
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७४९

# आव्हान




REFBK-0006126

ग० त्र्यं० माडखोलकर

वीणा प्रकाशन—१७

# आव्हान

ग्रंथ संग्रहालय
ग्र. क्र. ६१२६

गजानन त्र्यंबक माडखोलकर

REFBK-0006126

१ ऑक्टोबर १९४१ ]

[ मूल्य १॥ रुपया

प्रकाशक
**ब. गो. गर्गे एम्. ए.**
वीणाप्रकाशन,
नागपूर

संपादक
**ब. गो. गर्गे, एम्. ए.**
**द्वा. वा. घाटे,**
बी. ए., एल्एल्. बी.

या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, त्यांतील उतारे घेण्याचे वगैरे सर्व हक्क
**सौ. शांता माडखोलकर,** जी. ए.
शांतानिवास, मॉडेल मिल्स रोड, नागपूर शहर
यांच्याकडे आहेत.

मुखपृष्ठावरील चित्र मुंबईचे सुप्रसिद्ध चित्रकार
**श्री. दलाल** यांचें आहे.

मुद्रक
**पांडुरंग नारायण वनहट्टी,**
नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर

आमचे प्रिय सुहृद्

**श्री. सदाशिव हरि कुळकर्णी**

यांना प्रेमादरपूर्वक

**समर्पण**

## मुक्तात्मा

दुसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली

मूल्य २॥ रुपये

महाराष्ट्र ग्रंथभांडार, मुंबई ४

## आधुनिक कविपंचक

मूल्य १। रुपया

परचुरे, पुराणिक आणि मंडळी, मुंबई ४

**श्री. माडखोलकर यांचीं**

सर्व पुस्तकें

वीणा प्रकाशन

संस्थेकडे मिळतील

# भाषणानुक्रम


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | महेश्वर | मध्यभारतीय मराठी साहित्यसंमेलन (अधिवेशन चवथें) | ७ | जून | १९३७ |
| २ | उज्जयिनि | महाराष्ट्र वाङ्मयमंडळ (अधिवेशन आठवें) | ६ | जानेवारी | १९४० |
| ३ | पुणें | शारदोपासक संमेलन (अधिवेशन नववें) | २९ | मे | १९४० |
| ४ | कल्याण | मुंबई प्रांतिक साहित्यसंमेलन (अधिवेशन सातवें) | १६ | नोवेंबर | १९४० |
| ५ | बडोदें | मराठी वाङ्मयपरिषद (अधिवेशन सातवें) | १ | फेब्रुवारी | १९४१ |
| ६ | मुंबई | मराठी ग्रंथसंग्रहालय (वार्षिकोत्सव बेचाळिसावा) | २६ | जुलै | १९४१ |

# माडखोलकरांचीं पुस्तकें

## प्रबंध

१ आधुनिक कविपंचक
२ विष्णु कृष्ण चिपळूणकर
३ विलापिका
४ वाङ्मयविलास
५ स्वैरविचार
६ माझे आवडते लेखक
७ अवशेष
८ आव्हान
९ माझी नभोवाणी
१० माझे आवडते कवि

## कथासंग्रह

१ शुक्राचें चांदणें
२ रातराणीचीं फुलें

## नाटिका

१ उर्वशी
२ शर्मिष्ठा
३ अगस्त्य
४ नचिकेत
५ एकलव्य
६ वृत्रहंता

## कादंबऱ्या

१ मुक्तात्मा
२ भंगलेलें देऊळ
३ शाप
४ कांता
५ दुहेरी जीवन
६ मुखवटे
७ नवे संसार
८ डाक बंगला
९ चंदनवाडी
१० गोंडवन
११ उमरा

# निवेदन

या पुस्तकाला प्रथम 'आवाहन' म्हणजे 'आमंत्रण' हें नांव देण्याचा माझा विचार होता. कारण, त्यांत संकलित केलेल्या सहा भाषणांपैकीं पांच भाषणांतून महाराष्ट्राच्या एकीकरणासाठीं जरूर ती चळवळ करण्याची विनंती मराठी लेखकांना आणि जनतेला केलेली आहे. पण, इतक्या प्रांजळ भावनेनें केलेलीं हीं भाषणें म्हणजे जणुं कांहीं आपल्याला आव्हानेंच आहेत, अशा ईर्ष्येनें जे वाद त्यांवर करण्यांत आले, त्या वादांमुळें, मला मुळींच इच्छा नसतांनाहि, 'आव्हान' हें नांव त्यांना देणें भाग पडत आहे. त्याबद्दल माझ्या टीकाकारांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

'आव्हान' हें नांव आणखीहि एका कारणामुळें या भाषणांना शोभण्यासारखें आहे. महाराष्ट्राच्या एकीकरणाची कल्पना ही वस्तुतः वादातीत असावयाला पाहिजे. कारण, सरकार, राष्ट्रसभा आणि हिंदु महासभा या तिघांनींहि भाषावार प्रान्तरचनेची आवश्यकता मान्य केलेली आहे. तरी सुद्धां या कल्पनेला अनेकांचा प्रच्छन्न वा प्रकट विरोध असल्याचें प्रत्ययाला येतें. तेव्हां, त्या विरोधाची दरकार न करितां, त्यांचें तें आव्हान स्वीकारून ही चळवळ महाराष्ट्र जनतेनें ईर्ष्येनें करावी, या अर्थानेंहि माझ्या टीकाकारांच्या कृपेनें सुचलेलें हें नांव समर्पक ठरेल.

१९३७ च्या जूनपासून १९४१ च्या फेब्रुवारीपर्यंत पांच प्रांतिक परिषदांचीं अध्यक्षपदें मला देण्यांत आलीं. त्यांपैकीं चार अध्यक्षपदें तर गेल्या बारा तेरा महिन्यांतलींच आहेत. त्यांत मी गतवर्षीं नाकारलेलें आणखी एक अध्यक्षपद जमेस धरलें, म्हणजे प्रांतिक संमेलनें आतां बहुतेक संपल्यासारखींच होतात. अर्थात् यापुढें आयुष्याच्या उत्तरार्धांत मला कोणतेंहि प्रांतिक अध्यक्षपद लाभण्याचा आणि त्या निमित्तानें

बृहन्महाराष्ट्राचा नवीन भाग पाहावयाला मिळण्याचा संभव दिसत नाहीं. हें लक्षांत घेतां गेल्या वर्ष दीड वर्षांत झालेला माझा हा बोल-बोला मला एकंदरींत फार महाग पडणार आहे, याबद्दल हळहळ व्यक्त केल्याशिवाय राहवत नाहीं.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिकोत्सवाच्या अध्यक्षपदाचें आमंत्रण मला गेल्या वर्षींच आलें होतें. पण कांहीं खासगी अडच-णींमुळें मी त्या वेळीं त्याचा स्वीकार करूं शकलों नाहीं. यंदा जेव्हां पुन्हा संग्रहालयाच्या चालकांनीं मला आमंत्रण दिलें, तेव्हां मी तें स्वीकारलें; व ती संधि साधून स्वतःची भूमिका मी निस्संदिग्ध स्वरूपांत त्या अध्यक्षीय भाषणांत विशद केली. माझ्या पूर्वींच्या पांचहि भाषणांना हें भाषण पूरक असल्यामुळें, त्याचाहि समावेश प्रस्तुत पुस्तकांत केला आहे.

महायुद्ध सुरू झाल्यापासून गेल्या दीड वर्षांत यांपैकीं पांच भाषणें करण्याचे योग आले. साहित्यांत राजकारण कालविल्यानें त्याचा साजूकपणा बिघडतो, याची मला जाणीव आहे; व त्या दृष्टीनें या भाषणांवर जी टीका झाली, ती मला समर्पकच वाटली. रोज डोळ्यांपुढें चालू असलेल्या प्रचंड घडामोडींकडे पूर्ण दुर्लक्ष करून जे शांत चित्तानें कला आणि साहित्य यांच्या निरपेक्ष चर्चेंत निमग्न होऊं शकतात, ते स्थितप्रज्ञ साहित्यिक खरोखरीच धन्य होत. पण, अशा तऱ्हेची निर्विकल्प साहित्यसमाधि मला साधली नाहीं; व माझ्या सगळ्याच भाषणांना थोडा फार राजकीय रंग चढत गेला. माझा हा स्वभावदोष मला कळतो आणि त्याबद्दल खेदहि वाटतो. पण जित्याची खोड मेल्याशिवाय थोडीच जाणार ? तेव्हां, साहित्याच्या व्यासपीठावरून केलेल्या या राजकीय स्वरूपाच्या भाषणांना जर मुरब्बी साहित्यिकांनीं नाकें मुरडलीं, तर त्यांचा तो नाजूक अधिक्षेप मला विनम्र मस्तकानें सहन करणें प्राप्त आहे. या भाषणांत कांहीं विशिष्ट कल्पनांचा आग्रहानें पुरस्कार

केल्यामुळें बरीच पुनरुक्तिहि झालेली आहे. पण तिच्याबद्दल टीकेचे तडाखे सोसण्यासाठीं मन घट्ट करण्याशिवाय दुसरें माझ्या हातीं काय आहे?

या भाषणांत आलेल्या निरनिराळ्या प्रश्नांच्या चर्चेला चालना देईल, अशी प्रस्तावना मला हवी होती. म्हणून मी माझे विद्यार्थिदशे-पासूनचे स्नेही श्री. त्र्यं. वि. पर्वते यांना प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली. नव्या तत्वज्ञानांचा आणि प्रश्नांचा स्वतंत्र बुद्धीनें विचार करणारे जे थोडे बहुश्रुत अभ्यासक आज महाराष्ट्रांतील तरुण पिढींत आहेत, त्यांत श्री. पर्वते यांची गणना होते. माझ्या विचारांचा आणि लेखणीचा विकास गेलीं पंचवीस वर्षे ते किंचित् वडिलकीच्या कौतुक-मिश्र जिव्हाळ्यानें पहात आले आहेत. माझ्या विनंतीला मान देऊन त्यांनीं लिहिलेली निर्भीड प्रस्तावना या भाषणांना एका परीनें पूरक झाली आहे, असें मला वाटतें.

या भाषणांतून जे हिंदी, गुजराती आणि बंगाली भाषांतले उल्लेख किंवा उतारे आले आहेत, ते माझे सहकारी आणि मित्र श्री. विनायकराव गिजरे यांनीं काढून दिलेले आहेत. किंबहुना, या भाषणांची सर्व प्रकारची पूर्व तयारी त्यांनीं परिश्रमपूर्वक केल्यामुळेंच मला निरनिराळ्या प्रश्नांचा परामर्श त्यांत घेतां आला, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. श्री. गिजरे यांनीं गेलीं पंधरा वर्षे मला माझ्या लेखनव्यवसायांत निष्ठेनें साह्य केलें आहे. त्यांना या ऋणनिर्देशाची मुळींच अपेक्षा नाहीं. पण, मी बहुभाषाभिज्ञ असल्याचा जो गैरसमज क्वचित् आढळतो, तो दूर करण्यासाठीं मुद्दाम हा खुलासा करित आहे. मला मातृभाषेशिवाय अन्य कोणतीहि भाषा फारशी अवगत नाहीं.

डोळ्यांच्या अधुपणामुळें मी वाचन आणि लेखन या दोनहि बाबतींत अलीकडे परावलंबी झालों आहें. या भाषणांसाठीं संदर्भ काढण्याच्या, त्यांची मुद्रणप्रत तयार करण्याच्या, मुद्रितें तपास-

ण्याच्या वगैरे कामीं माझे तरुण साहाय्यक श्री. शेषराव भातंब्रेकर, श्री. माधवराव पारधी आणि श्री. ज. श्री. देशपांडे यांनीं तत्परतेनें केलेल्या साहाय्याचा येथें कृतज्ञतापूर्वक निर्देश करणें अवश्य आहे.

आम्हां उभयतांवर बंधुतुल्य लोभ करणारे माझे विद्यार्थिदशेपासूनचे स्नेही श्री. सदाशिवराव ऊर्फ नानासाहेब कुळकर्णी यांना हें पुस्तक आम्ही त्यांच्या अनुमतीविना अर्पण करीत आहों.

८ सप्टेंबर १९४१
शांतानिवास, नागपूर शहर

ग. त्र्यं. माडखोलकर.

# प्रस्तावना

माझे मित्र श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या भाषणांच्या संग्रहाच्या प्रस्तुत पुस्तकाला प्रस्तावनेदाखल कांहीं लिहिण्यास मी प्रवृत्त होत आहे यांत फारसें औचित्य नाहीं, असें, प्रस्तावना लिहिण्यास सुरुवात केल्यानंतरही, मला वाटत आहे. आमची दोघांचीही चाळिशी आतां उलटली आहे आणि या चाळिसांपैकीं उणींपुरीं पंचवीस वर्षें, एका गावांत वसती नसतांहि, आमचा मित्रपणा टिकून राहिला आहे. माडखोलकरांनीं कविता, निबंध, टीका वगैरे लिहिण्याला शाळेंत शिकत असतांच आरंभ केला; व तेव्हांपासून त्यांनीं जें कांहीं लिहून प्रसिद्ध केलें आहे, तें बहुतेक मीं वाचलेलें आहे, स्नेहमूलक सहानुभूतीनें वाचलेलें आहे, हें एकच कारण श्री. माडखोलकर यांना माझीच प्रस्तावना घेण्याचा आपला हट्ट कायम ठेवण्यास समर्पक वाटलें आणि म्हणून ही प्रस्तावना मी लिहीत आहे. परंतु, मला असें अवश्य वाटतें कीं, त्यांच्यापेक्षां बऱ्याच वडील अशा कोणी तरी त्यांच्या साहित्यिक मित्रांपैकीं एकाद्यानें ही प्रस्तावना लिहिली असती, तर तें ठीक झालें असतें.

श्री. माडखोलकर यांच्या कीर्तीचा सुगंध अखिल महाराष्ट्रभर दरवळलेला आहे ही गोष्ट अगदीं खरी. पण हा लौकिक त्यांनीं लेखक म्हणून मिळविला आहे, वक्ता म्हणून नव्हे. प्रस्तुत संग्रहांतील सहा निबंध हे त्यांनी वेगवेगळ्या सहा प्रसंगीं केलेलीं भाषणें आहेत. भाषणांचा म्हणून संग्रह प्रसिद्ध केल्यावर तरी ते पुष्कळ भाषणें करूं लागतील, अशी आशा करण्यास आतां हरकत नाहीं. परंतु, वक्ता म्हणूनहि लौकिक जर माडखोलकरांना मिळवावयाचा असेल, तर त्यांना

सध्यांप्रमाणें निबंधलेखनाचें स्वरूप आपल्या भाषणांना देऊन भागणार नाहीं. भाषण करण्यास बोलाविलें असतां ते प्रायः नकारच देतात, असा आतांपर्यंतचा जवळजवळ सार्वत्रिक अनुभव आहे. प्रस्तुतचीं सहा भाषणें कोणत्या ना कोणत्या तरी साहित्यिक मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं केलीं आहेत. परंतु, असलीं औपचारिक स्वरूपाचीं अध्यक्षीय भाषणें करण्याचें सोडून, मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या यंदाच्या वार्षिकोत्सवानिमित्त त्यांचा मुक्काम मुंबईत असतांना, त्यांनीं तीन चार ठिकाणीं जाहीर भाषणें केलीं. तीं सर्व चांगलीं वठलीं आणि 'नवा काळ' कचेरींत वर्तमानपत्रकारांच्या लहानशा सभेंत त्यांनीं आयत्या वेळीं लहानसेंच पण सुंदर असें जें भाषण केलें त्यावरून मला नक्की असें वाटतें कीं, थोड्याशा संवयीनें---आणि संवयीशिवाय दुसरी कसलीहि गरज त्यांना नाहीं---ते चांगले लोकप्रिय व प्रभावी वक्ते होतील.

श्री. माडखोलकर यांजपाशीं वक्तृत्वगुण निश्चितपणें आहेत. परंतु त्यांचा त्यांना अद्यापि भरवंसा वाटत नसावा असें दिसतें. बहुधा तें १९१४ किंवा १५ साल असावें. आम्ही दोघेही मुंबईच्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेंत शिकत होतों. त्या वेळीं 'मेरी सर्कल' या नांवाची अनेक शाळांतील कांहीं विद्यार्थ्यांनीं चालविलेली, वक्तृत्वकला व वाङ्मय या विषयांत लुडबुड करणारी, एक संस्था होती. आम्ही दोघेही तिचे सभासद होतों. त्या संस्थेचा एक वार्षिकोत्सव 'करमणूक' पत्राचे संपादक व सुप्रसिद्ध कादंबरीकार कै. हरी नारायण आपटे यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. त्या वेळीं कोणत्याशा विषयावर झालेल्या वक्तृत्वाच्या चढाओढींत आम्ही दोघेही सामील होतों. त्या वेळीं माडखोलकर जसे झपझप, निर्विकारपणें, कांहींही हावभाव किंवा हातवारे न करतां, आवाजाचे चढउतार न होऊं देतां आणि घाबरटपणें बोलले होते, त्याचप्रमाणें जवळजवळ गेल्या वर्षीं कल्याण येथें मुंबई साहित्यसंमेलनाच्या वेळीं समारोप करतांना बोलले! अध्यक्षीय भाषण

वाचतांना तर जणूं काय वाघच त्यांच्या पाठीस लागला होता! भाषेवर पहिल्या प्रतीचें प्रभुत्व, योग्य तेच शब्द यथास्थित व यथाकाल वापरण्याचें कसब, अनेक विषयांचें मधुकरवृत्तीनें सांठविलेलें ज्ञान व वाणीचा अस्खलितपणा हे गुण प्रकर्षानें अंगीं वसत असतांही माडखोलकरांना श्रवणीय भाषणें करतां न यावीं अथवा करावीं अशी हौस न वाटावी, ही एक नवलाची गोष्ट होती.

भाषणांचा म्हणून वेगळा संग्रह जर माडखोलकर न काढते तर ते वक्ते आहेत किंवा नाहींत, असले तर कसे काय आहेत, चांगले नसतील तर चांगल्या वक्त्यांत गणना होण्याची कोशीस त्यांनी कां करूं नये, वगैरे चर्चा या ठिकाणीं करण्याचें कारण नव्हतें. प्रस्तुत प्रसंगीं ती करण्यांत त्यांना थोडेंसें चिडवावें व जाहीर वक्तृत्वास अधिक प्रवृत्त करावें, असा माझा हेतु आहे! केवळ वर्तमानपत्रीय लिखाण आणि टीका–कादंबऱ्या लिहीत न बसतां, आणखी कांहीं सार्वजनिक हिताची कामगिरी उघडपणें करावी असें त्यांस वाटूं लागलें असावें, असें मानण्यास प्रस्तुत भाषणसंग्रह हा एक आधार आहे, असें मला वाटतें. महाराष्ट्र एकीकरण, महाराष्ट्रांत माजलेलें तथाकथित बौद्धिक अराजक, फासिझम, कम्युनिझम, लेखकांपुढें ध्येयें असण्याची जरूरी, रशियन क्रांतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन वगैरे प्रश्न विचारार्थ घेऊन लोकमताला वळण लावण्याची, तें संघटित करण्याची व पुढारीपणाच्या आविर्भावानें आणि अभिनिवेशानें तें प्रकट करण्याची जोखीम आपल्या शिरावर घेण्याची प्रशंसनीय आकांक्षा त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली आहे असें दिसतें. नवमहाराष्ट्राला अशा विचारी नेत्यांची खात्रीनें जरूर आहे, व त्यांचें या नात्यानें सर्वत्र स्वागतहि होईल. मात्र पुढारी बाण्याला अनुसरून, मिळेल त्या संधीचा फायदा घेऊन, जाहीर भाषणें करून या विषयांवरील आपलीं मतें पूर्ण विचारानें कायम करून लोकांपुढें मांडण्याला त्यांनीं धैर्यानें व नेटानें प्रारंभ केला पाहिजे. सध्यां-

प्रमाणें ज्या वेळीं जें मनांत उत्कटत्वानें खळबळत असेल, तें त्या वेळीं बोलून टाकून आपलीं मतें डळमळीत, अर्धकच्चीं व ठाम होणाऱ्या केवळ मार्गावरच असलेलीं अशीं आहेत, असें दाखवून चालणार नाहीं.

या पुस्तकांत आलेल्या सहा भाषणांत विवेचनासाठीं घेतलेले सार्वजनिक महत्वाचे प्रश्न असे आहेत कीं, त्यांबद्दल सध्यां सर्वत्र चर्चा चालू आहे. कांहीं प्रश्नांच्या चर्चेला पुष्कळसा रंग चढण्याचें कारण केवळ माडखोलकरांनी हे प्रश्न चर्चेला घेतले म्हणूनच चढला. कांहीं प्रश्नांवर आजमितीसही चर्चा चालू आहे. कारण सध्यांच्या युद्धानें ती चर्चा करणें अपरिहार्य करून सोडलें आहे. या सर्व प्रश्नांवर नवमहाराष्ट्राचें खरें हृद्गत बाहेर पडण्यासाठीं, नवमहाराष्ट्राला खरोखर कशाचा जिव्हाळा वाटतो हें समजण्यासाठीं आणि कोणी शहाणेसुर्तें देखील जर भ्रांतिष्टपणें, संकुचित भावनांच्या आहारीं जाऊन, उन्मार्गगामी होत असतील तर तें टाळावें म्हणून एकादी परिषद् भरवूनहि चर्चा केली पाहिजे. अशा चर्चेचा स्वाभाविक परिणाम असा होईल कीं, महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत पसरलेल्या तरुण मंडळीची एकविचाराची, परंतु विचारस्वातंत्र्याचा हक्क गमावून न बसलेली, अशी एक फळी निर्माण होईल. अशा फळीचे प्रवक्ते होण्याला माडखोलकरांसारखे खबरदार व खणखणीत गृहस्थ जर पुढें आले, तर ती एक अत्यंत इष्ट अशी घटना होईल आणि मग त्यांचें प्रतिभाशाली लेखनकौशल्य प्रतिभाशाली वक्तृत्वाचें रूप घेऊनहि प्रकट होईल, याबद्दल मला पूर्ण खात्री वाटते.

माडखोलकरांचें अंतःकरण एका देशभक्ताचें आहे, राजकीय स्वातंत्र्याची त्यांना मनापासून तळमळ आहे, समाजसुधारणेबद्दल त्यांना कळकळ वाटते, महाराष्ट्राच्या इतिहासाचा व परंपरेचा त्यांना अभिमान आहे, महाराष्ट्राच्या प्राचीन अर्वाचीन साहित्याबद्दल त्यांना

पराकाष्ठेची भक्ति आहे वगैरे गोष्टी सांगत बसण्याची जरूरी नाही. परंतु, त्यांचा उल्लेख एकवार इतक्यासाठींच करावयाचा कीं, त्यांच्या मनोरचनेची घडण अगर बैठक सामान्यपणें एकदम ध्यानांत यावी. ही बैठक एकदां लक्षांत घेतली म्हणजे त्यांच्या विचारांचा, मतांचा व लेखनाचा विकास कोणत्या ओघानें होत आला आहे, हें समजणें सोपें होतें. माडखोलकर देशभक्त आहेत हें मला, ते शाळेंत चवथ्या–पांचव्या यत्तेंत होते, तेव्हांपासून माहीत आहे. शाळेंत असतांनाच आमचा एक 'देशसेवकसंघ' होता आणि त्यांत असलेले सात आठ विद्यार्थी हे वेगवेगळ्या श्रेणींचे व प्रकारांचे देशभक्त होते. बहुतेक सर्व भावनेनें शिवरामपंत परांजपे यांचे चहाते, व्यवहारदृष्टीमुळे टिळकांचे भक्त व अनुयायी, गोखले यांना मवाळांत काढून साधारणपणें तुच्छच लेखणारे, बेझंटबाई व त्यांचे थिऑसॉफिस्ट शिष्य यांकडे साशंकतेनें पाहाणारे आणि कांहीं तर वासुदेव बळवंतांच्याहि पंथाचे कैवारी होते. गोखल्यांचीं भाषणें मनापासून वाचणारा, त्यांजविषयीं पक्षपात दाखविणारा व इंग्रजी वाङ्मय आणि इतिहास यांनीं या देशाच्या विकासाला इष्ट, उदात्त व प्रगतिपर वळण लाविलेलें आहे असें म्हणून इंग्रजी राज्याला निर्भेळ आपत्ति न समजणारा असा कदाचित् या 'देशसेवकसंघां'त मी एकटाच होतों म्हटलें तरी चालेल. आम्ही सर्वच आपलीं मतें, तयार कपड्यांसारखीं, कोणाच्या ना कोणाच्या तरी लेखांतून अगर पुस्तकांतून जशींच्या तशीं उचलीत होतों. कॉलेजमध्यें शिकूं लागल्यावर देखील बहुतेकांची स्थिति अशीच होती. माडखोलकर कॉलेजांत गेले नाहींत. परंतु आमच्यापैकीं कॉलेजमध्यें शिकणाऱ्या कोणाहि एकापेक्षां त्यांची इंग्रजी, मराठी व संस्कृत वाङ्मयांतील गति अधिक होती, वाचन विस्तृत होतें आणि कॉलेजांतून बाहेर पडून जो तो आपल्या मार्गाला लागण्याच्या सुमारास, वाङ्मयसेवा म्हणजेच देशभक्ति असें समीकरण माडखोलकर यांच्या दृष्टीनें तयार झालें होतें असें म्हणण्यास

हरकत नाहीं. देशभक्तीचे बाकी सर्व प्रकार त्यांनीं जरी कमी प्रतीचे मानले नसले, तरी त्यांची केव्हां केव्हां थट्टा करण्यापर्यंत त्यांची मजल पोंचली होती आणि आपल्या स्वतःच्या दृष्टीनें तरी वाङ्मयसेवा, ग्रंथलेखन व वाचन यांतच रमून जाणें आपल्याला मानवतें, असें त्यांनीं ठरविलें.

१९१३-१४ सालापासून साधारणपणें १९२१-२२ सालापर्यंत जे संस्कार मनावर झाले, जीं अनेकविध माणसें त्यांना भेटलीं, जे अनेक स्नेहीसोबती त्यांना लाभले त्या सर्वांचा परिणाम म्हणजेच आज स्वतःचे विचार आत्मविश्वासानें व सामर्थ्यानें पुढें मांडावयास तयार झालेले माडखोलकर होत. आज ते अशा अवस्थेंत आहेत कीं, कांहीं परिपक्व झालेले विचार आणि नक्की केलेलीं मतें आपण मांडावीं, त्यांना देशहितकारक समजणारे सहचर एकत्र करावे आणि सर्वांनीं मिळून अखिल महाराष्ट्राचा, इतकेंच नव्हे तर अलम् हिन्दुस्थानचा पाठिंबा त्या मतप्रणालीला मिळवावा. सुरुवातीलाच एकदां म्हटल्याप्रमाणें या त्यांच्या आकांक्षेला प्रस्तुतच्या सहाहि भाषणांत आधार आहे.

महाराष्ट्र एकीकरणाचाच विषय प्रथम आपण घेतला तर असें दिसेल कीं, सहापैकीं तीन भाषणांत त्यांनीं महाराष्ट्राच्या एकीकरणाचा उल्लेख केलेला आहे. मला असें नक्की आठवतें कीं, 'तिभंगलेल्या' महाराष्ट्राबद्दल श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं 'केसरी'मध्यें सुमारें तीस वर्षांपूर्वीं लिहिलें; व तो त्यांचा लेख चित्रशाळेनें प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या लेखसंग्रहाच्या पहिल्या आवृत्तींत आम्ही प्रथम वाचला. हा तिभंगलेला महाराष्ट्र एकसंध व्हावा आणि निजामाच्या राज्यांत व पोर्तुगीज मुलुखांत असलेले महाराष्ट्राचे तुकडे त्याला जोडून खरोखर पांच ठिकाणीं फांकलेल्या या महाराष्ट्राचें एकीकरण व्हावें अशा स्वरूपाची चर्चा आम्ही बावीस ते वीस वर्षांपूर्वीं एकदां केलेली होती; व आमच्या राजकीय आकांक्षांच्या प्रतिज्ञापत्रकाच्या मसुद्यांतील तें एक कलम होतें. हल्लीं संयुक्त महाराष्ट्र सभा निघाली आहे व महाराष्ट्राचें

एकीकरण हाच त्या सभेचा उद्देश आहे. मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांचा एकाच राजकीय विभागांत अंतर्भाव व्हावा हें एकच या सभेचें उद्दिष्ट. भाषावर प्रांतरचना सर्व हिन्दुस्थानांत व्हावी हें सरकार व लोकपक्ष या दोघांनाही मान्य असलेलें तत्त्व आहे हा या मागणीचा वा आकांक्षेचा मुख्य आधार. असें समजा कीं, निजामाच्या राज्यांतील व पोर्तुगीज अमलांत असलेल्या महाराष्ट्राची गोष्ट बाजूस ठेवून, उरलेला महाराष्ट्र एक व्हावा यावर एकमत झालें, परंतु गुजरात प्रांताला, विशेषतः मुंबई शहरांत असणाऱ्या त्याच्या हितसंबंधांच्या अनुरोधानें, याच नवीन प्रांतांत राहण्याची इच्छा असली, तर गुजरात व महाराष्ट्र यांचा संयुक्त प्रांत असण्याला संयुक्त महाराष्ट्र सभा हरकत घेईल कीं काय? एकभाषी प्रांत असण्याऐवजीं एकमेकांना अगदीं जवळ असलेल्या गुजराती व मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचा एक प्रांत असला तर काय बिघडेल? मुंबई शहराचा अंतर्भाव न करतां होईल तो एकीकृत महाराष्ट्र ही घटना महाराष्ट्रीय जनतेला रुचते काय? माझ्या दृष्टीनें, महाराष्ट्राच्या एकीकरणाचा, केवळ एकभाषी प्रांत करण्याच्या दृष्टीनें, पूर्ण विचार होऊं शकत नाहीं. एकीकृत महाराष्ट्र ही कल्पना विशेषतः मुंबई बेटाचा अंतर्भाव त्यांत न झाला तर अगदीं टाकाऊ आहे. कित्येक महाराष्ट्रीय देशभक्त तर असे आहेत कीं, मुंबई महाराष्ट्रांतून वगळली गेली तर बरा सुंठीवांचून खोकला गेला, असें त्यांना वाटतें. सांपत्तिक स्वयंपूर्णतेच्या दृष्टीनें, लोकाचार अधिकाधिक सुधारलेले होण्याच्या दृष्टीनें, बाह्य जगाशीं येणारा संबंध कमी कमी न व्हावा म्हणून, मराठी भाषेचा व वाङ्मयाचा अगदीं कडेपर्यंत अभिमान बाळगून व त्यांच्या अभिवृद्धीसाठीं झटूनहि इंग्रजी भाषेची संगत आहे अशी दृढ राहावी म्हणून निव्वळ महाराष्ट्राचें एकीकरण ही कल्पना सोडून देऊन मुंबई इलाख्याची पुनर्घटना या दृष्टीनें महाराष्ट्राच्या एकीकरणाचा विचार केला पाहिजे, असें मला वाटतें. माझे हे

विचार मीं 'इंडियन सोशल रिफॉर्मर' पत्राच्या २७ जुलै १९४० च्या अंकांत लिहिलेल्या एका लेखांत आलेले आहेत; तसेंच 'प्रकाश' या आतां बंद पडलेल्या साप्ताहिकाच्या त्याच सुमारास प्रसिद्ध झालेल्या एका अंकाच्या अग्रलेखांत मांडले आहेत. आणि श्री. दत्तो वामन पोतदार यांच्यासारख्या अस्सल, कडव्या मराठ्याच्या कानांवरहि घातले आहेत. बहुधा या गोष्टी ध्यानांत घेऊनच माडखोलकर बडोद्याच्या वाङ्मयपरिषदेंतील भाषणांत असें म्हणाले कीं, "कांहीं राजकीय ध्येयवाद्यांना तर असाहि मोह पडतो कीं, महाराष्ट्र व गुजरात यांचें एकीकरण करून पश्चिम भारतांत एक बलाढ्य संयुक्त राष्ट्र निर्माण करावें व कराचीपासून कारवारपर्यंत पसरलेल्या अफाट सिंधुसागरावर सत्ता गाजवून त्यानें हिंदुस्थानचा पश्चिम किनारा निर्भय करावा." पुढें एक वाक्य त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, "श्री. मुनशी यांनाहि ही कल्पना ग्राह्य वाटत असावी असें दिसतें. कारण महाराष्ट्र व गुजरात यांची फारकत झाल्यास चिमकल्या गुजरातची दारुण हानि होईल अशी भीति त्यांनीं व्यक्त केली आहे." श्री. मुनशींचें असें मत असेल, तर ती मोठी स्वागतार्ह गोष्ट आहे असें मी समजतों. माडखोलकर या 'विवाद्य' प्रश्नांत शिरावयास तयार नाहींत व वाङ्मयसेवकांच्या सहकार्यावर आणि वारंवार एकत्र येण्यावरच ते सध्यां संतुष्ट आहेत. परंतु अशी बगल देऊन चालणार नाहीं; व जें सांस्कृतिक सहकार्य त्यांना हवें आहे तेंहि राजकीय ऐक्याचा समान आधार असल्याशिवाय परिणामकारक रीतीनें होणार नाहीं. आपल्या देशभक्तीच्या मोघम कल्पनांना निश्चित स्वरूप देऊन त्या अंमलांत आणण्याच्या प्रयत्नांना लागणें म्हणजेच पुढारीपणाचें खरें कर्तव्य बजावणें होय. मराठा व गुजराती विचारवंतांनीं व पुढाऱ्यांनीं एक लहानशी परिषद् भरवून, एकमेकांचे विचार समजावून घेऊन व त्यांत जरूर त्या दुरुस्त्या उभयपक्षीं करून नंतर या विषयावर एक जाहीरनामा प्रसिद्ध केला पाहिजे.

महाराष्ट्राची पीछेहाट, महाराष्ट्रांत माजलेलें बौद्धिक अराजक, मुंबई व नागपूरसारख्या शहरीं चाललेली मराठी भाषेची गळचेपी वगैरे प्रश्नांसंबंधीं माडखोलकरांचें या भाषणांत ठिकठिकाणीं आलेलें विवेचन मोठें वक्तृत्वपूर्ण आहे. परंतु, त्यांना त्याबद्दल जो कळवळा वाटलेला दिसत आहे, तो पुष्कळसा विनाकारण आहे. महाराष्ट्रांत जन्मलेला, जन्मभाषा मराठी असलेला कोणी तरी पुढारी अग्रभागीं म्हणजे अग्रमानाच्या जागीं नसला, म्हणजे सगळ्या महाराष्ट्र जनतेची पीछेहाट झालेली आहे ही कल्पना अगदींच भोळसरपणाची आणि वरपांगी पाहाण्याच्या प्रवृत्तीची निदर्शक आहे. गेल्या वीस वर्षांत महाराष्ट्रांतील व हिन्दुस्थानच्या इतर सर्व प्रांतांतील जनतेची सर्व तऱ्हेनें प्रगतीच झालेली आहे. फक्त दारिद्र्य पूर्वींपेक्षां अधिक सार्वजनिक झालेलें आहे. परंतु स्वतःवरील संकटें, स्वतःसमोर संसारांत येणाऱ्या अडचणी या सगळ्या प्रांतांतील लोकांना सामुदायिक अर्थानें अधिकाधिक समजूं लागल्या आहेत, त्यांना अधिकाधिक लढाऊपणानें तोंड देण्याला ते शिकत आहेत. गांधींच्या अहिंसेच्या शिकवणुकींत बेडरपणा आहे कीं भेकडपणा आहे याबद्दल शाब्दिक काथ्याकूट न करतां, लोक अधिकाधिक लढाऊ झालेले दिसून येतात. कांग्रेस व गांधी यांच्या प्रभावाचा यांत कांहींच हिस्सा नाहीं काय? टिळक वीस वर्षांपूर्वी वारले तेव्हांचीच त्यांची शिकवणूक लोकांना अजून शिदोरीसारखी पुरत आहे काय? समाजवादी पंथांचा व प्रचारकांचा या जागृतींत व झुंजारवृत्तीच्या प्रवृत्तींत कांहींच वांटा नाहीं काय? कांहीं ललित आणि विनोदी लेखक भांबावले अथवा गांगरले असतील. सर्व जनतेची तशी स्थिति झालेली नाहीं व आत्मौपम्यबुद्धीनें ललित अगर लोकांची करमणूकच फक्त करण्याची आकांक्षा धरणाऱ्या लेखकांनीं हे आरोप दुसऱ्यांवर करण्याचें कांहीं कारण नाहीं. सरहद्दीवर असणाऱ्या शहरांत या किंवा त्या भाषेचें वर्चस्व झालें, तर त्याचेंही इतकें वैषम्य कशाला वाटावयास पाहिजे? जी

भाषा व्यवहारांत अधिक उपयुक्त अगर सोईस्कर असेल तिचें वर्चस्व होईल. नागपुरांत कांहीं जास्त मराठे हिन्दुस्तानी बोलूं लागले अगर मुंबईत मराठ्यांना गुजरातींत व्यवहार करावा लागला तरी त्याचा एवढा कांही शोक करण्याचें कारण नाही. खरें म्हटलें तर अशा सरहद्दीवरच्या ठिकाणीं लोक आपोआपच दुभाषी होतात व तो एक फायदाच आहे. परप्रांतांत वसाहती करणारे मराठे जेव्हां मराठीच्या संरक्षणाची अवास्तव ओरड चालवितात तेव्हां मला वाटतें 'मग हे परप्रांतांत जातात कशाला ?' ज्या प्रांतांत राहावयाचें त्या प्रांताची भाषा आत्मसात् करावी, आपल्या मुलांना जन्मभाषेसारखी शिकवावी आणि गमतीखातर अथवा पाहिजे तर कांहीं परंपरेच्या अभिमानासाठीं म्हणा, खाजगी, घरगुती प्रयत्नांनीं मराठी भाषा व मराठी म्हणून सांगितले जाणारे आचारविचार टिकतील त्या प्रमाणांत टिकूं द्यावे. याहून जास्त स्तोम माजविण्याचें कारण नाहीं. आपल्या प्रांतांत जे कोणी परदेशी येतील ते मराठी शिकतील व मराठींतून व्यवहार करतील. इतिहासांत हें नेहमींच घडत आलेलें आहे. आतांच्या युगांत क्षुद्र अभिमान बाजूस ठेवून एक माणुसकीचा, बंधु-भावनेचा, परस्परसहकार्यानें सुखी होण्याच्या मानवधर्माचाच अभिमान धरण्यास शिकविण्याची जास्त जरूरी आहे.

समाजवाद, फासिझम, कम्युनिझम, लोकशाही, सामुदायिक नेतृत्व, लाल साम्राज्यशाही वगैरे विषयांवरहि माडखोलकर आपल्या भाषणांत मधूनमधून फुटकळपणें बोलले आहेत. यांपैकीं कशाला ते नक्की अनुकूल आहेत याबद्दल निखालसपणें बोलणें जरा कठीणच आहे. परंतु त्यांचें या संग्रहांतील जें भाषण बडोद्याला झालें व त्यापूर्वीचें कल्याणास झालें हें ध्यानांत घेतलें म्हणजे त्यांचे या दोन भाषणांत प्रकट झालेले विचार हे अगदीं ताजे मानले पाहिजेत. तेच कायम होतील तर अथवा त्याच वळणानें यापुढें त्यांचे विचार चालतील तर माझे त्यांचे विचार बरेचसे जमतात असें मला म्हटलें पाहिजे. या दोनहि

भाषणांपूर्वी पुण्यास शारदोपासक संमेलनाच्या नवव्या अधिवेशनाच्या वेळीं त्यांनीं जें भाषण केलें, तें त्या वेळीं फार गाजलें. टीकेचा पुष्कळच भडिमार त्यावर झाला. भांबावलेल्या आणि बावरलेल्या मनःस्थितींत भाषण करीत असल्याची कबुली त्यांनीं स्वतःच सुरुवातीला देऊन टाकल्यामुळें कांहींची टीका सहानुभूतीची तर कांहींची कठोर होती. पण बहुतेक टीकाकार त्यांना प्रतिकूल होते हें ध्यानांत घेतलें पाहिजे. "एकादा महान् नेता, एकादें महान् ध्येय आणि एकादा महान् कार्यक्रम स्फूर्ति व प्रेरणा" देण्यासाठीं नसल्यामुळें सर्वत्र बजबजपुरी माजली आहे असें त्यांना वाटलें; व ती मोडून काढावी म्हणून असा नेता पाहिजे अशी फासिस्ट पद्धतीची घोषणा त्यांनीं केली. विचारांची अनेकता, कार्यक्रमांचा विविधपणा व पुढाऱ्यांचा सुकाळ असला तरी चालेल पण फासिस्टांची मनुष्यांना केवळ यंत्रें करून टाकणारी शिस्त व कार्यक्षमता नको. सुधारणा कितीहि विलंबानें होवो पण ती सर्वांना उच्चारस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, संघस्वातंत्र्य मिळून लोकशाही मार्गांनींच व्हावी अशीं मतें असणारांनीं माडखोलकरांची खणखणीत हजेरी लेखांनीं आणि संभाषणांनीं घेतली. भांबावलेले माडखोलकर हेमगर्भाची मात्रा मिळाल्याप्रमाणें सावध झाले. त्यांच्याप्रमाणें ज्यांचीं डोकीं भरकटावयास लागलीं होतीं त्यांचे विचार उघडपणें बोलून दाखवून व त्या सर्वांनाच सदर टीका सोसावयास लावून माडखोलकरांनीं तरुण महाराष्ट्राची फार मोठी सेवा केली आहे. टीकेनें शहाणें होण्याचा गुण माडखोलकर यांचे अंगीं आहे. टीकेनें ते रागावत नाहींत; आपला योग्य तो फायदा करून घेतात. याचें प्रत्यंतर लगेच कल्याणच्या भाषणांत मिळालें. 'शास्त्रीय व सुसंस्कृत लोकशाही', 'राजकीय व औद्योगिक लोकशाही', 'सामुदायिक नेतृत्व' वगैरे कल्पनांचा पुरस्कार त्यांच्या भाषणांत आला आणि पुण्याची चूक दुरुस्त करून वैचारिक दृष्टीनें आपली प्रकृति सुदृढ आहे असें त्यांनीं दाखवून दिलें. 'धनुर्धारी'

पत्रांत या निमित्तानें आलेल्या लेखनाचा त्यांना चांगला फायदा झाला असला पाहिजे, असा माझा कयास आहे. बडोद्याच्या भाषणांतहि त्यांनीं त्याच कल्पना निराळ्या शब्दांत पुनः मांडल्या. नवीन महाराष्ट्रांत या त्यांच्या विचारांबद्दल समाधान वाटत असलेलें पुनः प्रत्ययास आलें.

नवीन महायुद्धानें कित्येक लोकांच्या पूर्वग्रहांना अथवा मतांना बरेच धक्के बसले. परंतु ज्यांनीं मूलतत्वांचा, मूलभूत उपपत्तींचा नीट अभ्यास केला होता, त्यांना त्या धक्क्यांनीं भांबावून जाण्याचें कारण पडलें नाहीं. ग्रेट ब्रिटन व अमेरिका यांची लोकशाही कितीहि बेगडी अथवा माडखोलकर म्हणतात त्याप्रमाणें 'मायावी आणि मतलबी' असली, तरी हुकूमशाहीपेक्षां पुष्कळ चांगली. लोकप्रतिनिधींच्या विचारानें राज्यकारभार व समाजांतील इतरहि चळवळी व कार्यक्रम करण्याची लोकशाही पद्धति ही इंग्लंडच्या परंपरेंत अनेक शतकें दिसून येते. आज युद्ध चालू असतांहि ब्रिटिश पार्लमेंटाला प्रधानांच्या कारभारावर टीका करतां येते, जाब विचारतां येतो, मंत्रिमंडळें बदलतां येतात. नागरिकत्वाच्या हक्कांवर कितीहि निर्बंध पडले, तरी फासिस्ट अगर नाझी राज्यांत आहे त्याप्रमाणें माणसांना गोठ्यांतल्या पशूंप्रमाणें वागविण्यांत येत नाहीं. जीं धोरणें राज्यकारभार चालविणारे आंखतात, त्यांना त्याबद्दलचे खुलासे द्यावे लागतात, लोकप्रतिनिधींची समजूत घालावी लागते. हें काम कंटाळवाणें, त्रासदायक व केव्हां केव्हां कार्यक्षमतेला बाधक होतें. परंतु एकतंत्री राज्याची जुलमी होण्याकडे प्रवृत्ति होते यासाठीं इतिहासानें तें टाकाऊ ठरविलें आहे. त्याची पुनरावृत्ति जगभर होऊं देण्यांत मनुष्यजाति आपलें नुकसान करून घेईल हें आम्ही कधींहि विसरतां उपयोगी नाहीं. आमचीहि प्रगति होणार असेल तर याच मार्गानें होईल, येथें हुकूमशहा व हुकूमशाही येऊन होणार नाहीं. या मूलतत्वाचा विसर आपणांस पडण्याचें कारण काय? ब्रिटिशांनीं आमचे सहस्र अपराध केले असतील, परंतु नाझींना यश चिंतिण्याचें

आम्हांला काय प्रयोजन? अशा प्रकारच्या प्रवृत्ती जेव्हां बळावतात, तेव्हां त्यांना पायबंद घालणें हें विचारवंतांचें कर्तव्य ठरतें.

कम्युनिझम व रशियाचा ध्येयवाद यांसंबंधींहि बरीच मंडळी युद्ध सुरू होतांच अशीच बावचळली. रशियांत सध्यां अधिकारारूढ असलेल्या स्टालिनपक्षानें अथवा स्टालिननें अनेक घोर कृत्यें केलीं म्हणून पुष्कळ लोकांना सात्त्विक संताप आला. ती गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे. जे आपणांला समाजवादी अगर कम्युनिस्ट म्हणवीत होते त्यांजकडून मात्र यापेक्षां जास्त अपेक्षा होती. रशिया राष्ट्रवादी बनला, त्यानें जागतिक क्रांतीचें तत्त्व कायमचें झुगारून दिलें, रशियांत भांडवलशाही सुरू झाली आहे, पोलंड, लाटविया, लिथुनिआया वगैरे जिंकण्यांत रशिया साम्राज्यवादी झाल्याचेंच दिसून येतें वगैरे गोष्टी समाजवादी म्हणविणारेहि जेव्हां बोलूं लागले, तेव्हां इतकेंच म्हणणें प्राप्त झालें कीं, स्टालिनच्या आमदानींत रशियाच्या जगत्क्रान्तिविषयक धोरणांत जो ढिलेपणा दिसून आला, त्यामुळें रशियाच्या ध्येयवादित्वाबद्दलचा यांचा विश्वास फारच डळमळला आहे. रशियांत सुरू झालेल्या समाजवादाची प्रगति होण्या-ऐवजीं पिच्छेहाट होण्याचा संभव त्यांना दिसावा, अशा कांहीं गोष्टी घडल्या हेंहि खरें. स्टालिनच्या कारकीर्दींत कम्युनिस्ट पक्षांतील लोकशाही नाहींशी होऊन स्टालिनची हुकूमशाही आली आणि त्या हुकूमशाहीचा अंमल करणाऱ्या अधिकारी लोकांना अधिक वेतन, त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या म्हणजेच सरकारी अधिकारी बनण्याच्या अधिक सोयी, शिल्लक सरकारी रोख्यांत गुंतविण्याच्या सवलती मिळून हा एक नवाच सरंजामदार वर्ग निर्माण होत आहे, हें पाहून समाजवाद्यांना धास्ती वाटावी हें साहजिक होतें. त्यांची स्टालिनच्या रशियावरील टीका समाजवाद रक्षिला व वाढविला जावा म्हणूनच झाली. तथापि एका देशापुरताच, शक्य आहे म्हणून, समाजवादाचा प्रयोग करणारा रशिया, आपल्या जागतिक क्रान्तीची वाट चालत असतां, कोठें ठेंचाळला

अथवा अडखळला हें सहानुभूतीनें पाहण्याचें इतर राहिलेल्या जगांतील समाजवाद्यांचें कर्तव्य आहे ही जाणीव नाहींशी मात्र झाली नव्हती आणि जर्मनीचं रशियावर एकाएकीं उलटल्यावर तर अशा समाजवाद्यांची 'अस्मिता' पूर्णपणें जागी झाली आहे. जगांतील सर्व दलित राष्ट्रांचा व वर्गांचा ध्येयदर्शी आधारस्तंभ म्हणून फिरून रशियाला ओळखण्या-इतकें प्रसंगावधान दाखविलें जात आहे. रशिया आपल्या स्वतःच्या संरक्षणासाठींच लढत आहे हें खरें असलें, तरी त्यांतच समाजवादी ध्येयाचें रक्षण होतें अशा कबुल्या टीकाकार आपण होऊन देत आहेत. रशियाचा पाडाव झाला व फासिझम विजयी झाला तर जग पुनः किती शतकें मागें पडेल याची कल्पना करण्याइतकीं बहुतेक प्रागतिक विचारसरणीच्या लोकांचीं डोकीं ठिकाणावर राहिलीं, ही खरोखर मोठी सुदैवाची व आम्ही भ्रांतचित्त झालों नाहीं याची निदर्शक गोष्ट आहे.

रशियाचा व इंग्लंडचा मी मनापासून पक्षपाती आहे ही गोष्ट युद्धाच्या सुरवातीपासून मी सातआठ महिने 'ज्योत्स्ना' मासिकांत लिहीत असें त्यांत व रेडियोवरून दिलेल्या कांहीं व्याख्यानांत स्पष्ट झालें आहे. स्टालिनच्या अमदानींत रशियन राज्यघटनेंत व प्रत्यक्ष कारभारांत इतके फरक झाले आहेत कीं, रशियांतील अंतर्गत राज्यकार-भार हा नाझीशाहीची एक प्रतिकृति झाली आहे; स्टालिननें निर्माण केलेल्या नोकरशाहीची तुलना इंग्लंडसारख्या देशांत ज्यांना 'गव्हर्निंग क्लास' अथवा राज्यकर्त्यांचा वर्ग म्हणून आपण ओळखतों त्याशीं करतां येईल, या नोकरशाहीला इतरांपेक्षां अनेक जादा सवलती व हक्क मिळतात यामुळें याच वर्गाला आपली सत्ता कायम राहावी असें वाटूं लागलें आहे वगैरे आक्षेपांत पुष्कळ तथ्य आहे. तथापि खाजगी मिळकत फायदा उकळण्यासाठीं कोणालाही ठेवतां येत नाहीं आणि जें जें कांहीं करणें असेल तें लोकांचें जीवन अधिकाधिक सुखी करण्याकरतांच होईल या तत्वज्ञानापासून व व्यवहारापासून स्टालिनवाद्यांनाही दूर जातां

येत नाहीं. नाझी राजवटींत राज्याला महत्व आहे, माणसें हीं राज्याकरितां आहेत या तत्त्वाचा प्रभाव आहे; तर सोविएटमध्यें माणसांकरितां राज्य-संस्था आहे असें मानलें जातें, हा तत्त्वाचा मोठाच फरक आहे. इंग्लंड व अमेरिका लोकशाहीचा मंत्र जपतात. यासाठींच या लढाईत पूर्वी इंग्लंडला व आतां रशिया, इंग्लंड व अमेरिका यांना आपण यश चिंतिणें अगदीं रास्त आहे. आमच्या राजकीय व सामाजिक स्थितींत इष्ट दिशेनें सुधारणा, इंग्लंड, अमेरिका व रशिया यांच्या जयानेंच, होण्याचा कांहीं तरी संभव आहे; नाझी जगज्जेते झाले तर मुळींच नाहीं.

रशिया, कम्युनिझम वगैरे विषयांवरील हें लिहिणें कांहींसें त्रोटक दिसेल. पण प्रस्तावनेंत लिहिणारानें लिहावें तरी किती? माडखोलकरांच्या भाषणांत हे विषय आले असल्यानें प्रस्तावना लिहिणारानें आपलें म्हणणें निदान थोडक्यांत लिहिणें मात्र जरूर आहे. शिवाय मला जें वाटलें तें मी उघडपणें न लिहिलें, तर ही प्रस्तावना लिहिण्याचें प्रयोजन तरी काय? माडखोलकरांना माझ्या प्रस्तावनेनें कांहीं जास्त लौकिक अगर लोकप्रियता मिळणार आहे अथवा प्रकाशकांना पुस्तक अधिक खपेल असें वाटावें असें माझें स्थान मराठी वाचकवर्गांत नाहीं हें मी जाणतों. माडखोलकरांच्या हट्टासाठीं, त्यांच्या सुंदर भाषणांबरोबर, प्रस्तावनेची ही रुक्ष कटकट वाचकांना सोसणें प्राप्त आहे. माडखोलकरांचीं हीं भाषणें प्रस्तावना लिहिण्याच्या निमित्तानें मला फिरून एकदां व अधिक लक्षपूर्वक वाचावीं लागलीं, यांत माझा निःसंशय फायदा झाला. प्रत्येक भाषणांत सुरुवातीलाच, ज्या शहरांत भाषण करावयाचें त्या शहराच्या लोकांना विश्वासांत घेण्यासाठीं, त्या शहराच्या महत्त्वाचें वर्णन माडखोलकरांनीं किती आर्जवानें, गुणग्राहकतेनें व यथार्थतेनें केलें आहे, हें मला हीं भाषणें एकत्र वाचलीं नसतीं तर कधींच कळलें नसतें. कला व जीवन या वादावरील त्यांचें विवेचन मला आवडलें व पटलेंहि. पण एरवीं तें मी फिरून वाचण्याचा कांहीं संभव नव्हता.

या भाषणांच्या संगतींत मी दोनतीन दिवस मोठ्या आनंदानें घालविले; व तशी संधि आग्रहानें आणून दिल्याबद्दल मी अर्थातच त्यांचा आभारी आहे.

या भाषणसंग्रहाला माडखोलकरांनीं 'आव्हान' असें नांव दिलें आहे. टीकाकारांना व विचारवंतांना हें अधिक विचार करण्याबद्दल व अधिक टीका करण्याबद्दल निमंत्रणच आहे. 'आव्हान' याचा आपणास चांगला माहीत असलेला अर्थ इंग्रजींतील 'चॅलेंज' शब्दानें व्यक्त होतो. माडखोलकरांना आपलीं मतें आतां ठाम बनल्याबद्दलचा विश्वास वाटत असेल. तसें वाटण्याला त्यांचीं शेवटचीं तीन भाषणें हा भरपूर पुरावा आहे आणि म्हणून त्यांनीं इतरांना 'करा आतां दोन हात' असें म्हटलें तरी काय बिघडलें ?

मुंबई
९ सप्टेंबर १९४१

त्र्यंबक विष्णु पर्वते

# वीणा प्रकाशन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | समरभूमि | प्रो. फडके | ... | १-८-० |
| (२) | स्वैरविचार | श्री. माडखोलकर | ... | १-८-० |
| (३) | दोन मनें | ,, खांडेकर | ... | २-०-० |
| (४) | कांता | ,, माडखोलकर | ... | २-०-० |
| (५) | आविष्कार | ,, गीता साने | ... | १-८-० |
| (६) | हेमलता | ,, द्वा. वा. घाटे | ... | १-०-० |
| (७) | पांढरे ढग | ,, खांडेकर | ... | २-०-० |
| (८) | निष्कलंक | ,, कु. कमल दिक्षीत | ... | १-४-० |
| (९) | विशाल जीवन | ,, पी. वाय. देशपांडे | ... | २-०-० |
| (१०) | उषःप्रभा | ,, मांजरेकर | ... | १-४-० |
| (११) | झंझावात | ,, बोकील | ... | २-०-० |
| (१२) | पहिली लाट | ,, खांडेकर | ... | १-८-० |
| (१३) | साकी | ,, बी. रघुनाथ | ... | १-०-० |
| (१४) | मुखवटे | ,, माडखोलकर | ... | २-८-० |
| (१५) | काळी राणी | ,, पी. वाय. देशपांडे | ... | २-८-० |
| (१६) | स्वीकार | ,, शरच्चंद्र टोंगो | ... | १-८-० |
| (१७) | आव्हान | ,, माडखोलकर | ... | १-८-० |
| (१८) | संक्रमण | ,, वरखेडकर | ... | १-८-० |
| (१९) | एकांकिका | ,, काणेकर | ... | १-८-० |
| (२०) | साहित्य आणि संस्कृति | श्री. स. खु. पांडे | ... | ३-०-० |

## आगामी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (२१) | माझा लढा | श्री. अडॉल्फ हिटलर | ... | ३–८–० |
| (२२) | डाक बंगला | ,, माडखोलकर | ... | २–०–० |
| (२३) | निरंकुश | ,, प्रो. आळतेकर | ... | २–०–० |
| (२४) | मोंगल दरबारांतील रहस्यें | श्री. देशपांडे | ... | २-१२-० |
| (२५) | खेळगडी | ,, उमाकांत भेंडे | ... | २–०–० |
| (२६) | चार भिंती | ,, खांडेकर | ... | ... |
| (२७) | नवीं मूल्यें | ,, पु. य. देशपांडे | ... | ... |
| (२८) | नवयुगाचे सहप्रवासी | ,, प्रभाकर पाध्ये | ... | ... |
| (२९) | फुलें नी कांटे | ,, खांडेकर | ... | ... |
| (३०) | दुसरी लाट | ,, खांडेकर | ... | ... |

## आमचीं इतर प्रकाशनें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | धबधब्याच्या धारेंत | प्रो. पाठक | ... | १-१२-० |
| (२) | पतितेचें हृदय | श्री. गडकरी | ... | १–८–० |
| (३) | कूजन (काव्य) | ,, हुताश | ... | १–४–० |
| (४) | शर्वरी (काव्य) | ,, हुताश | ... | १–८–० |
| (५) | सन १८५७ | ,, हंबर्डे | ... | ०-१२-० |
| (६) | बिगारीचा बैल | ,, हंबर्डे | ... | ०–६–० |

# प्रांतिक साहित्यसंमेलनांची आवश्यकता

अलिकडे महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत स्थानिक साहित्य-संमेलनें भरविण्याची प्रथा रूढ झाली असून, बृहन्महाराष्ट्रांतील सर्व महत्त्वाच्या शहरांतून मराठी भाषेचे उत्सव सालोसाल मोठ्या उत्साहानें साजरे केले जात असतात. ही प्रथा पाडण्याचें श्रेय नागपूर–वऱ्हाड प्रांताला दिलें, तर तें गैर होईल, असें वाटत नाहीं. किंबहुना, प्रांताभिमानाचा आरोप होण्याची भीति पत्करूनही, वैदर्भीयांनीं प्रांतिक संमेलनें रूढ करण्याच्या कामीं पुढाकार घेतला, हें त्यांना भूषणावह आहे. दहा वर्षांपूर्वी विदर्भ साहित्यसंघ स्थापन झाला त्या वेळीं व विशेषतः नागपुरास त्याचें अधिवेशन भरलें त्या प्रसंगीं प्रांतिक संमेलनांच्या इष्टानिष्टतेबद्दल बरेंच वादरण नियतकालिकांतून माजलें होतें. या संमेलनांविरुद्ध मुख्य आक्षेप असा कीं, त्यांमुळें प्रांतिक अभिमानाला ऊत येऊन राष्ट्रीय भावनेला ओहोट लागेल. विदर्भ साहित्यसंमेलनाला ज्यांनीं विरोध केला, त्यांच्या मनांत हीच भीति बव्हंशीं वागत होती.

पण गेल्या दहा वर्षांच्या अनुभवानें ती भीति खोटी ठरविली आहे. आरंभीं फक्त नागपूर–वऱ्हाड प्रांताचेंच वेगळें साहित्यसंमेलन भरत असे. पण, आतां मध्यहिंदुस्थान, गोमंतक, निजाम–हैद्राबाद, बडोदें इत्यादि भागांचीं वेगवेगळीं संमेलनें भरूं लागलेलीं असून, गेलीं दोन वर्षें मुंबई शहराचेंही स्वतंत्र संमेलन होऊं लागलें आहे. या बाबतींत खेदाची गोष्ट अशी कीं, ज्या विदर्भ साहित्यसंघाच्या उद्योगामुळें प्रांतिक संमेलनांच्या प्रथेला मूळ चालना मिळाली, त्याचें संमेलन मात्र अलिकडे पांच वर्षें भरत नाहीं. जणुं कांहीं ही प्रांतिक संमेलनांची प्रथा प्रचलित करण्यासाठींच हा संघ अस्तित्वांत आला होता! याशिवाय मंडलेश्वर, उज्जयिनी, मडगांव, हैद्राबाद, पुणें, मुंबई इत्यादि ठिकाणच्या साहित्य-संस्थांच्या वार्षिक उत्सवांच्या रूपानें जीं संमेलनें भरतात, तीं वेगळींच.

ही प्रांतिक संमेलनांची प्रथा जर खरोखरीच अनिष्ट असती, तर गेल्या दहा वर्षांत तिची अनिष्टता थोडी तरी प्रत्ययाला आली

नसती काय? पण तसें कांहींच घडलेलें दिसत नाहीं. उलट, मराठी भाषेच्या संवर्धनाच्या चळवळीला त्यामुळें जोर आला असून, सर्व महाराष्ट्रांत एक प्रकारची वाङ्मयविषयक जागृति झालेली दृष्टीस पडत आहे. या संमेलनांवरील मुख्य आक्षेप जो प्रांतिक अभिमानाला चेतना देण्याचा तो दोष न वाटतां विचारांतीं गुणच वाटतो. प्रांतिक अभिमान म्हणजे काय? तर त्या त्या ठिकाणची विशिष्ट बोली, लेखनसंप्रदाय, संशोधन, साहित्यसंस्था आणि लेखकवर्ग यांना उत्तेजन देण्याची प्रवृत्ति. या प्रवृत्तींत खरोखरी गैर काय आहे? महाराष्ट्रांत दर जिल्ह्यागणिक वेगळ्या प्रकारची बोली प्रचारांत असून, प्रत्येक बोलीचें शब्दभांडार आपआपल्यापरीनें बरेंच स्वतंत्रहि आहे. त्या त्या भागाच्या अभिमानानें या भांडारांतील वेचक शब्द जर त्या त्या भागांतील साहित्यिकांनीं आपल्या लिखाणांतून उपयोगांत आणले, तर मराठी भाषेची शब्दसंपत्ति वाढणार नाहीं काय? महाराष्ट्राच्या सर्वसामान्य रूढ ग्रांथिक भाषेच्या महत्त्वाला बाध न येतां जर ठिकठिकाणच्या स्थानिक बोलींतील चांगल्या शब्दांची भर तींत पडली, तर तो एक फायदा नव्हे काय? प्रांताभिमानाच्या भरांत जोंपर्यंत स्थानिक बोलींत ग्रंथ लिहिण्याचा अट्टाहास कोणी करीत नाहीं, तोंपर्यंत तरी त्या अभिमानाला भिण्याचें मुळींच कारण नाहीं.

उलट, स्थानिक बोली आणि ग्रांथिक भाषा यांच्यांत जर सहकार्य घडून आलें, तर ग्रांथिक भाषेला कालांतरानें येणारें जाड्य आणि कृत्रिमता नाहींशी होऊन तिच्यांत नेहमीं चैतन्य खेळत राहील व तिचा विस्तार होत जाईल. नैसर्गिक दृष्टीनें महाराष्ट्र हा एकसंध आणि एकजिनसी प्रांत नाहीं. महाराष्ट्राच्या कांहीं भागाला समुद्रकिनारा लाभलेला आहे; तर कांहीं भाग दाट झाडींत दडलेला आहे; कांहीं भाग डोंगराळ आहे; तर कांहीं सपाट आहे; व कांहीं जलमय आहे, तर कांहीं निर्जल आहे. अर्थात् या प्रत्येक भागांतील परिस्थिति, व्यवसाय, रहाणी, पिकें वगैरे अगदीं भिन्न आहेत. कोंकण आणि वऱ्हाड हे दोन प्रांत

घेतले, तर त्यांच्या नैसर्गिक संपत्तींत, राहणींत, कुळाचारांत, सणावारांत आणि बोलींत विलक्षण अंतर आढळतें. या परिस्थितिभेदाचा परिणाम अर्थात्च बोलीवर आपोआप होतो. दर्यावर्दीपणासंबंधीं जे अनेक शब्द समुद्रकांठच्या कोंकणांत लोकांच्या तोंडीं खेळत आहेत, त्यांतला एखादाहि वऱ्हाडांत गेलें असतां कानांवर पडणें कठीण. उलट कपाशी, ज्वारी, संत्रा वगैरे पिकांमुळें नागपूर–वऱ्हाडांतील बोलींत जे शब्द रूढ आहेत, ते कोंकणांत कुठून ऐकावयाला मिळणार? प्रांतिक संमेलनें आणि तज्जन्य अभिमान यांच्यामुळें असा फायदा होईल कीं, हे स्थानिक बोलींतील शब्द त्या त्या ठिकाणींच वापरले न जातां ग्रांथिक भाषेंत घुसून तिचें अभिव्यक्तीचें सामर्थ्य आणि वैभव हीं दोन्ही वाढवतील.

प्रांतिक संमेलनांचा दुसरा फायदा स्थानिक लेखकवर्ग, साहित्यसंस्था आणि संशोधन यांना चालना मिळणें हा होय. नागपूर–वऱ्हाडांत, निझामशाहींत, मध्य हिंदुस्थानांत, गोमंतकांत आणि बृहन्महाराष्ट्राच्या बडोदें वगैरे भागांत जी वाङ्मयविषयक जागृति अलिकडे दृष्टीस पडत आहे, तिचें श्रेय जर या स्थानिक संमेलनांना दिलें, तर तें खचित वावगें होणार नाहीं. हीं संमेलनें उत्साह उत्पन्न करतात, मार्ग दाखवितात आणि संघटन घडवून आणतात. प्रांताच्या विशिष्ट गरजांची आणि परिस्थितीची चर्चा त्यांतून होते; व त्यामुळें लेखकवर्गाला आपल्या कर्तव्याचा निश्चित बोध होतो. अखिल महाराष्ट्राच्या साहित्यसंमेलनांत फक्त धुरंधर लेखकांनाच प्रामुख्य मिळूं शकतें; व सर्व महाराष्ट्राला सामान्य अशाच वाङ्मयविषयक प्रश्नांचा विचार केला जातो. प्रांतिक संमेलनांतून त्या त्या ठिकाणच्या लहानसहानहि लेखकांच्या गुणांची बूज हौसेने केली जाऊन त्यामुळें तेथील साहित्यिकांना आणि साहित्यसंस्थांना एक प्रकारचें प्रोत्साहन मिळतें. प्रांतिक संमेलनांचे हे सारे फायदे लक्षांत घेतले असतां तीं संमेलनें भरूं नयेत, असें कोण म्हणेल? किंबहुना या सर्व फायद्यांपेक्षां अधिक महत्त्वाचा असा एक मराठी भाषेचा फायदा या संमेलनांमुळें घडत आहे. तो असा कीं, राजसत्ता आणि विद्यापीठें या दोहोंनींहि

उपेक्षिलेल्या मराठी भाषेचीं अनेक केंद्रें या संमेलनांच्या रूपानें जागोजाग स्थापन केलीं जात असून, त्यांमुळें तिच्या व्यासंगाला, संशोधनाला आणि संघटनेला अतिशय मदत होत आहे.

या दृष्टीनें विचार केला, तर प्रांतिक संमेलनें या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या शाखा म्हणाव्या लागतील. अशा प्रकारच्या संमेलनांविषयीं विचार करतांना दोन उपमा मला सुचतात. सिंधु किंवा गंगा यांच्यासारखी महानदी ज्या भागांतून वाहते, त्या भागांप्रमाणेंच इतरही दूरदूरच्या भागांना तिच्या सलिलसंपदेचा फायदा मिळण्यासाठीं आपण कालवे काढतों. त्या कालव्यांमुळें या नद्यांचें महत्त्व कमी होत नाहीं; उलट उपयुक्तता मात्र वाढते. किंवा रेल्वेचा मोठा फांटा हा टळक ठळक शहरांतूनच जात असल्यामुळें, अंतःप्रदेशांतील लहान लहान गांवांपर्यंत तिचें दळणवळण पोंचावें म्हणून छोटे फाटे काढले जातात; व त्या फाटयांमुळें रेल्वेचें उत्पन्न आणि लोकांचे व्यवहार या दोहोंवरही इष्ट परिणाम होतो. प्रांतिक संमेलनांचा उपयोगही असाच दुहेरी आहे. या संमेलनांमुळें मुंबई, नागपूर, पुणें, कोल्हापूर, बडोदें यांच्यासारख्या प्रमुख शहरांत केंद्रित होऊन राहिलेली विद्याभिरुचि आणि वाङ्मयस्फूर्ति ही सर्वत्र पसरावयाला मदत होते; व त्याबरोबरच स्थानिक संशोधन, बोलीचा अभ्यास, ग्रंथांचें प्रकाशन इत्यादि कार्यांच्या रूपानें हीं संमेलनें महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या राष्ट्रीय चळवळीला आधार आणि उठाव देतात. या सर्व दृष्टींनीं प्रांतिक संमेलनांची प्रथा ही अत्यंत इष्ट अशीच असून, ती चालू राहाण्यांत परतंत्र महाराष्ट्राचें सर्वतोपरी कल्याणच आहे. कारण, महाराष्ट्राच्या दूरदूरच्या व राजकीय सत्ताभेदांमुळें एकमेकांना दुरावलेल्या भागांत समान मातृभाषेच्या भक्तीची भावना जागृत आणि बलवत्तर करून हीं संमेलनें मराठयांच्या राष्ट्रीय ऐक्याचा परिपोष करतात.*

*मुम्बईच्या 'नवजीवन' मासिकाच्या १९३५ च्या दिवाळी अंकांत प्रसिद्ध झालेला माडखोलकरांचा लेख.

# महेश्वर

(७ जून १९३७)

अ. क्र. ६७२६

## साहित्यपंडित नव्हे, साहित्योपजीवी

आपण ज्या वेळीं या संमेलनाचें अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती मला केली, त्या वेळीं माझ्या मनाला मोठाच संकोच वाटला. मी पंडित नाहीं, प्राध्यापक नाहीं किंवा पदवीधरहि नाहीं. वर्तमानपत्रांच्या धंद्यांतील आणि तोहि मी एक नोकरपेशाचा माणूस आहे. तेरा वर्षांपूर्वी माझ्या एका विद्वान् सहकाऱ्यानें मला हटकलें, "तुमच्या लिहिण्यावर वर्तमानपत्री छाप फार असते बुवा! त्यामुळें आम्हांला तुमचे लेख आमच्या पुस्तकांत घेतांना फार अवघड वाटतें!" त्या विद्वानाच्या या उद्गारांनीं माझे डोळे खाडकन् उघडले. आणि, मला कळून चुकलें कीं, माझें स्थान साहित्यिकांच्या संमेलनांत किंवा पंडितांच्या प्रणालिकेंत नसून पोट बांधून एक प्रकारच्या ईर्ष्येनें स्वतःच्या मतानुसार लोकशिक्षणाचें कार्य करणाऱ्या वृत्तपत्रांच्या क्षेत्रांतील श्रमजीवी वर्गांत आहे. शिष्टाचार असा आहे कीं, साहित्यशास्त्राचें गाढ अध्ययन केलेल्या तज्ज्ञानें अशा प्रकारच्या संमेलनांचें अध्यक्षपद अलंकृत करून आपल्या पांडित्याचा

लाभ सामान्य लोकांना द्यावा. पण मी कांहीं साहित्यपंडित नाहीं; तर लेखनकामाठीच्या बळावर निर्वाह करणारा एक साहित्योपजीवी आहे. त्यामुळें आपल्या आमंत्रणाचा स्वीकार करण्याचा धीर मला प्रथम होईना. पण अखेर, माझ्या योग्यतेच्या जाणिवेने नव्हे, तर आपल्या प्रेमळ आग्रहाला मान देण्यासाठीं मी ही जबाबदारी भीत भीत पतकरली.

## वर्तमानपत्रें आणि साहित्यिक

पण साहित्यक्षेत्रांतील बड्या धेंडांची वर्तमानपत्राकडे पाहण्याची ही तुच्छतेची वृत्ति योग्य आहे काय? ते समजतात तितकें वर्तमानपत्री लेखकांचें लिखाण खरोखरीच हीणकस असतें? वस्तुस्थिति अशी आहे कीं, या परतंत्र महाराष्ट्रांत राजाश्रयाला मुकलेल्या मराठी भाषेचा ढांसळलेला संसार मोठ्या हिरीरीनें सांवरून जर कोणी नांवारूपाला आणला असेल, तर तो मराठी वृत्तपत्रकारांनींच होय. ज्ञानप्रसाराचें सुलभ साधन म्हणूनच केवळ नव्हे, तर परकीय सत्तेशीं झुंज देण्याचें प्रभावी शस्त्र म्हणूनहि मराठी वर्तमानपत्रांनीं गेल्या अर्धशतकांत केलेली कामगिरी खचित अनन्य मानली जाईल. त्यांनीं मराठी भाषेचा दृष्टिकोन व्यापक केला; तिची शब्दसंपत्ति वाढविली; तिच्यांत होणाऱ्या नवीन ग्रंथरचनेला निष्ठेनें उत्तेजन दिलें; व मानवी हृदयांत उद्भूत होणारी कोणतीहि भावना आपण लीलेनें व्यक्त करूं शकूं असा आत्मप्रत्यय तिच्या ठिकाणीं उत्पन्न केला. वर्तमानपत्राचा अंक म्हणजे वाचल्याबरोबर फेकून द्यावयाचें कागदी चिटोरें असें ज्या दुर्विदग्धांना वाटत असेल, त्यांना खुशाल वाटो. पण, त्यांनी ही गोष्ट विसरूं नये कीं, काळाच्या अफाट प्रवाहावर सोडून दिलेल्या या कागदी होडींत मानव जातीच्या उद्धाराच्या तळमळीनें प्रेरित होऊन आपल्या उच्च विचारांचीं आणि उदात्त कल्पनांचीं अनर्घ्य रत्नें भरणारे धाडसी सौदागर शब्दसृष्टींत आजपर्यंत कांहीं थोडे झालेले नाहींत. खुद्द या महाराष्ट्रभूमींत

लोकहितवादी आणि आगरकर, टिळक आणि परांजपे, आपटे आणि केळकर, खाडिलकर आणि अच्युतराव कोल्हटकर प्रभृतींचें बहुतेक वाङ्मय वर्तमानपत्राच्या रटाळ मानलेल्या रकान्यांतूनच अवतीर्ण झालेलें नाहीं काय? आपलें आमंत्रण स्वीकारतांना वृत्तव्यवसायाची ही उज्ज्वल परंपरा माझ्या डोळ्यांपुढें होती, असें मी म्हटलें तर तें विनयाला सोडून होणार नाहीं, अशी मला आशा आहे.

## महेश्वरचें आकर्षण

शिवाय या महेश्वर शहराविषयीं वाटणाऱ्या आकर्षणामुळेंहि मला आपलें आमंत्रण स्वीकारण्याचा मोह पडला. सहस्रार्जुनानें आपल्या हजारों बाहूंनीं अडविल्यामुळें क्रुद्ध झालेली नर्मदा त्याच्या विरोधाला न जुमानतां ज्या ठिकाणीं सहस्रधारांनी वाहूं लागली, तें हें पुराणप्रसिद्ध स्थान पाहण्यासाठीं माझें चित्त साहजिकच उत्सुक झालें होतें. काल सकाळीं ज्या वेळीं मी हें शहर प्रत्यक्ष पाहिलें, त्या वेळीं त्याचें निसर्ग-सौंदर्य बघून मला असा भास झाला कीं, विंध्याचलाच्या उत्संगावर अवखळपणानें खेळून दमलेल्या नर्मदेनें विश्रांति घेण्यासाठीं हें रमणीय स्थान निर्माण केलें असावें. पण, महेश्वराला जें इतकें पावित्र्य आलें आहे, तें केवळ नर्मदेमुळें मात्र नव्हे; तर आपल्या धवल यशानें तिच्या पुण्यप्रदत्वाला लाजविणाऱ्या श्रीअहल्यादेवीच्या वास्तव्यानें. सहस्रार्जु-नाच्या काळांत त्याच्या या राजधानीच्या रणशौर्याचा दुंदुभि त्रैलोक्यांत दुमदुमत होता. अहल्याबाईच्या कारकीर्दींत या शहराच्या दानशौर्याची कीर्ति दिगंतीं पसरली. कार्तवीर्य हा योगी खरा. पण त्याच्या पराक्रमाचें स्वरूप तामसी होतें. उलट अहल्यादेवीच्या सात्त्विक पुण्यप्रकोपानें, समरांगणावर प्रत्यक्ष पाऊल न ठेवतां, राघो भरारीसारख्या सेनानीचा रणमद केवळ तीक्ष्ण वाग्बाणांनीं उतरला. महेश्वर दरबारच्या बातमी-पत्रांत जागोजाग उद्‌धृत केलेले तिचे उद्गार मराठशाहीच्या कुजलेल्या

अंतरंगावर विदारक प्रकाश पाडणारे असून, तिच्या तोंडचीं कांहीं बव्हर्थ वचनें तर राज्यशास्त्रांतील उत्कृष्ट सूत्रें गणलीं जातील. सहस्रार्जुनाच्या विनाशानंतर हजारों वर्षांनीं त्याच्या या राजधानीचा जीर्णोद्धार करून अहल्याबाईनें तिला पुन्हा राजैश्वर्य प्राप्त करून दिलें. पण, पुराणें, इतिहास आणि काव्यें यांनीं जिच्या पुरातन वैभवाचें वर्णन एकमुखानें केलें आहे, ती ही माहिष्मती नगरी आज कालगतीनें पुन्हा ऱ्हास पावत असलेली पाहून कोणाच्या मनाला उद्वेग वाटणार नाहीं?

## कालिदास आणि कलावादी

या मालवभूमींत आल्यावर कविकुलगुरु कालिदास याची आठवण न होणें अशक्य आहे. त्याचा जन्म कुठें झाला असेल, तो असो. पण, मालवभूमीवर त्याचें इतकें उत्कट प्रेम होतें कीं, सहस्रार्जुन, वत्सराज आणि विक्रमादित्य यांच्या प्रणयाच्या आणि पराक्रमाच्या अद्भुत कथांत रमलेल्या त्याच्या प्रतिभेला उज्जयिनी हें स्वर्गाचें जणूं ऐश्वर्यशाली शकल असल्याचा भास झाला; व माहिष्मतीला वळसा घालणाऱ्या नर्मदेच्या प्रवाह इतका रम्य वाटला कीं, त्याचें सौंदर्य सतत पहावयाला मिळावें म्हणून विदर्भदेशच्या राजकन्येला त्यानें प्रतीपाला माळ घालण्याची शिफारस केली. कलेसाठीं कला या तत्त्वाचा उदो उदो करणाऱ्या साहित्यिकांना कालिदास हा आपला मोठाच आधार वाटतो. आणि तें एका परीनें साहजिकहि आहे. कविताकामिनीचा विलास म्हणून ज्याचें वर्णन जयदेवानें केलें आहे, त्या कविश्रेष्ठाला कलावाद्यांनीं आपला कुलगुरु मानावें, यांत काय आश्चर्य? कारण त्यांच्या मतानें कला म्हणजे प्रतिभेचा केवळ विलास: कष्टमय मानवी जीवनाशीं कलेला कांहीं कर्तव्य नाहीं. कालिदासाची काव्यसृष्टि घेतली, तरी ती सौंदर्य आणि विलास यांनीं परिपूर्ण अशी दुसरी अलकाच नाहीं काय? तिच्यांत दुःखाश्रु गळलेले असले, तरी ते प्रणयी जीवांची ताटातूट झाल्यामुळें;

व करुण रस आलेला असला, तरी तो शृंगाराशीं संलग्न होऊन,–त्या रसराजाचा केवळ एक परिचारक या नात्यानें. दुष्यंतानें आपल्या दयितेच्या अपुऱ्या राहिलेल्या चित्रावर किंवा यक्षस्त्रीनें आपल्या प्रियकराचें गाणें म्हणण्यासाठीं हातीं घेतलेल्या वीणेवर गळलेले अश्रु बघून करुणाच्या दारुण वेदनांऐवजीं शृंगाराच्या कोमल संवेदनाच मनाला अधिक होत नाहींत काय? म्हणून कालिदासाकडे अभिमानानें अंगुलिनिर्देश करून कलावादी असा युक्तिवाद करितात कीं, कला ही जर केवळ तत्त्वबोधासाठींच असेल, तर रघुवंश आणि शाकुंतल हीं कोणत्या तत्त्वांचा बोध करण्यासाठीं कालिदासानें लिहिलीं? व त्याचें मेघदूत कोणत्या नीतिपाठांचा धडा मानवजातीला देत आहे? कला ही केवळ कलेसाठीं आहे, तिचा आविष्कार समाजनिरपेक्ष आणि निरंकुश असतो, याचें कालिदासाची कविता हें मूर्तिमंत प्रत्यंतर आहे. मग समाजाच्या उद्बोधनाचें कर्तव्य करण्याचा जो ससेमिरा आज कलेच्या मागें लावला जात आहे, तो काय म्हणून?

## देवदासी, राजदासी आणि अर्थदासी

प्रथमदर्शनीं हा युक्तिवाद खरोखरीच बिनतोड वाटतो. कारण, टागोरांनीं जरी शाकुंतलांतून तत्त्वबोध काढून दाखविला असला, तरी आपण जें तें नाटक वाचतों, तें कांहीं तत्त्वजिज्ञासेनें नव्हे, तर रम्यत्वाच्या प्रतीतीसाठीं., पण, त्याबरोबरच अशीहि कल्पना मनांत आल्याशिवाय रहात नाहीं कीं, दिलीप, रघु आणि रामचंद्र यांच्यासारख्या एकाहून एक प्रजावत्सल राजांच्या उदात्त चरित्रांचें वर्णन केल्यानंतर दर्शनोत्सुक प्रजेला महालाच्या खिडकींतून फक्त आपला एक पाय काढून दाखविणाऱ्या कर्तव्यभ्रष्ट, विलासी अग्निवर्णाच्या रूपानें रघुवंशाच्या अधःपाताचें सूचक चित्र रेखाटण्यांत गुप्तवंशीय सम्राटांच्या आश्रयाला राहिलेल्या त्या महाकवीचा कांहींच उद्देश नसेल काय? तथापि,

कालिदासाचा प्रश्न तूर्त बाजूला ठेवून, कलेसाठीं कला या तत्त्वाला जर आपण इतिहासाची कसोटी लाविली, तर आपल्याला काय आढळून येतें? कला ही कधीं तरी स्वतंत्र आणि समाजनिरपेक्ष होती काय? कलावादी हे पुष्कळदां आपल्या आराध्यदेवतेला अप्सरेची उपमा देत असतात. अजर, अमर आणि उन्मेषशाली अशा सौन्दर्याची अधिष्ठात्री एवढयाच अर्थानें जर ते कलेला अप्सरेची उपमा देत असतील, तर मला त्याबद्दल कांहीं म्हणावयाचें नाहीं. पण त्याबरोबरच त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, अप्सरा ही देवेंद्राच्या दरबारांतील नर्तकी असते, त्याचा हुकूम होतांच तिला राजर्षींचा अनुनय आणि महर्षींचा तपोभंग करण्यासाठीं मृत्युलोकीं धांव घ्यावी लागते. प्राचीन काळीं मानवी जीवनांतील कलेचें स्थान सामान्यतः अशाच प्रकारचें होतें, अशी साक्ष इतिहास देतो. जगाच्या बाल्यावस्थेंत कला ही देवदासी होती, त्याच्या प्रौढावस्थेंत ती राजदासी झाली व आज या भांडवलशाहीच्या युगांत ती अर्थदासी होऊन बसली आहे. आपल्या लोकसत्ताक राज्यांत देवांचीं स्तोत्रें आणि महापुरुषांचे स्तुतिपाठ यांच्याशिवाय अन्य प्रकारची कविता आपण नांदूं देणार नाहीं, असें जें प्लेटोनें म्हटलें आहे, तें कलेच्या प्राचीन काळांतील दास्यावर विदारक प्रकाश पाडतें. महाकालाच्या दर्शनाबरोबरच त्याच्या मंदिरांत नृत्य करणाऱ्या वेश्यांच्या कटाक्ष-वीक्षणाची कालिदासानें मेघाला दाखविलेली लालूच ही जशी त्या विलासी कवीच्या रसिकतेची तशीच धर्म आणि कला यांच्या परस्पर-संबंधाचीहि द्योतक आहे. जगांतील साऱ्या आद्यकाव्यांचें देवधार्मिक स्वरूप, बुद्धाच्या स्मृतिचिन्हांवर बांधलेले चैत्य आणि स्तूप, अजिंठ्याचीं लेणीं आणि भुवनेश्वरचीं मंदिरें, आग्र्याचा ताजमहाल आणि नागपूरचें काशीबाईचें देऊळ हीं सारीं कलेनें केलेल्या धर्मसेवेचीं आणि राजसेवेचीं स्मारकेंच नव्हेत काय? रघूचा दिग्विजय वर्णन करितांना कालिदासाच्या कानांत समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाचे डिंडिम दुमदुमत होते आणि

कुमारसंभव लिहितांना युवराज कुमारगुप्ताच्या जन्मोत्सवाचा मंगल प्रसंग त्याच्या डोळ्यांपुढें होता, हें संशोधकांचें अनुमान जर खरें असेल, तर हीं दोन महाकाव्यें रचून कालिदासानें देवसेवेबरोबरच राजसेवाहि साधून घेतली, असें म्हणावयाला काय हरकत आहे? कादंबरी लिहून बाणानें आपला आश्रयदाता हर्ष याचें मनोरंजन केलें आणि हर्षचरित लिहून त्या सम्राटाच्या पराक्रमाची महती गाइली, ही अगदीं उघड दिसणारी गोष्ट नाहीं काय? आज या औद्योगिक युगांत तर कलेचें स्वातंत्र्य सर्वच बाजूंनीं संपुष्टांत आलेलें दिसत आहे. नाटक-मंडळींतील पात्रांचीं तोंडें पाहून नाटकें लिहावयाचीं, प्रकाशकांनीं घातलेल्या अटी पाळून कादंबऱ्या लिहावयाच्या, सिनेमाचें तंत्र लक्षांत घेऊन कृत्रिम घटनांनीं परिपूर्ण अशीं कथानकें लिहावयाचीं आणि हें सारें करीत असतांना कलेसाठीं कला या तत्त्वाचा डंका पिटावयाचा, यापरता दुसरा विसंगतपणा तो कोणता?

## ललित वाङ्मयाची समाजनिष्ठता

अर्थात् कला ही पूर्वीं कधीं स्वतंत्र नव्हती, आजहि स्वतंत्र नाहीं. बदलत्या कालानुसार तिच्या आराधनेचीं केंद्रें बदलत गेलीं, एवढेंच. "मी जें लिहितों, तें केवळ माझ्या स्वतःच्या आनंदासाठींच लिहितों," असें जेव्हां एकादा कलावंत म्हणतो, तेव्हां तो केवळ आपल्या अहंकाराचेंच नव्हे, तर कलेच्या स्वरूपाविषयींच्या अज्ञानाचेंहि प्रदर्शन करीत असतो. मुद्रणकलेचा उदय ज्या वेळीं झालेला नव्हता, राजाश्रय किंवा लोकाश्रय यांची ज्या वेळीं कलेला अपेक्षा नव्हती, त्या काळांत तपोवनामध्यें राहून आरण्यकें किंवा उपनिषदें रचणाऱ्या ऋषींनीं जर अशी भाषा उच्चारली असती, तर त्यांना कदाचित् तें शोभून गेलें असतें. त्या ऋषींना सुद्धां आपली तपस्या आणि आध्यात्म-चिंतन निर्विघ्न चालण्यासाठीं राजांकडून संरक्षण मिळविण्याची

आवश्यकता असे. पण, आज वाचक, प्रकाशक आणि मुद्रक यांचीं मतें, मनोवृत्ति आणि मर्यादा लक्षांत घेऊन वाङ्मयाची पैदास करणाऱ्या ललित लेखकानें असला दिमाख मिरविण्यांत काय अर्थ! ललित लेखक आणि त्याची कला ही संगीत, शिल्प वगैरे इतर कोणत्याहि कलेपेक्षां अधिक संस्कारसुलभ, अधिक संवेदनक्षम असते. लेखनकलेचें आवाहन जसें इतर सर्व कलांपेक्षां व्यापक, तशीच तिची संस्कार आणि संवेदना ग्रहण करण्याची शक्तीहि इतर कलांपेक्षां मोठी. याचीं कारणें उघडच आहेत. एक तर, लेखनकलेचें आविष्काराचें साधन जें शब्द, तें इतर कलांच्या आविष्काराच्या साधनांप्रमाणें जड नाहीं. शिल्पकलेचें साधन मृत्तिका किंवा पाषाण हें इतकें जड असतें कीं, कलावंताचा हस्तस्पर्श त्याला घडल्याविना तें कोणताही भाव व्यक्त करूं शकत नाहीं. चित्रकलेचें साधन रंग हें त्या मानानें कमी जड ठरेल. संगीतकलेंतील स्वर किंवा नाद हा तर त्याहिपेक्षां अधिक भावदर्शी. पण, भावदर्शनाच्या बाबतींत शब्दाइतकें स्वत:समर्थ साधन जगांत दुसरें नाहीं. प्रत्येक शब्द म्हणजे जणूं एक चित्र आणि तेंहि चलच्चित्र असतें. त्याला विकास असतो, परंपरा असते, इतिहास असतो; व त्यामुळें केवळ साहित्यांतीलच नव्हे, तर समाजांतीलहि त्याचें कार्य निश्चित झालेलें असतें. जिचें भावाविष्काराचें साधन अशा रीतीनें समाजसापेक्ष आणि परंपरेनें युक्त आहे, ती लेखन-कला स्वभावतःच समाजाशीं निगडित असावी, यांत नवल काय! दुसरी गोष्ट अशी कीं, ललित लेखक हा आपल्या साहित्याच्या बाबतींत इतर कोणत्याहि कलावंतापेक्षां समाजावर अधिक अवलंबून असतो. तो ज्या समाजाचा घटक असतो, त्याची मनोरचना आणि परिस्थिति हेंच वस्तुतः त्याचें साहित्य असतें; व त्यामुळें त्याची इच्छा नसली, तरीहि त्याचें प्रतिबिंब त्याच्या कृतींत पडल्याविना राहत नाहीं. शिवाय वाच-कांच्या मनोरंजनाचा उद्देश ललित लेखकाच्या डोळ्यांपुढें थोडयाबहुत

प्रमाणांत असल्याकारणानें, त्यांच्या अभिरुचींला अनुकूल असें स्वरूप ललित कृतीला आपोआपच येतें. वाचक हा जरी लेखकाचा प्रत्यक्ष निर्माता नसला, तरी त्याच्या प्रतिभेवर आपल्या अभिरुचीच्या रूपानें तो अप्रत्यक्ष नियंत्रण गाजवितो, यांत मात्र शंका नाहीं.

## नुसता पुनःप्रत्यय म्हणजे कला नव्हे

तेव्हां, कला ही कलेसाठींच आहे, अशी भाषा निदान समंजस लेखकानें तरी वापरूं नये, असेंच कोणीहि म्हणेल. पण, ललित लेखकाला ज्या वेळीं असें आढळून येतें कीं, आपल्या भोंवतालच्या समाजाच्या आकांक्षांशीं आपण समरस होऊं शकत नाहीं, प्रभुत्वानें जगण्यासाटीं चाललेल्या त्या समाजाच्या धडपडीनें आपलें हृदय आंदोलित किंवा उद्दीपित होत नाहीं, त्या वेळीं तो कलेसाठीं कला या गोंडस तत्त्वाचा आश्रय घेऊन, आपली सहानुभूतिशून्य मनोवृत्ति, आपल्या आणि समाजाच्या मनःस्थितींतील तीव्र विसंवाद लपविण्याचा प्रयत्न करितो. वाचक, प्रकाशक आणि मुद्रक यांचा गुलाम असलेला ललित लेखक जेव्हां अशा प्रकारची उद्दामपणाची भाषा वापरतो, तेव्हां त्याचा अर्थ एवढाच समजावयाचा कीं, समाजाचा घटक या नात्यानें आपलें कर्तव्य करण्याची त्याला इच्छा नाहीं, आपली सामाजिक जबाबदारी ओळखावयाला तो तयार नाहीं. म्हणूनच त्याला, कला हा मानवी प्रतिभेचा विलास किंवा मानवी जीवनाचें मंडन आहे, असे एकांगी सिद्धांत सुचतात; व बहुजनसमाजाशीं फटकून वागून ललित वाङ्मयाला तो समाजांतील फक्त संपन्न वर्गाची मिरास, त्यांच्या करमणुकीचें खेळणें बनवावयाला प्रवृत्त होतो. भोगलेल्या अनुभूतींच्या पुनःप्रत्ययाचा आनंद मनुष्याला मिळवून देणें हें जें उद्दिष्ट कलावाद्यांनीं ललित वाङ्मयाला चिकटविलें आहे, तें त्यांच्या या संकुचित, वर्गविशिष्ट दृष्टिकोनाची साक्ष देतें. पुनःप्रत्यय हा कलेच्या निर्माणकार्यांतील एक

महत्त्वाचा घटक आहे, हें खरें, पण नुसता पुनःप्रत्यय म्हणजे मात्र कला नव्हे. मनुष्याचे अनुभव हे इतके मर्यादित असतात कीं, केवळ त्यांच्या पुनःप्रत्ययावरच जर त्यानें निर्वाह करण्याचें मनांत आणलें, तर त्याच्या कलेला वर्गविशिष्ट स्वरूप आपोआपच येईल; व त्याचें लिखाण म्हणजे निव्वळ त्याच त्या अनुभवांचें प्रतिबिंब होऊन बसेल. ललित लेखकाची भिस्त प्रत्यक्षानुभूतीपेक्षांसुद्धां अवलोकन, सहानुभूति आणि कल्पकता यांच्यावर अधिक असते; व त्यामुळेंच त्याच्या कृतीला जीवनाच्या नुसत्या प्रतिबिंबापेक्षां अधिक विशाल आणि सखोल स्वरूप येतें; तिच्या आवाहनांत पुनःप्रत्ययाचा आनंद देण्याच्या गुणाबरोबरच मनाला उद्बोधित करण्याच्या, त्याला नवा प्रत्यय देण्याच्या सामर्थ्याचाहि आविर्भाव होतो. नुसता पुनःप्रत्ययाचा आनंद मिळवून देणें हें जसें कलेचें कार्य नव्हे, तसेंच नुसतें जीवन मंडित करणें हेंहि तिचें कार्य नव्हे. कला हें जीवनाचें मंडन आहे असें म्हटलें म्हणजे तिच्या आवाहनाला आणि उपयुक्ततेला एकदम मर्यादा पडतात; व स्वतःचें जीवन मंडित करण्याची ऐपत ज्यांना असेल, अशा समाजांतील फक्त प्रतिष्ठित वर्गांची ती विलासवस्तु होऊन बसेत. कलेच्या मंडनामुळें मानवी जीवनाला रम्यता येते, यांत शंका नाही. पण नुसता विभ्रम म्हणजे जशी स्त्री नव्हे, तसेंच नुसतें मंडन म्हणजे कांहीं कला नव्हे. उलट, कला ही गेलीं हजारों वर्षें मानवी जीवनाचें अत्यंत आवश्यक अंग होऊन बसली असून, मनुष्याच्या भौतिक शरीराचें पोषण जसें अन्नानें होतें, तसें त्याच्या आत्मिक शरीराचें पोषण कलेनें होतें.

## वास्तववादाचें स्वरूप आणि कार्य

अर्थात् कला ही जीवनाचें नुसतें प्रतिबिंब नाहीं, विनोदन नाहीं किंवा अलंकरणहि नाहीं. ती जर जीवनाचें नुसतें प्रतिबिंबच असती, तर मनुष्य विसांव्यासाठीं तिच्याकडे वळता ना; ती जर जीवनाचें नुसतें

विनोदनच असती, तर मनुष्य स्फूर्तीसाठीं तिच्याकडे पहाता ना; व ती जर जीवनाचें नुसतें अलंकरणच असती, तर मनुष्य संसारसंगरांत तिच्या साहाय्याची अपेक्षा करता ना. कला ही जीवनाची प्रगतिपथावरील सहचरी आहे : मानवजातीच्या प्रगतीचा युगायुगांवर पसरलेला अनादि आणि अनंत असा खडतर मार्ग कलेनें आपल्या ललित कृतींच्या रम्यतेनें मंडित केला आहे व उज्ज्वल स्वप्नांच्या दिव्यतेनें प्रकाशित केला आहे. कला ही मानवी जीवनाचें नुसतें प्रतिबिंबच दाखवीत नाहीं, तर त्याला वळण देते; ती मानवी मनाची नुसती करमणूकच करीत नाहीं, तर त्याला उद्बोधित करिते; व ती मानवी जीवन नुसतें मंडितच करीत नाहीं, तर अभिनव ध्येयांच्या प्रभावानें तें आमूलाग्र बदलून टाकते. जीवनाचें हुबेहुब प्रतिबिंब दाखविण्यांत किंवा यथार्थ चित्रण करण्यांत कलेचा उद्देश केवळ पुनःप्रत्ययाचा आनंद मनुष्याला मिळवून देण्याचा नसतो. त्या आनंदाबरोबरच जीवनांतील सारे दोष आणि उणीवा मनुष्याच्या नजरेस आणून देऊन तें अधिक निर्दोष आणि पूर्ण बनविण्याची आकांक्षा त्याच्या ठिकाणीं निर्माण करणें, हा कलेचा हेतु आहे; व या हेतूची जाणीव ललित लेखकाला जितक्या तीव्रतेनें असेल, तितकें त्याच्या हातून जीवनाचें चित्रण अधिक मूलगामी आणि मर्मदर्शी होईल. पाण्यांत पडलेल्या सांवलीसारखें जीवनाचें नुसतें निर्जीव प्रतिबिंब दाखविण्यांत ललित लेखकाला कसला आनंद आहे? आणि त्याच्या सृजनसामर्थ्याचा तरी कोणता गौरव आहे? नुसतें प्रतिबिंब दाखवावयाला सृजनशक्तीची गरज नाहीं. बिंबग्राही मन असलेला कोणताहि लेखनकुशल मनुष्य तें काम करूं शकतो. वास्तववादाचा अर्थ जर नुसता दिसेल तसें लिहिणें एवढाच असता, तर वर्तमानपत्रांचे बातमीदार उत्तम कादंबरीकार कां न होते? पण वास्तवता म्हणजे नुसतें प्रतिबिंब नव्हे, जसें दिसेल तसें रेखाटणें नव्हे. अशा प्रकारच्या कलाहीन वास्तवतेला ललित वाङ्मयांत थारा नाहीं. कलावंत हा जीवनाचा

पुनर्निर्माता असतो, छायाचित्रकार नव्हे. तो वस्तुसृष्टीपासून आपलें साहित्य घेत असला, तरी त्याचा उपयोग अपरसृष्टि उत्पन्न करण्यासाठीं करीत असतो. किंबहुना, निसर्गाची काय किंवा संसाराची काय हुबेहुब अनुकृति न करितां, तो जेव्हां स्वतःच्या कल्पनेनुसार वास्तवाची पुनर्घटना करितो, तेव्हांच त्याच्या कृतीला कलात्मक स्वरूप येतें. खरा वास्तववादी हा समाजाची सुधारणा करण्याच्या आंतरिक तळमळीनें प्रेरित झालेला असतो; जीवनाच्या प्रगमनशीलतेवर त्याची श्रद्धा असल्यामुळें त्याच्या कुंठित झालेल्या गतीला चालना मिळावी या हेतूनें तो वस्तुस्थितीचें चित्रण करितो; व त्यामुळें त्यानें रेखाटलेल्या वस्तुचित्राला ध्येयवादाची उज्ज्वल पार्श्वभूमि लाभते. वास्तवतेच्या नांवानें जे समाजांतील घाण उपसतात, त्याच्या स्तिमित जीवनाचें तितक्याच स्तिमित बुद्धीनें वर्णन करीत सुटतात, त्यांना वास्तवतेचा अर्थ आणि कार्य हीं दोन्हीहि समजलीं नाहींत, असेंच म्हणावें लागतें. कलेनें ज्या दिवशीं वास्तवतेचा अंगीकार केला, त्याच दिवशीं ती प्रथम लोकाभि-मुख झाली;–समाजांतील सत्ताधारी आणि संपन्न वर्गाकडे असलेलें तिचें तोंड मध्यम आणि कनिष्ठ वर्गाकडे वळलें. धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्या सद्दीच्या काळांत कलेचें स्वरूप बव्हंशीं अद्भुत होतें. कलेच्या या तत्कालीन अद्भुतपणाची प्रतीति देवदेवता किंवा राजेराण्या यांच्या वैभवावर आणि विलासांवर लिहिलेल्या जुन्या दृश्य–श्राव्य काव्यांतूनच केवळ नव्हे, तर संगीत, चित्र, शिल्प इत्यादि कलांच्या प्राचीन अव-शेषांतूनहि येते. धर्मसत्ता आणि राजसत्ता यांचा ज्या ज्या वेळीं उत्कर्ष झाला, त्या त्या वेळीं द्रव्यबळ आणि मनुष्यबळ वेठीला धरून अवाढव्य प्रासाद, मंदिरें, जयस्तंभ, मशिदी आणि मनोरे उभारण्यांत आले. या शिल्पकृतींचें सौंदर्य मनाला जितका आल्हाद देतें, त्याहिपेक्षां जास्त आचंबा त्यांचा भव्यपणा पाहून वाटतो. जणूं कांहीं त्यांचा तो भव्यपणा म्हणजे देव आणि त्यांचे अंशावतार किंवा पूर्णावतार गणले गेलेले राजे

यांच्याविषयीं त्या वेळच्या लोकांना वाटणाऱ्या निरतिशय आदरबुद्धीचें प्रदर्शनच होय. धर्मसत्ता आणि राजसत्ता यांचें प्राबल्य कमी होऊन त्यांच्याविषयींच्या या आदरबुद्धीला जसजशी ओहोट लागत गेली, तसतसा कलेचा कल अद्भुताकडून वास्तवाकडे झुकत गेला; व देवांचें आणि राजांचें वैभव वर्णन करण्याऐवजीं मध्यम आणि कनिष्ठ वर्गांचीं सुखदुःखें चित्रित करण्यांत तिला गोडी वाटूं लागली. कालिदासाच्या रघुवंशापासून गॅल्सवर्दीच्या फॉरसाईट सगापर्यंत ललित वाङ्मयाच्या वर्ण्यविषयांत होत गेलेलें परिवर्तन हें गेल्या हजारों वर्षांतील या सामाजिक स्थित्यंतराचें प्रातिनिधिक आहे. बदलत्या कालमानानुसार शासनसत्तेचें अधिष्ठान जसजसें व्यापक होत गेलें, तसतसा कलेचाहि दृष्टिकोन विशाल होत जाऊन ती लोकाभिमुख झाली. भांडवलशाहीचे गुन्हे इतर काय असतील ते असोत. पण, एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्या गुलामगिरींतून कलेला सोडवून देवांची आराधना आणि राजांचें विनोदन करण्याऐवजीं समाजाचें उद्बोधन करण्याची प्रवृत्ति तिनें कलेच्या ठिकाणीं उत्पन्न केली.

## कलेची उत्पत्ति आणि उपयुक्तता

समाजाच्या उद्बोधनाचा उद्देश कलेच्या मागें लावण्यांत तिच्या माथीं कोणतेंहि नवें कर्तव्य लादलें जात नाहीं किंवा तिच्या स्वरूपाचाहि विपर्यास केला जात नाहीं. उद्बोधन हें कलेचें स्वाभाविक कार्य आहे. मनुष्याच्या उत्साहमूलक क्रीडेच्या प्रवृत्तींतून कलेचा उद्भव झाला आहे व म्हणून त्याची करमणूक करणें हें कलेचें कार्य आहे, असें कांहीं तत्त्वज्ञांचें मत असून, त्या मतांतूनच कलेसाठीं कला या तत्त्वाचा उदय झाला आहे. पण कलेच्या उत्पत्तिविषयींची ही त्यांची उपपत्ति अपुरी आणि सदोष वाटते. निसर्गाच्या आधीन असलेल्या शक्ति हस्तगत करून घेऊन किंवा त्या शक्तींना आपल्या कल्पनांनुसार वळण देऊन

जीवित सुखमय, उन्नत आणि पूर्ण करण्याची मनुष्याची जी धडपड अनादि कालापासून चालू आहे, तिचा कला हा एक महत्त्वाचा भाग आहे; व म्हणूनच मनुष्यानें आपल्या अतिरिक्त उत्साहाला वाव करून देण्यासाठीं कलेच्या रूपानें एक क्रीडेचें साधन पैदा केलें आहे, असें म्हणणें योग्य होणार नाहीं. मनुष्याच्या ठिकाणीं जी स्वाभाविक सृजनप्रियता आहे—सृजनशक्तीच्या बाबतींत निसर्गाशीं स्पर्धा करण्याची मनुष्याची जी जन्मजात प्रवृत्ति आहे, तिच्यापासून कलेचा जन्म झाला आहे. जगाच्या बाल्यावस्थेंत गुहांतून आयुष्य कंठणाऱ्या रानटी माणसानें काढलेल्या शिकारीच्या ओबडधोबड रेखाचित्रांपासून तों लहान मुलानें कोळशानें किंवा खडूनें काढलेल्या वेड्यावांकड्या आकृतींपर्यंत साऱ्या कलाकृतींत मनुष्याची ही सृजनप्रियता, सृजनसामर्थ्याच्या बाबतींत निसर्गावर मात करण्याची हौस प्रकट झाल्याचें दिसून येतें. आत्माविष्काराच्या ईर्ष्येनें, स्वतःच्या भावनांना आणि कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याच्या आकांक्षेनें मनुष्याच्या या सृजनप्रियतेला जेव्हां चालना मिळते, तेव्हां त्याच्या हातून कलाकृति निर्माण होतात. अर्थात् कला हें मनुष्याच्या क्रीडाबुद्धीचें किंवा निसर्ग आणि समाज यांच्याशीं होणाऱ्या त्याच्या संघर्षाचेंहि अपत्य नाहीं. कलाकृतीच्या निर्मितीला निसर्ग किंवा समाज यांच्याशीं झगडण्याच्या इच्छेइतकीच त्यांच्याविषयींची सहानुभूति, समरसता किंवा त्यांना पूर्णता आणण्याची सात्त्विक आकांक्षा निमित्त झालेली दृष्टीस पडते. भौतिक जग ही जशी निसर्गाची सृष्टि आहे, तशी कलात्मक जग ही मनुष्याची सृष्टि आहे; व निसर्गनिगडित मानवी जीवनाला त्याच्या तावडींतून सोडवून पूर्णता आणणें हें या अपरसृष्टीचें कार्य आहे. जीवित पूर्ण, उन्नत आणि सुखमय करण्याचीं साधनें जों जों सूक्ष्म आणि उदात्त होत जातात, तों तों त्यांना सुंदर स्वरूप प्राप्त होऊन त्यांचा समावेश कलांमध्यें केला जातो; व या दृष्टीनें पाहिलें तर शास्त्रीय संशोधनामुळें कलांचें क्षेत्र संकुचित न होतां तें उलट

वाढण्याचा संभव जास्त दिसतो. उपयुक्त आणि आनंददायक असे कलांचे दोन वर्ग पाडलेले कुठें कुठें आढळतात. पण, हें वर्गीकरण फक्त कर्मेंद्रियांची उपयुक्तता लक्षांत घेऊन केलेलें असल्यामुळें चुकीचें ठरतें. जीविताच्या उन्नतीच्या दृष्टीनें उपयुक्ततेपेक्षां आनंदाला व आनंदापेक्षां उद्बोधनाला जास्त महत्त्व आहे. मन आणि बुद्धि यांच्या उद्बोधनांतून जो आनंद उद्भूत होतो, त्याची सर जगांतील अन्य कोणत्याहि सुखाला येणार नाहीं. पोषाखांतील रंगसंगति पाहून डोळ्यांना संतोष होतो, हें खरें. पण, एकाद्या उत्कृष्ट चित्रांतील रम्यगूढ भावदर्शन पाहून मन आणि बुद्धि यांचें उद्बोधन झाल्यामुळें ज्या आनंदाच्या तरल ऊर्मि अंतःकरणांत उठतात, त्यांची सर त्या संतोषाला कधींतरी येईल काय? उपयुक्ततेचा संबंध मुख्यतः मनुष्याच्या कर्मेंद्रियांशीं, आनंदाचा ज्ञानेंद्रियांशीं आणि उद्बोधनाचा संबंध मन, बुद्धि आणि आत्मा यांच्याशीं आहे. अर्थात् मन, बुद्धि आणि आत्मा यांना उद्बोधित करून ज्या कला मनुष्याला अत्युच्च आनंदाचा लाभ करून देतात, त्यांना अनुपयुक्त कसें म्हणावें? त्या कलांना जर अनुपयुक्त म्हणावयाचें असेल, तर त्यांच्याबरोबरच तत्त्वज्ञानालाहि अनुपयुक्त म्हणावें लागणार नाहीं काय? कारण त्याचा तरी मनुष्याची बौद्धिक बुभुक्षा भागविण्यापलीकडे दुसरा काय उपयोग आहे? उलट मनुष्य जों जों जास्त सज्ञान होत जाईल, उच्चतर आनंदाचा उपभोग घेण्याची बौद्धिक आणि आर्थिक ऐपत जसजशी त्याला जास्त येत जाईल, तसतसें कला हें त्याच्या रोजच्या आयुष्याचें एक आवश्यक अंग होऊन बसेल. संगीत आणि रेडियो यांची वाढती लोकप्रियता ही आजपर्यंत अनुपयुक्त गणल्या गेलेल्या कलांच्या वाढत्या उपयुक्ततेची निदर्शक आहे. किंबहुना, जीवित सुखमय, उन्नत आणि पूर्ण होण्याच्या दृष्टीनें कलांची उपयुक्तता अतुल आहे, असेंच खरोखरी म्हणावें लागेल. जाति, राष्ट्र आणि धर्म यांनीं माणसा माणसांत उत्पन्न केलेल्या कृत्रिम भेदांचा विसर पाडून मनुष्याला मानव्याच्या उत्तुंग भूमिकेवर जर कोणी

नेत असेल, तर ती कलाच होय. राष्ट्राच्या जीवनाचें आणि संस्कृतीचें वैशिष्टय त्याच्या कलेच्या रूपानें मूर्त स्वरूप धारण करून आविर्भूत होतें; व कालांतरानें राष्ट्रें नष्ट झालीं, तरी त्यांच्या कलाकृतींचे अवशेष त्यांच्या कर्तृत्वाची आणि संस्कृतीची साक्ष मानवजातीला देत राहतात. भाषा ही जशी मनुष्याची वाणी आहे, तशी कला ही संस्कृति आणि इतिहास यांची वाणी आहे. अजिंठयाचीं लेणीं जर अस्तित्वांत नसतीं, तर प्राचीन काळीं भारतीयांचे पोषाख, अलंकार किंवा रीतिरिवाज कशा प्रकारचे होते, याचें ज्ञान आपल्याला कसें झालें असतें? नुसतीं शाब्दिक वर्णनें वाचून हें ज्ञान होऊं शकत नाहीं; त्याला प्रत्यक्ष नमुनेच डोळयां-पुढें पाहिजेत. कलांचा हा उपयोग लक्षांत घेतला असतां प्राचीन कलाकृतींचे अवशेष म्हणजे मानवी इतिहासाचीं जणुं बोलकीं शकलेंच म्हणावीं लागतील. तेव्हां, विषम समाजरचनेमुळें दारिद्र्य आणि अज्ञान यांनीं ग्रस्त झालेल्या मनुष्याच्या केवळ आजच्या व्यावहारिक गरजा लक्षांत घेऊन कलांचें उपयुक्त आणि अनुपयुक्त असें वर्गीकरण करणें योग्य होणार नाहीं.

## परात्मप्रवेशाची सिद्धि

ललित कलांना ज्यांनीं अनुपयुक्त ठरविल्या, त्यांनीं अर्थातच फक्त सौंदर्यनिर्मिति हें उद्दिष्ट त्यांच्या मागें लावलें आहे. पण इतर कलांचें काय असेल तें असो. निदान लेखनकलेचें उद्दिष्ट तरी निव्वळ सौंदर्यनिर्मिति हें असूं शकत नाहीं. चित्र आणि शिल्प या कलांचें प्रमाणबद्धता हें प्रधान अंग असून, त्यांचा निसर्गाशीं जास्त संबंध व हस्तकौशल्यावर जास्त भर आहे. शिवाय, त्यांच्या आवाहनाला स्थल आणि काल यांच्या मर्यादा असल्यामुळें मनाला उद्बोधित करण्यापेक्षां जीवनाला मंडित करण्यासाठींच त्यांचा उपयोग जास्त केला जातो; व त्या दृष्टीनें सौंदर्यनिर्मितीचेंच कार्य त्यांच्या हातून मुख्यतः होतें, असें

म्हणतां येईल. नृत्य आणि संगीत यांचें आवाहन जरी स्थल आणि काल यांनीं मर्यादित असलें, तरी त्यांचा संबंध निसर्गापेक्षां मनुष्याशीं जास्त असून मानवी अवयव हेंच त्यांचें भावाविष्काराचें साधन आहे. त्यामुळें त्यांचें आवाहन मर्यादित खरें, पण अतिशय प्रत्यक्ष आणि इंद्रियगम्य व म्हणून सर्व कलांपेक्षां अधिक सुबोध, अधिक आकर्षक आणि अधिक प्रभावी असतें. जगांतील सुसंस्कृत समाजाइतक्याच या कला ज्या रानटी समाजांतहि लोकप्रिय असलेल्या आढळतात, त्या याच कारणांमुळें; व जातीय भावना, राष्ट्रीय अभिमान किंवा युद्धाचा उन्माद उत्पन्न करण्यासाठीं त्यांचा सामुदायिक उपयोग अनादि कालापासून केला जात आहे. किंबहुना, मानवी अंतःकरणांतील गूढ आणि गाढ भावना उद्बोधित आणि उद्दीपित करण्याच्या बाबतींत संगीत आणि नृत्य या कला इतर कोणत्याही कलेपेक्षां अधिक सामर्थ्यशाली ठरतील. त्यांचें आवाहन अर्थातच बुद्धिपेक्षां भावनांना अधिक असतें. उलट, लेखन-कलेचें आवाहन या दोन कलांच्या मानानें अप्रत्यक्ष, कमी सुबोध, बव्हंशीं बुद्धिगम्य व म्हणून टिकाऊ मात्र जास्त असतें. तथापि, हें आवाहन बुद्धिगम्य खरें पण भावनाप्रधान असतें,–स्वतःच्या भावनांना सदृश किंवा संवादी अशा भावना दुसऱ्याच्या अंतःकरणांत उद्बोधित करून केलें जात असतें, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. त्या* दृष्टीनें कलेच्या कार्याची मीमांसा करितांना, स्वतः अनुभविलेल्या भावनांची अनुभूति दुसऱ्यांना देण्याचा, आपल्या भावनांनीं इतरांना भारण्याचा

---

*Art is a human activity consisting in this, that one man consciously by means of certain external signs, hands on to others feelings he has lived through, and that others are infected by these feelings and also experience them.

—*Tolstoy*

मनुष्याचा बुद्धिपुरःसर प्रयत्न म्हणजेच कला, अशी जी व्याख्या टॉल्स्टॉयनें केली आहे, ती अत्यंत समर्पक वाटते. बुखारिननें या व्याख्येचा स्वीकार करितांना, व्यक्तीच्या भावनांना सामाजिक स्वरूप देण्याचें—व्यक्तिगत भावनांचें समाजीकरण करण्याचें साधन म्हणजे कला, असें तिचें विशदीकरण केलें आहे.* टॉल्स्टॉयची मूळ व्याख्या आणि बुखारिननें केलेलें तिचें विशदीकरण या दोहोंतून कलेचा उद्बोधन हा उद्देश अगदीं स्पष्टपणें प्रतीत होतो. स्वतःचें हृदय मनुष्य दुसऱ्यापाशीं कां मोकळें करितो?—तर आत्माविष्काराच्या या क्रियेमुळें त्याच्या दुःखाच्या वेदना सुसह्य आणि सुखाच्या संवेदना शतगुणित होतात म्हणून—दुसऱ्याची सहानुभूति आणि समरसता त्याला संपादन करितां येते म्हणून. आत्मनिवेदनाची इच्छा हा मनुष्याचा प्रकृतिधर्म आहे; व अगदीं सामान्य मनुष्य झाला, तरी तो सुद्धां दुःखाच्या किंवा सुखाच्या प्रसंगीं त्या त्या भावना यथाशक्ति व्यक्त करून आपल्या भोंवतालच्या माणसांना स्वतःशीं समरस व्हावयाला लावतो. पण म्हणून कांहीं त्याच्या त्या आत्मनिवेदनाला कोणी कला म्हणत नाहीं. आत्माविष्काराला कलेचें स्वरूप केव्हां येतें?—तर भोगलेल्या सुखदुःखांच्या अनुभूति, त्यांच्या तात्कालिक क्षोभाची तीव्रता कमी झाल्यावर, मनुष्य जेव्हां कल्पकतेच्या साहाय्यानें पुन्हा अनुभवतो आणि त्यांचें चित्रण करितो, तेव्हां त्याच्या त्या आत्माविष्काराच्या क्रियेला कलात्मक स्वरूप येतें—त्या आत्माविष्कृतीला कला म्हणतात. मनाच्या क्षुब्ध स्थितींत केलेलें आत्मकथन गढूळ आणि अव्यवस्थित असतें. पण, तो क्षोभ शांत झाल्यावर मनुष्य जेव्हां कल्पकतेच्या साहाय्यानें त्या भावनांत पुन्हा रममाण होतो आणि त्या चित्रित

---

*Art is a means of "socializing the feelings"; or as Leo Tolstoi correctly says in his book, art is a means of emotionally "infecting" men.—Nikolai Bukharin.

करितो, तेव्हां त्यांतील तात्कालिक विकारांची कलुषता नाहींशी होऊन कल्पकतेच्या प्रभावानें त्यांना रम्य आणि विशाल स्वरूप प्राप्त होतें. आत्माविष्काराची ही कलात्मक क्रिया सृजनशक्तिशिवाय शक्य नाहीं. किंबहुना, ज्याच्या ठिकाणीं सृजनशक्ति थोडया बहुत प्रमाणांत तरी असते, तोच मनुष्य आत्माविष्काराच्या या क्रियेला उद्युक्त होतो. कलाकृतीचा आत्मा भावना हा असला, तरी त्या भावनेला रमणीय आणि उदात्त स्वरूप यावयाला कल्पकतेची अत्यंत आवश्यकता असते. इतकेंच नव्हे, तर कल्पकतेच्या प्रभावानेंच मनुष्य दुसऱ्याच्या सुखदुःखांशीं उत्कटतेनें समरस होऊं शकतो; व जणुं कांहीं त्या भावना स्वतःच्याच आहेत अशा रीतीनें त्यांचें वर्णन करितो. ही परात्मप्रवेशाची सिद्धि अवगत असल्याशिवाय कलावंताचें बिलकूल निभणार नाहीं. ललित वाङ्मयांत प्रत्यक्षानुभूतिपेक्षां सुद्धां कांकणभर जास्त महत्व कल्पकता आणि सहानुभूति यांना आहे असें जें म्हणावयाचें, तें याच कारणामुळें. व्यक्तिगत भावनांवर उभारलेली तरल आणि त्रुटित भावकविता सोडली, तर काव्यें, नाटकें, कादंबऱ्या इत्यादि ललित वाङ्मयाच्या इतर सर्व प्रकारांची उभारणी ही बव्हंशीं परोक्षानुभूतिवर झालेली असते. पण, त्याबरोबरच ही गोष्टहि लक्षांत ठेवली पाहिजे कीं, कलावंताची ही परोक्षानुभूति, हा परात्मप्रवेश जणू कांहीं त्या भावनांचें आंदोलन त्यानें स्वतः अनुभवल्याइतकाच उत्कट आणि प्रामाणिक असला, तरच त्याची कलाकृति तिच्यांतील भावनांनीं इतरांना भारावयाला समर्थ होईल. कलेच्या निर्मितींतील व्यक्तिगत भावनांचें हें महत्त्व लक्षांत घेतलें असतां तिचें स्वरूप बव्हंशीं व्यक्तिनिष्ठ रहाणें अपरिहार्य आहे, हें कबूल केलें पाहिजे. किंबहुना ललित लेखकाचें व्यक्तित्व जितकें प्रभावी आणि विशाल, तितकी त्याची कृति सामर्थ्यसंपन्न असते. रशियाचा लोकप्रिय भावकवि (lyrical poet) येसेनिन याचें काव्यवाचन ज्या वेळीं रशियन सम्राज्ञीपुढें झालें, त्या वेळीं ती उद्गारली, "तुमचीं

भावगीतें सुंदर खरीं, पण अत्यंत दुःखपूर्ण आहेत." त्यावर येसेनिननें उत्तर दिलें, "सारा रशियाहि असाच दुःखीकष्टी आहे." कवीच्या भावगीतांत राष्ट्राच्या दैन्याची कणव भरलेली दिसावी, हें त्याच्या प्रभावशाली व्यक्तित्वाचेंच निदर्शक नव्हे काय? येसेनिननें जेव्हां आपलीं भावगीतें लिहिलीं, तेव्हां त्याला कदाचित् कल्पनाहि नसेल कीं, आपल्या स्वतःच्या दुःखाबरोबर आपण रशियाचेंहि दैन्य व्यक्त करीत आहोंत. पण त्याच्या प्रतिभेच्या विशालतेमुळें त्याच्या व्यक्तिगत भावनांचें समाजीकरण झालें,–त्या भावनांच्या वैयक्तिक मर्यादा सुटून त्यांना सामाजिक स्वरूप आलें.

## मतप्रसाराची सक्ती नको

ललित वाङ्मयाचा उद्देश केवळ सौंदर्यनिर्मिति किंवा आनंदप्रदता नसून, उद्बोधन हेंच त्याचें कार्य आहे, असें जें मी म्हणतों, तें याच कारणामुळें. उद्बोधन म्हणजे जागृति, विकास किंवा क्षोभ. ललित लेखक आपल्या भावनांनीं दुसऱ्याला भारण्याचा, स्वतःच्या भावनांचें समाजीकरण करण्याचा जो प्रयत्न करितो, तो कशासाठीं? त्या भावनांना सदृश आणि संवादी अशा भावना दुसऱ्याच्या अंतःकरणांत जागृत कराव्या म्हणूनच ना? त्याच्या त्या भावना नेहमींच रमणीय किंवा आनंददायक असतील, असें नाहीं. पण त्या मनाची जागृति, विकास किंवा क्षोभ करणाऱ्या असतात, एवढें मात्र खास. हरिभाऊंची 'पण लक्षांत कोण घेतो,' टॉल्स्टॉयची 'रीसरेक्शन' किंवा हार्डीची 'ज्यूड द आब्स्क्युअर' या कादंबऱ्या सौंदर्य किंवा आनंद यांच्या निधान आहेत असें कोणीहि म्हणूं शकणार नाहीं. पण, मन आणि बुद्धि हीं जागृत, विकसित आणि क्षुब्ध करून विचारांना चालना देण्याची केवढी शक्ति या कादंबऱ्यांत आहे! किंबहुना, शाकुंतलासारख्या सौंदर्यप्रधान आणि सुखपर्यवसायी नाटकाच्या वाचनानें आणि चिंतनानें आपल्या

अंतःकरणांत जे नाना प्रकारचे कल्लोळ उठतात, त्यांचें वर्णन नुसत्या 'आनंद' या शब्दानें करतां येईल काय? त्या कल्लोळांत आनंदाबरोबर उन्नतता, उदात्ततादि असते; व तिचा जो परिणाम मनावर आणि बुद्धिवर होतो, तोच विकास होय. ही विकासक्षमता कलाकृतींत जितक्या जास्त प्रमाणांत असेल, तितकी तिची थोरवी मोठी. उत्कृष्ट संगीत प्रत्यक्ष ऐकतांना कानांना जितका आनंद होतो, त्याहिपेक्षां जास्त आनंद त्याचे ते सूर कानांत आणि मनांत घोळत असतांना होतो. ललित वाङ्मयाचेंहि तसेंच आहे. त्याच्या वाचनानें जितका आल्हाद होतो, त्याहिपेक्षां जास्त आल्हाद त्याच्या चिंतनानें होतो, झाला पाहिजे. जी ललित कृति मनाला किंवा बुद्धीला क्षणमात्र आनंद देते, त्याची किंचित्काल फक्त करमणूक करिते, ती, टॉलस्टॉयनें म्हटल्याप्रमाणें, बनावट (counterfeit) आहे, असें खुशाल समजावें. मनुष्याचें मन हें स्थूल आणि सूक्ष्म, गूढ आणि गाढ, सुप्त आणि गुप्त अशा अगणित भावनांचें जणूं कांहीं अनंत असें भुयारच आहे. त्या भुयारांत चाहूल लागूं न देतां चोर पावलांनीं शिरून ललित लेखक हा त्यांतील संवादी भावना जागृत करितो आणि अशा रीतीनें त्याच्या मनाचा विकास घडवून आणतो. लेखकाच्या भावनांचें समाजीकरण खरोखरी तेव्हांच यशस्वी आणि प्रभावी होतें कीं, जेव्हां त्या भावना अंतःकरणाच्या खोल कुहरांतून कसल्या ना कसल्या तरी ईर्ष्येनें उफाळून बाहेर पडलेल्या असतात,—जेव्हां त्याची सृजनशक्ति कसल्या ना कसल्या तरी आंतरिक प्रेरणेनें उत्स्फूर्त झालेली असते. स्वतःच्या भावनांना आणि अनुभूतींना सामाजिक स्वरूप देण्याच्या ललित लेखकाच्या या प्रयत्नामुळें व्यक्तिशः त्याचा दुहेरी फायदा होतो: एक तर, आपल्या सृजनशक्तीच्या प्रभावाची प्रतीति येऊन त्याला एक प्रकारच्या अहंतामूलक आनंदाचा लाभ होतो; व दुसरें असें कीं, स्वतःच्या कल्पनांचा आणि विचारांचा प्रसार केल्याचेंहि समाधान त्याला मिळतें. याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, ललित लेखन हें नेहमींच मतप्रसाराच्या

बुद्धीनें केलें जातें किंवा केलें गेलें पाहिजे. मतप्रसाराची शिसारी असणाऱ्या एका कलावादी इंग्रज लेखकानें असें म्हटलें आहे कीं, ललित कलांना मतप्रसारार्थ राबवून घेणें म्हणजे फुलपांखरांना रणगाड्याच्या धुरेला जुंपण्यासारखेंच आहे. हें विधान करितांना तो कलाविलासाचा भोक्ता ही गोष्ट विसरला कीं, लालित्य म्हणजे कांहीं नुसता लिवलिवीतपणा नव्हे व ललित लेखक म्हणजे कांहीं कर्तृत्वशून्य कमलभक्षक नव्हेत. कलेसाठीं कला हें तत्त्व जितकें चुकीचें आहे, तितकेंच मतप्रसारासाठीं कला हें तत्त्वहि चुकीचें आहे. कलेचें सारें सौन्दर्य आणि सामर्थ्य हें तिच्यांत व्यक्त होणाऱ्या मानवी मनोव्यापारांच्या गाढतेवर, उत्कटतेवर आणि विविधतेवर अवलंबून असतें. कलेनें विशिष्ट मतांचा पुरस्कार आणि प्रसार केला पाहिजे, असा आग्रह धरल्यावर मानवी मनोव्यापारांच्या अनिर्बंध आविष्काराला तींत कुठून वाव मिळणार? विशिष्ट मतांचा प्रसार करण्याची सक्ती कलावंतावर करणें म्हणजे त्याच्या प्रतिभेचा, त्याच्या व्यक्तित्वाचा कोंडमारा करणेंच होय; व बोल्शेविक अमलाखालीं झालेल्या मतप्रसाराच्या जुलमाला कंटाळून रशियन कवींनीं एकामागून एक केलेल्या आत्महत्यांवरून अशा प्रकारच्या सक्तीचे परिणाम किती भीषण होतात, याची उत्तम कल्पना येते. तरी सुद्धां आज महाराष्ट्रामध्यें ललित वाङ्मयाची श्रेष्ठकनिष्ठता ठरविण्यासाठीं साम्यवादी कसोटीचा एक नवा दगड बनविला जात आहे. पण, भक्तिरस ही वाङ्मयाची कसोटी ठरविण्याचा जुन्या संतकवींचा अट्टाहास जितका अप्रयोजकपणाचा होता, तितकाच साम्यवाद हा वाङ्मयाचा निकष ठरविण्याचा सध्यां चाललेला उपद्व्यापहि आचरटपणाचा आहे. महाराष्ट्रांतील गांवठी आव्हर्बाक कांहींहि म्हणोत. खुद्द लेनिनला मात्र मतप्रसाराच्या सक्तीमुळें कशा कलाहीन वाङ्मयाची पैदास होते, याची पूर्ण जाणीव होती. रशियांतील साम्यवादी कवितेचा बडा सरकारी कारखानदार मायाकोव्स्की व त्याचे गण यांनीं मतप्रसारार्थ लिहिलेल्या खंडोगणती कवितेविषयीं

तो नेहमीं तुच्छतेनें बोलत असे. एकदां तर त्यानें असे उद्गार काढले कीं, "मायाकोव्स्कीच्या कविता वाचण्याचा मी अनेकदां प्रयत्न केला. पण तीन ओळींच्या पलिकडे कांहीं माझी मजल जाऊं शकली नाहीं. मला सारखी झोंप येऊं लागली!" पुष्किन, टॉल्स्टॉय किंवा गटे यांच्या ललित कृति अतृप्ततेनें वाचणाऱ्या व प्रवासांत नेहमीं आपल्या बरोबर बाळगणाऱ्या लेनिनला आपल्या तत्त्वज्ञानाच्या मायाकोव्स्कीसारख्या निष्ठावंत प्रचारकाची कविता डोळ्यांसमोर नकोशी वाटावी, याचा अर्थ काय? याचा अर्थ इतकाच कीं, जगांतील कोणतेंहि तत्त्वज्ञान हें कलेचें निकष होऊं शकत नाहीं. कलेचे स्वतःचे असे स्वयंभू निर्बंध असून त्यांच्या कसोटीवरच कलाकृतीची पारख करण्यांत आली पाहिजे, असें जें ट्रॉट्स्कीसारख्या कट्टया मार्क्सवाद्यानें सुद्धां म्हटलें आहे, त्याचेंहि मर्म झालें तरी हेंच होय.*

## साहित्योपजीवी लेखकांचें दैन्य

पण, या औद्योगीकरणाच्या (industrialisation) युगांत कलावंताच्या व्यक्तित्वाचा उत्तरोत्तर कोंडमारा होत जाईल, अशी भीति वाटते. शिल्प, चित्र, नृत्य आणि संगीत या कलांचें औद्योगीकरण भांडवलशाहीनें मोठ्या प्रमाणांत केलें असून, हॉलीवूडसारखीं सिनेमा-शहरें हीं तिच्या या क्षेत्रांतील कर्तबगारीची साक्ष देत आहेत. ललित-वाङ्मय मात्र तिच्या तावडींत अद्याप तितक्या प्रमाणांत सांपडलेलें नाहीं. पण, भांडवलशाहीनें जें केलेलें नाहीं, तें रशिया, जर्मनी, इटली

---

* It is very true that one cannot always go by the principles of Marxism in deciding whether to reject or to accept a work of art. A work of art should, in the first place, be judged by its own law, that is by the law of art.

—*Leon Trotsky*

वगैरे कांहीं पाश्चात्य राष्ट्रांतून झोटिंगशाहीनें करून दाखविलें आहे. जर्मनी आणि इटली या देशांतून विशिष्ट प्रकारचें वाङ्मय लिहिण्याची सक्ती आज लेखकांवर केली जात असून, जर्मनींत तर सरकारच्या अवकृपेला पात्र होणारे ग्रंथ चवाठ्यावर होळी करून जाळले जातात. मतप्रसाराच्या हेतूनें ललित वाङ्मयाच्या औद्योगीकरणाचा सर्वांत पद्धतशीर प्रयत्न जर कुठें झाला असेल, तर तो रशियामध्यें. बोल्शेविकांच्या हातीं राज्यसत्ता आल्यावर, साम्यवादी संस्कृति निर्माण करण्याच्या उद्देशानें, त्यांनीं वाङ्मयाचा पंचवार्षिक कार्यक्रम आंखला; व मायाकोव्स्की आणि आव्हर्बाक यांच्या नेतृत्वाखालीं कवि, लेखक आणि टीकाकार यांची पलटणें उभारून प्रोलेटकल्ट आणि रॅप या संस्थांनीं ललित वाङ्मयाची सामुदायिक पैदास (mass production) करण्याचा खटाटोप प्रचंड प्रमाणावर केला. या दोन संस्थांनीं रशियन वाङ्मयांत जी झारशाही गाजविली, तिला कंटाळून कांहीं लेखकांनीं साहित्यसंन्यास घेतला, कांहीं देशोधडीला लागले, कांहींनीं आत्महत्या केल्या; व पुष्किन किंवा टॉल्स्टाय यांच्याशीं ज्याची अंशतः तरी तुलना करितां येईल असा एकहि साहित्यिक आम्ही निर्माण करूं शकलों नाहीं, अशी कबुली देण्याची पाळी ट्रॉट्स्कीवर आली. वाङ्मयाची घाऊक निपज करण्याचा अशा प्रकारचा उद्योग भांडवलशाहीनें केलेला नाहीं, हें खरें. तथापि, मुद्रक, प्रकाशक आणि नियतकालिकांचे चालक यांनीं ललित वाङ्मयाचें औद्योगीकरण, लहान प्रमाणावर कां होईना, कळत न कळत केलें असून, त्यांच्या आश्रयानें वाङ्मयव्यवसाय करणाऱ्या साहित्योपजीवी लेखकांचा मोठा वर्ग आज उत्पन्न झाला आहे. अर्थात् लेखन ही कांहीं यापुढें निव्वळ शारदेची उपासना किंवा वाङ्मयाची तपस्या राहिली नसून, तो एक आतां धंदा झाला आहे,—क्रयविक्रयाचें सारें अर्थशास्त्र त्याचें नियमन करूं पहात आहे. खुद्द महाराष्ट्रांतहि लेखनकलेला व्यावसायिक स्वरूप आलें असून, आज अनेक लेखक छापखाने, प्रकाशन-

संस्था, वर्तमानपत्रें, नाटकमंडळ्या किंवा सिनेमा कंपन्या यांच्या आश्रयानें ललित लेखन करीत आहेत. हे लेखक जरी पांढरपेशे गणले जात असले, तरी वस्तुतः त्यांचा समावेश श्रमजीवी वर्गांतच केला पाहिजे. कारण, मेहनताना अगर मोबदला जेमतेम पोटापुरता, तोहि हुकमी मिळण्याची खात्री नाहीं व सामाजिक दर्जाचा अभाव, अशी आज त्यांची अवस्था आहे. मराठी लेखकांच्या या दैन्याला उपमा द्यावयाची झाली, तर ती फक्त प्राथमिक शिक्षकांच्या दैन्याचीच देतां येईल. हें दैन्य दूर करण्यासाठीं लेखकवर्गानें आपली संघटना केली पाहिजे; व ललित वाङ्मयाच्या औद्योगीकरणांत त्याचे निर्माते म्हणून आपले हक्क निश्चित करून घेतले पाहिजेत. उपजीविकेचें साधन म्हणून मोबदल्यासाठीं लेखन करणाऱ्या धंदेवाईक लेखकांना टॉलस्टॉयनें नाकें मुरडलीं आहेत. त्याची तक्रार अशी आहे कीं, धंदेवाईकपणामुळें लेखनाला बनावट स्वरूप येतें. पण, नट, गायक, चित्रकार, शिल्पकार वगैरे सारेच कलावंत जिथें आज धंदेवाईक झाले आहेत, तिथें एकट्या लेखकालाच नांवें ठेवण्यांत काय अर्थ? व हजारों रुपये घेऊन कामें करणाऱ्या नटांच्या, गायकांच्या किंवा चित्रकारांच्या कलेला जर बनावट स्वरूप येत नाहीं, तर एकट्या लेखकाच्याच कलेला तें का यावें टॉल्स्टॉयच्या या तक्रारींत तथ्य असलें, तरी तें अगदींच थोडें आहे. लेखक मोबदल्यासाठीं जरी लिहावयाला बसला, तरी त्याचे स्वाभाविक मनोधर्म, त्याचें व्यक्तित्व त्यांत प्रकट झाल्याशिवाय रहात नाहीं. मनुष्य जर जातिवंत कलोपासक असेल, तर तो अनिच्छेनें जरी कलेच्या आराधनेला उद्युक्त झाला, तरी तिची नशा त्याच्यावर चढून लवकरच त्याची समाधि लागते. या बाबतींत एका मैफलीच्या वेळीं प्रत्यक्ष पाहिलेला प्रसंग मला मोठा बोधप्रद वाटला. पहांटे तीन वाजण्याचा सुमार होता. सतत चार तास गाऊन श्रांत झालेल्या गायिकेनें बैठक संपविण्याच्या इच्छेनें भैरवीचे सूर लाविले होते. तोंच मैफलींतील एका लक्ष्मीपुत्राची एक विशिष्ट लावणी ऐकण्याची लहर

लागली; व त्यानें हातांतील हिऱ्याची आंगठी तिच्यापुढें काढून ठेवून तिला ती लावणी म्हणण्यासाठीं पराकाष्ठेचा आग्रह केला. अखेर अत्यंत नाराजीनें लावणी म्हणावयाला ती तयार झाली. तिच्या सुंदर भृकुटि वक्र झाल्या होत्या; तोंडावरलें मंद स्मित मावळलें होतें; व आपल्या साथीदारांकडे सरोप दृष्टीनें पाहून तिनें त्या लावणीचे सूर त्यांना लावावयाला सांगितले. पण नवलाची गोष्ट अशी कीं, लावणीचीं दोन कडवीं पुरीं होतात न होतात, तोंच ती स्वतः तन्मय होऊन गेली; व इतक्या समरसतेनें तिनें ती लावणी म्हटली कीं, ऐकणारांच्याच काय, पण तिच्या स्वतःच्याहि डोळ्यांना शेवटीं शेवटीं पाणी आलें. दुसऱ्या दिवशीं मी जेव्हां तिला या प्रकाराबद्दल विचारलें, तेव्हां ती म्हणाली, "असं होतं खरं महाराज! पण कां होतं तें मात्र सांगतां येत नाहीं. मन कितीहि नाराज असलं, तरी एकदां गायला सुरवात केल्यावर, मग इतर साऱ्या गोष्टींचा विसर पडून, त्यांत रंगून जातं तें!" मोबदल्यासाठीं लेखन करणाऱ्या कलावंतांनाहि अशा प्रकारचा अनुभव नेहमीं येतो. पाश्चात्य राष्ट्रांतून लेखनाला सर्वस्वीं धंद्याचें स्वरूप आलें असतांना सुद्धां शब्दागणिक शिलिंग घेणाऱ्या श्रेष्ठ कलावंतांच्या वाङ्मयांत जो जिव्हाळा आणि ताजेपणा आढळतो, तो याच कारणामुळें.

## मराठी ललित लेखकांच्या अडचणी

महाराष्ट्रांत अलिकडे प्रसिद्ध होत असलेलें ललित वाङ्मय हें संकुचित आणि बनावट असल्याची तक्रार वारंवार कानांवर पडते; व डॉ. केतकर हे तर, सरसकट साऱ्याच मराठी ललित वाङ्मयाला गिरगांवी आणि सदाशिवपेटी हीं विशेषणें बहाल करून, त्याच्याविषयीं तुच्छतेनें बोलत असत. वाङ्मयनिर्माणाच्या बाबतींत त्यांना स्वतःला जें गिरगांव आणि सदाशिवपेठ यांच्या थोडें बहुत तरी पलिकडे जातां आलें, याचें कारण, त्यांना लाभलेली परदेशगमनाची संधि व तेथें आलेले वैचित्र्य

पूर्ण अनुभव, हें होय. हें भाग्य बिचाऱ्या इतर ललित लेखकांना कोठून लाभणार? फार कशाला, डॉ. केतकर यांच्यासारख्या वाङ्मय-निर्मिति हा धंदा करून बसलेल्या व त्यांत अंशतः यश संपादिलेल्याहि धुरंधर लेखकाला दारिद्र्याशीं झगडत अकालीं मृत्युमुखीं पडावें लागलें, यापरतें मराठी लेखकांच्या दैन्याचें आणखी कोणतें विदारक प्रत्यंतर हवें? अशा स्थितींत मराठी लेखकांना त्यांच्या संकुचितपणाबद्दल दोष देणें फारसें योग्य होईल, असें वाटत नाहीं. महाराष्ट्रांतील ललित लेखकांच्या जीवनाचा चारी बाजूंनीं कोंडमारा झाला आहे, त्यांच्या व्यक्तित्वाच्या विकासाला जिकडे तिकडे मर्यादा पडल्या आहेत. प्रेस ॲक्टच्या जुलमामुळें देशांतील प्रभावी राजकीय आंदोलनाचें प्रतिबिंब ललित वाङ्मयांत पडणें अशक्यप्राय झालें असून, त्या बाबतींत पक्षघात झाल्यासारखी त्याची अवस्था होऊन बसली आहे. त्यांतच पुन्हा सामाजिक विषमतेमुळें होणाऱ्या कुचंबणेची भर. मराठी ललित वाङ्मयाला सदाशिवपेठी स्वरूप येण्याचें मुख्य कारण जातिभेद हें होय. महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जाति पोटजाति जरी हिंदु या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या एकाच समाजांत मोडत असल्या, तरी प्रत्येक जातिगणिक भाषा, रहाणी आणि विचार यांत इतका कांहीं फरक पडत गेला आहे कीं, समाजाच्या शिरोभागीं विराजत असलेला ब्राह्मण आणि त्याच्या पदतळीं तुडविला जाणारा अस्पृश्य यांना एकाच धर्माचे संतान किंवा एकाच संस्कृतीचे सहोदर मानावयाला मन एकदम धजत नाहीं. जातिजातींतील भेद म्हणजे जणूं कांहीं दुर्लंघ्य असे तटच असून, त्यांनीं व्यापक सामाजिक जीवन आणि अवलोकन हीं दोनीहि अशक्य करून सोडलीं आहेत. त्यामुळें ब्राह्मणाला कायस्थाच्या आचारांची, कायस्थाला मराठ्याच्या आचरांची व मराठ्याला महाराच्या आचारांची कांहींच माहिती नसते. मराठी ललित वाङ्मयांत सामुदायिक आवाहन ( Mass appeal) करण्याचें सामर्थ्य जें प्रतीत होत नाहीं, त्याचेंहि कारण

जातिभेद हेंच होय. ‘पण लक्षांत कोण घेतो’ ही हरिभाऊंची कादंबरी कितीहि हृदयस्पर्शी असली, तरी ज्या जातींत विधवांचें वपन करण्याची रूढि नाहीं व त्यांना पुनर्विवाह करण्याची मोकळीक आहे, त्या जातींतील वाचकाच्या मनावर त्या कादंबरीचा काय परिणाम होणार? आणि ‘ब्राह्मणकन्ये’त माजविलेलें अकरमाशांच्या प्रश्नाचें प्रस्थ पाहून मराठ्यांसारख्या अधर्मसंततीच्या बाबतींत उदार आणि समावेशक असलेल्या जातींतील वाचकाला कादंबरीकाराचा दृष्टिकोन जर निव्वळ ब्राह्मणी वाटला, तर त्यांत नवल काय? जातिभेदाच्या मागोमाग धर्मभेद येतो. हिंदूंच्या मानानें अन्यधर्मीय लोक जरी महाराष्ट्रांत अल्पसंख्य असले, तरी सामाजिक जीवनांतील त्यांचें स्थान कांहीं कमी महत्त्वाचें आहे, असें नाहीं. पारशी, बोहरी आणि यहुदी यांच्या मुठींत महाराष्ट्रांतील आर्थिक व्यवहाराचीं सूत्रें असून, खिस्ती व विशेषतः मुसलमान लोकांनीं खेड्यापाड्यांतील घरगुती धंद्यांचा निम्मा वांटा उचललेला आहे. पण, जिथें स्वतःच्या समाजांतीलच निरनिराळ्या जातींच्या रहाणीची चांगलीशी कल्पना नसते, तिथें या अन्यधर्मीयांच्या आयुष्यक्रमाची माहिती कोठून असणार? विख्यात बंगाली कादंबरीकार श्री. शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांनीं मुसलमान समाजाच्या जीवनाचें चित्रण करण्याचा आपला संकल्प नुकताच जाहिर केला आहे. या त्यांच्या घोषणेपासून मराठी लेखकांना पुष्कळ बोध घेतां येईल. महाराष्ट्रांतील ललित लेखकांची दृष्टि स्वजातीयांच्या आणि स्वधर्मीयांच्या पलिकडे गेल्याशिवाय मराठी वाङ्मयाचें सदाशिवपेठी स्वरूप नष्ट होणें शक्य नाहीं व त्याच्यांत सामुदायिक आवाहन करण्याचें सामर्थ्य येणेंहि शक्य नाहीं.

## मराठी लेखकांचें कर्तव्य

म्हणूनच मराठी ललित लेखकांनीं महाराष्ट्राच्या सर्वांगीण पुनर्घटनेला पोषक अशा नवीन क्रांतिकारक तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला

पाहिजे. आज आपल्या समाजाची स्थिति, ज्यांतील साऱ्या इमारती हादरून खिळखिळ्या झाल्या आहेत पण पुरत्या पडलेल्या नाहींत, अशा भूकंपानें उद्ध्वस्त झालेल्या शहरासारखी आहे. अशा स्थितींत नुसत्या डागडुजीनें भागणार नाहीं; तर आमूलाग्र पुनर्घटनाच केली पाहिजे. आणि ती करितांना समाजवादाच्या कांहीं तत्त्वांचा तरी अवलंब केल्याविना गत्यंतर नाहीं. समाजवाद अद्यापि प्रयोगावस्थेंत आहे; व रशियांतील त्याचा प्रयोग यशस्वी झाला आहे असें गृहीत धरलें, तरीसुद्धां त्याच्या कार्यक्रमाचा जशाचा तसा अंगीकार करणें कितपत इष्ट होईल, याबद्दल शंका वाटते. मॉस्को ही आपली मक्का, कॅपिटल हें आपलें कुराण आणि मार्क्स हा आपला महंमद पैगंबर अशी ज्यांची श्रद्धा आहे, त्या परप्रत्ययनेय कम्युनिस्टांची गोष्ट अर्थातच निराळी. पण समाजवाद हा मानवजातीच्या उन्नतीच्या शास्त्रांतील शेवटचा शब्द आहे, त्या शास्त्राची परमोच्च परिसीमा आहे, असें समजणें असमंजसपणाचें होईल. म्हणून, समाजवादांतील जीं तत्त्वें महाराष्ट्राच्या पुनर्घटनेला उपकारक आहेत असें मराठी ललित लेखकांना वाटेल, त्या तत्त्वांचा त्यांनीं आपल्या वाङ्मयांतून कलात्मक पुरस्कार करणें आवश्यक आहे. रशियांतील राज्यक्रांतीच्या वेळीं एका प्रसिद्ध साम्यवादी सेनानीची एका प्रसिद्ध ललित लेखकाशीं मॉस्कोमध्यें सहज गांठ पडली असतां, त्या सेनानीनें किंचित् उपहासानें त्या लेखकाला म्हटलें, "काय हो, आम्ही तिकडे रणमैदानावर लढत असतां, तुम्ही इकडे राजधानींत काय करीत आहांत?" त्यावर तो लेखक म्हणाला, "मी इथें राहून तुम्हांला माणसांचा पुरवठा करीत आहे!– तुमच्या मशिन गनमधून जितकीं स्फोटक द्रव्यें निघत नसतील, तितकीं स्फोटक द्रव्यें माझ्या लेखणींतून बाहेर पडतात!" या उद्गारांना जरी थोडा अहंकाराचा दर्प येत असला, तरी राष्ट्रीय जीवनांतील लेखकाचें कार्य त्यांत मार्मिकपणानें दिग्दर्शित केलेलें आहे, यांत मात्र शंका नाहीं. राष्ट्रीय विप्लवाच्या काळांत ज्याच्या हातीं जें

साधन असेल, त्याचा उपयोग राष्ट्राच्या उन्नतीसाठीं करणें हें त्याचें पहिलें कर्तव्य आहे. मानवजातीच्या आयुष्यक्रमांत जीं अभिनव सामर्थ्यें आज क्रांति घडवून आणीत आहेत, त्यांची ओळख मराठी ललित लेखकांनीं स्वतः करून घेतली पाहिजे व बहुजनसमाजालाहि करून दिली पाहिजे. एवढी कामगिरी जरी त्यांनी केली, तरी महाराष्ट्राच्या पुनर्घटनेला, त्याच्या राष्ट्रीय पुनर्जन्माला त्यांनीं मोठाच हातभार लावला, असें होईल. आणि त्यांतच खरोखरी त्यांच्या सृजनशक्तीचें साफल्य आहे. कारण, कला ही कलेसाठीं नाहीं, तर माणसासाठीं आहे,—प्रगतीच्या खडतर मार्गावर मानवजातीचें साहचर्य करण्यासाठीं आहे.

# उज्जयिनी

(१ जानेवारी १९४०)

### उज्जयिनी आणि प्रतिष्ठान

विंध्य पर्वताच्या उत्संगावर वसलेल्या विक्रमादित्याच्या या प्राचीन राजधानींत उभे राहून आपल्या समोर बोलतांना माझ्या मनांत आज किती तरी चमत्कारिक कल्पनांची गर्दी उसळली आहे. उज्जयिनीस आल्याबरोबर मला जर प्रथम कसली आठवण झाली असेल, तर ती लहानपणीं मोठ्या उत्सुकतेनें वाचलेल्या वेताळ पंचविशीची. या वेताळानें ज्या विक्रम राजाला नरबळी देणाऱ्या योग्याच्या तावडींतून वांचविला, तो विक्रम पैठणचा होता कीं उज्जयिनीचा होता, याबद्दल वाद आहे. या वादांतून मी तरी एवढाच अर्थ काढतों कीं, अत्यंत प्राचीन काळीं सुद्धां दिग्विजयी सम्राटांविषयीं बोलतांना लोकांची दृष्टी उज्जयिनी आणि प्रतिष्ठान या दोनच शहरांकडे वळत असे; व त्यामुळेंच पैठणचा त्रिविक्रमसेन हा उज्जयिनीच्या विक्रमादित्याचा अवतार होता अशा प्रकारच्या कल्पना प्रसृत होत असत. विद्या आणि वैभव यांच्या बाब-तींतही उज्जयिनी आणि प्रतिष्ठान यांची ही स्पर्धा पुराणप्रसिद्ध असून,

कालिदास आणि गुणाढ्य या कवींप्रमाणेंच वसंतसेना, मदनमाला आणि कुमुदिका या कलावतींनीं त्याच्या प्राचीन इतिहासांत चारुता आणि चमत्कृति उत्पन्न केली आहे. उज्जयिनीचा महाराष्ट्राशीं असलेला हा पुरातन ऋणानुबंध लक्षांत घेतला असतां तें शहर आधुनिक काळांत मराठयांच्या साम्राज्यामध्यें समाविष्ट व्हावें आणि महाराष्ट्र वाङ्मयमंडळासारख्या मराठीच्या केंद्राची येथें स्थापना व्हावी, या योगायोगाचें कोणाला कौतुक वाटणार नाहीं ?

## मालव आणि महाराष्ट्र

या योगायोगावरून आणखीहि एक कल्पना माझ्या मनांत आली. हिंदुस्थानांत आजच्या घटकेलाहि ज्यांची शकगणना चालू आहे, असे भारतीय सम्राट् विक्रमादित्य आणि शालिवाहन हे दोनच होऊन गेले. पण दैवयोग असा विचित्र कीं, या सम्राटांनीं स्थापन केलेलीं तीं विशाल आणि वैभवशाली साम्राज्यें नष्ट झालीं. इतकेंच केवळ नव्हे, तर त्यांनीं आपल्या लोकोत्तर कर्तृत्वानें ज्यांचें नांव इतिहासांत उज्ज्वल करून ठेवलें आहे, त्या त्यांच्या राष्ट्रांचेहि तुकडे तुकडे होऊन गेले! विंध्याद्रीच्या उत्संगावर वसलेला विक्रमादित्याचा मालव आणि सह्याद्रीच्या उत्संगावर वसलेला शालिवाहनाचा महाराष्ट्र!–एका काळीं शकांचा संहार करून सारा भारतवर्ष निर्भय केल्याबद्दल इतिहासांत गाजलेलीं हीं दोन तुल्यबल राष्ट्रें !–आज त्या राष्ट्रांचे अनेक तुकडे पडले असून ते तुकडे निरनिराळ्या राज्यसत्तांच्या अमलाखालीं दीनवाणें जिणें कंठीत आहेत. साम्राज्यांचा विध्वंस हा त्यांत जबरदस्तीनें सामील करून घेतलेल्या जित राष्ट्रांच्या विमोचनाला कारण होत असतो; व म्हणून विक्रमादित्य आणि शालिवाहन यांचीं साम्राज्यें लयाला गेल्याबद्दल आज तरी कोणी अश्रु ढाळणार नाहीं. पण छिन्नभिन्न झालेले मालव आणि महाराष्ट्र !–त्यांच्या दुर्दशेमुळें कोणाचें मन व्यथित होणार नाहीं ?

# तेजोवध करण्याचे संभावित प्रकार

पण हा प्रश्न मन नुसतें व्यथित होऊन स्वस्थ बसण्याचा नाहीं. ज्यांच्या सम्राज्यांचा विध्वंस करण्यांत आला, इतकेंच नव्हे तर ज्यांच्या शरीराचेहि लचके तहाच्या वेळीं तोडण्यांत आले, तीं युरोपांतील राष्ट्रें आज कशीं बोलत आणि वागत आहेत हें पाहिलें असतां आपल्याला थोडा तरी आपल्या कर्तव्याचा बोध होईल. गेल्या महायुद्धानंतर पराभूत झालेल्या जर्मनीचे निरनिराळया सबबी सांगून पद्धतशीर तुकडे पाडण्यांत आले; व त्याच्या शरीराचीं हीं शकलें सभोंवतालच्या इतर देशांच्या अंगाला चिकटवून देऊन त्याच्या आसपास नवीं कृत्रिम राष्ट्रकें निर्माण करण्यांत आलीं. पण पुढें सोळा वर्षांनीं जर्मनीला आपल्या सामर्थ्याचा भरंवसा येतांच, त्यानें प्रथम जर कोणती गोष्ट केली असेल, तर ती आपल्या शरीराचीं हीं शकलें परत मिळविण्याची. दैत्यांनीं हिंस्र पशूंना खाऊं घातलेले कचाच्या शरीराचे तुकडे, शुक्राचार्यांनीं संजीवनी मंत्र जपून हाक मारतांच, जसे त्या पशूंचीं पोटें फाडून बाहेर पडले, तसाच चमत्कार जर्मनीच्या पुनरुत्थानाच्या बाबतींतहि घडला. जित राष्ट्राचा तेजोवध करण्याचे दोन संभावित प्रकार आधुनिक राजकारणांत रूढ झालेले आहेत: एक प्रकार असा कीं, जिंकलेल्या राष्ट्राचे तुकडे पाडून त्याला खच्ची करावयाचें. गेल्या महायुद्धांत जर्मनीच्या आणि चालू महायुद्धांत पोलंडच्या बाबतींत ही राजनीति जगाच्या प्रत्ययाला आली. दुसरा प्रकार असा कीं, जित राष्ट्राच्या अगदीं अंतरंगांतच विजातीय असें कृत्रिम राष्ट्रक स्थापन करून काळजांत भाल्याचें फाळ घुसून बसल्यासारखी त्याची अवस्था करून टाकावयाची. आयर्लंडांतील अल्स्टर आणि अरबस्तानांतील पॅलेस्टाईन हे या दुसऱ्या प्रकाराचे मासले म्हणून दाखवितां येतील. महाराष्ट्रावर आधुनिक राजनीतीचे हे दोन्ही प्रयोग झालेले आहेत, हें आपल्या विचारांतीं लक्षांत येईल.

पोर्तुगीजांच्या ताब्यांतील गोमंतक, निजाम राज्यांतील मराठवाडा, मध्यप्रांतांतील नागपूर–वऱ्हाड आणि मुंबई प्रांतांतील मराठी विभाग हीं महाराष्ट्राचीं चार शकलें आपल्या सर्वांच्या माहितीचीं आहेत. महाराष्ट्राचीं हीं शकलें भिन्नभाषी प्रदेशांना जोडलीं गेल्यामुळें त्याची जी हानी झाली आहे, ती आज जरी कदाचित् तितकी तीव्रतेनें जाणवत नसली, तरी उद्यां जेव्हां महाराष्ट्राचें एकीकरण होण्याचा प्रसंग येईल, तेव्हां तिचे दुष्परिणाम प्रत्ययाला आल्यावांचून राहणार नाहींत. गोमंतकाचा एकजिनसी विभाग सोडला, तर महाराष्ट्राच्या बाकी तिन्ही विभागांची सांगड भाषा आणि संस्कृति या दोहोंच्या दृष्टीनें विभिन्न अशा प्रदेशांशीं घातली गेल्यामुळें, त्या दोन्हीही बाबतींत त्याची सारखी कुचंबणा आणि पिछेहाट चालली आहे. मुंबई प्रांतांत गुजरातीशीं, नागपूर–वऱ्हाडांत हिंदीशीं आणि मराठवाड्यांत उर्दूशीं मराठीचा संघर्ष आल्यामुळें तिची स्वतःच्या घरांतही स्वामित्वानें नांदणूक होऊं शकत नाहीं. इंग्रजी ही राजभाषा म्हणून आधींच सर्वांच्या डोक्यावर बसली आहे. राजदरबारांत आणि विद्यापीठांत तिला अग्रासन दिल्यावर उरलेलें दुसरें स्थानही मराठीला आज पुरतेपणीं लाभत नाहीं. याहिपेक्षां महत्त्वाचा प्रश्न असा कीं, मुंबई आणि नागपूर हीं जीं महाराष्ट्राच्या दोन प्रमुख भागांतील दोन राजधानीचीं शहरें तीं आतां पूर्णपणें दुभाषी बनलीं असून, महाराष्ट्राचा त्यांच्यावरील हक्क त्या प्रमाणांत वादग्रस्त होऊं पहात आहे. नागपुरांतील एका हिंदी दैनिकाच्या उद्घाटनाच्या प्रसंगीं एका कांग्रेस मंत्र्यानें असें स्पष्टच बोलून दाखविलें कीं, नागपूरवर मराठीपेक्षां हिंदीचा हक्क जास्त आहे! आणि हें त्याचें विधान कांहीं अप्रस्तुत नव्हतें. नागपुरांत हिंदीचीं दोन दैनिकें चालावीं आणि मराठीचें मात्र एकहि दैनिक यशस्वी होऊं नये, याचा दुसरा अर्थ काय करणार? मुंबइतही मराठी दैनिकांपेक्षां गुजराती 'जन्मभूमी'चा खप अधिक होतो, असें म्हणतात.

ही परिस्थिति काय दर्शविते ? याचा अर्थ असा कीं, महाराष्ट्राच्या या दोन्हीही राजधान्यांतून, एखाद्या राष्ट्राच्या अंतरगांत जसें कृत्रिम विजातीय राष्ट्रक निर्माण करावें त्याप्रमाणें, महाराष्ट्रीयेतरांचें वर्चस्व सारखें वाढत आणि वाढविलें जात आहे. कालांतरानें, म्हणजे फेडरल घटनेमध्यें जेव्हां महाराष्ट्र कधीं संयुक्त होऊन आपलें स्थान घेईल तेव्हां, असा प्रश्न खात्रीनें उद्‌भवेल कीं, त्याच्या राजधान्यांचीं हीं दुभाषी शहरें महाराष्ट्रांत राहूं द्यावयाचीं कीं चीनमधील शांघाय किंवा हाँगकांग या शहरांप्रमाणें तीं आंतरप्रांतीय समजून स्वतंत्र करावयाचीं ? हा प्रश्न फक्त राजधानीच्या शहरांपुरताच उद्‌भवला आहे, असें आपण समजूं नका. महाराष्ट्राच्या सरहद्दीवर जेथें जेथें गुजराथी आणि हिंदी या भाषांशीं मराठीचा संघर्ष आला आहे, त्या त्या सर्व ठिकाणीं मराठी मागें रेटली जात असल्याचें आपल्या नजरेला येईल. नागपूर ही प्रांताची राजधानी म्हणून, वर्धा हें कॉंग्रेसचें केंद्र म्हणून आणि भंडारा हें सरहद्दीवरलें शहर म्हणून या तीनही ठिकाणीं नागपूर प्रांतांत हिंदीचा वरचष्मा दृष्टीस पडतो. नागपूर काय किंवा मुंबई काय, भेसळ प्रांतांच्या राजधान्या होण्याचा भोग या शहरांच्या नशिबीं आल्या-मुळें त्यांचा एकजिनसीपणा झपाट्यानें कमी होत चालला आहे; व त्या प्रमाणांत त्यांचें महाराष्ट्रीयत्वही दिवसेंदिवस लुप्त होत आहे. भाषेचा प्रचार हा वाङ्मयापेक्षां वृत्तपत्रें, सभापरिषदा, बाजारहाट आणि कोर्ट-कचेऱ्या यांच्यावरच जास्त अवलंबून असतो. मुंबई आणि नागपूर या शहरांच्या बाबतींत तरी भाषाप्रचाराचीं हीं सर्व स्थानें गुजराती आणि हिंदी या भाषांनीं आक्रमिलेलीं आहेत, हें कबूल केलें पाहिजे. महाराष्ट्राच्या सरहद्दीवर बहुतेक सर्व ठिकाणीं अशाच प्रकारची स्थिति आपल्याला आढळेल; व लोकमताचा कौल घेऊन जर तदनुसार उद्यां सरहद्दी कायम करण्याचा प्रसंग आला, तर महाराष्ट्राला किती ठिकाणीं आंत

हटावें लागेल, याची कल्पनाही करवत नाहीं. सत्ता आणि संपत्ति यांचीं केंद्रें ज्यांच्या मुठींत नाहींत, त्यांची भाषा ही मागें हटावयाचीच.

## पॅलेस्टाईनचें उदाहरण

भेसळ प्रांतरचनेमुळें महाराष्ट्राची ही सर्वांत मोठी हानि झाली आहे; व तिचे भावी दुष्परिणाम लक्षांत घेऊन आपण या आणिबाणीच्या वेळीं महाराष्ट्राच्या एकीकरणासाटीं कसोशीनें प्रयत्न केले पाहिजेत. सध्यां चालू असलेल्या महायुद्धाचा शेवट कसाही होवो. ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, या युद्धामुळें राज्यघटनेचा फेरविचार हा अपरिहार्य झाला असून, जर युद्ध फार दिवस लांबलें, तर भावी काळांत काय उलथापालथी होतील, हें सांगणें कठीण आहे. अशा या संक्रमणाच्या वेळीं हिंदी राज्यघटनेंतील आपला दर्जा आणि महत्त्व यांच्याविषयींचे महाराष्ट्राचे विचार जर निश्चित झालेले नसतील, आपल्या राजकीय भवितव्याविषयींच्या त्याच्या कल्पना जर सुस्पष्ट आणि सुसंघटित झालेल्या नसतील, तर हल्लींच्या दुरवस्थेंतून महाराष्ट्राचें डोकें वर निघणें अशक्य आहे. युद्धोत्तर घडामोडींचें आगाऊ आकलन करून महाराष्ट्र जर या वेळीं दूरदर्शीपणानें वागला नाहीं, तर शौर्य आणि बुद्धिमत्ता यांच्या बाबतींत पंजाब, बंगाल आणि युक्तप्रांत यांच्या बरोबरीचें असलेलें हें प्राचीन राष्ट्र फेडरल राजकारणांत मागें पडण्याची भीति आहे. गेल्या महायुद्धाचा फायदा घेऊन पोलंड आणि झेकोस्लोव्हाकिया हीं राष्ट्रं जीं स्वतंत्र झालीं, तीं कांहीं दोस्त राष्ट्रांच्या केवळ मेहरबानीमुळें नव्हे; तर मॅसॅरिक आणि पिल्सुडस्की यांनीं, अज्ञातवासांत आणि बंदिवासांत आयुष्य कंठित असतां, आपल्या मायदेशाच्या भवितव्यासंबंधींचें जें स्पष्ट ध्येय आपल्या डोळ्यांपुढें ठेवलें होतें, तें त्यांनीं युद्धाच्या धामधुमींत चिकाटीनें आणि धडाडीनें अमलांत आणल्यामुळेंच होय. महाराष्ट्राच्या दृष्टीनें याहीपेक्षां जास्त समर्पक उदाहरण द्यावयाचें

झालें, तर तें आधुनिक पॅलेस्टाईनचा निर्माता डॉ. विझमन् याचें देतां येईल. महायुद्धाच्या वेळीं दारूगोळ्यासाठीं अवश्य असलेलें 'ॲसेटोन' नांवाचें द्रव्य संशोधनपूर्वक तयार करून या ज्यू वैज्ञानिकानें इंग्लंडला मोठ्या आपत्तींतून वाचविलें; व त्या बिनमोल मदतीचा मोबदला म्हणून मँचेस्टर विद्यापीठांतील या तरुण प्राध्यापकानें, इंग्लंडचे मुख्य प्रधान लॉयड जॉर्ज यांच्याजवळ आपल्या परागंदा झालेल्या देशबांधवांना त्यांची पितृभूमि परत मिळवून द्यावी, अशी मागणी केली. पण ही गोष्ट लक्षांत ठेवा कीं, हजारों वर्षांपूर्वीं देशोधडीला लागलेल्या आपल्या बांधवांना पॅलेस्टाईन परत मिळवून देऊन तिथें अभिनव ज्यू राष्ट्र निर्माण करण्याचें ध्येय वयाच्या सोळाव्या वर्षापासून विझमन्नें आपल्या हृदयांत जोपासून ठेवलें होतें, म्हणूनच त्याला, 'तुझ्या अनुपमेय कामगिरीबद्दल तुला काय मागशील तो मोबदला देतों,' असे उद्गार लॉयड जॉर्ज यांच्या तोंडून बाहेर पडतांच ज्यू राष्ट्राच्या पुनर्जन्माचा वर मागतां आला ! आपल्या ध्येयाविषयींची निश्चित कल्पना आणि त्याच्या सिद्धीसाठीं सतत केलेले प्रयत्न हीच मॅसरिक, पिल्सुडस्की किंवा विझमन् या द्रष्ट्यांना लाभलेल्या लोकोत्तर यशाचीं कारणें नाहींत काय?

## वांशिक आणि भाषिक ऐक्य

तेव्हां आज चालू असलेल्या महायुद्धाचें सर्वंकष आणि क्रांतिकारक स्वरूप लक्षांत घेऊन महाराष्ट्रानें आपल्या पुनरुज्जीवनाची योजना वेळींच निश्चित करावयाला नको काय? गेल्या महायुद्धांत पराभूत झालेलीं इटली आणि जर्मनी यांच्यासारखीं राष्ट्रें आपला गमावलेला मुलूख परत घेऊनच थांबलीं नाहींत; तर स्वतःच्या वाढत्या लोकसंख्येला नांदावयाला भरपूर जागा मिळावी म्हणून तीं जरूर तेव्हां युद्धालाहि उभीं टाकलीं! त्या मानानें परतंत्र आणि बलहीन असलेले

आपण मराठे लोक आपलें गमावलेलें वडिलार्जित घर, आपली छिन्नभिन्न झालेली हक्काची पितृभूमि तरी परत मिळविण्याचा आणि एकत्रित करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करूं या! जर्मनीचें नाझी राजकारण प्रतिगामी आहे यांत शंकाच नाहीं. पण जर्मन वंशाच्या आणि जर्मन भाषा बोलणाऱ्या साऱ्या लोकांचें एक बलाढ्य राष्ट्र बनविण्यासाठीं जो प्रचंड उद्योग हिटलरनें केला, तो जगांतील साऱ्या दुबळ्या, परतंत्र आणि विच्छिन्न राष्ट्रांनी अनुकरण्यासारखा आहे हें कोणीही कबूल करील. आपल्या पुनरुज्जीवनाचा विचार करतांना वांशिक आणि भाषिक ऐक्याचा हा प्रश्नहि महाराष्ट्रानें अगत्यपूर्वक लक्षांत घेतला पाहिजे. आज महाराष्ट्रांत अनेक जातींचे आणि धर्मांचे समाज आहेत ही गोष्ट खरी. पण त्या साऱ्या समाजांचा वंश सामान्यतः एकच आणि भाषाहि सामान्यतः एकच आहे. महाराष्ट्रांतले हिंदु, मुसलमान आणि ख्रिस्ती हे जसे एका रक्ताचे आहेत आणि एकाच वंशांतले आहेत, तशीच त्यांची भाषाही पण एकच असावयाला नको काय? चार वर्षांपूर्वीं मी कलकत्त्याला शिवकुमारभवनमध्यें रहात असतां त्या भवना-समोर असलेल्या मशिदीजवळच्या घरावर "वंगीय मुस्लीम समिती" या नांवाची पाटी लागलेली रोज माझ्या दृष्टीस पडत असे. ती पाटी पहातांच माझ्या मनांत येई,—'महाराष्ट्रीय मुस्लीम साहित्य परिषद' या नांवाची पाटी आपल्याला नागपुरांत कधींतरी पाहावयाला मिळेल का? बंगालमध्यें जर राष्ट्रीय स्फूर्तीचीं वीरकवनें वंगवाणींत गाणारा नझरुल इस्लाम निर्माण होऊं शकतो, तर महाराष्ट्रांत कां होऊं नये? अद्याप झालेला नाहीं खरा आणि त्याचें कारण आमची अनास्था.

## हिंदुतर समाजांना आत्मसात् करा

राष्ट्र हें धर्म आणि जाती यांच्या अतीत असतें, असें आम्ही तोंडानें म्हणतों. पण त्याप्रमाणें वागण्याची मात्र आमची तयारी नाहीं.

वंग कादंबरीकार डॉ. शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांनीं, हिंदूप्रमाणेंच मुसलमानहि बंगाली राष्ट्राचे घटक आहेत आणि बंगाली वाङ्मयावर हिंदूइतकाच त्यांचाही हक्क आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन, आपल्या कथावाङ्मयांत मुसलमानांना स्थान देण्याचा संकल्प केला होता. ही जाणीव महाराष्ट्रांतल्या किती ललित लेखकांमध्यें आढळून येईल? स्वतःच्या विशिष्ट पोटजातीकडे ज्यांच्या कल्पनाशक्तीची उडी जात नाहीं, त्यांचा वाचकवर्गही जर मर्यादित राहिला, तर त्यांत दोष कोणाचा? दक्षिण महाराष्ट्रांत आणि कोंकणांत मुसलमान, इस्रायल, ख्रिस्ती आणि पारशी या चारीही धर्मांचे लोक मराठी भाषा बोलतात. त्यांचें मराठी कुणबाऊ असेल, अशुद्ध असेल; पण तें मराठी आहे हें विसरून चालणार नाहीं. त्यांच्या जीवनाचें आणि आकांक्षांचें चित्रण मराठी ललित लेखक जोंपर्यंत करीत नाहींत, तोंपर्यंत मराठी वाङ्मयाविषयीं त्यांना काय म्हणून जिव्हाळा वाटेल? व त्यांची भाषा तरी मराठी वाचनाची अभिरुचि वाढल्याशिवाय कशी सुधारेल? हे भिन्नधर्मीय लोक सामान्यतः आमच्याच वंशांतले, आमच्याच सारखा पोषाख करणारे आणि आमचीच भाषा बोलणारे आहेत. पण आमच्या वाङ्मयाशीं मात्र त्यांचा कांहीं संबंध नाहीं; त्याच्या प्रगति-परागतीचें त्यांना कांहीं सोयर-सुतक नाहीं. अशा स्थितींत महाराष्ट्रांतील मुसलमानांनीं उर्दूकडे अधिक आत्मीयतेनें पहावें, किरिस्तावांनीं पोर्तुगीजमिश्र कोंकणीचा अभिमान वहावा आणि इस्रायलांनीं हिब्रूच्या पुनरुज्जीवनाची आशा मनांत बाळगावी, यांत नवल काय? महाराष्ट्रांत राहात असलेल्या हर एक जातीच्या आणि धर्माच्या लोकांच्या जीवनाचें प्रतिबिंब जोंपर्यंत मराठी ललित वाङ्मयांत पडत नाहीं, तोंपर्यंत वांशिक आणि भाषिक ऐक्य असूनहि या हिंद्वितर समाजांत आपल्याला 'मराठे' म्हणवून घेण्याची ईर्ष्या उत्पन्न होणें अशक्य आहे. ही ईर्ष्या जोंपर्यंत आपण बहुसंख्य हिंदु महाराष्ट्रीय या हिंद्वितर समाजांत निर्माण करीत नाहीं,

तोंपर्यंत महाराष्ट्रांतील वाङ्मयिक काय किंवा राजकीय काय साऱ्या चळवळी कमजोर राहाणार; आपलें सामाजिक आणि राजकीय जीवन एकांगी आणि खुरटें राहणार.

## सामुदायिक जीवनाचा आदर्श

म्हणून महाराष्ट्राच्या भवितव्याचा विचार करतांना (१) त्याच्या निरनिराळ्या शकलांचें एकीकरण व (२) त्यांतील हिंद्वितर समाजांचें महाराष्ट्रीकरण हे दोन उद्देश आपल्या डोळ्यांपुढें सतत ठेविले पाहिजेत. नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलेला सारा मराठी मुलूख एका राजकीय सत्तेच्या, एका मध्यवर्ती विद्यापीठाच्या आणि एका सर्वव्यापी राष्ट्रसंस्थेच्या छत्राखालीं आणावयाचा, महाराष्ट्रांतील एका रक्ताच्या आणि एका भाषेच्या लोकांचें मुलताईपासून मडगांवपर्यंत एकसंध राष्ट्र निर्माण करावयाचें, हें ध्येय आपण ईर्ष्येनें वाढीला लावलें पाहिजे. ही एकता जरी आज मधून मधून बोलली जात असली, तरी तिला मूर्त स्वरूप देण्याचें काम मात्र सोपें नाहीं. त्या एकतेला मूर्त स्वरूप देण्या-साठीं, राजकारणांत आणि वाङ्मयांत ती एकता प्रभावी करून दाखवि-ण्यासाठीं, साऱ्या धार्मिक आणि जातीय कोत्या कल्पनांचा त्याग करावा लागेल. आजच्या संकुचित जातवार जीवनाची कोंडी फोडून टाकून राष्ट्रीय अशा सामुदायिक जीवनाचा आदर्श उत्पन्न करावा लागेल; व सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे हें जें विशाल सामुदायिक जीवन उत्पन्न करण्याची भाषा आपण बोलत आहोंत तें जगण्याला धडाडीनें तयार व्हावें लागेल! सर्व धर्मांच्या आणि सर्व जातींच्या लोकांना ज्यांत सारखें स्थान मिळेल आणि ज्याच्याविषयीं सारखा जिव्हाळा वाटेल असा जीवनाचा एक नवा आदर्श आणि राष्ट्रीयत्वाचा एक नवा मनु आपल्याला उत्पन्न करावयाचा आहे. ही जाणीव मनांत बाणल्याशिवाय, या तळमळीनें अंतःकरण उद्दीपित झाल्याशिवाय महाराष्ट्राचें प्रादेशिक आणि सांस्कृतिक

एकीकरण होणें शक्य नाहीं. आज अशी स्थिति आहे कीं, हिंदु, खिस्ती आणि मुसलमान हे जरी शतकानुशतकें एका गांवांत राहात आले आहेत, तरी त्यांच्या जीवनाचे ओघ मात्र अगदीं भिन्न दिशांनीं वाहात असतात; व कांहीं आर्थिक आणि राजकीय व्यवहार सोडले, तर त्यांचा एकमेकांशीं सामाजिक असा संबंध कोणत्याच प्रकारचा येत नाहीं. आणि ज्यांच्यांत सामाजिक संबंध येत नाहींत, त्यांच्यांत एकतेची भावना कशी पैदा व्हावी ? म्हणूनच मी म्हणतों कीं, एकसंघ आणि बलशाली असा महाराष्ट्र जर आपल्याला निर्माण करावयाचा असेल, तर त्याचें प्रादेशिक आणि सांस्कृतिक ऐक्य घडवून आणण्यासाठीं आपण जरूर तो सर्व प्रकारचा त्याग करावयाला आनंदानें तयार झालें पाहिजे.

## हा जगण्याचा प्रश्न आहे

या साऱ्या राजकीय चर्चेचा आजच्या उत्सवाशीं काय संबंध आहे, अशी शंका बहुधा आपल्या मनांत आतांपर्यंत जोरानें उफाळून उठली असेल. वाङ्मय आणि राजकारण हीं जीवनाचीं दोन अगदीं भिन्न, परस्परांशीं कांहीं संबंध नसलेलीं, अंगें आहेत असा एक समज विशेषत: साहित्यिकांत प्रचलित आहे. पण तो समज बरोबर आहे का ? महाराष्ट्राचा दोन अडीच कोट लोकसंख्येचा प्रदेश निरनिराळ्या राज्यसत्तांखालीं विभागला गेल्यामुळें मराठी भाषेची जी हानी झाली आणि होत आहे, ती लक्षांत घेतली तरी सुद्धां या समजुतीचा फोलपणा आपल्या ध्यानांत येईल. राजकीय दृष्टीनें जें लोक एकवटलेले आणि सत्ताधारी नाहींत, त्यांच्या मातृभाषेच्याहि कपाळीं बटकीची नांदणूक येते. ही स्थिति सर्व बृहन्महाराष्ट्रांतील मराठ्यांच्या निदर्शनाला आणून देण्यासाठींच मी हें सारें बोलत आहें. आपण विंध्यपर्वताच्या पठारावर राहतां. तेव्हां डोंगराळ मुलुखांतील खेडुतांचा एक रिवाज आपल्याला माहितच असेल.

रात्रीच्या वेळीं एकमेकांना संकटाचा इषारा किंवा धीर देण्यासाठी उंचवटया उंचवटयावरून शेकोटया करून खेडवळ लोक हाकारे देत असतात. महाराष्ट्रापासून हजारों मैल दूर असलेल्या विंध्याचलाच्या या पठारावरून सह्याद्रीच्या शूर पण गाफील पुत्रांना मी तशाच रीतीनें हा साद घालीत आहे. आपल्यापैकीं कांहीं रसिक मंडळी माझ्या तोंडून साहित्याची चर्चा ऐकावयाला इथें आली असेल; तर कांहीं तरुण मित्र साम्यवादाचा पुरस्कार माझ्याकडून व्हावा असें अपेक्षीत असतील. त्या दोघांनाही मी हें नम्रतेनें सांगूं इच्छितों कीं, जगण्याचा प्रश्न हा साहित्य आणि साम्यवाद या दोहोंच्याहि चर्चेपेक्षां अधिक निकडीचा आहे. युरोपांतील गेल्या महायुद्धामुळें जसा त्या वेळीं लोकप्रिय असलेल्या राजकीय तत्त्वज्ञानाचा ढोंगीपणा चवाठयावर आणला, त्याचप्रमाणें सध्यां चालू असलेल्या महायुद्धानें गेल्या वीस वर्षांत बोकाळलेल्या नव्या राजकीय तत्त्वज्ञानाचा दंभस्फोट केला आहे : तोंडावरले मुखवटे निराळे; हातांतलीं निशाणें निराळीं; पण तीच झोटिंगशाही आणि तोच साम्राज्य-वाद आजही दुबळ्यांना ग्रासावयाला कसा उभा ठाकला आहे, हें झेक, पोलंड आणि फिनलंड यांच्या विध्वंसावरून आपल्याला स्पष्ट दिसून आलें आहे. आपली स्थिति तर वणव्याची निमूटपणें वाट पहात असलेल्या वाळलेल्या गवतासारखी असहाय आहे. त्या वाळलेल्या गवतानें जागतिक क्रांतीची पोपटपंची करण्यांत काय अर्थ?

## 'लाल' सेनापतीचा दृष्टांत

म्हणून, माझ्या रसिक आणि तरुण मित्रांच्या माझ्या भाषणा-विषयीं काय अपेक्षा असतील याची पूर्ण जाणीव असतांना सुद्धां, त्यांना यत्किंचितही उत्सुकता नसलेल्या या प्रश्नावर मी आज बोललों आहे. वाटल्यास मला कोत्या दृष्टीचा म्हणा. चीनमधील किंवा स्पेनमधील भुकेल्यांच्या हांकेपेक्षां महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांची हांक माझ्या कानांना

अधिक तीव्रतेनें जाणवते; व जागतिक क्रांतीच्या अनाकलनीय रशियन तत्वज्ञानापेक्षां मला महाराष्ट्राच्या एकीकरणाचा प्रश्न जास्त जिव्हाळ्याचा वाटतो. चीनचा "लाल" (Red) म्हणून गाजलेला सेनापति मॅओ यानें असें म्हटलें आहे कीं, "स्वातंत्र्याला मुकलेल्या लोकांचें पहिलें कर्तव्य स्वातंत्र्यासाठीं झगडण्याचें आहे; समाजवादी क्रांतीचें नव्हे. साम्यवादाचा प्रयोग ज्या मायदेशांत करून पहावयाचा तोच जर आपल्याकडून हिरावून घेतला गेलेला असेल, तर साम्यवादाची नुसती चर्चा करणेंही अशक्य आहे." ( For a people being deprived of its national freedom the revolutionary task is not immediate Socialism, but the struggle for independence. We cannot even discuss communism if we are robbed of a country in which to practise it ) मला वाटतें, त्या लाल सेनापतीचा हा इशारा माझ्या तरुण मित्रांनाही विचारांतीं समर्पक वाटेल. आज आपल्या पुढला सर्वांत महत्वाचा आणि निकडीचा प्रश्न सध्या चालू असलेल्या संक्रमणाचा फायदा कशा रीतीनें घ्यावयाचा हा आहे महाकालाचें तांडव नृत्य पुन्हा वीस वर्षांनीं अधिक भीषणतेनें सुरू झालें आहे. त्याच्या त्या क्रुद्ध पदक्षेपांखालीं साऱ्या जुन्या कल्पना, जुन्या संस्था आणि जुनीं साम्राज्यें यांचा चक्काचूर होणार हें निर्विवाद. त्य प्रळयानंतर जी नवी सृष्टी निर्माण होईल, तिच्यांत विकलांग आणि विछिन्न महाराष्ट्राचें पुनरुत्थान होणें न होणें हें सर्वस्वीं आपल्या धडाडीवर आणि दूरदर्शित्वावर अवलंबून आहे. कारण सनातन आणि मृत्युंजय असा महाकाल हा फक्त द्रष्ट्यांवरच प्रसन्न होत असतो.

# पुणें

( २९ मे १९४० )

## नागपूर आणि पुणें

आज मी आपल्यापुढें भांबावलेल्या मनःस्थितींत उभा आहे. पुणें हें विद्वानांचें आगर; महाराष्ट्राचें बौद्धिक आणि शैक्षणिक केंद्र; एका काळीं अखिल हिंदी राजकारणाचीं सूत्रेंहि या इतिहासप्रसिद्ध शहरांतून चाळविलीं जात असत. तेव्हां महाराष्ट्रांतील या अग्रगण्य शहरांतल्या आपल्यासारख्या मार्मिक श्रोत्यांपुढें मी गोंडवनांतून आलेला माणूस काय बोलणार! आपलें पुणें शहर हें बौद्धिक व्यासंग आणि वादविवाद यांच्याबद्दल प्रसिद्ध आहे. आमच्या नागपूर शहराचा लौकिक संत्र्यांचा व्यापार आणि कुस्त्यांची दंगल यांच्याबद्दल आहे. त्या आडदांड आणि उच्छृंखल शहरांतून येणारा मी आपल्या चोखंदळ बुद्धीला काय चालना देऊं शकेन? फळांच्या भारानें वांकलेलें आणि ठिकठिकाणीं धीरे देऊन सांवरलेलें संत्र्याचें झाड आपण कधीं पाहिलें आहे कां? जीवनरसाचा स्वाद, साफल्य आणि रंगरम्यता यांचें एक मूर्तिमंत प्रतीक आहे तें. कोकिळाला उन्मत्त करणाऱ्या आम्रमंजरीचा

मादकपणा आपल्या जुन्या संस्कृत कवींनीं पुनः पुन्हा वर्णिला आहे. नागपुरी संत्र्याचा फुलोरा आम्रमंजरीइतका नाजूक नसेल कदाचित्; पण मनाला बेहोष करण्याचें त्याचें सामर्थ्य इतकें विलक्षण आहे कीं, मदनानें आपल्या धनुष्यावर तेवढा एकच एक बाण जरी चढवला, तरी काम होईल! अशा या गोंडवनांतल्या माझ्यासारख्या तरुण, अनभ्यस्त लेखकाला इतिहासाचार्य राजवाडे आणि ज्ञानकोशकार केतकर यांनीं मंडित केलेलें हें अध्यक्षपद देण्यांत आपण खरोखरीच मोठें धार्ष्ट्य केलें आहे, असें मला वाटतें.

## भाषण नव्हे, प्रकट चिंतन

अर्थात् मी आज आपल्यापुढें उभा राहिलों आहें, तो आपल्याला कांहीं उपदेश करण्याच्या, कांहीं आदेश देण्याच्या किंवा आपले कांहीं दोष दाखविण्याच्या उद्देशानें नव्हे. माझा तो अधिकारच नाहीं. महाराष्ट्र आणि मराठी वाङ्मय यांच्याविषयीं जे विचार माझ्या मनांत सतत घोळत आहेत, ते आपल्याला बोलून दाखवावे एवढ्याच हेतूनें मी इथें उभा राहिलों आहें. या भाषणाला वाटल्यास आपण आत्म-निवेदन समजा, वाटल्यास प्रकट चिंतन (Loud Thinking) समजा. नाटकांतलें पात्र रंगभूमीवर येऊन स्वगत भाषण करितें, पण वस्तुतः तें परगत असतें. उलट मी जें आतां बोलत आहें, तें दिसावयाला परगत खरें, पण वस्तुत: स्वगत आहे. आणि या संमेलनाच्या अध्यक्ष-पदावर बसलें असतां अशा तऱ्हेचें प्रकट चिंतन करण्याची स्फूर्ति व्हावी अशीच खरोखरी त्याची पूर्व परंपरा, त्याची महती आहे. आपल्याला ही दंतकथा माहितच असेल कीं, विक्रमाच्या अज्ञात सिंहासनावर चुकून एक अजाण मुलगा बसला आणि त्या सिंहासनाच्या प्रभावानें त्यानें अचूक न्यायदान केलें. तसाच प्रकार जर आजच्या माझ्या भाषणाचा झाला, तर तो या स्थानाचा प्रभाव आहे, असें मी

समजेन. मला वाटतें, याच शारदोपासक संमेलनाच्या अध्यक्षपदावरून इतिहासाचार्य राजवाडे यांनीं मराठी भाषा मुमूर्षु असल्याचें मनाला धक्का देणारें पण एका परीनें अगदीं समर्पक निदान केलें होतें; व इतिहासाचार्यांच्या या घोषणेनें उत्पन्न झालेली निराशा घालविण्यासाठीं गुरुवर्य तात्यासाहेब कोल्हटकर यांनीं साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून उत्कृष्ट युक्तिवाद लढविला होता. तशा तऱ्हेचें कांहीं बोलून आपल्या मनाला धक्के देण्याचा माझा विचार किंवा अधिकार नाहीं, हें मी प्रथमच आपल्याला सांगून टाकतों.

## महान् नेता, महान् ध्येय, महान् कार्यक्रम

माझ्या ज्या भांबावलेल्या मनःस्थितीचा उल्लेख मी प्रारंभीं केला, तिच्याचविषयीं मी आज थोडेसें बोलणार आहे. हेतु असा कीं, आपल्यासारख्या विद्वानांकडून शक्य तर कांहीं मार्गदर्शन मला घडावें. खरोखरी मी एकापेक्षां अनेक अर्थांनीं आज भांबावलेला आहे. महाराष्ट्राची पिछेहाट झाल्याची तक्रार सारखी आज कानांवर येत आहे; व प्रो. फडके यांनीं साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत मराठी वर्तमानपत्रांना या पिछेहाटीबद्दल पर्यायानें जबाबदार धरलें आहे. पण रोगाचें वर्णन म्हणजे कांहीं रोगाचें निदान नव्हे. कारण, मला वाटतें, महाराष्ट्राच्या पिछेहाटीला वर्तमानपत्रांची अधोगति कारण झाली नसून, वर्तमानपत्रांच्या अधोगतीला महाराष्ट्राची पिछेहाट कारण झाली आहे. प्रो. फडके यांनीं वर्तमानपत्रें आणि त्यांचा संपादक-वर्ग यांना समाजाच्या धुरीणाची आणि शिक्षकाची भूमिका बहाल करून त्यांचा गौरव केला आहे. पण प्रोफेसरसाहेबांची ही समजूत बरोबर नाहीं. वर्तमानपत्रें हीं लोकमताला वळण लावतात, समाजाला जागृत आणि कार्यप्रवृत्त करतात, हें खरें. पण केव्हां? ज्या वेळीं एकादा महान् नेता, एकादें महान् ध्येय आणि एकादा महान् कार्यक्रम त्यांना

स्फूर्ति आणि प्रेरणा देत असेल, तेव्हां. एरवीं वर्तमानपत्रें हीं बव्हंशीं लोकमताचीं प्रदर्शक आहेत, प्रवर्तक नव्हेत, हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. वर्तमानपत्रें ही एक प्रचंड राष्ट्रीय शक्ति आहे, यांत शंकाच नाहीं. पण त्या शक्तीला चालना द्यावयाला कोणी तरी महान् नेता, कोणतें तरी महान् ध्येय आणि कोणता तरी महान् कार्यक्रम लागत असतो.

## तमासगीरपणाची वृत्ति

अशा महान् नेत्याच्या आणि ध्येयाच्या अभावामुळेंच आज केवळ मराठी वर्तमानपत्रांचीच नव्हे, तर एकंदर महाराष्ट्रीय समाजाचीहि अधोगति झाल्यासारखी दिसत आहे. लोकमताला वळण लावण्याचें सामर्थ्य ज्यांच्या वाणींत आणि लेखणींत आहे, अशा महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गांना श्रद्धेय आणि अनुकरणीय असें कांहीं आपल्यापुढें दिसत नसल्यामुळेंच आज महाराष्ट्रामध्यें एक प्रकारचें बौद्धिक अराजक बोकाळलेलें आपण पहात आहोंत. कोणाच्याहि नेतृत्वावर आणि कार्यक्रमावर पूर्ण निष्ठा नाहीं, कोणत्याहि तत्त्वज्ञानाविषयीं आणि चळवळीविषयीं पूर्ण भरवसा वाटत नाहीं, अशी स्थिति जेव्हां राष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गांत उत्पन्न होते, तेव्हां लोक सगळ्या व्यक्तींकडे आणि चळवळींकडे टीकाखोर दृष्टीनें बघूं लागतात, त्यांची टिंगल करण्यांत आनंद मानतात. मी या मनःस्थितीला 'तमासगीरपणाची वृत्ति' असें नांव देतों. टिळकांच्या मृत्यूपासून गेलीं वीस वर्षे महाराष्ट्राकडे, महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गाकडे ही टीकाकाराची, ही तमासगीरपणाची भूमिका आली आहे. गेल्या वीस वर्षांत गांधीजींच्या नेतृत्वाखालीं ज्या निरनिराळ्या चळवळी हिंदुस्थानांत निघाल्या, त्यांत महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गांनीं भाग घेतला नाहीं, असें नाहीं. पण जो काय भाग घेतला, तो केवळ प्रवाहपतित म्हणून! किंबहुना, एकीकडे त्या चळवळींत भाग

व्यावयाचा आणि दुसरीकडे त्या चळवळींवर टीकास्त्र सोडलेलें असावयाचें, असा विचित्र, विसंगत देखावा गेलीं वीस वर्षें महाराष्ट्रांत दृष्टीस पडत आला आहे. कारण गांधीजी, त्यांचें तत्त्वज्ञान आणि त्यांचा कार्यक्रम यांच्यावर महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गांचा, त्या वर्गांतील विचारी लोकांचा कधींच पूर्ण विश्वास बसला नाहीं. त्या विश्वासाच्या अभावीं महाराष्ट्रांत तमासगीरपणाची वृत्ति बळावली.

## द्विधा मनोवृत्तीचें प्रदर्शन

आपण असें विचाराल कीं, गांधीजींच्या नेतृत्वावर आणि तत्त्वज्ञानावर जर महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गांची श्रद्धा नाहीं, तर त्यांना श्रद्धेय असे दुसरे नेते आणि तत्त्वज्ञान आढळलें नाहीं काय? विशेषतः हिंदु महासभा आणि समाजवाद यांचे कार्यक्रम लोकांच्या पुढें असतांना त्यांना महान् ध्येयाच्या अभावीं भांबावून जाण्याचें काय कारण? सुदैवानें वा दुर्दैवानें महासभा आणि समाजवाद या दोहोंचेंहि तत्त्वज्ञान महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गांना पूर्णपणें श्रद्धेय आणि अनुकरणीय वाटत नाहीं. एका काळीं महाराष्ट्रांतील तरुण पिढीची आणि विशेषतः पाश्चात्य विचारसरणीनें भारलेल्या तरुण लेखकवर्गाची समाजवादावर नितांत श्रद्धा जडली होती. पण, रशियांत स्टालिनच्या हुकमतीखालीं सुरू झालेल्या निरर्गल हत्याकांडामुळें, हिंदी समाजवाद्यांतील पंथोपपंथांच्या वैमनस्यामुळें आणि त्याहिपेक्षां चालू महायुद्धांत प्रत्ययाला आलेल्या जगांतील एकमेव समाजवादी सरकारच्या अनाकलनीय धोरणामुळें ती श्रद्धा ढांसळली; व समाजवादाच्या ध्वजावर तळपणारा लाल रंग हाहि कांहीं निराळ्या प्रकारच्या रुधिरपिपासु विजिगीषेचा निदर्शक आहे कीं काय अशा संशयाचा अंगार स्वतःला समाजवादी म्हणविणारांच्याहि अंतःकरणांत धगधगूं लागला! हिंदु महासभेचें तत्त्वज्ञान हें युयुत्सु आणि आकर्षक आहे, यांत शंका नाहीं.

पण, रानडे, टिळक आणि गोखले यांनीं राष्ट्रवादाच्या आणि राष्ट्रऐक्याच्या ज्या विशाल कल्पना गेलीं पाऊणशें वर्षे महाराष्ट्राच्या मनावर बिंबविल्या, त्यांच्याशीं हें तत्त्वज्ञान विसंगत असल्यामुळें त्याच्याबद्दलहि महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गांना श्रद्धा वाटूं शकली नाहीं. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, महासभा आणि समाजवाद यांच्या नेत्यांची मराठी वर्तमानपत्रांतून केव्हां तारीफ तर केव्हां टिंगल असें द्विधा मनोवृत्तीचें प्रदर्शन दृष्टीस पडतें.

## बौद्धिक अराजकाचें मर्म

महाराष्ट्रांत आज जें बौद्धिक अराजक माजलेलें दिसतें, त्याचें खरें कारण बुद्धिप्रधान वर्गांपुढें त्यांना सर्वथैव श्रद्धेय वाटेल असा महान् नेता, महान् ध्येय आणि महान् कार्यक्रम नाहीं, हें आहे. वर्तमानपत्रांची तमासगीरपणाची वृत्ति हें या अराजकाचें कारण नव्हे; तर केवळ प्रतिबिंब, एक प्रतिक्रिया आहे. गांधींच्या नेतृत्वावर तर विश्वास नाहीं व दुसरा कोणी त्यांच्याइतका प्रभावशाली नेता आणि मनाला पूर्णपणें पटण्यासारखा कार्यक्रम तर दिसत नाहीं, अशा भांबावलेल्या मनःस्थितींत आज महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्ग आहे. अखिल महाराष्ट्राला ज्यां-च्याविषयीं प्रेम किंवा आदर वाटावा असे कार्यकर्ते आज महाराष्ट्रांत नाहींत असें नाहीं. पण विद्युद्दीपाची प्रकाश देण्याची शक्ति जरी मेणबत्त्यांच्या संख्येनें मोजण्यांत येत असली, तरी त्या प्रकाशाचा लखलखाट तितक्या मेणबत्त्या लावल्यानें लाभूं शकत नाहीं, हा आपला नेहमींचा अनुभव आहे. तोच याहि बाबतींत लागू पडतो. हिमालयालाहि आपल्या उन्नतत्वानें लाजवतील असे रानडे, टिळक आणि गोखले हे तीन लोकातिग कर्तृत्वाचे नेते महाराष्ट्राला गेल्या पाऊणशें वर्षांत लाभले. सुदैवानें वा दुर्दैवानें त्यांच्या नेतृत्वाखालीं अखिल हिंदुस्थानाच्या राजकारणांत सतत अर्धशतक वर्चस्व गाजविलेल्या महाराष्ट्रांतील

बुद्धिप्रधान वर्गांना त्या मानदंडांच्या मापानें नेत्यांचें विभूतिमत्त्व मोजण्याची संवय झाली आहे. त्या मापाला जे थिटे, अपुरे पडतात, त्यांच्याविषयीं कितीहि प्रेम आणि आदर वाटला, तरी ते महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गाच्या एकांतिक निष्ठेचे विषय होऊं शकत नाहींत. निव्वळ आंधळ्या श्रद्धेनें कोणत्याही व्यक्तीच्या मागें जाण्याचा महाराष्ट्राचा स्वभाव नाहीं ज्याचें ध्येयवादित्व, विभूतिमत्त्व आणि नेतृत्व हें कितीहि चिकित्सक दृष्टीनें पाहिलें असतां उणें किंवा डगळ वाटत नाहीं, अशाच नेत्याच्या मागून महाराष्ट्र आजवर जात आला आहे. अशा नेत्याच्या अभावीं आज महाराष्ट्र भांबावला आहे, महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्ग निव्वळ टीकाखोर आणि तमासगीर बनला आहे.

## लेखकांची भांबावलेली स्थिति

मराठी वर्तमानपत्रांवरच केवळ नव्हे, तर मराठी साहित्यावरहि जी आज कीड पडल्यासारखी दिसत आहे, ती खरोखरी याच कारणामुळें. प्रो. फडके यांनीं आपल्या भाषणांत मराठी वर्तमानपत्रांना हीन अभिरुचिबद्दल दोष दिला आहे. पण, मी त्यांना उलट असें विचारतों कीं, महाराष्ट्रांतील या लोकप्रिय कादंबरीकारानें तरी कोणत्या उज्ज्वल ध्येयांचें दर्शन आपल्या कथावाङ्मयांतून महाराष्ट्राला घडविलें आहे? आपटे, कोल्हटकर आणि खाडिलकर यांच्या ललित वाङ्मयानें महाराष्ट्रापुढें जीवनाचे प्रगत आणि तेजस्वी आदर्श ठेवले असें ज्याप्रमाणें आपण साभिमान म्हणूं शकतों, तसें प्रो. फडके यांच्या ललित वाङ्मयाविषयीं आपल्याला म्हणतां येईल काय? अलिकडे ते स्वतःला अधून मधून समाजवादी म्हणवितात; व आपल्या कादंबऱ्यांनाहि राजकारणाची झिलई देण्याची व्यवहारदक्षता त्यांनीं दाखविली आहे. पण, 'अटकेपार' पर्यंतचा त्यांचा कथावाङ्मयांतील प्रवास महाराष्ट्राला कोणत्या महान् ध्येयाप्रत नेणारा आहे? तथापि हा दोष, अर्थातच, प्रो. फडके यांचा

नव्हे. फडके काय, खांडेकर काय किंवा मी स्वतः काय, आम्ही सारेच खरोखरी भांबावलेलों आहों. लोकांना कांहीं तरी सांगावें अशी आम्हांला उत्कट इच्छा आहे. पण तें काय सांगावें याबद्दल मात्र आमच्या मनाचा निश्चय झालेला नाहीं, अद्याप होत नाहीं. श्री. काकासाहेब कालेलकर आणि श्री. साने गुरुजी हे ज्या श्रद्धेनें गांधीवादाचा पुरस्कार करतात, ती त्यांची उत्कट आणि गंभीर श्रद्धा पाहून मला त्यांचा हेवा वाटतो. अशा तऱ्हेची श्रद्धा, अशा तऱ्हेची ईर्ष्या आम्हाला कोणत्याच ध्येयाविषयीं, कोणत्याच तत्त्वज्ञानाविषयीं कां वाटूं नये? एखाद्या महान् ध्येयाविषयींच्या श्रद्धेनें आणि तळमळीनें जेव्हां सबंध राष्ट्र कार्यप्रवृत्त होतें, तेव्हां त्याच्या साहित्यांतहि अभिनव तेजाचा संचार होतो. रानडे, टिळक आणि गोखले हे ज्या वेळीं महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर सूर्यासारखे तळपत अखिल हिंदुस्थानाला चैतन्य आणि स्फूर्ति देत होते, त्या वेळीं महाराष्ट्रांत सर्व प्रकारच्या निर्माणक चळवळींना जणुं कांहीं भरती आली होती. आपटे, परांजपे, कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी, वरेरकर प्रभृति या काळांतील धुरंधर लेखकांचें वाङ्मय आपण पहा. त्यांत आपल्याला रानडे, टिळक आणि गोखले यांच्या ध्येयवादाचें आणि विभूतिमत्त्वाचें ओज ओसंडत असलेलें दिसेल. १९२० च्या मे महिन्यांत गुरुवर्य तात्यासाहेब कोल्हटकर यांच्याशीं ज्या वेळीं माझी पहिली भेट झाली, त्या वेळीं त्यांनीं मजजवळ काढलेले हृदयस्पर्शी उद्गार मला अद्याप आठवतात. "गजाननराव, मला एकच इच्छा आतां उरली आहे.— शिवाजीमहाराजांच्या चरित्रावर नाटक आणि न्या. रानड्यांच्या तत्त्वांवर कादंबरी लिहिण्याची!" हा ध्येयवाद, ही तळमळ आजच्या ललित लेखकांत कुठें आहे? आपटे, कोल्हटकर, खाडिलकर आणि गडकरी यांच्या वाङ्मयावर लोकहितवादी, भांडारकर, रानडे, चिपळूणकर, आगरकर, टिळक आणि गोखले यांच्या विचारांची आणि जीवनाची छाप किती पडली आहे, हें मी आपल्याला सांगायला नको. आणि

खाडिलकरांनीं तर प्रतापराव, रामशास्त्री, हरिश्चंद्र या आपल्या नायकांच्या रूपानें टिळकांचें उग्र आणि युयुत्सु राजकारण मूर्तिमंत रंगभूमीवर उभें केलें. आजच्या ललित वाङ्मयांत आपल्याला अशा तऱ्हेचा जिवंत ध्येयवाद कुठें आढळतो काय ?

## प्रचारक आणि संशयात्मा

कारण, आज आम्हीं सारेच अंधारांत चांचपडत आहोंत, संशयाच्या भोंवऱ्यांत गटंकळ्या खात आहोंत. जुनीं ध्येयें, श्रद्धेचे जुने विषय नाहींसे झाले; ज्याच्या विभूतिमत्त्वापासून स्फूर्ति घेऊन कांहीं लिहावें किंवा करावें असा एकहि महान् नेता डोळ्यांपुढें दिसत नाहीं; समाजवादासारखें जें नवें तत्त्वज्ञान मध्यंतरीं कांहीं काळ आकर्षक वाटलें होतें, त्याचीहि मोहनी आज डोळ्यांवरून उडून गेली आहे. त्यामुळें सडा तुटलेल्या पतंगासारखी किंवा सुकाणू नसलेल्या जहाजासारखी आज महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गाच्या मनाची आणि मराठी ललित लेखकांच्या प्रतिभेची अवस्था झाली आहे; व इतरांच्या विचारांतल्या तर्कच्युति आणि वर्तनांतल्या विसंगति चव्हाट्यावर बसून चिवडण्यापलिकडे दुसरा कांहीं कार्यक्रम, दुसरें कांहीं कर्तव्य आम्हांला उरलेलें नाहीं. राजकीय चळवळीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली मराठींतील कोणतीहि कादंबरी आपण घ्या. तींत फक्त गांधीवादाचे वाभाडे काढलेले आपल्या दृष्टीस पडतील. पण, गांधीवाद हा अशास्त्रीय, अपर्याप्त व म्हणून त्याज्य आहे असें कंठरवानें सांगितल्यावर लोकांना त्यापेक्षां श्रेयस्कर आणि तेजस्वी असें कांहीं तरी दाखविण्याची जी जबाबदारी ओघानेंच येते, तिची जाणीव मात्र फारशी कोणाला दिसत नाहीं. श्री काकासाहेब कालेलकर आणि श्री. साने गुरुजी यांच्याप्रमाणें श्री. मामासाहेब वरेरकर आणि प्रो. वामनराव जोशी हे महाराष्ट्रांतील दोघे वृद्ध अग्रगण्य लेखक मात्र या भांबावलेल्या परिस्थितींतसुद्धां कांहीं निश्चित धोरणानें लिहितांना दृष्टीस पडतात. विशेषतः मामासाहेबांनीं

जाणूनबूजून प्रचारकाचीच भूमिका पत्करलेली असल्यामुळें, त्यांचें काम एका परीनें सोपें झालें आहे. समाजापुढें जो प्रश्न ज्या वेळीं प्रामुख्यानें उपस्थित झालेला असेल, त्याचा प्रसार ईर्ष्येनें करावयाचा असें मामासाहेबांचें प्रथमपासूनच धोरण आहे. त्यामुळें हुंडयापासून तों दारूबंदीपर्यंत गेल्या तीस वर्षांत समाजापुढें निरनिराळ्या वेळीं उद्भूत झालेले सारे प्रश्न त्यांनीं सारख्याच आपुलकीनें आणि चातुर्यानें हाताळले आहेत. वामनरावांची भूमिका वरेरकरांपेक्षां अगदीं निराळी आहे. राष्ट्रीय पक्षांत राहून त्याच्याशीं समरस न झालेले, समाजवादी तरुणांच्या घोळक्यांत मिसळून त्याकडे साशंकतेनें बघणारे आणि नीतिशास्त्राच्या अध्ययनांत आयुष्य घालवून स्थितप्रज्ञता न लाभलेले वामनरावजी हे महाराष्ट्रांत विसाव्या शतकाच्या सुरवातीला प्रादुर्भूत झालेल्या संशयवादाचे प्रतिनिधि आणि प्रवर्तक आहेत. ते कोणत्याहि व्यक्तीचे किंवा तत्त्वज्ञानाचे वाभाडे काढणार नाहींत; पण साऱ्याच नेत्यांविषयीं आणि तत्वांविषयीं सूक्ष्म, मार्मिक असा संशय मोठ्या नाजूकपणानें व्यक्त करीत राहतील. त्यांची शैली अगदीं सौम्य आणि मनोज्ञ असेल. पण, महाराष्ट्रांत जो संशयवाद आज तमासगीरपणाचें ग्राम्य स्वरूप घेऊन धिंगाणा घालीत आहे, त्याची चाहूल प्रथम वामनरावांच्याच वाङ्मयांत आपल्या कानांवर पडली. त्यांच्या वाङ्मयाचें आणि विचारसरणीचें प्रतीक कोणतें असावें असें जर मला कोणी विचारलें, तर मी 'प्रश्नचिन्ह' असावें असें सांगेन. ही या संशयात्म्याची महाराष्ट्राला निश्चित अशी वैचारिक देणगी आहे. पण, प्रचारक आणि संशयात्मा यांचें वाङ्मय कितीहि उद्बोधक असलें, तरी तें दिङ्मूढ झालेल्या समाजाला ध्येयसिद्धीच्या मार्गाला लावूं शकत नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

## वाङ्मयचौर्याची ओरड

महाराष्ट्रांत बोकाळलेल्या बौद्धिक अराजकाची जी ही मीमांसा मी केली आहे, ती आपल्याला कितपत पटेल, याबद्दल मला शंका

वाटते. पण मी प्रथमच आपल्याला सांगून टाकलें आहे कीं, हें माझें भाषण म्हणजे एका परीनें प्रकट चिंतन आहे. तेव्हां, मी केलेली ही मीमांसा जर आपल्याला पटली नाहीं, तर माझी स्वतःची भांबावलेली मनःस्थिति मी वर्णन केली आहे, असें आपण समजा. तथापि ही गोष्ट आपल्यालाहि मान्य होईल कीं, महाराष्ट्राचें बौद्धिक जीवन आज ध्येयशून्य झालें असून त्यामुळें मराठी वाङ्मय आणि मराठी वृत्तपत्रें यांना अवकळा आली आहे. या अवकळेचें किंवा तमासगीरपणाचें आणखी एक प्रत्यंतर दाखवावयाचें झालें, तर तें मी कलापूर्ण अशा विधायक टीकाकृतींचा अभाव हें सांगेन. वाङ्मय घ्या, बोलपट घ्या, चळवळी घ्या किंवा राजकारण घ्या, यांच्यावर जी टीका आज नियत-कालिकांतून येते, तिच्यांत स्तुति किंवा निंदा यांपैकीं कशाचा तरी अतिरेक झालेला दिसून येतो. जणुं कांहीं खुशामत करणें किंवा रेवडी उडवणें यापेक्षां अभिरुचीचा अन्य कांहीं प्रकार आम्हांला मुळीं माहितच नाहीं. वाङ्मयचौर्याविषयीं मराठी नियतकालिकांतून सतत येणाऱ्या तक्रारी हा या बौद्धिक अधोगतीचाच एक मासला आहे. मला 'वाङ्मयचौर्य' या शब्दाचा अर्थ जर कोणी समजावून सांगितला, तर फार उपकार होतील. शकुंतलोपाख्यानावरून शाकुंतल लिहिणारा कालिदास आणि चारुदत्तावरून मृच्छकटिक लिहिणारा शूद्रक यांना आपण शर्विलक म्हणावयाला तयार व्हाल काय? शेक्सपियरचा हॅम्लेट आणि गॅटेचा फॉस्ट या नाट्यकृतींचीं कथानकें मौलिक आहेत असें आपण म्हणूं शकाल काय? हरिभाऊंच्या कादंबऱ्यांवर डिकन्स आणि थॅकरे यांची छाप पडलेली नाहीं असें आपल्याला वाटतें काय? खाडि-लकरांचा केशवशास्त्री पाहून आयागोची आणि आनंदीबाई पाहून लेडी मॅकबेथची आठवण आपल्याला कधीं झालेली नाहीं काय? वस्तुस्थिति अशी आहे कीं, प्रत्येक लेखक हा पूर्वसूरींच्या संस्कारांचें आणि व्यासं-गाचें प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असें दुहेरी ऋण घेऊन वाङ्मय निर्माण

करितो आणि अशा रीतीनें त्या ऋणाचा वारसा पुढील पिढीपर्यंत नेऊन पोचवितो. वाङ्मयामध्यें प्रगतीप्रमाणेंच जें सातत्य दृष्टीस पडतें, त्याचें मर्म खरोखरी हेंच होय; व "अथवा कृतवाग्द्वारे वंशेऽस्मिन् पूर्वसूरिभिः। मणौ वज्रसमुत्कीर्णे सूत्रस्येवास्ति मे गतिः" या आपल्या विनीत उद्गारांत कविकुलगुरूनें वाङ्मयांतील या अनादि ऋणपरंपरेचा निर्देश मोठ्या मार्मिकपणानें केला आहे. मनुष्याचें मन ही एक रसायनशाळा आहे. बाहेरच्या अनेक चिजा या रसायनशाळेंत कळत वा न कळत येतात; व त्या सर्व एका मुशींत ओतल्या जाऊन नंतर अगदीं नव्या दिसणाऱ्या चिजा त्या रसायनशाळेंतून बाहेर पडतात. निरनिराळ्या वेळीं अनुभवलेल्या, बघितलेल्या आणि वांछिलेल्या अनेक विसंगत गोष्टींचा एकमेळ होऊन स्वप्नदृश्य तयार होत असल्याचें जें मानसशास्त्रज्ञ सांगतात, तेंच वाङ्मयालाहि लागू आहे. स्वतःच्या अनुभवांवर भिस्त ठेऊन मी लिहीन अशी घमेंड जो लेखक बाळगतो, त्याचें वाङ्मय दरिद्री निपजल्याशिवाय राहणार नाहीं. तिलोत्तमेला उत्पन्न करितांना प्रत्येक वस्तूंतील तिळमात्र सौंदर्य उसनें घ्यावयाला जर विधात्याला लाज वाटली नाहीं, तर आपल्या कृतींत इतरांच्या विचारांचे किंवा कल्पनांचे अंश आल्याबद्दल लेखकाला लाज कां वाटावी? आणि टीकाकारांनीं तरी त्याबद्दल त्याला नांवें कां ठेवावीं? तांब्यांच्या कवितेंत टागोरांच्या कल्पना आणि टागोरांच्या कवितेंत कबीरप्रभृति वैष्णव कवींच्या कल्पना प्रतिबिंबित झाल्याबद्दल जे टीकाकार नाकें मुरडतात, त्यांना वाङ्मयाच्या निर्मितीचा किंबहुना मानवी विचारविकासाचा एक मूलभूत सिद्धांत समजलेला नाहीं, असें मला वाटतें.

## वाङ्मय यंत्रारूढ झालें

तो सिद्धांत असा कीं, वाङ्मय किंवा कोणतीहि ललित कृति ही सर्वथैव मौलिक किंवा व्यक्तिवादी असूं शकत नाहीं. देवघेव हा निसर्गाचा कायदा आहे; व त्या कायद्याच्या तडाक्यांतून वाङ्मयहि

सुटलेलें नाहीं. बोलपट दाखवितांना सुरवातीला त्याच्या निर्मितीच्या कामीं ज्यांचा ज्यांचा हातभार लागलेला असतो, अशा सगळ्या कलावंतांचे वैशिष्ट्यदर्शक निर्देश केल्याचें आपण नेहमीं पहातों. बोलपटांच्या सुन्दर सजावटींत इतके वाटेकरी असतात कीं, बिचारा कथालेखक हा त्या अनेकांपैकीं केवळ एक म्हणूनच उल्लेखिला जातो. जी स्थिति बोलपटांची, तीच सामान्यतः सर्व ललित कलांची आणि विशेषतः वाङ्मयाची आहे. बोलपटाचा हा प्रास्ताविक भाग पहातांना माझ्या मनांत पुष्कळदां असें येतें कीं, एकाद्या उत्कृष्ट ललित कृतीच्या प्रस्तावनेंत लेखकानें प्रामाणिकपणानें जर तिच्या बनावटीचा इतिहास उकलून सांगितला, तर जगाला अज्ञात अशा किती तरी कलाभिज्ञ व्यक्तींचें त्याला साह्य झालें असल्याचें लोकांना कळून येईल. मुद्रणकला ज्या वेळीं आस्तित्वांत नव्हती, तेव्हां लेखक आणि वाचक ही जोडगोळी सहविचारानें साहित्याचें स्वरूप निश्चित करीत असे. मुद्रणकलेच्या उदयानन्तर वाचकाच्या जोडीला मुद्रक आणि प्रकाशक व त्या दोहोंचें नियमन करणारें म्हणून सरकार अशा चौघांना लेखक जबाबदार झाला; व त्या चौघांच्याहि अभिरुचीची प्रतिक्रिया साहित्यावर घडून आज त्याचें स्वरूप बनत असतें. आतां रेडियो आणि बोलपट यांच्या या युगांत सगळेंच साहित्य हें कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत श्राव्य आणि दृश्य होण्याचा दृढ सम्भव असल्यामुळें लेखकाची जबाबदारी आणि मर्यादा या दोन्ही वाढल्या आहेत. ही सगळी परिस्थिति एकाच वाक्यांत वर्णन करावयाची झाली, तर मी असें म्हणेन कीं, जीवनाच्या इतर सर्व शाखांप्रमाणें वाङ्मय हेंहि आतां यंत्रारूढ झालें आहे; व यांत्रिक शक्तीनें पैदा होणाऱ्या इतर सर्व वस्तूंना जे नियम लागू पडतात, ते यापुढें वाङ्मयालाहि झपाट्यानें लागू होणार, याबद्दल मला शंका नाहीं. लेखकाचा व्यक्तिगत प्रतिभागुण, लेखकाच्या मनोरचनेवर होणारे पूर्वसूरींचे संस्कार, त्याच्या भोंवतालच्या परिस्थितीचा त्याच्यावर

पडणारा प्रभाव, वाचक, मुद्रक, प्रकाशक आणि शासनसंस्था यांच्या अभिरुचींची त्याच्यावर होणारी प्रतिक्रिया व आपली कृति यंत्रारूढ होण्याच्या संभवनीयतेमुळें त्याच्यावर पडणारीं बंधनें हे सगळे कमी-अधिक प्रबळ घटक त्याच्या स्वतःच्या प्रतिभागुणाप्रमाणेंच त्याच्या वाङ्मयाचें स्वरूप आज निश्चित करीत आहेत. म्हणूनच मी म्हणतों कीं, या यंत्रयुगांत वाङ्मय हें व्यक्तिवादी आणि स्वयंभू राहूं शकत नाहीं; व ही गोष्ट लक्षांत घेऊनच टीकाकारांनी यापुढें वाङ्मयाकडे पाहिलें पाहिजे. मराठींत सृजनशील टीकाकृति उत्पन्न होत नाहींत याचें मुख्य कारण असें की, टीकाकार हा स्वतःला गुप्त पोलिस आणि पब्लिक प्रॉसिक्यूटर समजतो; व ब्रिटिश राजवटींतील मॅजिस्ट्रेट हा सकाळीं वॉरंट बजावून आपण पकडलेल्या आरोपीला जसा दुपारीं स्वतःच न्यायासनावर बसून शिक्षा ठोठावतो, त्याप्रमाणें हे टीकाकार आपल्यापुढें आलेली वाङ्मयकृति निकालांत काढून मोकळे होतात. महाराष्ट्रांत आज जी तमासगीरपणाची वृत्ति बोकाळली आहे, ती लक्षांत घेतां टीकाकारांचा हा दृष्टिकोन बदलणें कठीण वाटतें.

## शारदेच्या उपासनेची सफलता

पण ही तमासगीरपणाची वृत्ति आतां फार दिवस टिकेल, असें मला वाटत नाहीं. युरोपच्या रणांगणावर महायुद्धाचें होमकुंड पेटलेलें असून, जगांतल्या सगळ्या राष्ट्रांचीं भवितव्यें त्या भयानक मुशींत आज घातलीं गेलीं आहेत. जंगलांत वणवा पेटला म्हणजे त्याच्या दीप्तीनें मोहित होऊन अनेक प्राणी त्याच्या उफाळणाऱ्या ज्वाळांचें चुंबन घ्यावयाला धांवतात. तशी आज महायुद्धामुळें जगांतील राष्ट्रांची अवस्था झाली आहे. जागतिक क्रांतीचें हें विराट् भीषण दृश्य आपण काय केवळ तमासगीरपणानें पहात बसणार ? महान् नेता, महान् ध्येय आणि महान् कार्यक्रम हीं अत्यंत दलित किंवा मागासलेल्या राष्ट्राला

सुद्धां किती झपाट्यानें आघाडीला आणतात, हें जर्मनी आणि रशिया यांच्या उदाहरणानें आपल्या प्रत्ययाला आलेंच आहे. महाराष्ट्राला आज टिळकांसारखा धुरंधर नेता नाहीं; व त्याचे अनेक तुकडे पाडलेले आहेत, ही गोष्ट खरी. पण महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गांनीं जर त्याच्या एकीकरणाचें आणि उन्नतीचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून कामाला प्रारंभ केला, तर या स्थितींतून आपलें डोकें वर निघणें अशक्य नाहीं. सुशिक्षित वर्गांत ही जाणीव उत्पन्न करून त्यांना कार्यप्रवृत्त करण्याची जबाबदारी मराठी लेखक आणि वृत्तपत्रें यांच्यावर आहे. समरांगणावर होणाऱ्या शस्त्रसंपातांतून जगाच्या पुनर्घटनेला कारण होणारें नवें प्रभावी तत्त्वज्ञान प्रकट होतें, असा भारतीय युद्धापासूनचा आपला अनुभव आहे. युरोपांतील गेल्या महायुद्धांतून स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा उदय झाला आणि त्या तत्त्वाच्या प्रभावानें अनेक राष्ट्रांचें पुनरुत्थान झालें. सध्यां चालू असलेल्या महायुद्धामुळेंहि जगाच्या राजकारणाची पुनर्घटना होणार हें निश्चित आहे. या जागतिक क्रांतीचा फायदा अखिल हिंदुस्थानाबरोबर महाराष्ट्रालाहि मिळावा म्हणून त्याला कार्यप्रवृत्त करण्यासाठीं आपल्या लेखणीचा उपयोग करण्यांतच मराठी लेखकांच्या व्यवसायाचा गौरव आणि शारदेच्या उपासनेची सफलता आहे.

# मुंबई

(१६ नोव्हेंबर १९४०)

## आईची हांक

मुंबई साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद मला देऊन आपण जो हा माझा गौरव केलात, त्याला मी पात्र आहे कीं नाहीं, याबद्दल माझें मन खरोखरीच साशंक आहे. तरीसुद्धां या गौरवाचा स्वीकार मी अत्यंत आनंदानें, अत्यंत अभिमानानें केला. मुंबई शहर ही माझी जन्मभूमि आहे. आणि जन्मभूमीनें केलेला आपला बहुमान कोणाला अभिलषणीय, कोणाला आनंददायक वाटणार नाहीं ? चाळीस वर्षांपूर्वी प्रथम मुंबई शहरांत सूर्याची कोमल प्रभा माझ्या दृष्टीस पडली आणि सागराचें भव्य गर्जित माझ्या कानांवर पडलें. सूर्यचंद्रांच्या आकर्षणानें सांजसकाळ उन्मत्त होऊन हेलावणाऱ्या सागराच्या तांडव नृत्याचे निनाद माझ्या रक्तांत इतके कांहीं भिनून गेलेले आहेत कीं, गोंडवनांत जाऊन राहिल्याला आतां सोळा वर्षें होत आलीं, तरीहि जललहरींचा नाच कुठेंहि नजरेस पडतांच, ते निनाद माझ्या कानांत घुमूं लागतात, त्या

लाटांचें तांडव माझ्या डोळ्यांसमोर हेलावूं लागतें! त्यामुळें, आपण जेव्हां अध्यक्षपदावर माझी निवड करून मला आमंत्रण दिलें, तेव्हां, आईच्या हांकेबरोबर धांवत येणाऱ्या अधिऱ्या मुलाप्रमाणें, मी तो बहुमान हर्षभरानें स्वीकारला.

## संस्कार आणि उपकार

मात्र हा माझा हर्ष निर्मळ नाहीं. त्यांत अनेक भावना एकवटलेल्या आहेत; आनंदाच्या अश्रूंबरोबर दुःखाचींहि आसवें मिसळलेलीं आहेत. माझ्या आयुष्याचीं पहिलीं वीस वर्षें मी मुंबई शहरांत घालविलीं. त्या वीस वर्षांतील नानाविध संस्कार आणि नाना व्यक्तींचे उपकार यांच्या स्मरणानें आज माझें अंतःकरण भरून येत आहे. माझा जन्म मुंबईला झाला, माझें बाळपण वसईला गेलें आणि माझें आजोळ कल्याणला आहे. मुंबईपासून कल्याणपर्यंत साऱ्या साष्टीबेटांत ज्याच्या ऋणानुबंधाचे धागे अशा रीतीनें सर्वदूर विखुरलेले आहेत, असा अध्यक्ष, मला वाटतें, मीच प्रथम आपल्या वाट्याला आलों असेन. शंभर वर्षांपूर्वी मुंबई शहरांत ज्यांनीं पहिलें मराठी वर्तमानपत्र काढलें, त्या बाळशास्त्री जांभेकरांच्या लोकातिग बुद्धिवैभवावर जरी मला वारसाचा हक्क सांगतां आला नाहीं, तरी त्यांच्या वंशाचें रक्त ज्याच्या नसांतून वहात आहे आणि त्यांनीं सुरू केलेल्या लोकजागृतीच्या व्यवसायांत ज्याचें आतांपर्यंतचें जीवन व्यतीत झालें आहे, त्या माझ्यासारख्या मुंबईच्या पिढीजात पण परागंदा पुत्राला हा बहुमान देऊन आपण त्याच्या सेवेची मोठ्या उदार मनानें बूज केली आहे. यापूर्वी माझ्या आयुष्यांत बहुमानाचे प्रसंग आलेले आहेत आणि यापुढें कदाचित् याहिपेक्षां जास्त बहुमानाचे प्रसंग येतील. पण, आपण केलेल्या या गौरवानें ज्या ऊर्मि या वेळीं माझ्या मनांत उत्पन्न केल्या आहेत, त्यांची उत्कटता मी पुन्हा कधीं अनुभवीन, असें मला वाटत नाहीं.

या ऊर्मींत दुःखाचेहि अश्रु मिसळलेले आहेत असें जें मी आतांच म्हणालों, तें ऐकून आपल्याला कदाचित् आश्चर्य वाटलें असेल. पण, आपल्या मनाच्या, बुद्धीच्या आणि कर्तृत्वाच्या विकासाला ज्यांनीं आत्मीयतेनें हातभार लावला, ते त्याची बूज झालेली पाहावयाला हयात असूं नयेत, याबद्दल कोणाला खेद वाटणार नाहीं? 'नवयुगा'चे संपादक कै. गणपतराव कुळकर्णी, 'विविधज्ञानविस्तारा'चे संपादक कै. रावसाहेब मोरमकर आणि 'सुबोधपत्रिके'चे संपादक कै. द्वा. गो. वैद्य हे जर आज येथें हजर असते, तर माझा आपण केलेला हा गौरव पाहून त्यांना खचित आनंद झाला असता. कारण विद्यालयाचा कोणताहि संस्कार न घडलेला आणि विद्यापीठाची कोणतीहि पदवी न लाभलेला हा उतावळा, अननुभवी मात्य, वयाच्या अठराव्या वर्षीं, जेव्हां शारदेच्या प्रौढगंभीर प्रांगणांत अवखळपणानें शिरला, तेव्हां त्याला मायेच्या मृदु शब्दांनीं केव्हां उत्तेजन देऊन तर केव्हां उपदेश करून या सुहृदांनीं उन्नतीच्या मार्गाला लावलें. त्यांच्याबरोबरच कविवर्य माधव केशव काटदरे आणि प्रो. नरहर रघुनाथ फाटक यांच्याहि ऋणाचा उल्लेख मला केला पाहिजे. देशांतील जुन्यानव्या घडामोडींकडे तौलनिक दृष्टीनें आणि विश्लेषक बुद्धीनें पाहण्याची संवय या दोघां विद्वानांनीं माझ्या भावनोत्कट मनाला लावली. 'नवयुगा'चें नवमतवादित्व, 'विस्तारा'ची व्यासंगपूर्ण चिकित्सा आणि 'पत्रिके'चा अभिनव भागवतधर्म यांचे जे संस्कार माझ्या उमलत्या बुद्धीवर झाले, त्यांची परिणति श्री. पर्वते, जोगळेकर आणि डांगे यांच्या सहवासांत मिळालेल्या समाजवादाच्या सक्रिय शिक्षणानें झाली. ठाकुरद्वारासमोरील जुन्या कर्नाटक प्रेसच्या पायऱ्यांवर किंवा तोफखान्याजवळील महालक्ष्मीच्या खडकांवर बसून आम्ही त्या वेळीं रात्ररात्र केलेल्या वादांचे पडसाद आजहि माझ्या हृदयांत उठत आहेत. आयर्लंडांतील सिनफेनांच्या आणि रशियांतील

बोल्शेविकांच्या क्रांतिकारक यशाचा जो परिणाम त्या वेळीं माझ्या मनावर झाला, त्यानें माझ्या लेखनाचें स्वरूप आणि भवितव्य निश्चित केलें.

## मुंबई शहराचें अनन्य महत्त्व

मुंबई शहर सोडून मला आतां वीस वर्षें झालीं. तरीहि माझ्या मनावरले हे सारे संस्कार काल रेखल्याप्रमाणें अगदीं ताजे आहेत. त्यांचा रंग उडाला नाहीं, प्रभाव लोपला नाहीं. माझ्या लिहिण्यांत जर कांहीं विशालता, जर कांहीं तेज असेल, तर त्याचें सर्व श्रेय या संस्कारांना आहे. मुंबई सोडल्याबद्दल केव्हां केव्हां मला वाईट वाटतें, तर केव्हां केव्हां हेवाहि वाटतो. कारण नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलेल्या आपल्या महाराष्ट्रभूमींत मुंबईसारखें नवविचारांचें दुसरें केंद्र नाहीं. सागराचा अफाट विस्तार ज्यांच्या डोळ्यांपुढें पसरलेला आहे, त्या विस्तारांत विलीन झालेलें तारकामंडित आकाश ज्यांच्या मस्तकावर विराजत आहे, त्यांची दृष्टि अत्यंत विशाल व्हावी, यांत काय आश्चर्य? समुद्रकांठचे लोक हे नाहीं तरी नेहमींच धाडसी आणि दूरदेशी असतात. वाऱ्याच्या प्रत्येक झुळकेबरोबर जे पश्चिमेकडचे प्रगत आणि प्रक्षोभक विचार मुंबईला येतात, त्या विचारांमुळें या शहराला महाराष्ट्राच्या बौद्धिक जीवनांत अग्रपद प्राप्त झालें आहे. महाराष्ट्रांतील समुद्रकांठचीं इतर गांवें हीं सागरसंगीतानें सुस्तावल्यासारखीं वाटतात. पण सागराच्या चारी बाजूंनीं अंगावर आदळणाऱ्या लाटांच्या अविरत घोषामुळें मुंबई शहर मात्र सदैव जागरूक राहून पश्चिमेकडून येणाऱ्या नवविचारांचें स्वागत आणि पुरस्कार करीत असतें. पूर्वाभिमुख कलकत्त्यापेक्षां पश्चिमाभिमुख मुंबईची छाप जी हिंदी राजकारणावर आजवर जास्त पडत आली आहे, ती, मला वाटतें, याच कारणामुळें; व 'हिंदुस्थानाचें प्रवेशद्वार' असें जें त्या शहराचें वर्णन नेहमीं केलें जातें, तें एकापेक्षां अनेक अर्थांनीं समर्पक ठरेल.

म्हणूनच महाराष्ट्राच्या एकीकरणाविषयीं उत्सुक असलेल्या माझ्या मनाला एक शंका वारंवार दंश करीत असते. ती ही कीं, सर्व हिंदुस्थानांत अद्वितीय अशा या शहराला मुकण्याचा प्रसंग महाराष्ट्रावर पुढें मागें येईल कीं काय? मुंबई हें हिंदुस्थानांतील पहिल्या दर्जाचें व्यापारी आणि औद्योगिक शहर आहे. व्यापारी शहरें हीं लोकसंख्येच्या दृष्टीनें नेहमींच बहुजिनसी आणि भेसळ असतात. कारण व्यापार ही जागतिक चीज आहे. त्याला ना जात, ना धर्म, ना राष्ट्रीयता. जगाच्या कुठल्याहि भागांतून भांडवल आणि मेहनत हीं खेचून आणून त्यांच्या मिलाफानें पैदास करावयाची आणि नफा उकळावयाचा, एवढीच त्याची दृष्टि. त्यामुळें जगांतील सगळींच प्रमुख, व्यापारी शहरें हीं लोकसंख्येच्या बाबतींत भेसळ आहेत. पण म्हणून कांहीं तीं शहरें आपल्या मायदेशाला पारखीं होत नाहींत, विजातीय ठरत नाहींत. तथापि, वीस वर्षांपूर्वी राष्ट्र-सभेनें, आपल्या नव्या घटनेनुसार,मुंबई शहर महाराष्ट्रांतून बाजूला काढून त्याला सवता सुभा दिल्यामुळें, त्या शहराची आणि महाराष्ट्राची एका परीनें राजकीय फारकत झाली आहे. डॉ. खरे हे मुख्य प्रधान असतांना एकदां सहज असें बोलून गेले होते कीं, मुंबई, मद्रास, कराची, दिल्ली, विजगापट्टण वगैरे कांहीं शहरें आणि बंदरें हीं फेडरल ठरवून त्या त्या प्रांतांतून पुढेंमागें वेगळीं काढलीं जाण्याचा संभव आहे. या त्यांच्या विधानाला काय आधार होता, याची मला कल्पना नाहीं. पण तें विधान ऐकल्यावर, मुंबई शहर आणि महाराष्ट्र यांची राष्ट्रसभेनें आधींच केलेली फारकत फेडरल घटना अंमलांत येतांना कदाचित् कायम होऊन जाईल, अशी भीति मात्र मनांत उफाळल्याशिवाय राहिली नाहीं. मुंबई शहरांतील व्यापारधंदे आज परप्रांतीयांच्या हातीं आहेत आणि तेथील बहुसंख्य मराठे हे केवळ कामगार किंवा कारकून आहेत, ही गोष्ट खरी. पण लोकशाहीच्या तत्त्वानुसार हें शहर मराठीच आहे आणि

तें महाराष्ट्रांतच गणलें गेलें पाहिजे, या आपल्या घोषणेला, मला वाटतें, आपले परप्रांतीय संपन्न बंधु हरकत घेणार नाहींत. त्याचप्रमाणें, फेडरल घटना अस्तित्वांत येण्याच्या वेळीं जर मुंबई शहर वेगळें काढण्याचा प्रयत्न खरोखरीच करण्यांत आला, तर त्यालाहि निकराचा विरोध करण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे.

## मुंबईच्या भवितव्याची चिंता

कारण, महाराष्ट्राची मुंबई शहरापासून जर खरोखरीच कायमची फारकत झाली, तर त्याची जी दारुण हानी होईल, तिची कल्पनाहि मला करवत नाहीं. मुंबई शहराचें औद्योगिक, राजकीय आणि आरमारी महत्त्व केवळ महाराष्ट्रांतच नव्हे, तर सर्व पश्चिम किनाऱ्यावर अतुल आहे. पश्चिमेकडील जगाचें प्रवेशद्वार आणि उतारपेठ म्हणून मुंबईला जें महत्त्व आहे, तें महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणत्याहि शहराला आणि पश्चिम किनाऱ्यावरील दुसऱ्या कोणत्याहि बंदराला नाहीं. असें हें अद्वितीय शहर, राष्ट्रसभेतील घटनापंडितांच्या चुकीमुळें म्हणा किंवा ब्रिटिश सरकारच्या मतलबी धोरणामुळें म्हणा, महाराष्ट्राला कायमचें पारखें होण्याची भीति उत्पन्न व्हावी, यापरतें आपलें दुर्भाग्य तें कोणतें ? अफगाणिस्थानानें कराची बंदरावर आपली लोभी नजर टाकावी आणि निजामानें विजगापट्टण ताब्यांत घेण्याचा अभिलाष धरावा, पण आपण मराठ्यांनीं मात्र मुंबईसारखें आपलें जागतिक दर्जाचें दर्यावर्दी शहर केवळ गाफिलगिरीनें गमावून बसावें, हें नादान-पणाचें होणार नाहीं काय ? महाराष्ट्रांतून मुंबई शहर वेगळें काढण्यांत राष्ट्रसभेचा कांहीं विशेष हेतु असेल, असें मला वाटत नाहीं. केवळ त्या शहराचा प्रचंड व्याप लक्षांत घेऊनच तिनें त्याला स्वतंत्र कमिटी बहाल केली असावी. पण, राष्ट्रसभेनें मुंबई शहराला सोईसाठीं वेगळी कमिटी दिली म्हणून तें स्वतंत्र झालें आणि महाराष्ट्र त्याला मुकला,

असें समजण्याचें कारण नाहीं; व लोकसंख्येच्या भेसळ स्वरूपाकडे बोट दाखवून तसा अर्थ जर कोणी या विभागणींतून काढूं लागला, तर त्याला जरबेनें गप्प बसविण्याची धमक आपल्या मनगटांत आहे, हें महाराष्ट्रानें दाखविलें पाहिजे. सत्तेच्या किंवा संपत्तीच्या जोरावर राष्ट्रांच्य-शरीराचे लचके तोडण्याचीं कारस्थानें किती भयंकर रीतीनें अंगलट येतात, हें युरोपांतल्या ताज्या घडामोडींनीं जगाच्या प्रत्ययाला नुकतेंच आणून दिलें आहे. तेव्हां, मराठ्यांच्या मुंबईवरील हक्काला हरकत घेण्याच्या धोरणाला राष्ट्रसभा फूस देईल, हें शक्य दिसत नाहीं. पण ब्रिटिश सरकारबद्दल असा निर्वाळा आपण थोडाच देऊं शकतों ! पोर्टसैद, अलेक्झांड्रिया, एडन, सिंगापूर, हांगकांग, शांघाय वगैरे ब्रिटिशांचीं पूर्वेकडील आरमारी नाकीं आणि त्यांची स्वतंत्र व्यवस्था पाहिली, म्हणजे मुंबई शहराच्या भवितव्याविषयीं मन सचिंत झाल्या शिवाय राहत नाहीं.

## इंग्रजी बोलणाऱ्या राष्ट्रांचें फेडरेशन

महाराष्ट्राचें एकीकरण आणि मुंबई शहराचें भवितव्य यांच्या-विषयीं मी जें हें बोलत आहें, तें ऐकून आपल्याला कदाचित् असें वाटेल कीं, साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठाचा उपयोग मी राजकीय प्रचारासाठीं करीत आहें. पण खरोखरी तसें नाहीं. अडीच कोट लोकसंख्येच्या चिमुकल्या मराठी राष्ट्राचे चार तुकडे पडल्यामुळें मराठी भाषा आणि वाङ्मय यांची जी आज कुचंबणा होत आहे, ती आपण ध्यानांत घ्या. म्हणजे महाराष्ट्राच्या एकीकरणाचा काय किंवा मुंबईच्या भवितव्याचा काय हे दोन्ही प्रश्न साहित्याच्याहि दृष्टीनें किती जिव्हाळ्याचे आहेत, हें आपल्या प्रत्ययाला येईल. गोमांतकांत होत असलेल्या मराठी भाषेच्या गळचेपीकडे हिंदु महासभेचे अध्यक्ष बॅ. सावरकर यांनीं आपलें लक्ष नुकतेंच वेधलें आहे. गोमांतकापेक्षांहि

मराठी भाषेची जास्त पद्धतशीर पायमल्ली आज निजामसाहेबांच्या सुलतानी अमलाखालीं असलेल्या मराठवाड्यांत होत आहे. नागपूर-वऱ्हाड प्रांतांतहि सरहद्दीवरील सर्व गांवांतून हिंदीचें मराठीवर आक्रमण होत असल्याच्या तक्रारी सारख्या कानावर येत आहेत. गोमांतक आणि मराठवाडा या दोन मोठ्या भागांत मराठी नियतकालिकांना प्रवेश नसल्यामुळें आणि मराठी शिक्षणाला मनाई झाल्यामुळें मराठी भाषा आणि वाङ्मय यांचें जें नुकसान होत आहे, त्याला किंवा नागपूर-वऱ्हाड प्रांतांतील हिंदीच्या आक्रमणाला कसा आळा घालतां येईल, याचा विचार करणें हें आपलें कर्तव्य नाहीं काय? भाषा आणि राजकारण यांचा कांहीं संबंध नाहीं, असें आपण अजूनहि सामान्यतः समजून चालतों. उलट ब्रिटिश साहित्यिक आणि राज्यनीतिशास्त्रज्ञ हे मात्र आजच्या घटकेलाहि, इंग्रजी भाषा हा पाया मानून, ती भाषा बोलणाऱ्या जगांतील सर्व राष्ट्रांचें फेडरेशन स्थापण्याच्या विवंचनेंत आहेत. गेल्या महायुद्धानंतर शॉ आणि वेल्स या दोघांनीं जेव्हां ब्रिटिश साम्राज्य आणि अमेरिका यांचें एकीकरण करून इंग्रजी भाषा बोलणाऱ्या जगांतील सर्व राष्ट्रांची लोकसत्तावादी अभेद्य जूट निर्माण करावी या कल्पनेचा पुरस्कार केला, तेव्हां ती कल्पना अनेकांनीं अव्यवहार्य किंबहुना हास्यास्पदहि ठरविली. पण आज विन्स्टन चर्चिल आणि हेन्री ब्रिज यांच्यासारख्या अव्वल दर्जाच्या मुत्सद्यांच्या तोंडून त्या कल्पनेचा वारंवार उद्घोष होत असलेला आपण ऐकत आहों.

## संस्कृति भाषानिष्ठ आहे

उलट आपल्याला मात्र महाराष्ट्राच्या एकीकरणाची निकड वाटत नाहीं किंवा मुंबई शहरावर हक्क सांगतांनाहि आपलें मन कचरतें. इंग्रजी भाषा बोलणाऱ्या राष्ट्रांच्या फेडरेशनची कल्पना विशद करितांना वेल्सनें हिंदुस्थान, इजिप्त, इराक, मलाया वगैरे ब्रिटिश साम्राज्यांतील

भिन्नभाषी देशांचा निर्देशहि बिनदिक्कत आंग्लभाषी म्हणून केला आहे. त्या मानानें आपला आत्मविश्वास किती कमी आणि आपल्या आकांक्षा तरी किती कोत्या! समभाषी राष्ट्रांचा संघ स्थापन करण्याची ही जी कल्पना गेल्या महायुद्धानंतर उदयाला आली, तिचें मर्म आपण लक्षांत घेतलें पाहिजे. युरोपखंड हें सामान्यतः एकधर्मी म्हणजे ख्रिस्ती असूनहि त्या खंडांत शांतता नांदू शकत नाहीं. अर्थात् राष्ट्राराष्ट्रांमध्यें किंवा जातीजातींमध्यें ऐक्य किंवा स्नेहभाव उत्पन्न करावयाला धर्मबंधन हें अपुरें पडतें हें सिद्धच आहे. कारण, धर्म एक असला, म्हणून कांहीं संस्कृति ही एक असतेच, असें नाहीं. खुद्द हिंदुस्थानांतहि धर्म साधारणतः एक असतांनासुद्धां प्रत्येक प्रांताची संस्कृति किती भिन्न आहे, हें आपण अनुभवतोंच आहों. संस्कृति ही बव्हंशीं भाषानिष्ठ असते; व म्हणूनच युरोपांत स्लाव्ह, लॅटिन, टयूटन वगैरे जातवार राष्ट्रसमूह मानले जात असूनहि त्या समूहांतील सजातीय समजल्या गेलेल्या राष्ट्रांची संस्कृति भाषापरत्वें अगदीं भिन्न आहे. भाषेची एकता ही सांस्कृतिक सात्म्य निर्माण करण्याच्या बाबतींत किती प्रभावी ठरते, याचें उदाहरण हुडकण्यासाटीं आपल्याला दूर जावयाला नको. इंग्रजी भाषेनें गेल्या दीडशें वर्षांत हिंदी सुशिक्षित वर्गामध्यें जी आचारविचारांची एकतानता उत्पन्न केली आहे, ती समान संस्कृति निर्माण करण्याच्या भाषेच्या सामर्थ्याची उत्कृष्ट साक्ष देते. भाषेचें हें सामर्थ्य लक्षांत घेऊनच वंगीय मुस्लिम परिषदेचे अध्यक्ष श्री. वाजेद अली यांनीं, प्रत्येक प्रांताची मातृभाषा हेंच यापुढें राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान समजून, त्या भाषेच्या साह्यानें हिन्दु आणि मुस्लिम यांचें समान नव साहित्य आणि समान नव संस्कृति निर्माण करून जातीय प्रश्न सोडविला पाहिजे, असें प्रतिपादिलें आहे; व वंगीय कादंबरीकारांचे अग्रणी कै. डॉ. शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांनींहि, डाक्का विद्यापीठानें दिलेल्या डॉक्टरेटचा स्वीकार करतांना केलेल्या भाषणांत, याच भावनेनें बंगालमधील मुस्लिम समा-

जाच्या जीवनाचें चित्रण आपल्या कादंबऱ्यांतून करण्याचा संकल्प जाहीर केला होता.

## विशाल प्रतिभा आणि उदार संस्कृति

तेव्हां, धर्म किंवा जाति यांच्यापेक्षां प्रबळ अशी राष्ट्राराष्ट्रांना किंवा जातिजातींना एकत्रित करून अगदीं न कळत समान भूमिकेवर आणणारी जर कोणती सांस्कृतिक शक्ति असेल, तर ती भाषा हीच होय. धर्म किंवा जाति यांच्या मानानें ही शक्ति दिसावयाला सौम्य किंवा सात्विक खरी, पण अत्यंत सूक्ष्म, व्यापक आणि प्रभावी आहे. भिन्न धर्मांच्या आणि भिन्न जातींच्या लोकांत भाषा हीच हळुहळू सांस्कृतिक सात्म्य उत्पन्न करते; व धर्म आणि जाति यांच्याहून अतीत आणि उच्च अशी समावेशक विशाल संस्कृति (cosmopolitan culture) निर्माण करून मानवतेची उदात्त जाणीव वाढीला लावते. अडीच कोट लोकसंख्येच्या चिमुकल्या मराठी राष्ट्रांतील मुसलमान, पारशी, यहुदी, ख्रिस्ती वगैरे अनेक धर्मांच्या आणि हिंदु समाजांतील अगणित जातींच्या लोकांत सांस्कृतिक ऐक्य उत्पन्न करून लोकशाहीच्या विकासाला पोषक अशी उदार राष्ट्रीयता जर महाराष्ट्रांत आपल्याला निर्माण करावयाची असेल, तर ज्ञानेश्वर–तुकारामादि संतकवींनीं भागवत-धर्माची अधिष्ठात्री बनविलेल्या मराठी भाषेचीं सर्व सुप्तगुप्त सामर्थ्यें आपल्याला एकवटून कामीं लावलीं पाहिजेत. याच दृष्टीनें मुंबई शहराचें महत्त्व मला फार वाटतें. मुंबई हें मराठी भाषेचें केंद्र आहे. मराठी वाङ्मयाची पैदास आणि खप ही मुंबई शहरांत जितकी होते, तितकी महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणत्याहि शहरांत होत नाहीं. मराठी भाषेची मुख्य बाजारपेठ आज मुंबई हीच आहे. पण, मला जें मुंबईचें महत्त्व वाटतें, तें अर्थातच या व्यावहारिक दृष्टीनें नव्हे; तर महाराष्ट्राचें वैचारिक नेतृत्व स्वीकारण्याचें जें सामर्थ्य मुंबईच्या विशाल प्रतिभेंत

आणि उदार संस्कृतींत आहे. त्या दृष्टीनें मी तिच्याकडे पाहतों. मुंबई शहराला ऐतिहासिक परंपरा नाहीं किंवा त्याची संस्कृतीहि ब्राह्मणी नाहीं. मच्छीमार कोळ्यांनीं वसविलेलें हें बेट दर्यावर्दी इंग्रजांच्या हातीं पडल्यामुळें त्याचा उत्कर्ष होऊन तें आज पश्चिम हिंदुस्थानाची राजधानी होऊन बसलें आहे. हें शहर जसें आधुनिक, तशी त्याची संस्कृतीहि आधुनिक. आपण ज्यांना महाराष्ट्रांतील पहिले समाजवादी म्हणूं शकूं, त्या विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांनीं हें शहर बाल्यावस्थेंत असतांनाच त्याला मानवतेच्या धर्माचे धडे दिले. एकुणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत मुंबईच्या विचारांना जें हें नवें क्रांतिकारक वळण लागलें, त्याची परंपरा विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील मीरत कटाच्या खटल्यापर्यंत अखंड चालत आलेली आपण पहात आहों. म्हणूनच महाराष्ट्राचें वाङ्मयीन आणि वैचारिक नेतृत्व आज या आधुनिक शहराकडे आलें आहे. वैज्ञानिक क्रांतीमुळें जग प्रत्यहीं इतक्या झपाट्यानें बदलत आहे कीं, पूर्वेतिहासापासून कोणत्याहि प्रकारची स्फूर्ति घेणें आतां शक्य किंवा इष्ट राहिलेलें नाहीं. किंबहुना, भूतकाळाच्या भग्न अवशेषांत रेंगाळणाऱ्या जुनाट मनांच्या आकांक्षा आणि कार्यपद्धति समाजाच्या उन्नतिपेक्षां पिछेहाटीलाच कारण होण्याचा संभव फार. शास्त्रीय ज्ञानाच्या पायावर समाजाच्या एकंदर जीविताची पुनर्घटना होऊन जी नवी मानवता आणि जी नवी संस्कृति या महायुद्धानंतर निर्माण होणार, तिला पोषक असें वातावरण महाराष्ट्रांत उत्पन्न करण्याचें सामर्थ्य फक्त या आधुनिक शहराच्या प्रतिभेंत आणि संस्कृतींतच आहे.

## नवी जागतिक शक्ति निर्माण होणार

ही नवी संस्कृति आणि नवी मानवता कोणती, असा प्रश्न आतां साहजिकच उद्भवतो. इतकेंच नव्हे, तर सध्यां चालू असलेल्या महायुद्धांतून नवी संस्कृति आणि नवी मानवता निर्माण होईल असा

जो निर्वाळा तुम्ही देतां त्यावर आम्ही कां विश्वास ठेवावा, असा प्रश्न जर कोणी केला, तर तो खचित गैर ठरणार नाहीं. कारण सांप्रतच्या महायुद्धाप्रमाणें गेलें महायुद्धहि लोकशाहीच्याच नांवानें लढलें गेलें नव्हतें काय? आणि त्या महायुद्धानंतर जेव्हां राष्ट्रसंघ स्थापन झाला, तेव्हां कांहीं काळ तरी शांततेचें आणि लोकशाहीचें सुवर्णयुग अवतरलें, असाच भास लोकांना झाला नाहीं काय? मग लोकशाहीच्या रक्षणार्थ म्हणून सुरू करण्यांत आलेल्या सध्यांच्या महायुद्धानंतरहि पुन्हा अशीच फसवणूक होणार नाहीं याची काय हमी? जर्मनींतील निरंकुश नाझीशाही ही लोकशाहीच्या मुळावरच उठलेली असल्यामुळें तिला प्रतिकार करण्यांत पर्यायानें लोकशाहीचा पुरस्कार होतो, ही गोष्ट खरी. पण, लोकशाहीच्या परित्राणाची बिरुदावलि आपल्या चिलखतावर लटकावून लढत असलेल्या राष्ट्रांनीं जोंपर्यंत स्वतःच्या पोलादी टांचेखालीं दडपल्या गेलेल्या परतंत्र देशांना लोकसत्ताक स्वातंत्र्याचें निस्संदिग्ध आश्वासन दिलेलें नाहीं, तोंपर्यंत त्यांचा लोकशाहीचा पुरस्कार मतलबी आणि मायावी आहे, असें म्हणण्यांत चूक कोणती? तेव्हां सध्यां चालू असलेल्या महायुद्धाबद्दल भलत्या आशा बाळगणें आणि भलतीं भाकितें वर्तवणें अप्रयोजकपणाचें होणार नाहीं काय? ही शंका खरोखरीच अत्यंत समर्पक आहे. पण, त्याबरोबरच ही गोष्टहि निर्विवाद आहे कीं, या युद्धाचा शेवट कसाहि झाला, तरी त्यांत भाग घेणारीं सारींच राष्ट्रें इतकीं हतबल होऊन जाणार आहेत कीं, त्यांच्या या दौर्बल्यांतून आणि विध्वंसांतून नवी जागतिक शक्ति आविर्भूत होऊन ती निस्त्राण आणि विस्कळित झालेल्या मानवसमाजाच्या पुनर्घटनेचें कार्य हातीं घेईल. एकुणिसाव्या आणि विसाव्या शतकांतील निरनिराळ्या लढायांच्या स्वरूपावरून युद्धें कोणत्या उद्देशानें उपस्थित केलीं जातात आणि कशा रीतीनें लढलीं जातात, हें आतां सर्वच लोकांच्या, स्वतंत्र राष्ट्रांप्रमाणें परतंत्र राष्ट्रांतील बहुजनांच्याहि (masses) लक्षांत येऊन चुकलें

आहे. आर्थिक विषमता, तिच्यामुळें ओकाळणारें दारिद्र्य आणि बेकारी व वाढत्या दरिद्री आणि बेकार प्रजेची सोय लावण्यासाठीं करावी लागणारी मुलूखगिरी हीं वारंवार होणाऱ्या युद्धांचीं उघड दिसणारीं कारणें आहेत; व युद्धप्रवृत्ति जर जगांतून खरोखरीच नाहींशी करावयाची असेल, तर शस्त्रसंन्यासाचे दिखाऊ आणि पोकळ कार्यक्रम हातीं न घेतां युद्धाचीं हीं कारणें प्रथम नष्ट केलीं पाहिजेत.

## शास्त्रीय आणि सुसंस्कृत लोकशाही

आणि हीं कारणें नष्ट करण्याचा उपाय एकच आहे. तो म्हणजे सर्व जगांत शास्त्रीय आणि सुसंस्कृत लोकशाही स्थापन करणें. मी 'लोकशाही' हा शब्द नुसताच न वापरतां 'शास्त्रीय' आणि 'सुसंस्कृत' हीं दोन जाडीं विशेषणें त्याला लावलीं, याबद्दल आपल्यापैकीं कांहींना अचंबा वाटेल आणि कांहींना तर कदाचित् रागहि येईल. पण मला खरोखरी सुजाण लोकशाही हवी आहे. कालांतरानें झोटिंगांची पैदास करणारी आंधळी झुंडशाही (mobocracy) नको हें दर्शविण्यासाठींच मी हीं विशेषणें योजलीं आहेत. गेल्या महायुद्धांत युरोपांतील बहुतेक पुरातन राजसत्तांचा उच्छेद होऊन किंवा त्या अत्यंत नियंत्रित होऊन निरनिराळ्या राष्ट्रांतून लोकसत्ताक राज्यपद्धति अस्तित्वांत आली. पण कालांतरानें या राज्यक्रांत्यांतून स्टालिन, मुसोलिनी, केमाल पाशा, हिटलर यांच्यासारखे अरेराव उदयाला येऊन त्यांनीं लोकसत्ताक राज्य-पद्धतीच्या नरडीला नख लावलें; व त्यांच्या विजिगीषेंतूनच सध्यां चालू असलेल्या महायुद्धाचा प्रळयाग्नि उफाळला आहे. प्रस्तुत महायुद्धा-नंतर जर या प्रकाराची पुनरावृत्ति व्हावयाला नको असेल, तर गेल्या महायुद्धानंतर स्थापन झालेलीं लोकसत्ताक राज्यें कां कोलमडून पडलीं याचीं कारणें तपासून, त्या दृष्टीनें लोकशाहीची पुनर्घटना केली पाहिजे. देशांतील वयांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीला मताधिकार बहाल करण्यांत

आला, म्हणजे लोकशाही स्थापन झाली असें होत नाहीं. त्या मताधिकाराचा योग्य उपयोग करण्याची पात्रता आणि जबाबदारी जोंपर्यंत प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं आलेली नाहीं, तोंपर्यंत त्या मताधिकाराचा दुरुपयोग होणार आणि त्यावर अधिष्ठित झालेली लोकशाहीहि पदभ्रष्ट होणार, हें निश्चित आहे. युरोपांत जे झोटिंग आज धिंगाणा घालीत आहेत, ते सुरवातीला तरी बहुमताच्या जोरावरच सत्ताधारी झाले, हें विसरून चालणार नाहीं. तेव्हां, लोकशाहीचें पर्यवसान झुंडशाहींत आणि झोटिंगांच्या पैदाशींत होऊं नये, अशी जर खरोखरीच इच्छा असेल, तर शास्त्रीय आणिं सुसंस्कृत लोकशाही निर्माण करण्याविना गत्यंतर नाहीं. फ्रान्स, अमेरिका किंवा इंग्लंड या देशांतून जी लोकशाही आज प्रचलित आहे, ती सुद्धां खरी लोकशाही नाहीं. ज्या देशांत मताधिकार विकला जातो आणि मतस्वातंत्र्याची मुस्कुटदाबी होते, त्या देशांत खरी लोकशाही नांदते आहे, असें कोण म्हणेल ?

## राजकीय आणि औद्योगिक लोकशाही

पण मग खरी लोकशाही कशाला म्हणावयाचें आणि ती अस्तित्वांत तरी कुठें आहे ? खरी लोकशाही आज पृथ्वीच्या पाठीवर कुठेंच नांदतांना दिसत नाहीं; व म्हणूनच महायुद्धाचें भयानक होमकुंड सतत धडधडत आहे. फ्रेंच आणि अमेरिकन राज्यक्रांतींतून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांचा उदय होऊन अठराव्या शतकाच्या अखेर त्या देशांत लोकराज्यें स्थापन झालीं, हें खरें. पण ही लोकशाही एकांगी म्हणजे फक्त राजकीय होती. जुलमी राजसत्ता आणि तिच्या आश्रयाने लोकांना गांजणारे सरंजामी वर्ग यांचें उच्चाटन करण्यापलिकडे या क्रांतीची मजल गेली नाहीं; व सरकारी पदव्या आणि वतनदारी नाहींशी करून या क्रांतीनें आपल्या कल्पनेप्रमाणें लोकशाही निश्चित केली. यंत्रयुग या सुमारास नुकतेंच सुरू झालें होतें आणि

भांडवलशाही अद्याप संघटित व्हावयाची होती. राजसत्ता आणि तिचा आश्रित सरंजामी वर्ग पदच्युत होतांच भांडवलशाहीनें पुढें सरसावून पैशाच्या जोरावर हळुहळू सत्तेचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं; व राजसत्ता आणि सरंजामी वर्ग यांना कधींहि साधलें नसेल अशा व्यवस्थितपणानें तिनें समाजांतील श्रमजीवी वर्गांना पिळून काढावयाला प्रारंभ केला. उत्पादनाचीं सर्व साधनें समाजांतील मूठभर धनाढ्यांच्या ताब्यांत गेलीं; हातीं असलेल्या प्रचंड संपत्तीच्या जोरावर त्यांनीं राज्ययंत्राचा ताबा घेतला; व अशा रीतीनें राजकीय दृष्टया लोकशाही अस्तित्वांत आली असतांनाहि लोकांचें दैन्य मात्र कायमच राहिलें. राजकीय लोकशाहीवर कुरघोडी करून तिला आपल्या स्वार्थसाधनासाठीं राबवि-णाऱ्या या भांडवलशाहीचा नायनाट करण्यासाठीं कार्ल मार्क्सचा साम्यवाद आविर्भूत झाला; व उत्पादनाच्या हर एक साधनाचें आणि हर एक प्रकारच्या संपत्तीचें समाजीकरण झाल्याशिवाय, त्यांच्यावरील व्यक्तींची किंवा वर्गांची मालकी नष्ट होऊन एकंदर समाजाची मालकी त्यांच्यावर स्थापन झाल्याशिवाय खरी सर्वांगीण लोकशाही अमलांत येणार नाहीं, हें लोकांच्या प्रत्ययाला आलें. निरर्गल राजसत्तेपेक्षांहि निरर्गल नफेबाजी ही समाजाची पिळणूक जास्त पद्धतशीर रीतीनें आणि जास्त अमानुष करते. म्हणून राजकीय लोकशाही ही जर पंगु आणि हतबल व्हावयाला नको असेल, तर औद्योगिक लोकशाहीचीहि जोड तिला दिली पाहिजे, असा हा सिद्धांत होता.

## लोकशाहीचा पाया मानवता

अर्थात् खरी लोकशाही ही राजकीय आणि आर्थिक अशी दुहेरी असली पाहिजे; कोणतीहि व्यक्ति किंवा वर्ग हा दुसऱ्या व्यक्तीला किंवा वर्गाला कोणत्याहि प्रकारें पिळून काढूं शकणार नाहीं, असें तिचें स्वरूप असलें पाहिजे. समाजहिताच्या दृष्टीनें अवश्य तेवढेंच नियंत्रण

व्यक्तीवर ठेवून इतर सर्व बाबतींत तिच्या विकासाला पूर्ण वाव देते ती लोकशाही, अशी लोकशाहीची एक व्याख्या करतां येईल; व नाझी-शाहीचा प्रतिवाद म्हणून ती व्याख्या समर्पकहि ठरेल. कारण नाझी-शाहींत एकमुखी सरकार हें व्यक्तीच्या रोजच्या जीवनांत इतकी कांहीं ढवळाढवळ करितें कीं, शेवटीं व्यक्ति ही फक्त सरकारचें एक हत्यार, त्याच्या आकांक्षापूर्तीचें एक साधन म्हणूनच शिल्लक राहते. माणूस किंवा नागरिक म्हणून कोणत्याहि प्रकारचें स्वतंत्र अस्तित्व किंवा हक्क व्यक्तीला उरत नाहीं. लोकशाही आणि नाझीशाही यांच्यांतील हा तात्त्विक विरोध, मानवतेकडे पहाण्याच्या त्यांच्या दृष्टींतील हा मूलभूत फरक लक्षांत घेऊन नाझींच्या जुलमामुळें देशोधडीला लागून अमेरिकेच्या आश्रयाला जाऊन राहिलेले जगद्विख्यात जर्मन कादंबरीकार डॉ. थॉमस मॅन यांनीं लोकशाहीची मोठी सुंदर व्याख्या केली आहे. ते म्हणतात, " मनुष्याच्या प्रतिष्ठेची, व्यक्तिमात्राच्या माणुसकीची जाणीव आणि कळकळ सतत आणि प्रामुख्यानें बाळगून चालणारी राज्यपद्धति आणि समाजरचना म्हणजे लोकशाही. मानवजातीची उन्नति करण्याची, तिला विचार करावयाला शिकविण्याची, तिला मुक्त करण्याची इच्छा लोकशाही बाळगते. ( We must define demoracy as that form of government and of society which is inspired above every other, with the feeling and consciousness of the dignity of man...... Democracy wishes to elevate mankind, to teach it to think, to set it free. )" लोकशाहीचें हें वर्णन काव्यमय खरें, पण कोणत्याहि शास्त्रीय व्याख्येपेक्षां तें जास्त अन्वर्थक, जास्त मर्मदर्शी ठरेल. भांडवलशाहीचा पाया जसा संपत्ति, नाझीशाहीचा पाया जसा अत्याचार, तसा लोकशाहीचा पाया मानवता हा आहे. समाजाची उन्नति आणि मानवतेचा विकास यांचा समन्वय ज्या समाजरचनेंत आणि राज्यपद्धतींत केलेला असतो, ती पूर्ण आणि

सर्वांगीण लोकशाही. एका व्यक्तीचा हिंसक अरेरावी हुकूम किंवा अहिंसक आंतला आवाज ज्या समाजावर सुलतानी गाजवितो, त्या समाजांत लोकशाहीची चाड उरलेली नाहीं, असें खुशाल समजावें. विशिष्ट गटाच्या किंवा पक्षाच्या स्वाधीन असलेल्या हुकमी बहुमताच्या जोरावर जो मनुष्य पुनः पुन्हा निवडून येऊन सत्ताधारी बनतो, त्याला लोकनियुक्त राष्ट्रनेता न म्हणतां खरोखरी हुकुमशहाच म्हटलें पाहिजे; व फ्रँकलिन रूझवेल्ट हे अध्यक्षपदाच्या निवडणुकीला तिसऱ्यांदा उभे राहिल्याबद्दल त्यांच्या लोकशाही पक्षांतील कांहीं सभासदांनीं "थर्ड टाईमर–तिसऱ्यांदा उभा रहाणारा" असें निंदाव्यंजक विशेषण योजून त्यांच्या उमेदवारीचा जो निषेध केला, त्याचेंहि मर्म ज्ञालें तरी हेंच होय.

## लोकशाही आणि वाङ्मय

तेव्हां निव्वळ सार्वत्रिक मताधिकार म्हणजे लोकशाही नव्हे; तर तो मताधिकार योग्य रीतीनें उपयोगांत आणण्याची व्यक्तीची पात्रता आणि अनिर्बंध मतस्वातंत्र्य हे लोकशाहीचे तितकेच प्रमुख घटक आहेत. जगांतील बहुतेक प्रगत राष्ट्रांतून आज सार्वत्रिक मताधिकार आहे; पण मतस्वातंत्र्य मात्र सर्वत्र आहेच असें नाहीं. रेडियो आणि बोलपट हीं आधुनिक काळांतील ज्ञानप्रसाराचीं सर्वांत सुलभ आणि प्रभावीं साधनें. पण, सरकारचें नियंत्रण त्यांच्यावर इतकें कडक असतें कीं, सरकार आणि त्याच्या प्रभावळींतील प्रतिष्ठित वर्ग यांना अनिष्ट वाटणारी कोणतीहि कल्पना किंवा माहिती या साधनांच्या साह्यानें लोकांत प्रसृत करतां येत नाहीं. उत्पादनाचीं साधनें अपरंपार वाढूनहि जसें बहुजनांचें दैन्य फिटलेलें नाहीं, तशींच शिक्षणप्रसाराचीं शीघ्र साधनें उपलब्ध होऊनहि बहुजनांचें अज्ञान घटलेलें नाहीं. रेडियो आणि बोलपट यांच्यापेक्षांहि वृत्तसंस्थेची स्थिति आज अधिक केविलवाणी आहे. राज्यसंस्थेची प्रतिस्पर्धी म्हणून गाजलेली वृत्तसंस्था भांडवल-शाहीच्या मुठींत गेलेली असून तिच्या राजकीय डावपेचांचा पाठपुरावा

करण्यापलिकडे दुसरें कर्तव्य तिला उरलेलें नाहीं. याच्या भरीला आणखी सरकारची सक्त नजर वृत्तसंस्थेवर असल्यामुळें लोकमताचा जो कोंडमारा सध्यां होत आहे, तो निराळाच. ब्रिटिश वृत्तपत्रांविषयीं वेल्सनें अशी उघड उघड तक्रार केली आहे कीं, हीं वृत्तपत्रें स्वदेशांतील घडामोडींच्या बाबतींत दाबादाबी आणि लपवाछपवी करीत असल्यामुळें इंग्लंडांतील बातम्या निर्भयतेनें देणाऱ्या अमेरिकन वृत्तपत्रांचा खप इंग्लंडांत दिवसें-दिवस वाढत आहे. लोकशाही आणि मतस्वातंत्र्य यांचा हा अन्योन्यसंबंध लक्षांत घेतला असतां वाङ्मयाच्या विकासाच्या दृष्टीनें लोकशाहीला असलेलें अनन्य महत्त्व आपल्याला कळून येईल. लोकवाणीचा पूर्ण आणि भव्य आविष्कार फक्त लोकशाहींतच संभवतो. तीन वर्षांपूर्वी जर्मनींतील बॉन विद्यापीठाच्या कुलगुरूनें डॉ. थॉमस मॅन यांना त्या विद्यापीठानें दिलेली डॉक्टरची सन्मान्य पदवी रद्द करणारा फतवा जेव्हां त्यांच्याकडे पाठविला, तेव्हां त्या फतव्याला दिलेल्या बाणेदार उत्तरांत डॉ. मॅन यांनीं असे उद्गार काढले होते कीं, "लोकवाणीची गळचेपी करणाऱ्या माणसासारखा मानवतेच्या दृष्टीनें जगांत दुसरा गुन्हेगार नाहीं." पण मानवतेच्या विरुद्ध हा गुन्हा आज जगांत सर्रास केला जात नाहीं काय? आपल्याला अप्रिय असणारे ग्रंथ चवाठ्यावर जाळणारे आततायी नाझी आणि त्यांच्या प्रकाशनाला मनाई करणारे कावेबाज बोल्शेविक हे दोघेहि लोकशाही आणि मानवता यांचे सारखेच शत्रु ठरतात.

## वैयक्तिक टीकेच्या मर्यादा

महाराष्ट्रांत सध्यां वैयक्तिक टीकेच्या मर्यादांबद्दल जो काथ्याकूट चालू आहे, त्याचा निर्णयहि, मला वाटतें, डॉ. मॅन यांच्या मी आतांच उल्लेखिलेल्या उद्गारांच्या अनुरोधानें करतां येईल. व्यक्ति, संस्था किंवा चळवळ ही कितीहि मोठी किंवा उपयुक्त असो, तिच्या मोठेपणानें दबून न जातां किंवा उपयुक्ततेनें मिंधे न होता तिच्यावर टीका कर-ण्याचा, तिची विचिकित्सा आणि विश्लेषण करण्याचा लोकांचा हक्क

कोणत्याहि सत्रीखालीं केव्हांहि नियंत्रित केला जातां कामा नये. व्यक्तीच्या खाजगी वर्तनाचा परिणाम ज्या प्रमाणांत समाजावर होत असेल, त्या प्रमाणांत समाजाला त्या वर्तनाची चर्चा करण्याचा हक्क आहे. व्यक्तीचें खाजगी वर्तन आणि सार्वजनिक भूमिका यांत जर विसंवाद असेल, तर त्याचा परिस्फोट करणें हें लोकांचें कर्तव्य ठरतें; व त्या दृष्टीनें समाजजीवनाच्या अंतःशुद्धीला कारण होणारी वैयक्तिक टीका ही कितीहि निर्घृण असली, तरी अवश्यच म्हणावी लागेल. श्री. भुलाभाई देसाई यांनीं प्रजेच्या चळवळीविरुद्ध कारस्थानें करीत असलेल्या संस्थानिकांना गुप्त कायदेशीर सल्ला दिल्याबद्दल जो गवगवा झाला आणि शेवटीं त्यांना जी दिलगिरी व्यक्त करावी लागली, ती या बाबतींत उदाहरण म्हणून सांगतां येईल. मतस्वातंत्र्याच्या आणि सार्वजनिक जीवनाच्या शुद्धतेच्या दृष्टीनें वैयक्तिक टीकेला फक्त दोनच मर्यादा असूं शकतात; व त्या म्हणजे अनृत आणि अश्लीलता यांच्या. अनृत आणि अश्लील यांचा अवलंब न करतां केलेली वैयक्तिक टीका, मग ती कितीहि जलाल किंवा कडक असो, क्षम्य समजावयाला हरकत नाहीं, सत्ता, संपत्ति आणि कीर्ति यांच्या मदानें चांगलीं सत्प्रवृत्त माणसेंहि धुंद होऊन अत्याचार करितात. त्यांना ताळ्याव आणावयाला कठोर वैयक्तिक टीकेसारखें दुसरें साधन नाहीं. इंग्लंडचे माजी मुख्य प्रधान नेव्हिल चेंबर्लेन यांच्यावर वेल्सनें केलेली अतिशय विदारक टीका जी रास्त मानली गेली, ती याच कारणामुळें. मी स्वतः गेल्या वीस वर्षांत अत्यंत निर्घृण वैयक्तिक टीकेचे आघात सतत सोशीत आलेलों असल्या-मुळें वृत्तव्यवसायाच्या सोयीसाठीं मी ही वैयक्तिक टीकेची तरफदारी करीत आहे, असें कोणी म्हणूं शकणार नाहीं.

## सामुदायिक नेतृत्व निर्माण करा

महाराष्ट्राची आणि मराठी भाषेची परंपरा ही बुद्धि-वादाची आणि लोकशाहीची आहे; व या संक्रमणाच्या काळांत ती

टिकविण्याची जबाबदारी या आधुनिक शहरावर विशेष पडते, असें मला वाटतें. कपटकारस्थानानें राजसत्ता हातीं घेणाऱ्या राघोबादादाला भर दरबारांत देहांत शिक्षा सुनावणारा रामशास्त्री या महाराष्ट्रांत निर्माण झाला; व राघोबाची खुनी, अरेरावी राजवट नाहींशी करणारे बारभाईहि याच महाराष्ट्रभूमींत होऊन गेले. परमेश्वराच्या दारांत कोणत्याहि भेदभावाला थारा नाहीं अशी गर्जना करणारी अभंगवाणी याच महाराष्ट्रांत दुमदुमली; व कोणत्याहि विभूतीच्या आंतल्या आवाजापुढें आम्हीं आपल्या विवेकबुद्धीचा बळी देणार नाहीं असा निर्धारहि याच महाराष्ट्रभूमींत प्रकट झाला. भारतवर्षाच्या इतिहासांत अपूर्व अशी श्रीशिवछत्रपतींची अष्ट प्रधानांची संस्था, भागवतधर्माचा सर्वभेदातीत ध्वज आणि पेशवाईतील बारभाईचें सामुदायिक नेतृत्व (Collective leadership) हीं महाराष्ट्राच्या जुन्या इतिहासांतील लोकशाहीच्या अजाण आविष्काराचीं स्मारकें आहेत; कोणत्याहि जुलमी सत्तेपुढें, तत्त्वापुढें आणि नेत्यापुढें न नमणाऱ्या महाराष्ट्राच्या चिकित्सक बुद्धीला हे मधून मधून झालेले लोकशाहीचे पुसट साक्षात्कार आहेत. महाराष्ट्रांत आज माजलेलें बौद्धिक अराजक पाहिलें, म्हणजे मला पुष्कळदां असें वाटतें कीं, यापुढें नवीन पिढींतील लेखकांनीं आणि कार्यकर्त्यांनीं सामुदायिक नेतृत्व निर्माण करूनच या अराजकांतून मार्ग काढला पाहिजे. महाराष्ट्राचें एकीकरण, हें इतर कोणत्याहि घटनेपेक्षां, अखिल हिंदुस्थानांत लोकशाही स्वराज्य स्थापन होण्यावरच अधिक अवलंबून आहे. त्या महान् ध्येयाच्या सिद्धतेसाठीं निर्भयतेनें झगडणारें सामुदायिक नेतृत्व निर्माण झाल्याशिवाय महाराष्ट्राची उन्नति आणि प्रगति होऊन या महायुद्धांतून जन्माला येणाऱ्या नव्या जागतिक राष्ट्रघटनेंत स्थान घ्यावयाला तो समर्थ होणार नाहीं. त्या सामुदायिक नेतृत्वाची स्फूर्ति महाराष्ट्रांत उत्पन्न करण्याची प्रतिज्ञा जर महाराष्ट्रांतील लेखकवर्गानें केली, तर असल्या संमेलनांचें सार्थक होईल.

# बडोदें

(१ फेब्रुवारी १९४१)

## आदर्श महाराष्ट्रीय नृपति

गायकवाडांच्या या वैभवशाली राजधानींत उभें रहातांच कै. श्री. सयाजीरावमहाराज गायकवाड यांनीं मराठी भाषेवर केलेल्या उपकारांची आठवण न होणें अशक्य आहे. राजाश्रयाला मुकलेल्या मराठी भाषेला, पारतंत्र्याच्या या दुर्धर काळांतहि, आपण अगदींच निराधार नसल्याचा भरंवसा जर कोणामुळें वाटला असेल, तर तो सयाजीरावांच्या दातृत्वामुळेंच होय; व त्यांच्या निधनानें मराठी भाषेचा हा एकमेव आधार तुटला आहे असें जर मी म्हटलें, तर ती खचित अतिशयोक्ति होणार नाहीं. मातृभाषा म्हणून मराठीचें, लोकभाषा म्हणून गुजरातीचें आणि राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचें संवर्धन करण्यांत कै. महाराजसाहेबांनी जी व्यापक राष्ट्रीय दृष्टि दाखविली, ती अखिल भारतवर्षांत अद्वितीय ठरेल. स्वतःची भाषा, आपल्या प्रजेची भाषा आणि ज्या विशाल राष्ट्राचे आपण घटक आहोंत, त्या हिंदी राष्ट्राची भाषा यांना सारख्याच आत्मीयतेनें वागविणारा असा दुसरा संस्थानिक अद्याप

हिंदुस्थानांत झालेला नाहीं; व महाराजांच्या या निःपक्षपाती धोरणापासून प्रजेच्या भाषेची पायमल्ली करणाऱ्या निजामासारख्या देशी संस्थानिकांनाच केवळ नव्हे, तर भारतीय आणि इंग्रजी, हिंदी आणि उर्दू या भाषांच्या बाबतींत पंक्तिप्रपंच करणाऱ्या ब्रिटिश सरकारलाहि पुष्कळच बोध घेतां येण्यासारखा आहे. कै. सयाजीराव महाराजांचें हें मराठी भाषेच्या सेवेचें व्रत त्यांचे पौत्र श्री. प्रतापसिंह महाराज हे निष्ठेनें पुढें चालवितील, अशी मला आशा वाटते.

## मराठीचें महाराष्ट्राबाहेरील जागतें पीठ

बडोदें संस्थान हें एके काळीं सर्व हिंदुस्थानभर पसरलेल्या मराठी साम्राज्याचें वस्तुतः केवळ एक शकल. पण कै. सयाजीराव महाराजांच्या लोकोत्तर कर्तृत्वामुळें महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनांत बडोद्याला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें. सोन्याच्या लगडीचे गुणधर्म त्याच्या लहानशा चिपेंतहि दृष्टीस पडतात आणि सूर्यबिंबाच्या शकलांपासून उत्पन्न झालेले ग्रहहि आपल्या प्रभेनें आकाश उजळतात. त्याप्रमाणें मराठी साम्राज्याच्या या अवशेषांतहि स्वराज्याच्या ऐश्वर्याचे सगळे विशेष, अंशमात्र का होईना, पहावयाला मिळतात; व आज बडोदें हें पुणें, मुंबई आणि नागपूर यांच्याप्रमाणें मराठी भाषेचें महाराष्ट्राबाहेरील एक जागतें पीठ होऊन बसलें आहे. आपल्या निरुपम वाङ्मोहनीनें गुजरातच्या या देवभूमींत महाराष्ट्रदर्शन घडविणारे राजकवि चंद्रशेखर, बंदूक आणि लेखणी या सारख्याच सफाईनें चालविणारे वृद्ध सेनानी नानासाहेब शिंदे, इंद्रधनुष्याची रम्य विविधता आपल्या विद्वत्तेनें दाखविणारे श्री. दाजीसाहेब आपटे, कायदा आणि कादंबरी यांची सांगड घालणारे राजरत्न वासुदेवराव जोशी आणि आपल्या विनोदचातुरीनें मराठी वाचकवर्गाला रिझविणारे प्रो. चिंतामणराव जोशी यांच्यासारख्या लेखकांनीं या गुर्जरभूमीच्या गाभाऱ्यांत

मराठीचा चौघडा ज्या अभिमानानें झडत ठेवला आहे, त्याबद्दल कोणाला धन्यता वाटणार नाहीं? कै. सयाजीराव महाराजांना आपण मराठे असल्याची तीव्र जाणीव होती; व त्या जाणिवेच्या प्रभावामुळेंच खरोखरी महाराष्ट्राच्या चतुःसीमेबाहेरील या गुजराती शहरांत आपल्या भेदकपणानें भाल्याच्या फेंकीला लाजविणारा मराठा बोल आज कानांवर पडत आहे.

## मुनशींची बोधप्रद घोषणा

बडोद्याच्या वाङ्मयकर्तृत्वाचा जो हा गौरव मीं केला, तो केवळ शिष्टाचारासाठीं नव्हे; किंवा आपण मला हें अध्यक्षपद दिलें म्हणून त्या उपकाराची फेड करण्याच्याहि उद्देशानें नव्हे. गुजरातचे राष्ट्रकवि श्री. अर्देसर खबरदार यांचे

**ज्यां ज्यां गुजराती बोली, त्यां त्यां गुजराती म्होलात**
**ज्यां ज्यां वसे एक गुजराती, त्यां त्यां सदाकाळ गुजरात**

हे उद्गार माझ्या मनांत सारखे घोळत आहेत; व म्हणूनच कै. महाराजसाहेबांच्या मराठीविषयींच्या निष्ठेचें स्मरण मला कृतज्ञतेनें करणें अवश्य वाटलें. आपण म्हणाल कीं, ही केवळ एका गुर्जर कवीच्या कल्पनेची भरारी आहे. पण, कवीच्या कल्पनेची भरारी ही जेव्हां मुत्सद्द्याची मार्गदर्शक बनते, तेव्हां त्या भरारीला राजकीय महत्त्व आणि सामर्थ्य प्राप्त होतें, हें विसरून चालणार नाहीं. आपलें हें बडोदें शहर जसें महाराष्ट्राबाहेरचें मराठीचें केंद्र आहे, तसें कराची शहर हें गुजरातबाहेरचें गुजरातीचें केंद्र आहे. तीन वर्षांपूर्वीं सिंधुनदाच्या तीरावरील या गुजरातीच्या केंद्रस्थानीं भरलेल्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून गुजरातचे लाडीले कादंबरीकार श्री. कन्हय्यालाल मुनशी यांनीं खबरदारांच्या या ऊर्जस्वल काव्यवाणीचा अनुवाद करून अशी घोषणा केली कीं, “ जेथें जेथें

म्हणून गुजराती लोक 'गुजरात आहे आणि रहाणार' अशी ठाम भावना बाळगून एकत्र होतात, तेथें तेथें गुजरात हा अस्तित्वांत आहेच. आणि गुजरातचा त्या त्या ठिकाणीं विस्तार होतो कीं, ज्या ज्या ठिकाणीं गुजराती लोक आपल्या इच्छाशक्तीनें आणि संकल्पबळानें त्याला निर्माण करितात." मुनशींच्या या घोषणेचें मर्म मीं आपल्याला सांगितलें पाहिजे, असें नाहीं. मला वाटतें, महाराष्ट्रांतील कोणत्याही आधुनिक कवीच्या कल्पनेनें अशी भरारी मारली नसावी. पण त्यांत नवल कसलें? ज्या राष्ट्राला स्वकीयांच्या उत्कर्षाची चाड नाहीं, त्याच्या कवींची कल्पना असली विशाल आणि आक्रमक भरारी कोठून मारणार?

## शेजाऱ्यांचें धोरण लक्षांत घ्या

मुनशींच्या या उद्गारांची आठवण मीं आपल्याला दिली, ती कोणत्याही प्रकारच्या असूयेनें किंवा स्पर्धेनें नव्हे. ज्यांची सरहद्द आपल्या सरहद्दीला भिडलेली आहे, बडोद्यापासून मुंबईपर्यंत ज्यांचे आणि आपले हितसंबंध गुरफटून गेलेले आहेत, त्या आपल्या अत्यंत धनाढ्य आणि हिंदी राजकारणावर आज प्रभुत्व गाजवीत असलेल्या प्रबळ शेजाऱ्यांच्या महत्त्वाकांक्षी मनाचे व्यापार कशा रीतीनें चालले आहेत हें आपल्या नजरेस आणून द्यावें, एवढाच फक्त माझा उद्देश आहे. मुनशींच्या या घोषणेवर भाष्य करण्याची माझी इच्छा नाहीं. मला फक्त एकच गोष्ट आपल्याला सांगावयाची आहे. ती ही कीं, गुजराती, कानडी किंवा बंगाली लोक ज्या जिव्हाळ्यानें आणि जागरूकतेनें आपल्या भाषेच्या आणि देशाच्या भवितव्याचा विचार करितात, त्याच जिव्हाळ्यानें आणि जागरूकतेनें आपण महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांच्या भवितव्याचा यापुढें विचार केला पाहिजे. राष्ट्रीयतेच्या या युगांत मी जें हें बोलत आहे, तें कदाचित् कोतेपणाचें ठरेल; व आपल्यापैकीं कांहीं आंतरराष्ट्रीय राजकारणाची

समाधि लावून बसलेले महाज्ञानी मी प्रांतीयतेचें प्रदर्शन करीत आहे, असेंहि म्हणतील. पण, महाराष्ट्राचा अभिमान धरण्यांत, त्याच्या ऊर्जिताची चिंता वहाण्यांत राष्ट्रीयत्वाला कांहीं बाध येतो असें मला वाटत नाहीं, त्याला मी काय करूं? विशेषतः बंगाल हा हिंदी राजकारणाचा निसर्गसिद्ध नेता आहे असें म्हणणारे देशबंधु दास, सर्व जगाकडून उत्सुकतेनें झेलला जाणारा आपला प्रत्येक शब्द प्रथम गुजरातींतून लिहिण्याची प्रतिज्ञा करणारे महात्मा गांधी किंवा गुजरातची सरहद्द थेट सिंधुनदाच्या मुखापर्यंत नेऊन भिडविणारे कन्हय्यालाल मुनशी यांच्या राष्ट्रीयतेला जर त्यांच्या या प्रांताभिनिवेशामुळें बट्टा लागत आहे असें कोणी समजत नाहीं, तर महाराष्ट्राच्या भवितव्याविषयीं ईर्ष्येनें बोलण्याची बिचाऱ्या मराठ्यांनाच तेवढी कां चोरी होऊन बसावी? ‘जय जय गरवी गुजरात’ अशी गर्जना करीत मुनशींनीं महागुजरातची घोषणा करण्यांत कांहीं राष्ट्रीयतेला धोका नाहीं आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आम्हीं सुरू केल्यास त्यानें मात्र राष्ट्रीयत्वाची हानि होते, हें तर्कशास्त्र अजब नव्हे काय?

## राष्ट्रीयता आणि प्रांतीयता

पण अशी स्थिति आज झाली आहे खरी. महाराष्ट्राच्या एकीकरणासाठीं प्रयत्न करणें किंवा मराठ्यांच्या इतिहासांतील एखाद्या संस्मरणीय प्रसंगाचा दृष्टांत देणें, हें आज प्रांतीयतेचें आणि कोतेपणाचें लक्षण समजलें जात आहे. जणुं कांहीं भारतवर्षाच्या राष्ट्रीयतेचा अभिमान वहावयाचा म्हणजे आपली मातृभूमि आणि मातृभाषा यांना पार विसरून गेलें पाहिजे! पण भरतखंडाची विराट् राष्ट्रीयता ही काय त्या खंडांतील राष्ट्रकांचें वैशिष्ट्य नष्ट होऊन सिद्ध व्हावयाची आहे? किंवा इंद्रधनुष्यांतील अनेक रंग आणि वृंदवादनांतील अनेक वाद्यें आपलें भिन्नत्व न गमावतां त्यांतून जसें विशाल आणि वैचित्र्यपूर्ण

ऐक्य निर्माण करितात, तशी भारताची राष्ट्रीयता ही त्यांतील सर्व राष्ट्रकांच्या गुणसमुच्चयांतून आविर्भूत व्हावयाची आहे? हिंदुस्थान हें राष्ट्र असलें, तरी तें अमेरिका आणि रशिया यांच्याप्रमाणें अनेक धर्म, जाति आणि संस्कृति यांच्या समवायानें बनलेलें बहुजिनसी राष्ट्र आहे; इंग्लंड, फ्रान्स किंवा जर्मनी यांच्यासारखें एकसंध राष्ट्र नाहीं. इतिहासाचार्य राजवाडे हे हिंदुस्थानाला राष्ट्र न म्हणतां खंड म्हणत असत, तें याच कारणामुळें. पण, रशिया आणि अमेरिका या दोन खंडसदृश अफाट देशांत अनेक वंश आणि संस्कृति नांदत असतांहि तेथें एकराष्ट्रीयत्वाची भावना आज आपला प्रभाव गाजवीत आहेच कीं नाहीं? मग त्यांच्यापेक्षां कांहीं बाबतींत अधिक बहुजिनसी असलेल्या भरतखंडांत एकराष्ट्रीयत्व उत्पन्न होणें अशक्य कां वाटावें? उलट दैवयोग कदाचित् असा असावा कीं, अनेक धर्म, जाति आणि संस्कृति यांनीं गजबजलेल्या या प्रचंड देशांत राष्ट्रीय एकता आणि संस्कृति निर्माण होऊन राष्ट्राभिमान, धर्माभिमान आणि वंशाभिमान यांनीं ग्रासलेल्या आजच्या स्पर्धिष्णु जगांत लोकशाही स्थापन करण्याच्या कामीं त्यानें पुढाकार घ्यावा. पण हिंदुस्थानाचें एकराष्ट्रीयत्व मान्य करणें म्हणजे कांहीं त्या खंडसदृश देशांतील राष्ट्रकांनीं आपल्या वैशिष्ट्याचा बळी देणें नव्हे; व आंध्र, गुजरात, कर्नाटक किंवा बंगाल हीं भारतवर्षांतील राष्ट्रें जर आपापल्या सांस्कृतिक आणि राजकीय विकासासाठीं दक्षतेनें झटत आहेत, तर एकट्या महाराष्ट्रानें तेवढें, एकराष्ट्रीयत्वाच्या चुकीच्या कल्पनेनें, स्वतःसंबंधीं उदासीन रहाणें आत्मघातकीपणाचें ठरेल. भावी फेडरल राज्यघटनेंत जिथें प्रत्येक प्रांत हा अमेरिकेंतील संस्थानांप्रमाणें स्वतंत्र आणि स्वायत्त घटक म्हणून नांदणार, तिथें प्रांतीयतेचा बाऊ करण्यांत काय अर्थ? पंधरा वर्षांपूर्वी गुजरात साहित्यसंसदेच्या अध्यक्षपदावरून बोलतांना, 'जसजसा प्रांतिक अभिमान वाढेल, तसतशी आर्यावर्ताच्या एकराष्ट्रीय-

त्याचीहि वृद्धि होईल,' असे जे उद्गार मुनशींनीं काढले होते, त्यांचें मी या वावदूकांना स्मरण देतों.

## लोकशाहीच्या दृष्टीनें विचार करा

ज्या लोकशाहीच्या तत्त्वासाठीं आज जगांत रणकंदन माजलें आहे, त्या तत्त्वाच्याहि दृष्टीनें जरी पाहिलें, तरी प्रांतीयतेची सबब पुढें करून महाराष्ट्राच्या आत्मविकासाच्या आणि आत्मपूर्ततेच्या आकांक्षांना विरोध करणें न्याय्य होणार नाहीं. गेल्या महायुद्धांत काय किंवा सध्यां चालू असलेल्या महायुद्धांत काय छोटया दुर्बळ राष्ट्रांच्या स्वातंत्र्यरक्षणाचा प्रश्न इरेला पडला आहे; व प्रबळांना दुर्बळांचा चुराडा करतां येणार नाहीं, अशी कायमची आंतरराष्ट्रीय व्यवस्था करण्याची भाषा आज स्वतःला लोकशाहीचे अभिमानी म्हणविणारे मुत्सद्दी बोलत आहेत. लोकशाहीचें मूलभूत तत्त्वच मुळीं हें आहे कीं, कोणत्याहि व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या योग्य विकासाला भरपूर वाव मिळेल अशी समाजाची किंवा आंतरराष्ट्रीय व्यवहाराची घटना असावी. चालू युद्धांत सोव्हिएट रशियाची जी प्रशंसा केली जाते, ती या कारणामुळें कीं, त्यानें जो मुलूख काबीज केला, त्या मुलखांतील राष्ट्रकांना लगेच स्वायत्ततेचे पूर्णाधिकार देऊन तेथें समाजसत्ताक राज्यें स्थापन केलीं. लोकशाहीच्या पुरस्काराची ही सगळी भाषा आणि हे प्रयत्न जर प्रामाणिकपणाचे असतील, तर महाराष्ट्राचें एकीकरण आणि महाराष्ट्र विद्यापीठाची योजना यांना जो प्रच्छन्न विरोध केला जात आहे, तो काय म्हणून? बिहार, सिंध, सीमाप्रांत आणि ओरिसा हीं राष्ट्रकें राष्ट्रसभेच्या सहाय्यानें संघटित आणि स्वायत्त झालीं; व आंध्र आणि कर्नाटक यांच्या एकीकरणाच्या चळवळीलाहि तिचा पाठिंबा लाभला आहे. मग एकटया महाराष्ट्राच्या आत्मपूर्ततेसाठीं चाललेल्या धडपडीलाच तेवढीं कां नाकें मुरडण्यांत यावींत? या बाबतींत प्रांतीयतेचें

किंवा स्पर्धेचें भय जर कोणाला वाटत असेल, तर तें निराधार आहे, असें मी म्हणतों. महाराष्ट्राची प्रवृत्ति आणि पूर्वपरंपराच मुळीं प्रांतिक किंवा धार्मिक भेदभाव हे राष्ट्रैक्याच्या आड येऊं देण्याला प्रतिकूल आहे. मुसलमानांच्या जुलमी सत्तेचा नायनाट करण्याचें कंकण ज्यांनीं हातीं बांधलें होतें, त्या शिवछत्रपतींना आपल्या सैन्यांत मुसलमानांची भरती करावयाला हरकत वाटली नाहीं; व आपल्या हिंदु प्रजेच्या देवस्थानां-प्रमाणें मुस्लिम प्रजेच्या दर्ग्यांनाहि त्यांनीं इनामें दिलीं. त्या थोर परंपरेंत वाढलेल्या आपल्या सयाजीराव महाराजांनीं गुजराती ही स्वतःच्या प्रजेची भाषा आहे हें लक्षांत घेऊन तिला दिलेला राजाश्रय आणि त्यांचें एकंदर प्रजाभिमुख धोरण सर्वश्रुतच आहे. ज्या महाराष्ट्रानें सयाजीरावांसारखा आपल्या भिन्नभाषी प्रजेला समदृष्टीनें वागविणारा आदर्श नृपति निर्माण केला, ज्या महाराष्ट्रानें हिंदीला श्री. बाबुराव पराडकर आणि गुजरातीला श्री. काकासाहेब कालेलकर यांच्यासारखे प्रतिभाशाली लेखक दिले, तो महाराष्ट्र प्रांतिक दुरभिमानानें आपल्या एकीकरणासाठीं झटत आहे अशी शंका कां घेण्यांत यावी? महाराष्ट्र हा स्वभावतःच स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचा पुरस्कर्ता आहे; व अखिल भरतखंडाच्या उन्नतीच्या विशाल आकांक्षेनें प्रेरित होऊनच गेलीं चार शतकें त्याचें धर्मकारण आणि राजकारण चालत आलें आहे.

## भारतीय साहित्यसंयोजन समिति

अर्थात् प्रांतीयता आणि राष्ट्रीयता यांत खरोखरी विरोध नाहीं; व म्हणून आपआपल्या विशिष्ट प्रांताच्या कल्याणासाठीं झटण्यांत कोणत्याहि प्रकारची राष्ट्रीय हानिहि नाहीं. मात्र स्पर्धा आणि असूया यांना या प्रांतिक विकासाच्या चळवळींत यत्किंचितहि थारा देतां कामा नये. किंबहुना, मी तर असेंहि म्हणेन कीं, मुंबई, नागपूर, बडोदें यांच्यासारखीं जीं शहरें दुभाषी किंवा त्रिभाषी आहेत, तेथें एकराष्ट्रीय-

त्याचा परिपोष होईल अशा रीतीनें त्या त्या भाषांच्या नेत्यांनीं आणि संस्थांनीं सहकार्याचा उपक्रम केला पाहिजे. आपल्या या बडोदें शहरांत महाराष्ट्र आणि गुजरात यांचें साहित्य आणि संस्कृति हीं दैवयोगानें एकत्र आलीं आहेत. दोन नद्यांचा जिथें संगम होतो, तें स्थान आपण पवित्र मानतों; व कांहीं विशेष प्रकारची साधना किंवा तपस्या करावयाची झाल्यास ती अशा ठिकाणीं जाऊन करण्यांत येते. त्याप्रमाणें भरतखंडाच्या विशाल राष्ट्रैक्यासाठीं जी सांस्कृतिक सहकारितेची साधना करणें अवश्य आहे, ती करावयाला दोन भाषा किंवा संस्कृति यांचा जिथें मिलाफ झाला आहे, त्या शहरासारखें अधिक योग्य स्थान दुसरें कोणतें मिळूं शकेल? म्हणून केवळ महाराष्ट्रांतच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानांत ज्या ज्या शहरीं दोन किंवा तीन भाषा आणि संस्कृति या एकत्र आलेल्या आहेत, त्या त्या शहरांतून साहित्यिक आणि साहित्यसंस्था यांनीं बौद्धिक सहकार्य करणें अवश्य असून, संयुक्त साहित्यसंमेलनेंहि मधून मधून भरविलीं पाहिजेत. भारतांतील सर्व नद्या आणि तीर्थें यांच्या पुण्योदकानें अभिषिंचन झाल्याशिवाय भरतखंडांतील चक्रवर्ती सम्राटाच्या राज्याभिषेकाची सांगता होत नसे, हा प्राचीन संस्कार आपल्याला माहितच असेल. हा संस्कार, मला वाटतें, आपल्या राष्ट्रीय आणि सांस्कृतिक एकतेचा द्योतक होता; व लोकशाहीच्या या नव्या मनूंत अखिल भरतखंडाची जी विराट् संस्कृति आणि राष्ट्रीय एकता आपण निर्माण करूं इच्छितों, तिच्या सांगतेसाठींहि भारतांतील सर्व भाषा आणि संस्कृति यांचें सहकार्य आणि संमीलन होणें अवश्य आहे. सरकार आणि विद्यापीठें यांच्याकडून होत असलेल्या पद्धतशीर उपेक्षेची केवळ राजकीय भूमिकाच या आंतरभाषीय सहकार्याला लाभेल, असें नाहीं; तर सर्व हिंदुस्थानांतील भाषांना सामान्य असे कांहीं राष्ट्रव्यापी साहित्यविषयक प्रश्नहि आपल्यापुढें आहेत. शास्त्रीय परिभाषेची निर्मिति, राष्ट्रीय इतिहासाचें संशोधन

किंवा स्पर्धेचें भय जर कोणाला वाटत असेल, तर तें निराधार आहे, असें मी म्हणतों. महाराष्ट्राची प्रवृत्ति आणि पूर्वपरंपराच मुळीं प्रांतिक किंवा धार्मिक भेदभाव हे राष्ट्रैक्याच्या आड येऊं देण्याला प्रतिकूल आहे. मुसलमानांच्या जुलमी सत्तेचा नायनाट करण्याचें कंकण ज्यांनीं हातीं बांधलें होतें, त्या शिवछत्रपतींना आपल्या सैन्यांत मुसलमानांची भरती करावयाला हरकत वाटली नाहीं; व आपल्या हिंदु प्रजेच्या देवस्थानां-प्रमाणें मुस्लिम प्रजेच्या दर्ग्यांनाहि त्यांनीं इनामें दिलीं. त्या थोर परंपरेंत वाढलेल्या आपल्या सयाजीराव महाराजांनीं गुजराती ही स्वतःच्या प्रजेची भाषा आहे हें लक्षांत घेऊन तिला दिलेला राजाश्रय आणि त्यांचें एकंदर प्रजाभिमुख धोरण सर्वश्रुतच आहे. ज्या महाराष्ट्रानें सयाजीरावांसारखा आपल्या भिन्नभाषी प्रजेला समदृष्टीनें वागविणारा आदर्श नृपति निर्माण केला, ज्या महाराष्ट्रानें हिंदीला श्री. बाबुराव पराडकर आणि गुजरातीला श्री. काकासाहेब कालेलकर यांच्यासारखे प्रतिभाशाली लेखक दिले, तो महाराष्ट्र प्रांतिक दुरभिमानानें आपल्या एकीकरणासाठीं झटत आहे अशी शंका कां घेण्यांत यावी? महाराष्ट्र हा स्वभावतःच स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचा पुरस्कर्ता आहे; व अखिल भरतखंडाच्या उन्नतीच्या विशाल आकांक्षेनें प्रेरित होऊनच गेलीं चार शतकें त्याचें धर्मकारण आणि राजकारण चालत आलें आहे.

## भारतीय साहित्यसंयोजन समिति

अर्थात् प्रांतीयता आणि राष्ट्रीयता यांत खरोखरी विरोध नाहीं; व म्हणून आपआपल्या विशिष्ट प्रांताच्या कल्याणासाठीं झटण्यांत कोणत्याहि प्रकारची राष्ट्रीय हानिहि नाहीं. मात्र स्पर्धा आणि असूया यांना या प्रांतिक विकासाच्या चळवळींत यत्किंचितहि थारा देतां कामा नये. किंबहुना, मी तर असेंहि म्हणेन कीं, मुंबई, नागपूर, बडोदें यांच्यासारखीं जीं शहरें दुभाषी किंवा त्रिभाषी आहेत, तेथें एकराष्ट्रीय-

त्वाचा परिपोष होईल अशा रीतीनें त्या त्या भाषांच्या नेत्यांनीं आणि संस्थांनीं सहकार्याचा उपक्रम केला पाहिजे. आपल्या या बडोदें शहरांत महाराष्ट्र आणि गुजरात यांचें साहित्य आणि संस्कृति हीं दैवयोगानें एकत्र आलीं आहेत. दोन नद्यांचा जिथें संगम होतो, तें स्थान आपण पवित्र मानतों; व कांहीं विशेष प्रकारची साधना किंवा तपस्या करावयाची झाल्यास ती अशा ठिकाणीं जाऊन करण्यांत येते. त्याप्रमाणें भरतखंडाच्या विशाल राष्ट्रैक्यासाठीं जी सांस्कृतिक सहकारितेची साधना करणें अवश्य आहे, ती करावयाला दोन भाषा किंवा संस्कृति यांचा जिथें मिलाफ झाला आहे, त्या शहरासारखें अधिक योग्य स्थान दुसरें कोणतें मिळूं शकेल? म्हणून केवळ महाराष्ट्रांतच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानांत ज्या ज्या शहरीं दोन किंवा तीन भाषा आणि संस्कृति या एकत्र आलेल्या आहेत, त्या त्या शहरांतून साहित्यिक आणि साहित्यसंस्था यांनीं बौद्धिक सहकार्य करणें अवश्य असून, संयुक्त साहित्यसंमेलनेंहि मधून मधून भरविलीं पाहिजेत. भारतांतील सर्व नद्या आणि तीर्थें यांच्या पुण्योदकानें अभिषिंचन झाल्याशिवाय भरतखंडांतील चक्रवर्ती सम्राटाच्या राज्याभिषेकाची सांगता होत नसे, हा प्राचीन संस्कार आपल्याला माहितच असेल. हा संस्कार, मला वाटतें, आपल्या राष्ट्रीय आणि सांस्कृतिक एकतेचा द्योतक होता; व लोकशाहीच्या या नव्या मनूंत अखिल भरतखंडाची जी विराट् संस्कृति आणि राष्ट्रीय एकता आपण निर्माण करूं इच्छितों, तिच्या सांगतेसाठींहि भारतांतील सर्व भाषा आणि संस्कृति यांचें सहकार्य आणि संमीलन होणें अवश्य आहे. सरकार आणि विद्यापीठें यांच्याकडून होत असलेल्या पद्धतशीर उपेक्षेची केवळ राजकीय भूमिकाच या आंतरभाषीय सहकार्याला लाभेल, असें नाहीं; तर सर्व हिंदुस्थानांतील भाषांना सामान्य असे कांहीं राष्ट्रव्यापी साहित्यविषयक प्रश्नहि आपल्यापुढें आहेत. शास्त्रीय परिभाषेची निर्मिति, राष्ट्रीय इतिहासाचें संशोधन

आणि लेखन, निरनिराळ्या प्रकारचे कोश आणि क्रमिक पुस्तकें यांची रचना, निरनिराळ्या भाषांतील जुन्या नव्या उत्कृष्ट ग्रंथांचे अनुवाद, शास्त्रीय आणि तात्त्विक विषयांवरील परिचायक ग्रंथमालांचें संपादन वगैरे कांहीं प्रश्न असे आहेत कीं, ते जर सगळ्या प्रांतिक भाषांच्या तज्ज्ञांची भारतीय साहित्यसंयोजन समिति स्थापन करून तिच्याकडे सोंपविण्यांत आले, तर वेळ, श्रम आणि पैसा यांची बचत होईल आणि सर्व हिंदुस्थानभर एक लिपि, एक ज्ञानकोश, एक शास्त्रीय परिभाषा, एक राष्ट्रीय इतिहास आणि सामान्यत: एकाच प्रकारचीं क्रमिक पुस्तकें प्रचलित होऊन राष्ट्रीय संस्कृतीच्या सिद्धतेचें कार्य पुष्कळच सुकर होईल; व त्याबरोबरच जुन्या नव्या उत्तम ग्रंथांचे अनुवाद प्रांतिक भाषांतून सतत होत गेल्यास भारताचें वैचारिक सात्म्यहि वाढीला लागेल. संस्कृतोद्भव आणि संस्कृतनिष्ठ अशा ज्या भाषा आहेत, त्यांच्यापुरता तरी असा संघटित प्रयत्न करावयाला हरकत नाहीं. निरनिराळ्या प्रांतांतील साहित्यपरिषदा किंवा राष्ट्रसभा यांनीं या कामीं पुढाकार घेऊन भारतीय साहित्यसंयोजन समिति स्थापन करावी, अशी माझी त्यांना सूचना आहे.

## गुजरातची ‘अस्मिता’ समजावून द्या

मराठी आणि गुजराती यांचें सहकार्य तर अत्यंत सुलभतेनें होऊं शकेल. या दोन भाषा केवळ संस्कृतोद्भवच नाहींत; तर जुळ्या बहिणीं-सारखें विलक्षण सादृश्य त्यांच्या रूपांत आहे. आणि, तें सादृश्य पाहून कांहीं राजकीय ध्येयवाद्यांना तर असाहि मोह पडतो कीं, महाराष्ट्र आणि गुजरात यांचें एकीकरण करून पश्चिम भारतांत एक बलाढ्य संयुक्त राष्ट्र निर्माण करावें व कराचीपासून कारवारपर्यंत पसरलेल्या अफाट सिंधुसागरावर सत्ता गाजवून त्यानें हिंदुस्थानाचा पश्चिम किनारा निर्भय करावा! खुद्द श्री. मुनशी यांनाहि ही कल्पना ग्राह्य

वाटत असावी, असें दिसतें. कारण, महाराष्ट्र आणि गुजरात यांची फारकत झाल्यास चिमुकल्या गुजरातची दारुण हानि होईल, अशी भीति त्यांनीं व्यक्त केली आहे. पण या विवाद्य प्रश्नांत आज तरी आपल्याला शिरण्याचें कारण नाहीं. मराठी आणि गुजराती या दोन्ही भाषा जर, कांहीं संशोधक समजतात त्याप्रमाणें, एका महाराष्ट्रीच्या अपभ्रंशापासून उद्भूत झालेल्या असतील, तर त्यांच्या घटनेंत अतिशय साम्य असावें, यांत नवल नाहीं; व सरहद्दीवर जिथें जिथें या दोन भाषा एकत्र आल्या आहेत, तिथें तिथें त्यांनीं आपल्या मीलनानें अहिराणी-सारखी दोन्ही भाषांशी सदृश असलेली भेसळ बोली उत्पन्न केली आहे. या सादृश्याचा फायदा घेऊन मराठी आणि गुजराती वाङ्मयांत जास्तींत जास्त सहकार्य घडवून आणण्याचा प्रयत्न आपण कां करूं नये? अशा प्रकारच्या सहकार्याला पहिली अडचण जर कोणती असेल, तर ती लिपीची. सुशिक्षित मराठी वाचक गुजराती लिपी थोड्याशा परिश्रमानें वाचूं शकतो, हें खरें. पण गुजराती वाङ्मय हें जर देवनागरींतून मुद्रित होऊं लागलें, तर मराठी आणि गुजराती यांच्या सहकारितेच्या आड येणारी एक मोठी नड दूर होईल. कराची येथें भरलेल्या गुजरात साहित्यसंमेलनांत गुजराती लिपीच्या नागरीकरणाचा ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला. तो ठराव जर गुजराती साहित्यिक आणि प्रकाशक निष्ठेनें अंमलांत आणतील, तर गुजराती वाङ्मय वाचण्याची प्रवृत्ति महाराष्ट्रांत निस्संशय वाढीला लागेल. मला स्वतःला ही गोष्ट शक्य तितक्या लवकर घडून यावी, असें वाटतें. मराठीच्या मानानें गुजराती वाङ्मय पूर्वी जरी कदाचित् मागासलेलें असलें, तरी म. गांधी यांच्या नेतृत्वाखालीं गुजरातनें राजकारणांत प्रवेश केल्यापासून, गुजराती साहित्याचें स्वरूप आमूलाग्र बदलून गेलें आहे. देशी आणि विदेशी अंमला-खालीं विभागल्या गेलेल्या अभागी गुजरातच्या असें कधीं स्वप्नांतहि आलें नसेल कीं, अखिल हिंदी राजकारणाच्या रणक्षेत्रांत आपण एकसंध

होऊन धडाडीनें उभे ठाकूं आणि आपल्या लोकविलक्षण ध्येयवादानें साऱ्या मानवजातीच्या कुतूहलाचा विषय होऊन बसूं! पण, श्री. मुनशी यांनीं योगसूत्रांतून हुडकून काढलेल्या अत्यंत मार्मिक शब्दांत सांगावयाचें म्हणजे गुजरातची विच्छिन्न 'अस्मिता' ( Individuality ) महात्माजींनीं जागृत आणि संघटित केली; व महागुजरातच्या संयोजनाचें स्फूर्तिदायक ध्येय त्याच्यापुढें ठेवलें. गांधीजींच्या लोकातिग विभूतींतून, नानालाल आणि खबरदार यांच्या ओजस्वी काव्यवाणींतून, कन्हय्यालाल मुनशी आणि रमणलाल देसाई यांच्या ध्येयदर्शी कादंबऱ्यांतून गुजरातच्या या युयुत्सु, प्रभावशाली अस्मितेच्या ज्या आकांक्षा प्रकट झाल्या आहेत, त्या आपण समजावून घेतल्या पाहिजेत. १९१४ सालपर्यंत हिंदी राजकारणांत गुजरातचा मागमूसहि नव्हता. त्यानंतर अवघ्या सहा वर्षांच्या आंत गुजरातनें, त्रिविक्रम वामनाप्रमाणें, भरतखंडाच्या विशाल राष्ट्रीय जीवनाच्या सगळ्या कक्षा व्यापून विश्वजीवनाच्या पुनर्घटनेला हात घातला. गुजरातच्या अस्मितेनें एकाएकीं धारण केलेलें हें विराट् स्वरूप आणि त्याचें गुजराती वाङ्मयांत पडलेलें प्रतिबिंब आपण न्याहाळून पाहिलें पाहिजे.

## महाराष्ट्राची अस्मिता आणि मराठी कादंबरीकार

गुजरातच्या अस्मितेचा हा जो विलक्षण विकास गेल्या पंचवीस वर्षांत झाला, त्याला एकट्या गांधीजींचें कर्तृत्व कारण झालेलें नाहीं. गुजरातेंतील कवि आणि कादंबरीकार यांनींहि त्या विकासाला तितकाच महत्त्वाचा हातभार लावला आहे. हें मी केवळ पारंपरिक पद्धतीनें बोलत नाहीं किंवा गुजरातमधील प्रमुख लेखक गांधीवादाचे पुरस्कर्ते आहेत असेंहि मला म्हणावयाचें नाहीं. किंबहुना, गांधीजींच्या हिंदी राजकारणांतील प्रवेशाबरोबरच ज्यांच्या कादंबरीलेखनाला प्रारंभ झाला, त्या मुनशींच्या वैभवशाली साहित्यावर गांधीवादाची छाया पडलेली

आपल्याला दिसणार नाहीं. या आधुनिक भार्गवानें गांधीजी आणि त्यांचा अहिंसाधर्म यांच्यापासून लेखनस्फूर्ति घेतलेली नाहीं; तर वैऱ्यांच्या रक्तानें पृथ्वीला अभिषेक करणारा उग्रकर्मा परशुराम, स्वतःच्या अपमानाचा सूड घेण्यासाठीं नंदांचें निर्मूलन करणारा भगवान् कौटिल्य आणि गुजरातच्या क्षात्रतेजानें सर्व भारताला दिपविणारा चालुक्य सम्राट् सिद्धराज जयसिंह यांच्या चारित्र्यचिंतनानें त्यांची प्रतिभा उद्दीपित झाली आहे. 'लोकवंद्य ने सर्वपूज्य' अशा शब्दांनीं महात्माजींचें एका काळीं ज्यांनीं मुक्तकंठानें जयगान केलें, ते नानालालहि आज गांधीवादाचे कट्टर विरोधी म्हणून खडे आहेत; व 'गुजरातनो तपस्वी' या त्यांच्या गांधीजींवरील गौरवकाव्याचें विडंबन 'प्रभातनो तपस्वी' या नांवाचें कुक्कुटकाव्य लिहून करावयाला राष्ट्रकवि खबरदार हे कचरले नाहींत. गुजराती साहित्यकांची ही स्वतंत्र प्रज्ञा आणि राष्ट्रघटनेच्या कार्यांतलें हें त्यांचें विशिष्ट स्थान मराठी लेखकांनीं लक्षांत घेण्यासारखें आहे. विशेषत: राष्ट्रसभेच्या अत्युच्च व्यासपीठावरून सत्य आणि अहिंसा यांचा आदेश महात्माजी जगाला देत असतां मुनशींनीं ज्या इर्ष्येनें सिद्धराज जयसिंहावरील उत्कृष्ट ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून गुजरातच्या राष्ट्रीय अस्मितेचा आणि अभिमानाचा परिपोष केला, ती मराठी कादंबरीकारांना बोधप्रद ठरेल. कारण कै. हरिभाऊ आपटे यांच्यानंतर मराठी कादंबरी आणि महाराष्ट्राची अस्मिता यांची सामान्यतः फारकत झाली आहे, असें म्हटल्यास तें फारसें गैर होणार नाहीं. हें विधान करतांना कै. डॉ. श्री. व्यं. केतकर, प्रो. वा. म. जोशी, श्री. भा. वि. वरेरकर, श्री. ना. ह. आपटे आणि श्री. साने गुरुजी यांचें कथावाङ्मय माझ्या डोळयांपुढें आहे. तरीसुद्धां मला असें म्हणावयाला शंका वाटत नाहीं कीं, हरिभाऊंच्या कादंबऱ्यांनीं ज्या पद्धतीनें आणि ज्या प्रमाणांत महाराष्ट्राच्या जागृतीला आणि उन्नतीला मदत केली, त्या प्रकारचें महत्कार्य गेल्या वीस वर्षांत एकाही

मराठी कादंबरीकाराच्या हातून घडलेलें नाही. हरिभाऊ हे सदाशिवपेठी कादंबरीकार असतील; व त्यांचा राजकीय दृष्टिकोनहि नेमस्त असेल. पण, पांढरपेशा वर्गापुरतेंच का होईना, जें यथादर्शनाचें आणि त्याबरोबरच ध्येयदर्शनाचेंहि कार्य त्यांनीं केलें, तें त्यांच्या नंतरच्या कादंबरीकारांपैकीं किती जणांनीं केल्याचें दाखवितां येईल? महाराष्ट्रांतील नुसता पांढरपेशा समाजच जरी घेतला, तरी त्याची अस्मिता आणि त्याच्या आकांक्षा यांचा जो यथार्थ आणि उत्कृष्ट आविष्कार हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून दृष्टीस पडतो, त्याच्याशीं सदृश अशी चित्रणचातुरी किंवा ध्येयदर्शित्व त्यांच्या नंतरच्या कादंबऱ्यांत आपल्याला आढळतें काय! कॉंग्रेसच्या चळवळीचे प्रचारक श्री. वरेरकर आणि गांधीवादाचे प्रतिपादक श्री. सानेगुरुजी यांच्या कथावाङ्मयांत जिव्हाळा आणि राष्ट्रहितबुद्धि आहे, हें खरें. पण वरेरकरांच्या कादंबऱ्यांतील कित्येकदां उथळ वाटणारा प्रचार आणि एकांगिता व सानेगुरुजींच्या कादंबऱ्यांतील जुनाट मतांची तरफदारी आणि भावनातिरेक हे दोष मनाचा फार विरस करितात. हरिभाऊ पांढरपेशे असले, तरी प्रत्येक बाबतींत त्यांचीं मतें प्रगमनशील होतीं; व त्यांच्या मानवतेचें स्वरूप अत्यंत विशुद्ध आणि विशाल होतें. त्यामुळें त्यांच्या ललित वाङ्मयांत महाराष्ट्राची अस्मिता प्रकट झाल्याचा, त्याची संस्कृति आणि संसार यांचें प्रतिबिंब पडल्याचा स्फूर्तिदायक प्रत्यय आपल्याला येतो. हा प्रत्यय त्यांच्या नंतरचें ललित वाङ्मय वाचतांना येत नाहीं, हें निस्संशय.

## अल्पात्म आणि अप्रातिनिधिक

असें का व्हावें! हरिभाऊंपेक्षां अधिक बहुश्रुत, अधिक तत्त्वजिज्ञासु, अधिक प्रचारनिष्ठ, अधिक कनवाळु, अधिक कलाचतुर आणि अधिक कल्पक असे कादंबरीकार गेल्या वीस वर्षांत पुढें आले असतां त्यांचें कथावाङ्मय हरिभाऊंच्या कथासृष्टीच्या मानानें अल्पात्म आणि

अप्रातिनिधिक कां वाटावें ? महाराष्ट्राच्या अस्मितेशीं आणि आकांक्षांशीं त्यांच्या वाङ्मयाचा कांहीं लागाबांधा नाहीं, अशीं भावना कां व्हावी ? हरिभाऊंच्या ऐतिहासिक आणि सामाजिक कादंबऱ्या हें एक स्वतंत्र मराठी जग आहे; व त्या कादंबऱ्या वाचतांना आपल्याला महाराष्ट्राच्या गेल्या तीन शतकांतील मनोव्यापारांचें, शिवयुगापासून टिळकयुगापर्यंतच्या मानसिक आंदोलनांचें यथादर्शन खचित होतें. या आपल्या कादंबऱ्यांतून त्यांनीं गुंफलेला महाराष्ट्राच्या राष्ट्रीय जीवनाचा धागा 'चंद्रगुप्त', 'वज्राघात', 'कालकूट', 'रूपनगरची राजकन्या' आणि 'म्हैसूरचा वाघ' या पांच कादंबऱ्यांच्या रूपानें भरतखंडाच्या राष्ट्रीय जीवनाला नेऊन जोडला; व महाराष्ट्राची अस्मिता ही अखिल भारताच्या विराट् अस्मितेची एक कला आहे ही जाणीव जागृत ठेवली. अशा प्रकारचें लोकोत्तर कार्य नंतरच्या कोणत्याहि कादंबरीकाराच्या हातून घडलेलें नाहीं. पण, नुसता महाराष्ट्र जरी घेतला, तरी त्याचेंहि भूतकालीन कर्तृत्व, सद्यःकालीन चळवळी आणि भविष्यत्कालीन आकांक्षा यांचें चित्रण सहृदयतेनें आणि सुंदरतेनें करणारा हरिभाऊं-सारखा दुसरा कादंबरीकार नंतर कां निर्माण होऊं नये ? गेलीं सहा सात वर्षें मराठी कादंबऱ्यांना झपाट्यानें राजकीय स्वरूप प्राप्त होत आहे. याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, पूर्वींच्या कादंबऱ्यांत राजकारणाचा मागमूसहि नव्हता. खुद्द हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतूनहि प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें राजकारण आलेलें आहे; व जोशी, केतकर, नाथमाधव, वरेरकर प्रभृति कादंबरीकारांनींहि राजकीय चळवळींचें चित्रण मधून मधून आपल्या कादंबऱ्यांतून केलेलें आढळतें. पण, विशिष्ट राजकीय कालखंडाच्या किंवा विचारप्रणालीच्या निदर्शक अशा कादंबऱ्या गेल्या सहासात वर्षांतच फार प्रसिद्ध झाल्या, यांत शंका नाहीं. परंतु, या राजकीय कादंबऱ्या वाचतांनाहि महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाचें यथादर्शन किंवा ध्येयदर्शन आपल्याला होत आहे, असें मनाला वाटत

नाहीं. उत्तररामचरितांत वनवासाचा चित्रपट सीता पहात असतां रामचंद्राला पुन: पुन्हा तिला असें सांगावें लागतें कीं, ‘अयि वियोगत्रस्ते चित्रमेतत्!’ तशा प्रकारची आपल्या मनाची तन्मयता आजकालच्या किती राजकीय कादंबऱ्या वाचतांना होते? ‘मी’, ‘यशवंतराव खरे’ किंवा ‘कर्मयोग’ या हरिभाऊंच्या कादंबऱ्या वाचतांना ज्या पुन:प्रत्ययाची अनुभूति आणि ध्येयदर्शनाचा आनंद आपल्याला होतो, तो देण्याचें सामर्थ्य यांपैकीं किती कादंबऱ्यांत आहे? हरिभाऊंच्या नंतर गेल्या वीस वर्षांत जे कादंबरीकार उदयाला आले, ते सारे कोणत्या ना कोणत्या तरी गुणांत त्यांच्यापेक्षां निःस्संशय सरस ठरतील; व त्यांपैकीं कांहींना तर कल्पकतेबद्दल, कथनकौशल्याबद्दल किंवा लेखनलालित्याबद्दल स्वतः हरिभाऊंनींहि अजिंक्यपत्र दिलें असतें. तरीसुद्धां हे कादंबरीकार हरिभाऊंच्या मानानें थिटे आणि खुजे कां वाटतात?

## जसें जीवन तसें वाङ्मय

याचें कारण मला जें दिसतें, तें मी प्रांजलपणानें सांगतों. तें हें कीं, हे सारे कादंबरीकार—माझा स्वतःचा अंतर्भावहि मी त्यांच्याच मालिकेंत करतों—ओतारी, चितारी, प्रचारक किंवा टीकाकार आहेत. उलट हरिभाऊ हे निर्माते आणि द्रष्टे होते. त्यांनीं आपल्या भोंवतालचें जग नुसतें पाहिलें, अनुभवलें किंवा रेखाटलेंच नाहीं; तर त्या अनुभवांतून आणि अवलोकनांतून आपल्या ध्येयदर्शी प्रतिभेच्या सामर्थ्यानें नवें जग निर्माण केलें. त्यांच्या कथावाङ्मयांत नुसतें निरीक्षणच नाहीं तर निर्माणक्षमताहि आहे; नुसतें विश्लेषणच नाहीं, तर विचारप्रणालीहि आहे; व नुसता पुन:प्रत्ययच नाहीं, तर ध्येयदर्शनहि आहे. उलट आज ज्या कादंबऱ्या झपाट्यानें बाहेर पडत आहेत, त्यांत एकतर्फी प्रचार तरी असतो किंवा टीका तरी असते. अलिकडील कोणतीहि राजकीय कादंबरी घ्या. त्यांत गांधीवादावर कोरडे तरी ओढलेले दिसतील किंवा

त्याचे गोडवे तरी गाइलेले आढळतील. याचा अर्थ असा कीं, अंधश्रद्धा आणि अविश्वास या दोन आत्यंतिक मनोवस्थाच आज महाराष्ट्रांत अस्तित्वांत आहेत. आणि मला तरी या प्रकाराबद्दल नवल वाटत नाहीं. गेल्या वीस वर्षांत अर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि मानसशास्त्र यांतलीं जीं नवीं प्रमेयें महाराष्ट्रांत घुसलीं, त्यांनीं लोकांच्या जीवनाला धारक असलेल्या सगळ्या जुन्या तत्त्वांचा आणि मूल्यांचा विध्वंस केला. धर्म, नीति, अर्थव्यवस्था आणि राजकारण या जीवनाच्या चारीहि क्षेत्रांतील सगळ्या रूढ कल्पनांवरून आज नांगर फिरला आहे. पण, त्यांच्या मागोमाग नव्या समाजधारक कल्पनांचें जें पद्धतशीर आरोपण व्हाव-याला हवें होतें, तें मात्र अद्याप झालेलें नाहीं. मार्क्सचा साम्यवाद, रसेलचा नवनीतिवाद आणि फ्रॉइडचें मानसशास्त्र यांनीं समाजघटनेची सगळीं जुनीं तत्त्वें, सगळीं जुनीं धार्मिक, नैतिक आणि आर्थिक मूल्यें चीरफाड करून फोल ठरविलीं. पण, दुर्दैव असें कीं, त्या मूल्यांचा अपुरेपणा किंवा पोकळपणा मनाला पटल्यावर मार्क्स, रसेल किंवा फ्रॉईड यांच्या सिद्धांतांचा स्वीकार मात्र त्यानें केला नाहीं. कारण अद्याप प्रयोगावस्थेंत असलेल्या याहि नव्या सिद्धांतांची एकांगिता, अपूर्णता आणि आत्यंतिकता लोकांच्या निदर्शनाला दिवसेंदिवस येत आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गाच्या जीवनांत आणि अंतःकरणांत एक प्रकारची न्यूनता, एक प्रकारची शून्यता उत्पन्न झाली आहे; व दारिद्र्य आणि बेकारी यांनीं गांजलेल्या त्याच्या त्रस्त मनाला कोणत्याहि गोष्टीकडे साशंकतेनें बघण्यापलीकडे दुसरें कांहीं सुचत नाहीं. प्रगतीचे आणि पराक्रमाचे सर्व मार्ग पारतंत्र्यामुळें कुंठित झालेले; मानवसुलभ मूलभूत वासना आणि कामना तृप्त होण्याची सुद्धां वानवा; व जीं ध्येयें यौवनाच्या उषःकालीं मोहक वाटलीं, त्यांच्याबद्दल मनांत कांक्षा उद्भूत झालेली. अशा दुर्धर स्थितींत गुदमरलेलीं आणि गांगरलेलीं हताश पण प्रतिभाशालीं मनें आपल्या

अतृप्त वासना आणि उध्वस्त आकांक्षा आज एक प्रकारच्या बेछूट-पणानें व्यक्त करीत असलीं, तर त्यांत नवल कसलें? पंचवीस वर्षांपूर्वी कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांना प्रोफेसर, डॉक्टर, वकील किंवा इंजिनीयर होण्याची खात्री असे. किमानपक्ष बऱ्या पगाराची सरकारी नोकरी तरी आजच्या इतकी तेव्हां दुर्मिळ झालेली नव्हती. आज कॉलेजांतला तरुण बाहेर पडल्यावर त्याला बेकारसंघाचें सभासद व्हावें लागतें आणि विवाहमंडळांत नांव नोंदावें लागतें. अलिकडील मराठी कथावाङ्मयांत जो लैंगिक वासनांचा दर्प भरलेला आहे, त्याचें बीज या उध्वस्त आकांक्षांच्या आणि अतृप्त कामनांच्या तगमगींत सांपडेल. पारतंत्र्याचे सगळे अघोर दुष्परिणाम जिच्या वांट्याला आले आहेत आणि जीवनाच्या जुन्या धारक तत्त्वांवरील जिची श्रद्धा उडाली आहे, ती आजच्या लेखकांची पिढी जीवनांतलें दैन्य, दंभ, अतृप्तता आणि साशंकता यांची मुखर बनली आहे. हरिभाऊंच्या आशावादी आणि आत्मविश्वस्त प्रतिभेची उदात्तता, संयोजकता आणि सृजनक्षमता तिच्या वाङ्मयांत कुठून आढळणार! आजचें जीवन जसें विच्छिन्न, विफल आणि संत्रस्त, तसेंच आजचें वाङ्मयहि आहे.

## महाराष्ट्राची अस्मिता बोलूं लागली

मात्र या परिस्थितीमुळें खचून जाण्याचें कारण नाहीं. उलट मी तर असें म्हणेन कीं, महाराष्ट्राच्या जीवनांतली ही शून्यता आणि कटुता जितकी लवकर बाहेर पडेल, तितका त्याच्या पुनरुज्जीवनाचा समय जवळ येईल. पंधराव्या शतकांत परतंत्र महाराष्ट्रामध्यें असाच निराशावाद बोकाळला होता. मात्र त्या काळच्या युगधर्मानुसार त्यानें निवृत्तीचें आणि विरक्तीचें सोज्वळ स्वरूप धारण केलें होतें, एवढेंच. आजचा निराशावाद विरक्त आणि निवृत्त होऊन पड खावयाला तयार नाहीं, यांतच भावी प्रगतीचें बीज आहे. जिवंत आणि युयुत्सु निराशा हीच क्रांतीला जन्म देत असते. असली क्रांतिगर्भ निराशा

सध्यां मराठी कथावाङ्मयांतून शतमुखानें प्रकट होत आहे. याचा अर्थच हा कीं, पारतंत्र्यामुळें सर्व बाजूंनीं कोंडली गेलेली आजची पिढी जरी दिङ्मूढ झाल्यासारखी दिसत असली, तरी ती पड खाऊन मरावयाला मात्र तयार नाहीं. दैन्य, विषमता आणि दांभिकता यांच्याविषयीं समाजांत चीड उत्पन्न करून त्याला चेतविण्याचा तिचा हा जिवापाड प्रयत्न चालला आहे. आजचें ललित वाङ्मय हें समाजमनांतील या प्रक्षोभाचें द्योतक आहे. अठरा वर्षांपूर्वीं याच बडोदें शहरांत महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलतांना श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं मराठींत त्या वेळीं अवतरलेल्या काव्ययुगाचें कौतुक केलें होतें. पण आज कवितेचें तें युग लोपून कादंबरीचा जमाना महाराष्ट्रांत गाजतो आहे. मला या परिवर्तनाबद्दल नवल वाटत नाहीं; उलट तें स्वाभाविक आणि इष्ट वाटतें. पांखरें किलबिलतात आणि गातात, तीं वसंताच्या आरंभीं; सृष्टि ज्या वेळीं हिंवानें गारठून, उन्हानें होरपळून किंवा पावसानें झोडपून निघते, त्या वेळीं नव्हे ! सामाजिक विराट् आंदोलनांच्या या काळांत लोकमनाचा प्रक्षोभ आणि आकांक्षा प्रकट व्हावयाला कादंबरीइतका लवचिक आणि समावेशक लेखनप्रकार दुसरा कोणता सांपडूं शकेल ? आज खेडयांतल्या अगदीं निरक्षर नांगऱ्याचें सुद्धां स्वत:पुरतें पाहून निभत नाहीं. सर्वंकष आर्थिक उलाढालींनीं आणि रेडियोसारख्या जगद्व्यापी वार्तावाहकांनीं प्रत्येक माणसाचें जीवन जगाला इतकें कांहीं अभिमुख केलें आहे कीं, वऱ्हाडांतल्या एकाद्या खेडयांतल्या शेतकऱ्याचा सण हा न्यूयॉर्कच्या बाजारपेठेंतील सट्टयावर अवलंबून रहातो. त्यामुळेंच मुख्यतः नितांत व्यक्तिनिष्ठ वैणिक कविता मागें पडून माणसाला त्याचें जगांतील स्थान आणि भवितव्य विशद करून सांगणारी समाजनिष्ठ कादंबरी लोकप्रिय झाली. कविता ही व्यक्तिमनाची गायक आहे, तर कादंबरी ही समाजमनाची प्रातिनिधिक आहे. मराठी कादंबरीची

आजची लोकप्रियता ही महाराष्ट्राची अस्मिता मुखर झाल्याची निदर्शक आहे.

## देशाभिमान व्यापक हवा

राजकीय कादंबऱ्या लिहिण्याची प्रवृत्ति महाराष्ट्रांत सध्यां जी झपाट्यानें वाढत आहे, ती याच कारणामुळें; व म्हणून त्या प्रवृत्तीचें मी मनःपूर्वक अभिनंदन करितों. कारण ती प्रवृत्ति राजकारणांतील जुन्या नेत्यांचा, ध्येयांचा आणि कार्यक्रमांचा महाराष्ट्राला वीट आला असल्याची द्योतक आहे. पण नुसता वीट येऊन भागणार नाहीं. जुने राजकीय पुढारी हे दांभिक आणि त्यांचें तत्त्वज्ञान प्रतिगामी आहे असें म्हणणारांवर देशाला नवें नेतृत्व आणि तत्त्वज्ञान देण्याची जबाबदारी पडते; व जागतिक क्रांतीच्या या काळांत तर त्या जबाबदारीचें स्वरूप विशेषच बिकट आणि नाजूक झालें आहे. चालू महायुद्धांत लोकशाही यशस्वी होऊन ती स्थिरपद झाली, तरच जगांतील दुबळ्या परतंत्र राष्ट्रांची कांहीं धडगत आहे. पण तसें घडेलच अशी हमी कोणी द्यावी? कारण, या युद्धांत जितांप्रमाणेंच विजयी राष्ट्रेंहि खिळखिळीं होऊन जाणार, हें निश्चित आहे; व अशक्त माणसाच्या शरिरांत जसा रोग तेव्हांच जोर करतो, त्याप्रमाणें खिळखिळ्या झालेल्या राष्ट्रांत हुकूमशहांची पोळी पिकते, हा गेल्या महायुद्धानंतर आलेला अनुभव आपल्या डोळ्यांपुढें आहेच. तेव्हां या युगांत लोकशाही नुसती यशस्वी होऊन भागणार नाहीं; तर ती स्थिरपदहि झाली पाहिजे. तरच हिंदुस्थानाच्या दास्यमोचनाची कांहीं शक्यता आहे. जगाच्या राजकारणाचें हें जटिल स्वरूप लक्षांत घेऊन भरतखंड आणि त्याचीं घटक राष्ट्रें यांच्या भवितव्याचा विचार आपण एका विशिष्ट धोरणानें केला पाहिजे. अनेक प्रांत, धर्म आणि संस्कृति यांनीं विभागलेल्या या देशांत जर स्वातंत्र्य आणि स्वास्थ्य हीं नांदावयाला हवीं असतील, त्याचे तुकडे

न पडतां जर राष्ट्रीय एकता अखंड रहावयाला हवी असेल, तर सगळे प्रांत, धर्म आणि संस्कृति यांच्या विकासाला योग्य वाव देऊन भारतीय राष्ट्रैक्याचा परिपोष करणारा व्यापक देशाभिमान आपण निर्माण केला पाहिजे; व तसा देशाभिमान फक्त लोकशाहींतच वाढीला लागणें शक्य आहे. आणि, ती लोकशाहीहि सतत सावध आणि सायुध असेल, तरच तिला स्थैर्य प्राप्त होईल. जागतिक राजकारणाचें हें मर्म लक्षांत घेऊन महाराष्ट्रांतील राजकीय कादंबरीकारांनीं लोकांपुढें नवी विचारप्रणाली ठेवली पाहिजे आणि व्यापक देशाभिमानाची भावना निर्माण केली पाहिजे. मराठी लेखकांनीं असा प्रयत्न सामुदायिक इच्छाशक्तीनें केला, तरच ही विचारक्रांति घडून येऊं शकेल. लढाऊ लोकशाहीला अनुरूप असा व्यापक आणि तेजस्वी देशाभिमान उत्पन्न झाल्याशिवाय आपल्या या प्राचीन राष्ट्राचें पुनरुज्जीवन होणें शक्य नाहीं. गुजरातचा राष्ट्रीय उद्गाता कवि नर्मद यानें म्हटलेंच आहे कीं—

**विना देश अभिमान देश उत्कर्ष न थाये,**
**देश रान समशान, जेह वो खावा धाये।**
**राज समंधी ऐक्य, नथि अहिना लोकोमां**
**जातिबंधनो खुब, जनो वाघोना मोमा**

ही त्याची आर्त हांक गुजराती साहित्यिकांप्रमाणें मराठी साहित्यिकांनाहि कार्यप्रवृत्त करो, एवढेंच मी शेवटीं म्हणतों.

# मुंबई

(२६ जुलै १९४१)

## लहानपणची आकांक्षा

भाषणाला सुरवात करण्यापूर्वीं शिष्टाचाराप्रमाणें मी प्रथम आपले आभार मानावयाला पाहिजेत, याची मला जाणीव आहे. कारण, मुंबई शहरांतील या सर्वांत जुन्या वाङ्मयसंस्थेच्या वार्षिकोत्सवाचें अध्यक्षपद मला देऊन आपण माझा जो गौरव केला आहे, तो कोणत्याहि साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाहून कमी योग्यतेचा नाहीं. प्रांतिक संमेलनांची प्रथा ज्या वेळीं मुळींच प्रचलित नव्हती, त्या वेळीं ठाणें आणि मुंबई येथील ग्रंथसंग्रहालयांचें अध्यक्षपद हें महाराष्ट्र साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या तोडीचें समजलें जात असे. आणि, आपल्या संस्थेच्या वार्षिकोत्सवाला आजपर्यंत जे अध्यक्ष लाभले, त्यांची प्रति-वृत्तांत दिलेली नामावलि जर पाहिली, तर तो समज अगदीं समर्पक होता, असेंच कोणीहि म्हणेल. असा हा अभिलषणीय बहुमान आपण मला दिल्याबद्दल मी आपले आभार मानीत नाहीं, याचें कारण अविनय हें मात्र खास नव्हे. कांहीं फुलें अशीं असतात कीं, आपल्या सुबक आका-

रानें टपोऱ्या मोत्यांना लाजविणाऱ्या त्यांच्या शुभ्र कळयांचा गजराच अधिक सुंदर दिसतो. तसेंच कांहीं नाजुक भावनांचेंहि आहे. त्या बोलून दाखविण्यापेक्षां न बोलण्यांतच अधिक गोडी असते. आज आपल्यासमोर उभें राहतांना माझ्या मनांत जी कृतज्ञतेची भावना उचंबळून आली आहे, ती अशाच अनिर्वचनीय भावनांपैकीं आहे. मला आठवतें, वयाच्या अकराव्या वर्षीं आधुनिक मराठी कादंबरीकारांचे अग्रणी कै. हरिभाऊ आपटे यांचें संग्रहालयाच्या वार्षिकोत्सवाच्या वेळचें भाषण ऐकत असतां, आपल्याला केव्हां तरी या सन्मानाचा लाभ होईल का, अशी कल्पना माझ्या मनांत चमकून गेली होती. ती आकांक्षा पूर्ण होण्याचा योग आज आपल्या कृपेनें आला, याबद्दल मला जितका आनंद तितकाच अभिमानहि वाटतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. क्र. ६१२६

## ग्रंथसंग्रहालय नव्हे शाळा

मात्र मला आज वाटत असलेल्या या आनंदांत कृतकृत्यतेपेक्षां कृतज्ञतेचाच भाग जास्त आहे. कारण इतक्या लहान वयांत ही आकांक्षा माझ्या मनांत उद्दीपित व्हावयाला हें ग्रंथसंग्रहालयच मुख्यतः कारण झालें. माझ्यापेक्षां फक्त दोनच वर्षांनीं मोठया असलेल्या या संस्थेंत वयाच्या आठव्या वर्षापासून मी बहुतेक रोज नेमानें वाचावयाला येत होतों. मला आतां नीट आठवत नाहीं—पण ग्रंथसंग्रहालय त्या वेळीं ठाकुरद्वारांतून फणसवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर कोठें तरी भाडयाच्या इमारतींत दुसऱ्या मजल्यावर होतें. सुटीच्या दिवशीं मी पुष्कळदां संध्याकाळीं चार साडे चार वाजतांच संग्रहालयाच्या दाराशीं येऊन तें उघडण्याची वाट पहात बसत असें. हेतु असा कीं, 'करमणूक', 'मनोरंजन', 'नवयुग', 'प्रभात', 'उद्यान' वगैरे त्या काळचीं लोकप्रिय नियतकालिकें प्रथम आपल्याला वाचावयाला मिळावीं. ललित वाङ्मय हें आजच्या वाचकवर्गालाच प्रिय आहे, असें नाहीं. त्या

वेळच्या वाचकवर्गाची, विशेषत: विद्यार्थ्यांची उडीहि ललित वाङ्मया-वरच फार असे; व संग्रहालयाच्या वार्षिकोत्सवाच्या अध्यक्षांपैकीं कांहींच्या भाषणांत तत्कालीन वाचकांच्या या अभिरुचीवर ताशेरा झाडलेलाहि आपल्याला आढळेल. मी ज्या वयांत या संग्रहालयांत वाचावयाला येऊं लागलों, तें वय हातीं पडेल तें पुस्तक आधाशीपणानें वाचून टाकण्याचें होतें. पण, अग्नींत कांहींहि पडलें, तरी तें भक्षण करून जसा तो प्रज्वलित होतो, तसेंच जिज्ञासु मुलांच्या मनाचेंहि होत असावें. त्या वेळच्या त्या आधाशी, अव्यवस्थित वाचनानें माझें मानसिक नुक-सान कदाचित् कांहीं झालेंही असेल. पण त्याबरोबरच माझ्या बुद्धीचा विकासहि झपाट्यानें होत गेला. वयाच्या अठराव्या वर्षीं ज्या आत्म-प्रत्ययाने मी वाङ्मयाच्या क्षेत्रांत प्रवेश केला, त्याचें श्रेय या संग्रहालयांत बसून केलेल्या त्या अव्यवस्थित व्यासंगालाच बव्हंशीं द्यावें लागेल. त्या दृष्टीनें हें संग्रहालय हीच खरोखरी या व्रात्याची आवडती शाळा, त्याचें एकमेव विद्यालय होय.

## इतिहासाचार्यांची उज्ज्वल स्मृति

पण, विद्यार्थिदशेंत घडलेल्या या अव्यवस्थित वाचनांतून, धुरांतून उफाळणाऱ्या उत्तुंग अग्निज्वालेप्रमाणें, कै. इतिहासाचार्य राजवाडे यांची स्मृति या क्षणीं माझ्या हृदयांत उचंबळून येत आहे. राजवाडे हे आजच्याइतकेच त्याहि वेळीं सामान्य वाचकवर्गाला अविदित होते; व मलाहि ते बहुधा अपरिचित राहिले असते. पण, माझ्या वडिलांचे स्नेही कै. खंडेराव बेलसरे आणि कै. नाना गद्रे यांच्याबरोबर राजवाडे हे एकदां आमच्या घरीं आले असतां, त्यांचा तो विचित्र पोषाख आणि विलक्षण संभाषण यांच्यामुळें माझें लक्ष त्यांच्याकडे वेधलें; व आमच्या घरीं असलेल्या 'ग्रंथमाला' मासिकाच्या अंकांतून मी त्यांचे 'कादंबरी', 'रामदास', 'शाळांतील

स्वानुभव' वगैरे निबंध वाचून काढले. ते लेख त्या वेळीं मला सर्वच चांगले समजले असतील, असें वाटत नाहीं. पण, त्या लेखांच्या वाचनानें कादंबरीचें क्रांतिकारक सामर्थ्य, समर्थांचें लोकोत्तर विभूतिमत्व आणि मराठ्यांच्या उपेक्षित इतिहासाचें संशोधन यांच्या-विषयीं जो जिव्हाळा माझ्या मनांत उत्पन्न झाला, तो आजहि कायम आहे. किंबहुना, कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेच्या सतत वाचनानें ज्या देशाभिमानाच्या भावना माझ्या मनांत उद्भूत झाल्या, त्यांचा परिपोष कांहीं एका निराळ्याच पद्धतीनें इतिहासा-चार्यांच्या वाङ्मयाच्या व्यासंगानें केला. त्यानंतर दिवाळीच्या, नाता-ळाच्या आणि उन्हाळ्याच्या सुटींत मी रोज सकाळ संध्याकाळ संग्रहालयाच्या ओंवरींत बसून 'ग्रंथमाला', 'विश्ववृत्त', 'सरस्वती-मंदिर', 'प्रभात', 'प्राचीप्रभा', 'इतिहाससंग्रह', 'लोकशिक्षण', 'रामदास आणि रामदासी', 'इतिहास आणि ऐतिहासिक' वगैरे नियतकालिकांतून आलेले राजवाड्यांचे लेख आणि त्यांनी संपादिलेले सर्व साधनग्रंथ यांचें निष्ठेनें पारायण केलें. कै. हरिभाऊ आपटे यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या वाचून मराठ्यांच्या कर्तृत्वाविषयींच्या ज्या कल्पना माझ्या मनावर बिंबल्या होत्या, त्या कल्पनांना स्थिर आणि प्रभावी असें स्वरूप इतिहासाचार्यांच्या वाङ्मयाच्या या अभ्यासानें प्राप्त झालें.

## साहित्यिकांनी माजविलेली धुळवड

तेव्हां, या ग्रंथसंग्रहालयांत बसून मी ज्याच्या वाङ्मयाचें परिशी-लन विद्यार्थिदशेंत केलें, त्या प्रभावशाली ग्रंथकाराची स्मृति मला आज तीव्रतेनें व्हावी, यांत नवल कसलें ! मराठी भाषेच्या उन्नतीसाठीं त्या इतिहासाचार्यानें आमरण केलेली उग्र तपस्या आठवली आणि आज महाराष्ट्रांतल्या प्रमुख साहित्यिकांनी चालविलेला फाल्गुनोत्सव पाहिला, म्हणजे मनाला उद्वेग वाटल्याशिवाय रहात नाहीं. विशेषतः, आपल्या

देशाच्या आजच्या आणीबाणीच्या स्थितींत, यादवी, परचक्र आणि अराजक हीं एकाहून एक भीषण संकटें दत्त म्हणून पुढें उभीं ठाकलेलीं दिसत असतां, लोकांच्या विचारांना वळण लावण्याचें सामर्थ्य ज्यांच्या लेखणींत आहे, त्या वागीश्वरांनीं एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढण्यांत दंग रहावें, या प्रकाराची कोणाला चीड येणार नाहीं? रत्नागिरीपासून सोलापूरपर्यंत गेलें वर्ष दीड वर्ष महाराष्ट्रांत जी धुळवड माजली आहे, जो ग्राम्यतेचा गलिच्छ धिंगाणा सारखा चढाओढीनें चालला आहे, त्यामुळें 'साहित्य' आणि 'साहित्यिक' या एका काळीं सर्व समाजाला आदरार्ह वाटणाऱ्या दोन्ही शब्दांची विटंबना झाली असून, शारदेच्या पवित्र मंदिराला मासळीबाजाराची अभद्र अवकळा आली आहे. ऐतिहासिक साधनांच्या तिसऱ्या खंडाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत राजवाड्यांनी असे उद्‌गार काढले आहेत कीं—

> "राष्ट्रांतील पुढाऱ्यांची व श्रेष्ठ पुरुषांची दानत धुतल्या तांदळासारखी असली, तरच इतर सामान्य जनांची नीतिमत्ता मर्यादेंत रहाते. पुदारी व श्रेष्ठ पुरुष कामक्रोधांनीं विकृत होऊन परस्परांना पाण्यांत पाहूं लागले व असें तामसी वर्तन ठेवूनहि त्यांचा बडेजाव दिवसेंदिवस वाढतच आहे असें कांहीं काळपर्यंत दिसलें, म्हणजे त्यांचें अनुकरण करण्याची इच्छा भोंवतालील मंडळीला व पुढील पिढीला अवश्यमेव होते व कालांतरानें सर्वत्र बजबजपुरी माजून राष्ट्राचा विलय होतो."

मराठी वाङ्मयांत सध्यां बोकाळलेल्या बजबजपुरीचें वर्णन करावयाला, मला वाटतें, यापेक्षा अधिक समर्पक शब्द क्वचित सांपडणार नाहींत. अशा स्थितींत पुण्याचे भाई गोरे यांनीं तिथल्या एका जाहीर सभेंत साहित्यिकांना लाथा मारण्याचें जें अवसान आणलें, तें जरी कितीहि उपमर्दकारक वाटण्यासारखें असलें, तरी त्याबद्दल त्यांना कोणत्या तोंडानें दोष देणार? त्यांना फार तर इतकेंच अत्यंत नम्रतेनें सांगत

येईल कीं, अहिंसेच्या कर्दमांत फसून अगतिक झालेल्या तुमच्या त्या चरणकमलांत जर खरोखरच इतकी खुमखुम असेल, तर ज्यांच्या निष्क्रिय अरेरावी धोरणामुळे देशांतल्या लढाऊ चळवळीचा आज तेजोभंग झाला आहे, त्या कांग्रेसश्रेष्ठींना तुमच्या पायांच्या त्या पराक्रमाची थोडी तरी चुणूक दाखवून पहा एकदां! त्यांच्यासारख्या शूर पुरुषानें आपल्या वाचेचें तें अचाट आणि अमोघ बळ कलमकारागिरीपेक्षां जास्त कांहीं करण्याची हिंमत नसलेल्या साहित्यिकांना धमक्या देण्यांत खर्च करावें, याबद्दल कोणाला खेद होणार नाहीं ?

## हीं भांडणें धंदेवाईकांचीं आहेत

पण, आज जर राजवाडे आपल्या सुदैवानें हयात असते, तर त्यांनीं भाई गोरे यांच्यापेक्षांहि कडक शब्दांनीं मराठी साहित्यिकांत सध्यां चालू असलेल्या लाथाळीचा धिक्कार केला असता. राष्ट्राच्या परिस्थितीची यत्किंचितहि चाड न बाळगतां स्वार्थसाधनाला प्रवृत्त होणाऱ्या व्यक्तींसाठीं त्यांच्याजवळ दोन शेलकीं विशेषणें होतीं : 'द्विपाद-पशु' आणि 'शिस्नोदरपरायण'. या दोन जहरी विशेषणांचा प्रयोग त्यांनीं आम्हां आजच्या साहित्यिकांविषयीं बोलतांना केला असता, याबद्दल मला शंका वाटत नाहीं. आणि त्यांत वावगें काय झालें असतें? मराठी साहित्यिकांमध्यें आज जीं भांडणें बोकाळलीं आहेत, त्या भांड-णांच्या बुडाशीं कांहीं तत्त्व आहे, असें त्यांच्यापैकीं एखादा तरी साहित्यिक म्हणू धजेल काय? या भांडणांच्या मुळाशीं कोणतेंहि तत्त्व नाहीं; फक्त तत्वमसीचा हपाप आहे; व म्हणूनच एकमेकांचीं खासगी बिंगें चढाओढीनें चवाठ्यावर आणून हे साहित्यिक अत्यंत बेशरमपणानें वाचकांपुढें आज आपल्या साहित्यसंसाराचा तमाशा करून दाखवीत आहेत. हीं भांडणें साहित्याचा बाजार भरवून बसलेल्या धंदेवाईकांचीं आहेत; एखाद्या उच्च तत्त्वासाठीं किंवा

कार्यासाठीं सर्वस्व पणाला लावून झगडणाऱ्या ध्येयवाद्यांचीं नव्हेत. हे वाद जर खरोखरीच एखाद्या तत्वासाठीं चाललेले असते, तर पहिली बायको घरांत नांदत असतां दिग्दर्शकानें नटीबरोबर गुपचूप केलेल्या छुप्या लग्नाचीं मंगलाष्टकें सहा महिन्यांनंतर जाहीर रीतीनें म्हणावयाला कोणता साहित्यिक आणि संपादक पुढें सरसावला असता? आणि दोन नामांकित कथालेखकांच्या कल्पनांवर डल्ला मारून सजविलेल्या चित्र-कथेचें कोड कौतुक करण्याचें धैर्य तरी या साहित्यिकांना आणि संपाद-कांना कसें झालें असतें? साम्यवादाची व्होड्का पिऊन झिंगलेले पुरोगामी साहित्यिक यावर कदाचित् असें म्हणतील कीं, जुनाट, कर्मठ नीतिकल्पनांच्या गळाठ्यांत गुरफटल्यामुळेंच तुम्ही असली टीका करीत सुटलां आहांत! मी कांहीं पुरोगामित्वाच्या अगम्य तत्वज्ञानाचा मक्तेदारच काय पण जाणकारहि नाहीं. त्यांना मी अत्यंत विनयानें एवढाच प्रश्न विचारीन कीं, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें साम्यवादाच्या नांगरानें नैतिक कल्पनांची केवढीहि जबर उलथापालथ केली असली, तरी दुराचाराला सदाचार आणि चोरीला सावगिरी म्हणावयाला सांगण्या-इतकें कां तें तत्वज्ञान माणुसकीला पारखें झालें आहे? नैतिक मूल्यें बदललेलीं आहेत असें म्हणत वाटेल त्या अपकृत्याची तरफदारी करावयाला पुढें येणाऱ्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, नीतीचीं कांहीं अचल तत्त्वें अशीं आहेत कीं, जीं सर्व शास्त्रांना आणि वादांना पुरून उरणार असून, आपण जीं नैतिक मूल्यें बदललीं असें समजतों तीं फक्त चलनी, दर्शनी मूल्यें असतात, खरीं नैतिक मूल्यें नव्हत. या खऱ्या नैतिक मूल्यांची चाड ज्यांना असेल, ते दिग्दर्शकांच्या हुकूमशाही-पुढें मान वाकवणार नाहींत, साप्ताहिक आणि मासिक भविष्यांचीं भारुडें छापणार नाहींत किंवा दिग्दर्शकानें नटीशीं केलेल्या चोरट्या लग्नाच्या प्रणयकथाहि रंगवून लिहिणार नाहींत. खरोखरी स्वतःला पुरोगामी म्हणविणारीं मराठी वृत्तपत्रें आणि साहित्यिक यांनी आज

चालविलेला नाना प्रकारचा खुषामतखोरपणा पाहिला, म्हणजे कॅल्डरमार्शलनें बोलपटांच्या धंद्याविषयीं लिहितांना म्हटल्याप्रमाणें, महाराष्ट्रांतील बुद्धिजीवी वर्गाचा मेंदू कांहीं भुरट्या भांडवलवाल्यांकडे गहाण पडला आहे, असें वाटतें. तेव्हां, सध्यां जीं भांडणें साहित्यिकांत बोकाळलीं आहेत, तीं कोणत्याहि तत्वासाठीं किंवा कार्यासाठीं चाललेलीं नसून, कोणाच्या लेखनकलेला किती बाजारभाव लागतो, हें पाहण्या-साठींच बोकाळलीं आहेत; व पायांना सुऱ्या बांधलेल्या दोन कोंबडयांची लढत प्रेक्षक जितक्या उल्हासानें पहातात, तितक्याच उल्हासानें मराठी वाङ्मयांत माजलेला हा फाल्गुनमास आज वाचकवर्ग पहात आहे.

## पुढारीपणाचा पोकळ हपाप

या भांडणांच्या मुळाशीं आणखीहि एक हपाप आहे आणि तो म्हणजे पुढारीपणाचा. महाराष्ट्राची गेल्या पाऊण शतकाची परंपरा अशी आहे कीं, महाराष्ट्राचा लोकप्रिय राजकीय नेता हा मराठी भाषेचा मूर्धाभिषिक्त ग्रंथकार असतो. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यापासून तों बॅ. विनायकराव सावरकर यांच्यापर्यंत वाङ्मय आणि राजकारण यांच्यांतील नेतृत्वाची ही समव्याप्ति अव्याहत चालत आली आहे. भाषा हें प्रचाराचें सर्वांत प्रभावी साधन आहे; व म्हणूनच भाषेचें प्रभुत्व ह नेतृत्वाला पोषक झालेलें पुष्कळदां आढळतें. आपल्या वाणीनें म्हणा किंवा लेखणीनें म्हणा जो मनुष्य जास्तींत जास्त लोकांचीं मनें आपल्याकडे आकर्षून घेतो, त्याचें व्यक्तित्व हें समाजांत एक सामर्थ्य होऊन बसतें. लेखकांना आजपर्यंत आपल्या या सामर्थ्याची जाणीव नव्हती. पण आतां ती झालेली आहे; व या लोकशाहीच्या युगांत आपल्या लेखणीच्या प्रभावानें केवळ वाङ्मयक्षेत्रांतच नव्हे, तर भाषेनें व्यापलेल्या जीव-नाच्या हर एक क्षेत्रांत जी काय सत्ता आपल्याला भोगावयाला मिळेल, ती हस्तगत करावयाला ते उत्सुक झाले आहेत. विशेषतः,

प्रांतिक स्वायत्ततेमुळें सरकार आणि विद्यापीठ यांनीं आजवर उपेक्षिलेल्या मराठी भाषेला नव्या लोकाभिमुख राजवटींत मतप्रचाराच्या दृष्टीनें अभूतपूर्व असें महत्त्व प्राप्त झालें असून, सरकार आणि विद्यापीठ यांची इच्छा असो वा नसो, या लोकभाषेकडे यापुढें राजैश्वर्य आपल्या पायांनीं चालत येणार आहे. अर्थात् मराठी भाषेचें महत्त्व ज्या प्रमाणांत वाढेल, ती राज्यसत्तेची अंशभागी ज्या प्रमाणांत होत जाईल, त्या प्रमाणांत मराठी लेखकांचेंहि महत्त्व वाढून तेहि राज्यसत्तेचे अंशभागी होतील, हें उघड आहे. हें लोभनीय स्थित्यंतर लेखकांच्या लक्षांत आल्याशिवाय राहिलेलें नाहीं; व अवघ्या अडीच कोट लोकसंख्येच्या या राष्ट्रकांत जिल्हावार संमेलनें भरविण्याची जी प्रथा अलीकडे बळावूं पहात आहे, ती या जाणिवेची एका परीनें निदर्शक म्हणतां येईल. पूर्वी मराठी वाङ्मयाचा वाचक हाच एकमेव आधारस्तंभ होता. पण, आतां प्रेक्षक आणि श्रोता हे दोन नवे पोशिंदे मराठी वाङ्मयाला लाभले असून, चित्रपट आणि रेडिओ यांनीं मराठीच्या संचाराला आणि प्रचाराला नवीं व्यापक क्षेत्रें उपलब्ध करून दिलीं आहेत. एकमेकांचे बोलपट हाणून पाडण्यासाठीं किंवा रेडिओंत मराठीला स्वतंत्र स्थान मिळवून देण्यासाठीं म्हणून ज्या झटापटी अलीकडे सारख्या चालू आहेत, त्या या दोन नव्या स्पर्धाक्षेत्रांतील साहित्यिकांच्या जोरदार हालचालींच्या द्योतक आहेत. तेव्हां, आर्थिक आणि राष्ट्रीय दृष्टीनें मराठी भाषेला झपाट्यानें येत असलेलें हें विलक्षण महत्त्व ध्यानांत घेऊन त्यांतल्या त्यांत धूर्त आणि लोकप्रिय असलेले प्रमुख साहित्यिक नेतृत्व आणि राज्यसत्ता या दोहोंतलाहि आपला स्वाभाविक वांटा उचलावयाला पुढें सरसावावे, यांत नवल नाहीं. साहित्यांतील चळवळींना आणि वादांना आज जो ऊत आलेला दिसत आहे, तो याच कारणामुळें. पूर्वी साहित्यिकांत वाद नव्हते, असें नाहीं. पण, मराठी भाषेचा व्याप आणि वाचकवर्ग त्या वेळीं अतिशयच मर्यादित असल्यामुळें, आज जें

लौकिक स्वरूप आणि महत्त्व त्या वादांना आलें आहे, तें त्या वेळीं येणें शक्य नव्हतें. भारद्वाज आणि भिंगारकर, राजवाडे आणि तेलंग, भुंडले आणि देव, गोखले आणि वाकसकर, कोल्हटकर आणि ठोसर, फाटक आणि केळकर प्रभृतींत जे अटीतटीचे सामने त्या वेळीं झडले, त्यांची मजा 'केसरी', 'सुधारक', 'विविधज्ञानविस्तार', 'ग्रंथमाला', 'मनोरंजन', 'विविधवृत्त', 'ज्ञानप्रकाश' वगैरे नियतकालिकांच्या कचेऱ्यांतील लेखकांच्या अड्डयांनीं काय लुटली असेल, तेवढीच. सामान्य वाचकांना त्या तात्त्विक आणि तांत्रिक वादांत कांहीं गम्यहि नव्हतें आणि रम्यहि नव्हतें. पण, साहित्यिकांच्या आजच्या वैयक्तिक वादांतील लढत आणि रंगत ही इतकी और, इतकी बहारीची आहे कीं, चंद्री, पवळी आणि सुभान्या किंवा तारी, हिरी आणि दौलत्या यांच्या चुरशीच्या तमाशावर जशी प्रेक्षकांची झुंबड पडते, तशी वाचकांची उडी या वादांत रंगणाऱ्या वृत्तपत्रांवर सध्यां पडत आहे.

## त्यागाची तयारी नाहीं

पण, वाङ्मयाच्या म्हणा किंवा राजकारणाच्या म्हणा क्षेत्रांतील वैचारिक वा प्रत्यक्ष नेतृत्वासाठीं जे साहित्यिक हपापलेले आहेत, त्यांच्या एक साधी गोष्ट लक्षांत आल्याचें दिसत नाहीं. ती ही कीं, नेतृत्वाचा मुकुट हा फक्त त्यागी आणि कर्तृत्ववान् पुरुषांच्या मस्तकावरच झळकत असतो. गांधी, सावरकर, मानवेंद्र रॉय, सुभाषचंद्र बोस किंवा नेहरू यांच्या धोरणाविषयीं कितीहि तीव्र मतभेद होण्यासारखे असले, तरी त्यांच्या त्यागाविषयीं मात्र मतैक्यच आढळेल; व त्या त्यागाच्या जोरावरच आपआपल्या भिन्न पक्षांच्या छावण्या थाटून ते बलाढ्य ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं एकीकडे सामना देत दुसरीकडे आपसांत तितक्याच ईर्ष्येनें झगडत आहेत. पुरस्कृत ध्येयासाठीं किंवा अंगीकृत कार्यासाठीं कोणत्याहि प्रकारचा त्याग करण्याची जोंपर्यंत साहित्यिकांची

तयारी नाहीं, तोंपर्यंत त्यांचें नाजूक बोलणें आणि साजूक लिहिणें वायांच जाणार. नुसते कपडे बदलून, साहित्याच्या नव्या निरर्थक व्याख्या करून किंवा पुरोगामित्वाचा निर्जीव पिसारा उभारून नेतृत्वाची ठाकुरकी मिळणें अशक्य आहे. लोक ज्या लढयांत प्राणपणानें गुंतले आहेत, त्या लढ्याला चेतना आणण्यासाठीं आपल्या लेखणीचा उपयोग जे शस्त्रासारखा करतील आणि तो करतांना वाटेल ते आघात सोसावयाला तयार होतील, त्यांच्याच मस्तकावर नेतृत्वाचीं छत्रचामरें झुलण्याची कांहीं आशा आहे. धुतलेल्या तांदळासारखी ज्यांची दानत नाहीं आणि कोणत्याहि प्रकारची झीज सोसण्याची ज्यांची तयारी नाहीं, अशा कलमकारागिरांचें एरवीं लोकांनीं कितीहि कौतुक केलें, तरी भलताच मान त्यांना देण्याइतकी कांहीं जनता दुधखुळी नाहीं. आपल्या व्यभिचारी जीवनाकडे काणाडोळा करण्याची विनवणी आपल्या देशबांधवांना करतांना आयर्लंडचा झुंजार पुढारी पार्नेल यानें, 'माझें खासगी जीवन हें माझें स्वतःचें आहे, माझें सार्वजनिक जीवन आयर्लंडचें आहे." (My private life is my own, my public life is Ireland's) असे जे उद्गार काढले होते, त्यांत निस्संशय तथ्य आहे; व कोणत्याहि कार्यकर्त्याच्या खासगी जीवनांत निष्कारण फाजील मन घालून लोकांनीं त्याचा विचका करूं नये, हेंहि खरें. पण, हा खासगी चारित्र्याचा प्रश्न जरी सोडून दिला, तरी ज्यांना सार्वजनिक आयुष्य आहे, त्यांना सार्वजनिक चारित्र्य आणि शील असतें, हें विसरून चालणार नाहीं. बोलल्याप्रमाणें वर्तन असणें हा त्या शीलाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. इंग्लंडच्या राजानें रणक्षेत्राच्या आघाडीवर जाऊन जातीनें लढावें, अशी अपेक्षा कोणीहि करीत नाहीं. पण, इंग्लंडच्या सध्यांच्या वेढा पडलेल्या स्थितींत प्रजेला जो रोजच्या खाण्याच्या पदार्थांपासून तों लेण्याच्या कपड्यापर्यंत प्रत्येक बाबतींत सारखा त्याग करावा लागत आहे, त्यांत राजा आणि राणी हीं दोघें स्वेच्छेनें सामील होत असल्यामुळेंच

युद्धजन्य आपत्तींचा दारुण ताण सहन करण्याचा धीर ब्रिटिश जनतेला येत आहे, हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. राष्ट्र आणि जनता हीं ज्या वेळीं आपल्या अस्तित्वासाठींच मुळीं प्राणपणानें झगडत असतात, त्या वेळीं कलावंतानें त्या झगडयांत जरी कदाचित् प्रत्यक्ष भाग नच घेतला, तरी त्या झगडयाशीं समरस होऊन आपली कला त्यानें राष्ट्राच्या सेवेंत राबवावी, अशी अपेक्षा जर लोकांनीं केली तर ती त्यांची चूक होईल काय? पॅडरस्कीनें आपल्या पियानोनें आधुनिक पोलंडच्या आणि विझमननें आपल्या संशोधनानें आधुनिक पॅलेस्टाईनच्या राष्ट्रघटनेला केवढें साह्य केलें आहे, हें पाहिल्यावर कलावंतांना किंवा वैज्ञानिकांना राष्ट्रीय लढयांत भाग घेतां येणार नाहीं, असें कोण म्हणेल? किंबहुना, रशिया आणि जर्मनी यांनीं गेल्या वीस वर्षांत आपआपल्या राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठीं जे भगीरथ प्रयत्न केले आणि ज्या प्रयत्नांमुळें हीं दोन राष्ट्रें जगांतल्या सगळ्या जुन्या बलाढ्य साम्राज्यांना प्रत्यादेश होऊन बसलीं, त्या प्रयत्नांत राजकारणी मुत्सद्द्यांइतकाच वैज्ञानिक, कलाभिज्ञ आणि साहित्यिक यांनींहि हिरीरीनें भाग घेतला होता, हें प्रसिद्धच आहे. वज्रासारखें अमोघ सामर्थ्य आणि संघटना राष्ट्रांत उत्पन्न करावयाला समजांतील सर्व क्षेत्रांतल्या नेत्यांना दधीचीप्रमाणें आत्माहुतीला आनंदानें सिद्ध व्हावें लागतें.

## ज्वाज्वल्य मनोवृत्तीचा अभाव

पण मराठी साहित्यिकांची अशा प्रकारच्या कोणत्याहि त्यागाला किंवा साहसाला तयारी नाहीं. इतकेंच नव्हे, तर सामान्य व्यावहारिक माणूस आपल्या बोलण्यांत आणि वागण्यांत मेळ ठेवण्याची जी दक्षता घेतो व व्यवहारांतील 'सचोटी' असें साधें नांव ज्या वागणुकीला दिलें जातें, ती सुद्धां आपल्या वर्तनांत असावी, अशी चाड आम्हां साहित्यिकांना नाहीं. त्यामुळें निरनिराळ्या क्षेत्रांतल्या नेतृत्वासाठीं चाललेल्या त्यांच्या साऱ्या धडपडी आणि चकमकी आज लोकांच्या कुचेष्टेचा

विषय होऊन बसल्या आहेत. त्यांना स्वतःलाहि या गोष्टीची जाणीव असावी, असें केव्हां केव्हां वाटतें. नाहीं तर आपल्या वर्तनांतील विसंगतीवर आणि वैगुण्यांवर विदारक प्रकाश पाडणाऱ्या वैयक्तिक टीकेविरुद्ध त्यांनीं इतका कलकलाट खचित केला नसता. पण, स्वतःचें राष्ट्र आणि समाज यांच्या दुःखाची झळ लागून जोंपर्यंत त्यांचें हृदय जळत नाहीं, तोंपर्यंत त्यांच्या वाङ्मयाला तेज चढणें आणि त्यांना नेतृत्वाचा मान मिळणें अशक्य आहे. आपल्या कादंबरीवरील निबंधांत इतिहासाचार्य राजवाडे यांनीं असे उद्‍गार काढले आहेत कीं—

"बाळमित्राचें भाषांतर करणाऱ्या छत्र्यांपासून तों मोठमोठ्या वास्तविक कादंबऱ्या लिहिणाऱ्या आपट्यांपर्यंत वास्तविक कादंबरीची मजल कोठपर्यंत येऊन पोहोंचली व ही लहानशी मजल मारण्यास किती वर्षें लागलीं ह्याचा विचार केला म्हणजे टॉल्स्टॉयपर्यंत जाण्याला किती युगें लागतील तें हरि जाणें ! समाधानाची बाब एवढीच कीं, पाऊल पुढें आहे, मागें नाहीं. आतां ह्युगो, झोला, टॉल्स्टॉय यांच्यासारखी ग्रंथरचना व्हावी अशी इच्छा असेल, तर त्याला एकच उपाय आहे. त्यांच्यासारखीं मनें या देशांतील कादंबरीकारांचीं बनलीं पाहिजेत. विधवांचीं दुःखें पाहून जीव तिळतिळ तुटला पाहिजे. गरिबांची उपासमार पाहून स्वतःच्या घशांतला घांस उतरतां कामा नये. स्वदेशाचें दैन्य पाहून रात्रीची झोंप डोळ्यांवरून उडून जावी. स्त्रियांची बेअब्रू झालेली पाहून द्रौपदीच्या भीमाप्रमाणें त्वेष यावा. ही मनोवृत्ति ज्यांची झाली, ह्या ब्रम्हानंदीं ज्यांची टाळी लागली, त्यांनींच कप्तान ड्रेफूची बाजू घेऊन सर्व राष्ट्राविरुद्ध भांडावें व रशियांतील पादशहांनाहि चळचळ कांपावयाला लावावें. इतरांची माय हीं कामें करणाऱ्या कादंबरीकारांना व्यालीं नाहीं! तेव्हां उत्तमोत्तम कादंबरीकार व्हावयाचें म्हणजे मनोवृत्ति अशी अत्यंत जाज्वल्य पाहिजे."

इतिहासाचार्यांनीं छत्तीस वर्षांपूर्वीं मराठी कादंबरीविषयीं काढलेले

हे उद्गार आजच्या मराठी कथावाङ्मयालाहि लागूं पडतात असें मी म्हटलें, तर तें चूक होईल काय? "सामान्य संकटें, रोजचें वर्तन, घरगुती भावणें, लहानसे पुरुषार्थ ह्या विषयींचीं चटकदार वर्णनें करून )मिळमिळीत, गुळगुळीत, सपक, नरम व आवेशहीन" कादंबऱ्या लिहिण्यांतच आजचे कादंबरीकार गर्क नाहींत काय? प्रो. वा. म. जोशी, श्री. भा. वि. वरेरकर आणि श्री. साने गुरुजी यांच्याकडे अपवाद म्हणून बोट दाखवितां येईल. पण, मराठी वाचकवर्गाचे आवडते लेखक हे नाहींत, ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. राजवाड्यांच्या उद्गारांची कसोटी मी अलीकडील वाङ्मयाला लावलेली पाहून कांहीं पुरोगामी साहित्यिक कदाचित् उद्गारतील, "हा कुठला एकोणिसाव्या शतकांतला माणूस उकरून काढून त्याच्या आधारानें तुम्ही आमचें नवें साहित्य हीणकस ठरवतां!" पण राजवाड्यांपेक्षांहि चार पावलें पुढें जाऊन, लेखकांनीं बहुजनांच्या लढ्यांत जातीनें भाग घेतला पाहिजे, असें ईर्ष्येनें प्रतिपादणाऱ्या एका आधुनिक मार्क्सवादी टीकाकाराच्या आग्रही विधानांचा आहेर मी त्यांना करितों. मार्क्सवादाच्या दृष्टीनें वाङ्मयाची मीमांसा करणाऱ्या एडवर्ड अपवर्डनें असें निक्षून सांगितलें आहे कीं, "लेखकानें आपलें व्यावहारिक आयुष्य बदललें पाहिजे; लढ्यांतील प्रगमनशील पक्षाला मिळालें पाहिजे. हें जोंपर्यंत तो करीत नाहीं, तोंपर्यंत जगाचें खरेंखुरें शब्दचित्र देणें त्याला शक्य होणार नाहीं." (He must change his practical life, must go over to the progressive side of the conflict, to the side whose practice is destined to be successful; not until he has done this will it be possible for his writing to give a true picture of the world.) एडवर्ड अपवर्डनें म्हटल्याप्रमाणें लेखक लढ्यांत प्रत्यक्ष भाग घेवो वा न घेवो, पण समाजांतील क्रांतिकारक सामर्थ्यांचा साक्षात्कार होण्याइतकें तरी त्याच्या मनाचें तादात्म्य राष्ट्राच्या आणि जनतेच्या जीवनाशीं

झालें पाहिजे, यांत शंका नाहीं. आज मराठी साहित्यिकांचें तसें तादात्म्य झालेलें नसल्यामुळेंच, समाजाच्या अंतरंगांत धुमसत असलेल्या स्फोटक शक्तींचा साक्षात्कार त्यांना घडलेला नसल्यामुळेंच त्यांचें वाङ्मय सांचेबंद आणि निस्सत्त्व वाटत आहे.

## ही मनोव्याधि सर्व जगाची आहे

खुद्द साहित्यिकांनाहि आपल्या या अपुरेपणाची, या थिटेपणाची पूर्ण जाणीव आहे, हें त्यांच्या अलीकडील भाषणांवरून स्पष्ट दिसतें; व साहित्याच्या ज्या नव्या लोकशाही व्याख्या प्रो. फडके यांच्यासारख्या एका काळच्या इरसाल कलावादी कादंबरीकाराच्या मुखांतून सध्यां प्रकट होत आहेत, त्या झाल्या तरी या जाणिवेच्याच निदर्शक आहेत, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. मराठी साहित्यिकांत इतर दोष कितीहि असोत. पण, त्यांच्यांपैकीं कांहींना तरी आपल्या अपुरेपणाचें आत्मज्ञान झालें आणि श्री. खांडेकर यांनीं खुद्द महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या अध्यक्ष-पदावरून त्या न्यूनतेची जाहीर रीतीनें कबुली दिली, या प्रांजळपणा-बद्दल त्यांचें अभिनंदन करावयाचें कीं उपहास करावयाचा? पण मराठी वाङ्मयाचे मर्मज्ञ चिकित्सक श्री. पु. मं. लाड यांनीं, श्रीसमर्थांचा आणि रवींद्रनाथांचा आधार घेऊन, व्याधिताची कुचेष्टा करीत त्यावर मानसोपचार करण्याचा प्रयत्न केला आहे. मी कांहीं त्यांच्याप्रमाणें मानसोपचाराचें शास्त्र जाणत नाहीं. पण, मला वाटतें, त्या शास्त्रांतील उपचारपद्धतीचें मूलभूत तत्त्व व्याधिताविषयीं सहानुभूति हें असावें, उपरोधबुद्धि हें नव्हे. विशेषतः, सुधारलेल्या पाश्चात्य जगांत प्रत्यक्ष राहून आलेल्या त्यांच्यासारख्या न्यायपंडितानें मराठी साहित्यिकांच्या मनोव्याधीची, हलक्या हातानें पापुद्रे उकलण्याचा आव आणून, जी चिवडाचिवड केली आहे, तिचें मला नवल वाटतें. मी त्यांना अत्यंत नम्र-तेनें येवढेंच सांगतों कीं, मराठी लेखकांना ज्या मनोव्याधीनें आज ग्रासलें

आहे, ती व्याधि त्यांची एकट्याचीच नसून, सर्व जगांतील लेखकवर्ग किंबहुना सर्व बुद्धिजीवी जगच मुळीं त्या मनोव्याधीनें पछाडलेलें आहे. बडोदें येथील वाङ्मय परिषदेंत केलेल्या भाषणांत मी असें सांगितलें होतें कीं, "महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गाच्या जीवनांत एक प्रकारची न्यूनता, एक प्रकारची शून्यता उत्पन्न झाली आहे; व दारिद्र्य आणि बेकारी यांनीं गांजलेल्या त्याच्या त्रस्त मनाला कोणत्याहि गोष्टीकडे साशंकतेनें बघण्यापलिकडे दुसरें कांहीं सुचत नाहीं." महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गाच्या मनाची ही साशंकता आणि संत्रस्तता अलीकडील कथावाङ्मयांत प्रतिबिम्बित होत आहे, असें माझें मत आहे. पण, श्री. लाड म्हणतात, महाराष्ट्र आणि मराठी वाङ्मय यांच्या मनोव्याधीचें मी केलेलें हें निदान साफ चूक आहे. असेलहि कदाचित्. पण माझ्या अल्प बुद्धीला मात्र असें वाटतें कीं, महाराष्ट्रांतील बुद्धिप्रधान वर्गाला ज्या विफलतेच्या जाणिवेनें, ज्या क्रांतिगर्भ निराशेनें आज घेरलें आहे आणि ज्या युयुत्सु निराशेचें प्रतिबिम्ब मराठी कथावाङ्मयांत दिवसेंदिवस जास्त जास्त प्रखरतेनें पडत आहे, त्या निराशेचें, त्या विफलतेचें मर्म श्री. लाड यांना समजलेलें दिसत नाहीं. मात्र मी याबद्दल त्यांना दोष देत नाहीं; त्यांच्या विशिष्ट परिस्थितीचा तो दोष आहे. महाराष्ट्रांत पसरलेलें हें निराशेचें निबिड तमिस्र, हा विफलतेचा दारुण विषाद एकाकी नाहीं; जागतिक निराशेची, विराट् मानवी मनाला झालेल्या विफलतेच्या घोर जाणिवेची ही एक कला, ही एक ऊर्मि आहे. कोलनें या जागतिक दुरवस्थेचें वर्णन 'मंदी' (Slump) या आर्थिक शब्दानें केलें आहे; जोडनें 'निर्मूलता' (Rootlessness) या सामाजिक शब्दानें केलें आहे; हक्स्लेनें 'अशाश्वती' (Insecurity) या प्रापंचिक शब्दानें केलें आहे; तर लुविसनें 'विफलता' (frustration) या लाक्षणिक शब्दानें केलें आहे. रोग एकच; पण प्रत्येकानें आपल्या मनोधर्मानुसार त्याचें निरनिराळ्या शब्दांनीं वर्णन केलें आहे, एवढेंच.

मानवी मनाची वास्तविक प्रतिष्ठा आणि महति व व्यवहारांत आज अनुभवाला येणारी त्याची अप्रतिष्ठा आणि विफलता (The potenlial dignity and worth, the actual indignity and frustration of the human mind both are true) यांच्या तीव्रतम दाहक जाणिवेंतून ही जागतिक निराशा प्रकट झाली आहे. सर्व जगाच्या वाङ्मयावर जिथें या निराशेचें दाट सांवट पडलें आहे, तिथें मराठी कथावाङ्मयावरहि कुठें कुठें त्याची काळोखी पसरलेली दिसावी, यांत नवल काय?

## लक्ष्मीच्या तळहातावरला फोड

उलट श्री. लाड यांनीं अशी तक्रार करावयाला हवी होती कीं, ही जागतिक निराशा इतक्या उशिरा मराठी वाङ्मयांत कां प्रतिबिम्बित झाली? ही मानव जातीची मनोव्याधि मराठी साहित्यापर्यंत येऊन पोंचावयाला इतका विलंब कां लागला? त्यांना हें माहित असलें पाहिजे कीं, गेल्या महायुद्धानंतर आर्थिक मंदी आणि हलाखी यांनीं जगाचा जो ग्रास केला, त्यांतून हिंदुस्थानहि सुटलेलें नाहीं; व त्या युद्धांत मानवजातीच्या उन्नतीसंबंधींच्या सगळ्या जुन्या कल्पनांचा विध्वंस होऊन जें बौद्धिक अराजक जगांत उत्पन्न झालें, त्याचाहि परिणाम हिंदी सुशिक्षित समाजाच्या विचारांवर झाल्याशिवाय राहिलेला नाहीं. जगांत बोकाळलेल्या या आर्थिक आणि बौद्धिक अशा दुहेरी अराजकाचा हिंदी राष्ट्रीय चळवळींवर पडलेला प्रभावहि आपण गेलीं वीस वर्षें पहातच आहों. गेल्या दहा वर्षांत महात्माजींच्या नेतृत्वावरीलहि सुशिक्षितांच्या श्रद्धेला ओहोट लागून, आगामी भीषण लढयांत त्यांच्या अहिंसाधिष्ठित सत्याग्रहाचें कांटेकोर तंत्र कामीं येणार नाहीं, अशी बहुजनांचीहि दिवसेंदिवस खात्री होत चालली आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या संघर्षानें भारतीय जीवनाचा जुना अध्यात्मिक पाया ढांसळला; व सर्वथैव

आर्थिक अशा नव्या आत्मशून्य पायावर जीवनाची पुनर्घटना करण्याचा जो प्रयत्न साम्यवादी कार्यकर्त्यांनीं सध्यां चालविला आहे, त्याच्या इष्टतेविषयीं बहुजनसमाजच काय, पण सुशिक्षित वर्गहि साशंक आहे. आपल्या सभोंवतीं माजलेलें हें अराजक लक्षांत घेऊन श्री. लाड यांनीं वस्तुत: अशी तक्रार करावयाला हवी होती कीं, मराठी ललित वाङ्मयांत या अराजकाचें, या प्रक्षोभाचें आणि निराशेचें प्रतिबिम्ब इतक्या उशिरा कां पडलें? पण, तशी रास्त तक्रार न करितां, उलट मराठी ललित वाङ्मयांत अलीकडे व्यक्त होऊं लागलेल्या या असंतोषाबद्दल असमाधान दर्शवून, पाश्चात्य वाङ्मयाच्या अनुकरणामुळें मराठी वाङ्मय खुरटें झालें, असें त्यांनीं म्हटलें आहे; व परिस्थितीवर मात करून विश्वकीर्ति संपादणाऱ्या रवींद्रनाथांकडे बोट दाखवून महाराष्ट्रांतील साहित्यिकांना हिणविलें आहे. मला वाटतें, रवींद्रनाथांचें उदाहरण त्यांनीं घेतलें नसतें, तर बरें झालें असतें. लक्ष्मीच्या तळहातावरील फोडासारख्या या गर्भश्रीमंत कवीचें उदाहरण न घेतां त्यांनीं कै. डॉ. शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांचें उदाहरण कां घेतलें नाहीं, कोण जाणे. बंगालच्या राष्ट्रीय जीवनांतला सगळा प्रक्षोभ, सगळी विफलता आणि सगळा विषाद त्या भटक्या कलंदर साहित्यिकाच्या कथावाङ्मयांत आविर्भूत झाला आहे; पद्मेच्या प्रवाहांतील नौकेंत बसून सृष्टीशीं सुखेनैव हितगुज करणाऱ्या राजकवीच्या भावकाव्यांत नव्हे. खुद्द रवींद्रांच्याहि 'घरे बाइरे', 'गोरा', 'शेषेर कविता' वगैरे कादंबऱ्यांतून असंतोषाचे उसासे कांहीं कमी कानावर पडतात, असें नाहीं; व आपल्या एक्यांशाव्या वाढदिवशीं केलेल्या भाषणांत ब्रिटिश संस्कृतीच्या घटोत्कचमायेचें भुरळ आपल्या डोळ्यांवरून उडून गेल्याबद्दल जें आक्रंदन त्यांनीं नुकतेंच केलें, तें त्यांना देशांतील अघोर दैन्याची जाणीव प्रथमच इतक्या उत्कटतेनें झाली, याचें निदर्शक आहे. 'घरे बाइरे' या आपल्या कादंबरीवरील टीकेला उत्तर देत ना स्वत

रवीन्द्रांनींच असे उद्गार काढले आहेत कीं, "जे काले लेखक जन्मग्रहण करेछे सेई कालटि लेखकेर भितर दिये हयत आपन उद्देश्य फूटिये तूलेछे. लेखकेर काल लेखकेर चित्तेर मध्ये गोचरे ओ अगोचरे काज करछे. आमादेर देशेर आधुनिक काल गोपने लेखकेर मने जे सब रेखापात करेछे, 'घरे बाइरे' गल्पेर मध्ये तार छाप पडछे." अनुकरणाच्या व्याधींतूनहि रवींद्रनाथ अजिबात सुटले होते, असें नाहीं. ज्या इंग्रजी वाङ्मयावर आपली प्रतिभा पोसली आणि ज्याचे गंभीर प्रतिध्वनि अद्यापहि आपल्या हृदयकुहरांत (deep resonance to the recesses of our heart) घुमतात, अशी प्रांजळ कबुली आपल्या आक्रंदनांत रवींद्रांनीं दिली आहे, त्या वाङ्मयांतील शेले, टेनिसन, स्विन्बर्न प्रभृति कवींच्या साहित्याचा पगडा त्यांच्या मनावर कांहीं थोडथोडका बसलेला नव्हता. आजचें मराठी वाङ्मय अनुकरणात्मक आहे असें म्हणून जेव्हां श्री. लाड हे त्याला तुच्छ लेखतात, तेव्हां आपल्याला अत्यंत प्रिय असलेल्या जुन्या मराठी वाङ्मयालाहि कै. इतिहासाचार्य राजवाडे आणि कै. प्रो. वा. ब पटवर्धन यांनीं 'परभृत' म्हणून त्याच्यावर नेमका हाच आक्षेप घेतला होता, हें ते विसरतात. आणि, ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांची मजल तर जुनें मराठी वाङ्मय सगळें जाळून टाकण्याच्या लायकीचें आहे' असें म्हणण्यापर्यंत गेली होती, हें काय त्यांना माहित नसेल?

## चलनी नाण्यांचा खुळखुळाट

अर्थात्, आजचें मराठी वाङ्मय जर खुरटें असेल, तर पारतंत्र्याच्या विषारी सांवटांत वाढत असल्यामुळेंच तें खुरटें आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. पारतंत्र्यामुळें हिंदी लोकांच्या व्यक्तित्वाची पूर्ण वाढ होऊं शकत नाहीं (to the full height of their stature) असें जें कै. ना. गोखले वारंवार म्हणत, तें वाङ्मयाच्याहि

विकासाला लागू पडतें. इंग्लंड हें येवढें धनाढ्य आणि बलाढ्य राष्ट्र असूनसुद्धां त्या स्वतंत्र, प्रजासत्ताक राष्ट्रांतील वाङ्मयहि गेल्या महायुद्धानंतर उत्पन्न झालेल्या आर्थिक आणि बौद्धिक अराजकामुळें कसें खुरटून जाऊन निस्सत्व आणि सांचेबंद झालें आहे, याचें मार्मिक वर्णन हक्स्लेनें केलें आहे. तो म्हणतो, "हल्लीच्या कादंबरीकारांपैकीं फारच थोडयांना परिस्थितीचा ठाव घेणारी अंतर्दृष्टि आहे; व आपल्या झगझगीत रंगभूमीवर ज्या कळसूत्री बाहुल्या ते नाचवितात, त्यांच्याविषयीं त्यांना खरी सहानुभूतिहि नसते. आजच्या बहुतेक गोष्टींप्रमाणें कादंबरीलासुद्धां यांत्रिक कळा आली असून, तिची ठोक पैदास होत आहे; व शून्यांतून सृष्टि निर्माण करणाऱ्या खऱ्या कलावंताची प्रतिभा विफलतेमुळें नष्ट होत आहे." (Few present day novelists have any real insight into things or are in real sympathy with the puppets they dangle above their overlighted stage ...Like most things to-day it has been tarred with the brush of mechanisation and mass-production; individual genius, the genius of the craftsman who builds out of nothing a real work of art is dying of frustration.) परिस्थितीच्या मानानें आजचे ललित लेखक अपुरे पडत असल्याबद्दल आणि जीविताचा पूर्ण साक्षात्कार त्यांना होत नसल्याबद्दल अपवर्डनें तर याहिपेक्षां कडक तक्रार केल्याचें आढळतें. श्री. लाड यांना मराठी वाङ्मय खुरटें वाटतें, तें अनुकरणात्मक असल्यामुळें, त्यावर असंतोषाची छाया पडल्यामुळें. उलट, मला तें खुरटें वाटतें, तें पारतंत्र्याशीं झगडण्याची अदम्य ईर्ष्या त्याच्यांत अजूनहि येत नसल्यामुळें, देशांतील सार्वत्रिक विराट् असंतोष भव्य आणि उग्र स्वरूपांत अद्यापहि त्यांत प्रकट होत नसल्यामुळें. अनुकरणाची भीति मला वाटत नाहीं. जिथें आमचें आजचें सारें वैयक्तिक आणि

सामाजिक जीवनच मुळीं पाश्चात्य थाटावर चाललें आहे, तिथें एकट्या वाङ्मयालाच तेवढें उसनवारीबद्दल खिजविणें अन्यायाचें होणार नाहीं काय? शिवाय, आजचें मराठी वाङ्मय जरी कदाचित् अनुकरणात्मक आणि मध्यमवर्गीय असलें, तरी त्याचा अंतरात्मा परकीय किंवा नकली नाहीं, अशी निदान माझी तरी खात्री आहे. आधुनिक वाङ्मयाला उसनवारीबद्दल मोघम नांवें ठेवण्यापेक्षां श्री. लाड यांनीं जर त्यांत दर तीन चार वर्षांनीं बोकाळणाऱ्या खुळचट वादांची चिकित्सा केली असती, तर तें अधिक इष्ट झालें असतें. पुरोगामित्वाच्या भोंगळ नांवाखालीं मार्क्सवादापासून तो रसेलनीतीपर्यंत हर एक चीज खपविण्याचा जो सवंग खटाटोप गेलीं सात आठ वर्षें चालू आहे, त्याची अप्रयोजकता आणि अशास्त्रीयता श्री. लाड यांनीं जर आपल्या अधिकारवाणीनें चवाठ्यावर आणली असती, तर सध्यांच्या बौद्धिक अराजकाच्या कांहीं अंगांवर विदारक प्रकाश पडला असता. कलानीतिवाद, कलाजीवनवाद, पावित्र्यविडंबनवाद, नवमतवाद, पुरोगामित्व वगैरे चलनी नाण्यांचा जो खुळखुळाट आलटून पालटून सारखा कानांवर पडत असतो, तो प्रत्येक नव्या पाश्चात्य कल्पनेच्या अविवेकानें आहारीं जाणाऱ्या साहित्यिकांच्या बुद्धीच्या थिल्लर चाळ्यांचा निदर्शक आहे. विशेषत: 'जें पुढें जातें, तें पुरोगामी' अशी पुरोगामित्वाची निरर्थक व्याख्या जेव्हां बेजबाबदारपणानें घडाकून केली जाते, तेव्हां तर या साऱ्या थिल्लरपणाचा कहर होतो. रसेलनीति ही मानवी स्वातंत्र्याची पराकोटि आहे आणि मार्क्सवाद ही मानवी उन्नतीची परिसीमा आहे असें अट्टाहासानें प्रतिपादणाऱ्या या पुरोगामी मंडळीला हें आतां स्पष्ट सांगणें जरूर आहे कीं, रसेलची नवनीति आणि मार्क्सचा साम्यवाद यांना मानवी प्रगतीच्या शास्त्रांतला शेवटचा शब्द मानणें आंधळेपणाचें होईल. मानवी संस्कृतीच्या विकासाचे प्रयोग आणि प्रयत्न गेलीं हजारों वर्षें चालू आहेत व पुढेंहि

चालू राहतील. त्या विकासाच्या मार्गावरील मार्क्सवाद हा अखेरच्या मैलाच्या पाषाण आहे असें मानावयाला आणि तिथें मुक्काम ठोकून आपली बुद्धि कुंठित करून घ्यावयाला मी तरी तयार नाही. महंमद हा शेवटचा पैगंबर आहे आणि मानवजातीच्या धर्मकल्पनांचा विकास त्याच्यापाशींच कायमचा थांबला आहे, असें मानणाऱ्या मुसलमानांच्या धर्मवेडासारखीच मला ही मार्क्सवाद्यांची भूमिका वाटते.

## नव्या तत्त्वज्ञानाकडे तारतम्यानें पहा

उलट, मिल्टनच्या ओजस्वी वाणीचा अनुवाद करून मी तर असें म्हणेन कीं, "मला फक्त माझ्या विवेकबुद्धीप्रमाणें जाणण्याचें, बोलण्याचें आणि मोकळेपणानें युक्तिवाद करण्याचें स्वातंत्र्य द्या." (Give me the liberty to know, to utter and to argue freely according to conscience, above all liberties.) राष्ट्र, वंश किंवा वर्ग यांच्या आततायी अभिमानानें अस्तित्वांत आलेले पक्ष आणि त्यांनीं स्थापन केलेलीं एकमुखी, विजिगीषु राज्य हीं मला सारखींच त्याज्य, मानवी स्वातंत्र्याच्या आणि उन्नतीच्या दृष्टीनें सारखींच भयावह वाटतात. "राष्ट्रावर एकमुखी प्रभुत्व गाजविणारा पक्ष ही चीज इतिहासांत अपूर्व आहे," (A party which governs a nation totalitarianally is a new fact in history) ही मुसोलिनीची दर्पोक्ति स्टॅलिनच्या साम्यवादी राजवटीलाहि लागू पडते; व जर्मनी आणि इटली या राष्ट्रांत ज्याप्रमाणें राज्य, संघटना आणि लोक (state movement and people) हें त्रिकूट आहे, त्याचप्रमाणें रशियांतहि राज्य, पक्ष आणि कामगारवर्ग या त्रिकूटाचें एकमुखी राज्य चालू असल्याबद्दल डॉ. कार्ल श्मिट यानें जो अभिप्राय दिला आहे, तो कांहीं चुकीचा म्हणतां येणार नाहीं. (Even in the Bolshevist state of the Soviet Union a triune system of

state, party and labour has been attempted as a totalitarian conception of political and social reality). जनता आणि राज्यसत्ता यांची सांगड घालणारा पक्ष किंवा संघटना हा अभेद्य, पोलादी दुवा असून, जनतेचा एकवार विश्वास संपादन करून तो राज्यसत्ता कायमची बळकावून बसतो. या सत्ताधारी पक्षाला जो विरोध करील, तो प्रतिक्रांतिकारक, राज्याचा आणि देशाचा शत्रु; व त्याला देशोधडीला लावल्यावरहि तो जिथें कुठें असेल, तिथें मारेकरी पाठवून त्याचा नि:पात करावयाचा. जर्मनींत काय, इटलींत काय किंवा रशियांत काय अशा प्रकारची या त्रिकूटाची राज्यनीति आज दृष्टीस पडते. हें सगळें बोलत असतांना नाझीवाद आणि साम्यवाद यांच्या विचारप्रणालींतील मूलभूत फरकाची मला पूर्ण जाणीव आहे. पण, एकजिनसी, वर्गविहीन, निर्द्वंद्व समाजरचना निर्माण करण्याच्या मिषानें आतापर्यंत जे अघोर प्रकार रशियांत घडले आणि जे पुढेंहि कदाचित् जास्त प्रमाणांत घडण्याचा संभव आहे, ते लक्षांत घेतां मला साम्यवादहि (Communism) लोकशाहीला पोषक आहे असें वाटत नाहीं, हें मी स्वच्छ सांगून टाकतों. शिवाय, मानवी मनाच्या उन्नतीच्या दृष्टीनें साम्यवाद हा अपर्याप्त आहे, असेंहि मला वाटतें. मानवी संस्कृति, इतिहास आणि भवितव्य यांचा विचार करतांना फक्त भौतिक आणि आर्थिक प्रेरणाच तेवढ्या लक्षांत घ्यावयाच्या, किंबहुना त्या प्रेरणांच्या अनुरोधानेंच मानवजातीच्या आजपर्यंतच्या सर्व कर्तृत्वाचा अन्वयार्थ लावावयाचा आणि त्या दोन्ही प्रेरणांहून श्रेष्ठ आणि विशुद्ध अशी जी आत्मिक प्रेरणा तिचें मात्र मुळीं अस्तित्व सुद्धां मानावयाचें नाहीं, ही जी साम्यवादाची एकांगी भूमिका आहे, तीहि मला पटत नाहीं. मानवी संस्कृतींत जें जें कांही अत्यंत उन्नत, उज्ज्वल किंवा आल्हाददायक म्हणून आहे, त्या त्या सर्वांचा उगम अतींद्रिय अशा विशुद्ध आत्मिक प्रेरणेंतून झाला आहे,

अशी माझी भावना आहे; व त्यामुळें मला साम्यवाद हा अपर्याप्त आणि आततायी वाटतो. मार्क्सला स्वत:लाहि आपलें तत्त्वज्ञान कितपत पूर्ण वाटत होतें, याबद्दल शंकाच आहे. भांडवलशाही आणि तिला आधारभूत असलेलें जुनें अर्थशास्त्र यांचा तो क्रांतिवादी टीकाकार आणि नव्या अर्थशास्त्राचा निर्माता होता. पण भांडवलशाहीशीं झुंज देण्यांतच त्याचें सर्व चित्त गुंतलेलें होतें. भांडवलशाहीच्या विनाशानंतर जी नवी समाजरचना निर्माण करावयाची, तिच्या स्वरूपासंबंधीं किंवा ती कोणत्या पायऱ्यांनीं अस्तित्वांत यावी, यासंबंधींहि त्यानें कुठें निश्चित प्रतिपादन केल्याचें आढळत नाहीं. (Marx nowhere formulates clearly either the nature of the new society or the detailed steps by which it is to be approached.) म्हणूनच रशियांतील बोल्शेव्हिक क्रांतीनंतर या मुद्द्यावर तीव्र मतभेद होऊन लेनिनिझम्, स्टॅलिनिझम् वगैरे व्यक्तिनिष्ठ संज्ञा प्रचारांत आल्या. मार्क्सवादांतलीं हीं सगळीं वैगुण्यें लक्षांत घेऊन मी म्हणतों कीं, त्या वादाच्या नांवावर मराठी वाङ्मयांत जी हुकूमशाही गाजविण्याचा मधून मधून प्रयत्न होत असतो, तिची लेखकांनीं पर्वा करण्याचें मुळींच कारण नाहीं. मात्र, व्यक्तिमात्राला समान संधि, सर्व संपत्तीची समायिक मालकी आणि उत्पादनाच्या साधनांचें सामुदायिक नियंत्रण हीं समाजवादांतलीं (Socialism) तीन मूलभूत तत्त्वें निरपवाद असून त्या तत्त्वांनुसार हिंदी समाजाची पुनर्घटना होणें-अवश्य आहे. त्याशिवाय जाति, धर्म आणि वर्ग यांनीं विभागलेल्या आपल्या समाजांतील नाना प्रकारची विषमता नष्ट होऊन तो एकसंध आणि प्रबळ होणार नाहीं.

## लेखणी शस्त्रासारखी वापरा

महाराष्ट्रांत जी नवी निष्ठा, जो नवा ध्येयवाद प्रसृत व्हावा असें मला वाटतें, त्याची प्रस्तावना करण्यासाठीं मी हें बोलत आहे. गेल्या पाऊणशें वर्षांत रानडे, टिळक आणि गांधी या तीन महान्

नेत्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचे संस्कार महाराष्ट्राच्या प्रतिभेवर आणि साहित्यावर झाले; व लोकमान्यांच्या मृत्यूनंतर महात्माजींचें अहिंसात्मक सत्याग्रहाचें क्रांतिशास्त्र जरी महाराष्ट्रांत प्रभावी झालें, तरी त्याच वेळीं साम्यवादाचाहि प्रचार जोरानें होत होता. इतकेंच नव्हे, तर खुद्द राष्ट्रसभेंतीलहि पंडित नेहरू प्रभृति तरुण पुढारी समाजवादाचा उघड उघड पुरस्कार करतात. कारण, समाजवाद हें जसें साध्य आहे, तसेंच साधनहि आहे. समाजवादाच्या प्रभावानें जीं क्रांतीचीं सामर्थ्यें देशांत आविर्भूत होतील, तीं जशीं बहुजनसमाजांतली नाना प्रकारची विषमता नष्ट करून त्याला सुसंघटित करतील, तशींच स्वातंत्र्याच्या लढ्यांतहि नवा जोश निर्माण करतील. आपल्या समाजाचें पारतंत्र्य दुहेरी आहे : परसत्तेच्या पाशांनीं तर तो जखडलेला आहेच, पण स्वतःच्या हातांनीं तयार केलेल्या धार्मिक आणि सामाजिक पाशांनीं तो जास्त जखडून गेलेला आहे. यांपैकीं कोणते पाश आधीं तुटले पाहिजेत, यासंबंधीचा वाद 'आधीं सामाजिक कीं आधीं राजकीय' या नांवानें एका काळीं गाजला होता. सुदैवानें आज या प्रश्नावर मतभेद उरलेला नाहीं. आतां लेखकवर्गाचें काम फक्त येवढेंच आहे कीं, रानडे, टिळक आणि गांधी यांच्या प्रयत्नांमुळें समाजाच्या निरनिराळ्या थरांत जी विचारांची हालचाल आज सुरू आहे, तिला आपल्या मधुर आणि ओजस्वी वाणीनें शास्त्रीय वळण देऊन भावी क्रांतीचा मार्ग सुकर करावयाचा. इतिहासाचार्य राजवाडे यांनीं असे उद्गार काढले आहेत कीं—

> "भाषेचा संकोच म्हणजे आपल्या हालचालींचा संकोच हें लक्षांत घेतलें पाहिजे. जसजशा आपल्या हालचाली संकुचित, मर्यादित होऊं लागल्या, तसतसा मराठी भाषेचा संकोच झाला. तेव्हां मराठी भाषेचा विकास करण्याला आपल्या राष्ट्रीय हालचाली वाढविल्या पाहिजेत. मराठी भाषेला ऊर्जित दशेला आणणें ह्या प्रयोगाचा अर्थ कांहींतरी राष्ट्रहिताची हालचाल करणें हा आहे. दुसरा कांहीं नाहीं. स्वदेशाचें हित व स्वभाषेचा उपयोग हे समानार्थक शब्द आहेत."

राजवाड्यांनीं चाळीस वर्षांपूर्वी काढलेल्या या उद्गारांवरून भाषा आणि राष्ट्रीय चळवळी, वाङ्मय आणि राजकारण यांचा परस्परसंबंध कळून येईल. हा संबंध लक्षांत आणून राष्ट्रीय लढ्यांतलें आपलें स्थान घ्यावयाला मराठी साहित्यिकांनीं आतां ईर्ष्येनें पुढें आलें पाहिजे. पारतंत्र्यामुळें आमच्या अमोघ वाक्सामर्थ्याचा आम्ही हवा तसा उपयोग करूं शकत नाही असें त्यांनीं म्हणूं नये आणि आज तें कोणी ऐकूनहि घेणार नाहीं. समाजांतील इतर अनेक वर्ग, वृत्तिच्छेदाची भीति न बाळगतां, राष्ट्रीय लढ्यांत धडाडीनें भाग घेत असतां, समाजाच्या वैचारिक नेतृत्वावर ज्यांचा स्वाभाविक हक्क आहे, त्या साहित्यिकांनीं मागें पाय घेऊन कसें चालेल? देवकीचें जन्माला येणारें प्रत्येक मूल तिच्या हातांतून हिसकून घेऊन त्याची हत्या करणाऱ्या कंसाप्रमाणें क्रांतीच्या नुसत्या कल्पनांच्याहि आविर्भावानें गांगरून जाणारी जुलमी राज्यसत्ता त्यांच्या वाङ्मयाचा नाश करण्यासाठीं धडपडेल, यांत शंका नाहीं. पण, देवकीच्या अर्भकांप्रमाणें आपल्या प्रभावशाली प्रतिभेच्या अपत्यांची गळचेपी आपल्या डोळ्यांसमोर झालेली 'काळ'कर्त्यांनीं आनंदानें पाहिली नाहीं काय? आणि भासाच्या भवितव्यतेचें स्मरण मनांत जागृत असतांहि त्यांनीं या महाराष्ट्रभूमींत विशुद्ध स्वातंत्र्याची उपासना पुन्हा धैर्यानें सुरू केली नाहीं काय? त्यांचें उज्ज्वल उदाहरण आपल्या डोळ्यांपुढें असतां आपण पारतंत्र्याच्या धास्तीनें पाय मागें घेऊन कसें चालेल? प्राचीन काळचे ब्रह्मर्षि हे दर्भाच्या काडीवर अस्त्रांचें अभिरोपण करून शत्रूंचा निःपात करीत असत, महाराष्ट्रांतील साहित्यिकांनीं स्वतःच्या लेखणीचा उपयोग या आणीबाणीच्या वेळीं जर शस्त्रासारखा केला, तर बॅ. विनायकराव सावरकर यांच्यावर त्यांना लेखण्या मोडून शस्त्रें हातीं घ्या असें सांगण्याचा लाजिरवाणा प्रसंग पुन्हा येणार नाहीं.

## आपुलिया बळें नाहीं मी बोलत

मराठी लेखकवर्गाला अशा तऱ्हेचा उपदेश करण्याचा माझा अधिकार नाहीं, हें मी जाणून आहे. वयानें, गुणांनीं आणि लेखनकर्तृत्वानेंहि आजच्या प्रमुख साहित्यिकांपेक्षां लहान असलेल्या माझ्यासारख्या बात्याचा उपदेश त्यांनीं काय म्हणून ऐकून घ्यावा? म्हणून गेल्या शंभर वर्षांत वाङ्मयक्षेत्रामध्यें 'तपस्वी' असा जो एकच एक पुरुष या महाराष्ट्रभूमींत होऊन गेला, त्याच्या आर्ष वाणीचा आधार घेऊन मी आतांपर्यंत बोलत आलों. हेंहि बोलण्याचा हिय्या कदाचित् मला झाला नसता. पण, जगांतील प्रमुख राष्ट्रें युद्धाच्या प्रचंड वणव्यांत होरपळत असतां आणि हिंदुस्थानापर्यंत त्या वणव्याच्या ज्वाळा येऊन पोंचल्या असतां महाराष्ट्रांतील प्रमुख साहित्यिक एकमेकांची अभद्र कुचाळी करण्यांत गर्क असावे, हें मला बघवेना. म्हणून, विनय आणि भीति हीं दोन्ही सोडून देऊन, थोडया कडक शब्दांनी मी त्यांची हजेरी घेतली आहे. पण मला खात्री आहे कीं, श्री. वरेरकर, प्रो. चिं. वि. जोशी, प्रो. फडके, श्री. अत्रे, श्री. य. गो. जोशी प्रभृति माझे जुने स्नेही माझ्या या स्पष्टोक्तीचा राग मानणार नाहींत; व माझ्या भाषणांत जें काय घेण्याजोगें वाटेल, त्याचा 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्' या न्यायानें ते उदार मनानें स्वीकार करतील. आज आपला देश क्रांतीच्या प्रक्षोभांत उभा असून, त्या क्रांतीच्या पोटीं कोणत्या भीषण घटना दडलेल्या आहेत, याचें भाकित वर्तविणें कठीण आहे. म्हणून मराठी साहित्यिकांना माझी अशी प्रार्थना आहे कीं, या आणीबाणीच्या वेळीं त्यांनीं आपसांतलीं वैयक्तिक भांडणें थांबवून आपल्या सहविचारानें आणि सहकारितेनें महाराष्ट्रांत सामुदायिक नेतृत्व निर्माण करावें. ( १ ) समाजवादाच्या ( Socialistic ) तत्त्वांवर महाराष्ट्र समाजाची पुनर्घटना, ( २ ) महाराष्ट्राचें एकीकरण, ( ३ ) हिंदुस्थानाचें दास्यमोचन आणि ( ४ ) लढाऊ लोकशाहीची स्थापना या चार मुद्द्यांवर जर त्यांनीं सहविचार

करून ईर्ष्येनें मतप्रचार केला, तर सध्यां महाराष्ट्रांत माजलेल्या मतामतांच्या गलबल्यांतून जनतेला बाहेर काढून व्यापक राष्ट्रकार्याच्या मार्गाला लावल्याचें श्रेय त्यांना निस्संशय मिळेल. जातिवाद, राष्ट्रवाद, साम्यवाद, साम्राज्यवाद वगैरे निरनिराळ्या कल्पना आज लोकांपुढें असून त्या कल्पनांच्या कोलाहलांत व्यापक राष्ट्रीयत्वाचें अत्युच्च ध्येय लोपून जाईल कीं काय, असा प्रसंग सध्यां उपस्थित झाला आहे. आपल्यापुढें असलेल्या नाना प्रकारच्या प्रश्नांचा आणि वादांचा शास्त्रीय दृष्टीनें आणि राष्ट्रीय बुद्धीनें विचार करण्याची प्रवृत्ति लोकांत उत्पन्न झाल्याशिवाय समाजाच्या निष्ठेला आणि ध्येयांना स्थैर्य येणार नाहीं. हें कार्य आतां मराठी साहित्यिकांनीं केलें पाहिजे.

## ललित लेखक आणि वृत्तलेखक

अशा तऱ्हेची तळमळ जर मराठी साहित्यिकांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली, तर मराठी वृत्तलेखकांचें सहकार्य त्यांना सुलभतेनें मिळेल, अशी मी ग्वाही देतों. वृत्तसंस्थेविषयीं आज जी स्पर्धेची आणि किंचित् तुच्छतेची वृत्ति साहित्यिकांत दिसते, ती अत्यंत अयोग्य आहे. साहित्यिकांनीं वृत्तकारांना हीन लेखणें म्हणजे फुलांनीं वाऱ्याला हलकें लेखण्यासारखें आहे. वारा बिचारा काय, फुलें जो बरा वाईट गंध पैदा करतात तो वाहून नेऊन त्याचा फैलाव करतो. त्याच्यावर फुलांनीं रागावणें हें जितकें वेडेपणाचें आहे, तितकेंच, आपल्या ललित वाङ्मयाची जी बरीवाईट प्रतिक्रिया वृत्तपत्रांवर होत असते, तिचा राग साहित्यिकांनीं वृत्तपत्रांवर काढणें अप्रयोजकपणाचें ठरेल. शिवाय मराठी भाषेचा उत्कर्ष हा वृत्तसंस्थेच्या आश्रयानेंच बऱ्हंशीं झालेला आहे, हें साहित्यिकांनीं विसरूं नये. मराठी भाषेच्या प्रतिष्ठेसाठीं सरकारशीं झगडून, जगांतील नवे विचारप्रवाह मराठी वाङ्मयांत आणून आणि नव्या ग्रंथांचा गुणग्रहणबुद्धीनें परामर्श घेऊन वृत्तकारांनीं मराठी भाषेला

हे ऊर्जिताचे दिवस आगले, म्हणूनच महाराष्ट्रांत साहित्यिकांचा आज येवढा बडेजाव होतो आहे. आपटे, परांजपे, केळकर, खाडिलकर, कोल्हटकर, ओगले, करंदीकर, जावडेकर, लिमये, अळतेकर, फाटक, भावे यांच्यासारख्या उत्कृष्ट लेखकांनीं वृत्तसंस्थेच्या आश्रयानेंच मराठी भाषेची महनीय सेवा केली असून, आजहि धुरंधर, नवरे, रांगणेकर, पर्वते, ताम्हनकर, गाडगीळ, ग्रावडेकर, चिटणीस, टिकेकर, सरदेसाई, काणेकर, पाध्ये, वांदेकर, वकील, आमोणकर, पुरोहित, अंतरकर, देसाई प्रभृति ताज्या दमाचे लेखक वृत्तव्यवसायांत राहूनच महाराष्ट्राच्या विचारांना चालना देत आहेत. या वृत्तविशारदांचें सहकार्य जर मराठी साहित्यिकांना संपादन करितां आलें, तर महाराष्ट्रांत सध्यां बोकाळलेलें बौद्धिक अराजक नष्ट व्हावयाला वेळ लागणार नाहीं. संयुक्त महाराष्ट्र आणि स्वतंत्र हिंदुस्थान हीं दोन ध्येयें इतकीं विशाल, उज्ज्वल आणि परस्पर पूरक आहेत कीं, त्यांच्या सिद्धतेच्या महत्कार्याला आपली लेखणी वहाणें यासारखी दुसरी तपस्या, दुसरें यश नाहीं. ती करण्याचा संकल्प या जागतिक क्रांतीच्या मुहूर्तावर मराठी साहित्यिकांनीं केला, तर त्यांच्या वाणीचें आणि लेखणीचें अमोघ सामर्थ्य कारणीं लागेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५१२६
REFBK-0006126



महेश्वर, उज्जयिनी, पुणें, कल्याण, बडोदें आणि मुंबई या बृहन्महाराष्ट्रांतील सहा प्रमुख शहरीं भरलेल्या प्रांतिक साहित्य-संमेलनांचे अध्यक्ष या नात्यानें श्री. गजाननराव माडखोलकर यांनीं गेल्या पांच वर्षांत केलेल्या भाषणांचा संग्रह या पुस्तकांत केला आहे. हीं भाषणें साहित्याच्या व्यासपीठावरून केलेलीं असलीं, तरी फक्त कला आणि साहित्य यांचीच चर्चा त्यांत केलेली नाहीं; तर कला आणि साहित्य यांचें अधिष्ठान जें राष्ट्रीय जीवन त्याच्या पुनर्घटनेचाच विचार या सहा भाषणांत प्रामुख्यानें केलेला आहे. कारण,